Impact Factor
5.604
www.sjifactor.com

p-ISSN 2454-7409
e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष सहावे अंक दुसरा जानेवारी २०२१
Vol. 6 Issue 2
Jan. 2021
Regular Issue

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## MPSP

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

Peer Reviewed Annual National Indexed Research Journal
in Marathi
Published as per UGC (India) Guidelines

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Impact Factor 5.604 p-ISSN 2454-7409 e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका
# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 6 ISSUE 2 January 2021
वर्ष सहावे, अंक दुसरा, जानेवारी २०२१
URL https://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=603

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

## संपादक मंडळ Editorial Board

डॉ. राजू आदे, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे

**1. Dr. R.T. Ade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rajuade2512@gmail.com Mobile No.: +91-9422608715
**2. Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: +91-9422153353
**3. Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: +91-9765034097
**4. Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
**5. Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479

## Invited Editors

**1. Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
**2. Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**3. Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
**4. Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

1. **Mrs. Sonali Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
2. **Dr. J. Prabhash**, Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
3. **Dr. Ramesh Mangal**, NAAC Assessor, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
4. **Dr. Anil Gajbhiye**, Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
5. **Dr. Shashikant Sawant**, Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
6. **Prof. Dineshkumar Joshi**, Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
7. **Dr. Santoh Thakre**, Ex. Dean, Faculty of Social Science, S.G.B. Amravati Uni., Amravati
8. **Dr. P.W. Kale**, Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
9. **Dr. R.A. Mishra**, Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
10. **Dr. U.V. Navalekar**, Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
11. **Dr. J.M. Chatur**, Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
12. **Dr. Dhanaji Gurav**, Principal, Dr.Babasaheb Ambedkar College, Mahad, Dist. Raigarh,
13. **Dr. Leela More**, Ex-Professor, Government College, Indore, M.P.
14. **Dr. Sindhu Mandavkar**, Ex-Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra
15. **Dr. Kisan Patil**, M.J. College, Jalgaon, Khandesh, Maharashtra

**मुद्रक** : सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक** : डॉ. पवन मांडवकर

## Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobil No.: +91-9422867658, +91-9403014885
**Website:** 1) www.researchjournal.net.in 2) www.indiramahavidyalaya.com

**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-**
by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001

(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी बोली आणि साहित्य | प्रा. डॉ. कृष्णा महादू भवारी | ५–९ |
| २ | प्रज्ञा पवार आत्मभान देणारी कवयित्री | प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश | १०–१२ |
| ३ | वारकरी संतकवयित्रींचे काव्यधन | डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे | १३–१६ |
| ४ | महानगरीय समाजजीवनाची मूलगामी चिकित्सा | प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत | १७–२१ |
| ५ | संतसाहित्यातील प्रबोधन | डॉ. प्रमोद देवके | २२–२४ |
| ६ | डोळे माझे सूर्य झाले : काव्यातील आंबेडकरवाद | प्रा. डॉ. मिलिंद भिवाजी कांबळे | २५–२८ |
| ७ | निवडक नायिकाप्रधान पौराणिक मराठी कादंबऱ्यांचा आशय | गौरी बबन गावडे | २९–३३ |
| ८ | 'किंगरी'च्या निमित्ताने | डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे | ३४–३६ |
| ९ | शाहू महाराजांच्या शिक्षणकार्याचे स्वरूप व व्याप्ती | डॉ. अनमोल शेंडे | ३७–४० |
| १० | 'डमोफून' कवी केतन पिंपळापुरे | प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम | ४१–४३ |
| ११ | कोविड–१९ आणि शिक्षण व्यवस्थेसमोरील नवी आव्हाने | प्रा. डॉ. स्वाती दीपक दामोदरे | ४४–४८ |
| १२ | रमेश बुरबुरे यांच्या अप्रकाशित गझला : आस्वाद आणि आकलन | प्रा. डॉ. सिद्धार्थ भगत | ४९–५२ |
| १३ | लोकनाट्य : स्वरूप व परंपरा | डॉ. देवमन दत्तुजी कामडी | ५३–५७ |
| १४ | दलित कविता – कवी नारायण सुर्वे | प्रा. रेखा व्ही. इंगोले | ५८–६० |
| १५ | श्री गुलाबराव महाराजांची स्त्रीगीते : चिकित्सा | डॉ. संजय नीळकंठ पाटील | ६१–६६ |
| १६ | 'चाकाची खुर्ची' आत्मकथनातील नसीमा हुरजूक यांच्या दिव्यांग जीवनाचे चित्रण | श्री. संदीप रमेश चौधरी (संशोधक विद्यार्थी)<br>प्रा. डॉ. फुला बागुल (संशोधक मार्गदर्शक) | ६७–७१ |
| १७ | "वारे वाहतायत..." : समकालीन सामाजिक अगतिकतेचा उच्चार | डॉ. नीलांबरी मंदार कुलकर्णी | ७२–७६ |
| १८ | वैदिकसंस्कृती अर्थ व प्रसार | प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर | ७७–७९ |
| १९ | कोरोना आणि डिजिटलायझेशन | डॉ. पवन मांडवकर | ८०–८४ |

# संपादकीय

'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'चा हा सहाव्या वर्षीचा दुसरा अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संशोधकांनी विविध विषयांवरील उत्तमोत्तम शोधनिबंध प्रकाशनार्थ पाठविले व पीअर रिव्ह्यू समितीकडून झालेल्या छाननीतून प्रकाशनयोग्य अशा निबंधांना हिरवी झेंडी मिळाल्यावर हा अंक तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय नियमावलीनुसार शोधनिबंध प्रकाशित करण्यासंदर्भात सर्व संशोधक, अभ्यासक लेखकांना आम्ही सतत आवाहन करतो आणि त्याला शोधनिबंधलेखकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो. यूजीसीचा नियतकालिकांसदर्भात जी नियमावली आहे, तिचे तंतोतंत पालन 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' करते. हे नियतकालिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या मार्गदर्शनात प्रकाशित होते. पी–आयएसएसएन व इ–आयएसएसएन प्राप्त या नियतकालिकाचा इम्पॅक्ट फॅक्टरही पाचच्या वर आहे.

शोधनिबंध लेखकांनी शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळावा, ही आमची अपेक्षा असते. त्यात गोषवारा अथवा सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष किंवा समारोप, संदर्भ यांचा समावेश अनिवार्यपणे करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात. शोधनिबंध पूर्णत: तपासूनच पाठवावा. जर्नल हे गूगल, एसएसआरएन, रिसर्च गेट यांच्याशी लिंक केले असल्याने आपल्या निबंधाचे शीर्षक, लेखकाचे नाव व गोषवारा युनिकोड फॉन्टमध्ये मराठीत व त्याखाली इंग्रजीत अनुवाद टाईम्स न्यू रोमन मध्ये पाठविल्यास त्याचा आपल्याला फार मोठा फायदा होतो.

हे जर्नल गूग ल कनेक्ट असलेल्या www.researchjournal.net.in या व इंदिरा महाविद्यालयाच्या www.indiramahavidyalaya.com या वेबसाईटवर Research Journal या हेडमध्येही ठेवले जाते. त्यामुळे आपल्या निबंधाचे शीर्षक, विषय किंवा लेखकाचे नाव गूगलवर सर्च करताच आपल्यापुढे आपला निबंध किंवा त्यासंदर्भातील माहिती निबंध प्रकाशित झाल्यावर ओपन होते. गुगल स्कॉलर, रिसर्च गेट, एसएसआरएनवर आपण असल्यास, आपला शोधनिबंध दर्जेदार असल्यास, सायटेशन मिळाल्यास आपोआप तिथे नोंद होते. 'नॅक'मध्ये हे शोधनिबंध दाखवता येतात. आपल्याला दिलेली लिंक आपण नॅक SSR मध्ये, आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील आपल्या रिसर्च पेपर्समध्ये तसेच आपल्या बायोडाटातील रिसर्च पेपर्ससह विविध ठिकाणी नमूद करू शकता. Peer Reviewed जर्नल असल्याने यातील शोधनिबंध विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विविध प्राधिकरणांवरील नॉमिनेशन/को ऑपसाठी ग्राह्य धरले जातात. तसेच एपीआयसाठी Peer Reviewed जर्नलमधील शोधनिबंधांचे गुण ग्राह्य धरता येतात. हे १८ जुलै २०१८ रोजी यूजीसीच्या नियुक्ती व पदोन्नतीसंदर्भात प्रकाशित 'द गॅझेट ऑफ इंडिया' मधील गाइडलाइन्समध्ये पृ. क्र. १०५ वर टेबल क्र. २ मध्ये पहिल्याच क्रमांकावर आहे. हे बघण्यासाठी त्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.
https://www.ugc.ac.in/pdfnews/4033931_UGC-Regulation_min_Qualification_Jul2018.pdf

यूजीसीच्या नोटिफाईड जर्नल्स यादीत येण्यासाठी विहित मार्गाने नियतकालिकाने अर्ज दाखल केलेला आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने अधिकाधिक दर्जेदार शोधनिबंध ऑनलाईन व ऑफलाईन प्रकाशित करण्याची संधी 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'ला मिळत राहील, हीच अपेक्षा!

— डॉ. पवन मांडवकर
व संपादक मंडळ

# आदिवासी बोली आणि साहित्य

प्रा. डॉ. कृष्णा महादू भवारी
मा.ब. श्री. क. कन्या महाविद्यालय, कडेगाव, जि. सांगली, महाराष्ट्र (India)
इ मेल bhawarihemant@gmail.com भ्रमणध्वनी ९४०३७२४०५८७३८५६७७९६३

## गोषवारा (Abstract)

आदिवासी साहित्यातील अनुभवविश्व हे वास्तवाशी निगडीत असल्यामुळे आदिवासी साहित्यातील घटना, प्रसंग आणि पात्रांच्या तोंडचे उदगार हे त्यांच्या बोलीतील असल्यामुळे आदिवासी साहित्यातील कलाकृती हया थेट मानवी जीवनाशी संवाद साधतात. त्यांच्या कलाकृती कुठल्याही प्रकारचा कृतिमपणा जाणवत नाही. त्यांच्या कलाकृतींना रचनाबंध नसतो. जे काही आहे ते जगण्या भोगण्याची व्यथा आणि आपल्या संस्कृतीच्या पाऊलखुणा जपत हा समाज निसर्गाच्या सानिध्यात राहत आहे. म्हणून कोणत्याही आदिवासी लेखकाच्या लेखनीतून तेथील निसर्ग, समाज, संस्कृती आणि त्यांची बोली या घटकांचा प्रामुख्याने विचार केलेला असतो. आदिवासी बोली हया समृध्द आहेत. त्यांना स्वतंत्र अशी लिपी नाही परंतु प्रत्येक बालीचे खास वैशिष्टये आहे. म्हणून या बोलींचे संवर्धन झाल्यास, आदिवासी साहित्यामध्ये त्या रूजल्या तर भविष्यात आदिवासी साहित्य प्रवाह हा नक्कीच विस्तार पावेल यात शंक नाही.

## प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ग्रीयर्सन यांनी भारतीय भाषांची पाहणी केली तेव्हा त्यांना १७९ भाषा आणि ५४४ बोली वापरात असल्याचे दिसून आले. त्यापैकी चारशे बोली हया आदिवासींच्या होत्या. बोलीच्या संदर्भात जागतिक स्तरावर विचार केला असता आपल्याला असे दिसून येते की, विविध राष्ट्रामध्ये अनेक आदिवासी बोली बोलल्या जातात. 'फाऊंडेशन ऑफ लॅंग्वेज' या ग्रंथात रॉबर्ट ग्रे या भाषा शास्त्रज्ञांच्या मते जगात २७८६ बोलीभाषा अस्तित्वात असल्याचे नमूद केले आहे. यातील एक हजाराहून अधिक बोलीभाषा अमेरिकेत आदिवासी जमातीत बोलल्या जातात. तर पाचशेहून अधिक बोलीभाषा आफ्रिकेतील विविध जमातीत बोलल्या जातात. यावरून आदिवासींच्या बोली किती समृध्द आणि महत्वपूर्ण आहेत याचे आकलन आपल्याला होते. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर महाराष्ट्रात आदिवासींच्या एकूण ४५ जमाती आहेत. प्रत्येक जमातीची एक स्वतंत्र अशी बोली अस्तित्वात आहे. तरीही काही संशोधकांच्या मते महाराष्ट्रात आदिवासींच्या लहान–मोठया अशा एकूण ७४ बोली भाषा आहेत.

भाषा आणि समाज यांची जडणघडण ही समांतरपणे सुरू असते. आपण जेव्हा बोलींचा विचार करतो तेव्हा आपल्याला एक गोष्ट लक्षात येते की, मानवी जीवन भाषेशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही. भाषेमुळे अनेक पिढया, सामाजिक वर्ग भौगोलिक प्रदेश यांना जोडून घेऊन एक सुसंघटित समाज उभा राहत असतो. एवढेच नव्हे तर भाषा आणि संस्कृतीचा एक अतूट परस्पर संबंध असतोच. म्हणून कुठल्याही संस्कृतीचा अभ्यास करायचा असेल तर त्या समूहाच्या बोलीचा अभ्यास करावा लागतो. थोडक्यात बोली हे संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे.

आदिवासी संस्कृती ही जागतिक स्तरावर एक श्रेष्ठ संस्कृती समजली जाते. त्यामुळे या संस्कृतीत बोलल्या जाणाऱ्या बोली ह्या तितक्याच महत्त्वाच्या आहेत. आदिवासी बोलींचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, आदिवासींच्या काही बोली हया मराठी भाषेच्या जवळच्या आहेत तर काही बोली दूरच्या आहेत. उदा. वारली, कातकरी, ठाकर, महादेव कोळी यांच्या बोलह हया मराठी भाषेच्या जवळच्या आहेत. थोडक्यात मराठी भाषेचा अपभ्रंश होऊन हया बोली निर्माण झाल्याचे दिसून येते. परंतु कोरकू, कोलाम, पावरा, माडिया, गोंड यांच्या बोली हया स्वतंत्र आहेत. मराठी भाषेपासून काहीशा दूर आहेतत्र असे असले तरीही आदिवासींच्या अनेक बोलींमधून कसदार साहित्य निर्मिती होत आहे. ही एक प्रकारे परिवर्तनाची नांदी असल्याचे लक्षात येते. सदरच्या शोधनिबंधात आदिवासींच्या काही निवडक लेखक– कवींच्या साहित्यातील बोली कशा प्रकट झालेल्या आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आदिवासी साहित्यामध्ये काही कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र आणि नाटक यांच्या तुलनेत कविता हा साहित्यप्रकार मोठया प्रमाणात लिहिला गेल्याचे दिसते. त्यामुळे आदिवासी कवितेमध्ये तसेच कथा कादंब—यांमधूनही अनेक आदिवासी बोलींचे उत्तम नमुने आपल्याला पहावयास मिळतात. आदिवासी आपल्या बोलीतून साहित्य लिहू लागला परंतु काही सामान्य वाचकाला त्या बोलीचा अर्थ लावणे कठीण होऊ लागले म्हणून काही ही कवी लेखकांनी त्याचा मराठीतून अनुवाद केलेला आहे. आदिवासी लेखक त्याचा अनुभव व्यक्त करताना जी बोली वापरतो त्या बोली भाषेमुळे कलाकृतीत एक प्रकारे जिवंतपणा आल्याचे दिसून येते. तुम्ही जर विशिष्ट बोलीच्या नावाखाली साहित्यनिर्मिती करत असाल आणि त्यामध्ये त्या बोलीचा समावेश नसेल तर सदरची कलाकृती कुठेतरी ओकीबोकी वाटेल, तिचा आत्मा हरवल्यासारखा वाटेल.

## वाहरू सोनवणे यांच्या कवितेतील भिलोरी बोली

वाहरू सोनवणे यांनी आपल्या काव्यातून काही भिलोरी कविता लिहिलेल्या आहेत. त्यांचे ‘गोधड’ आणि ‘रोडाली’ हे दोन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. गोधड काव्यसंग्रहात त्यांनी ज्या भिलोरी बोलीमध्ये कविता लिहिलेल्या आहेत. त्यांचा मराठी अनुवाद त्यांनी दिलेला आहे. उदा.‘खावटी’ या कवितेत ते म्हणतात,

आठयाभर व्हई त येवा,<br>
मी शेरभर सांगनील... मग,<br>
ढेड आठवर वनी, पन<br>
पाटील आयकना न्हा.

वरील कविता ही भिलोरी बोलीतली असली तरीही कवीने त्याचा तिथेच मराठी भाषेत खुलासा केलेला आहे. तो असा, आठवडाभर असेल या मी शेरभर सांगितले. नंतर दीड आठवडयावर आले पण पाटलांनी ऐकलं नाही. अशाप्रकारे मराठीतून अर्थ दिल्यामुळे ज्या वाचकांना भिलोरी भाषेची जाण नाही त्यांना कवितेचे रसग्रहण करण्यात सोपे जाते. त्यांच्या ‘रोडाली’ या काव्यसंग्रहातही त्यांनी दोन ते तीन भिलोरी कवितांचा स्वतंत्र असा समावेश केलेला आहे. तो असा.

ते चॉदपं जाई वुनत<br>
तिस्ना देखाय नया<br>
हामुन, खेतमां जाई वुनत<br>
घाम गाई वुनत<br>
ठना कोला काहीच नाहा?

वरील कविता ही सामान्य वाचकाला प्रथमदर्शनी आकलन न होणारी आहे. कारण त्यातील ‘तिस्ना’, ‘हामुन’ ‘वुनत’ हे शब्द अपरिचित आहेत. त्यामुळे कवितेचा भावार्थ सामान्य वाचकाला समजला नाही तरी कवीने त्याचा मराठीतूनही अर्थ देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो असा. ते चंद्रावर जाऊन आलेत त्यांचे कौतुक झाले. आम्ही शेतात जाऊन आलो, घाम गाळून आलो याचे कोणाला काही नाही ही? अशाप्रकारे भिलोरी बोलीतूनन कवी व्यवस्थेला जाब विचारतात.

भिलोरी बोलीचा आपण बारकाईने अभ्यास केल्यास आपल्याला असे लक्षात येते की, ही जी बोली आहे तिच्यावर हिंदी भाषेचा जास्त प्रभाव पडलेला दिसतो. तसेच काही अंशी गुजराती भाषेचाही प्रभाव पडलेला दिसतो. याचे कारण असे की, धुळे, नंदुरबार, जळगाव या सीमांत भागांमध्ये ही बोली बोलली जात असल्यामुळे नकळतपणे हिंदी आणि गुजराती चा प्रभाव हया बोलीवर असल्याचे जाणवते.

## चामुलांल राठवा यांच्या कवितेतील देहवाली बोली

एखादी बोली वाचकांना अनभिज्ञ असेल तर त्या साहित्यातील शब्द कळा, आशय लवकर समजत नाही. म्हणून तर काही कवी लेखक विशिष्ट बोलीतील शब्दांचा अर्थ मुद्दाम प्रमाण भाषेत देत असतात. कवी चामुलाल राठवा यांनी मात्र देहवाली बोलीतून काही कविता लिहिलेल्या आहेत. परंतु त्यांचा अर्थ किंवा त्याचा अनुवाद मराठीतून दिलेला नाही. त्यामुळे सदरची कविता समजण्यास अवघड जाते. उदाहरणार्थ त्यांच्या ‘रेवॉय’ ही कविता देहवाली बोलीचा एक उत्तम नमुना आहे.

या रेवॉय,
आमॉहांन आमीं
तो आरी नॉय रेवॉय
मॉ जात–जोमात
चाल्ये जेहेंतेहे रेरॉय
वतन सोडीन.

वास्तविक पाहता देहवाली बोली ही भिलोरी बोलीचाच एक पोट बोली आहे. तरीही वाहरू सोनवणे यांच्या कवितेतील बोली आणि चामुलाल राठवा यांच्या कवितेतील बोली यांच्यात आपल्याला फरक जाणवतो. कवी चामुलाल राठवा यांनी मात्र या कवितेचे अनुवाद केलेले नाही. त्यामुळे 'रेवॉय', 'आमॉहांन' यांसारखे शब्द अपरिचित वाटतात. या कवितेचा अर्थ असा होतो की, राहता येणार नाही तुला सोडून आम्हाला तुझ्याशिवाय राहता येणार नाही. माझी जमात निघाली इकडे तिकडे राहायल वतन सोडून ... थोडक्यात देहवाली बोली ही भिलोरी बोली पेक्षाही मराठी भाषेच्या दूरची दिसते.

## तुकाराम धांडे यांच्या कवितेतील डांगणी बोली

सहयाद्री पर्वत रांगेतील नगर आणि नाशिकच्या सीमाभागत डांगणी बोली बोलली जाते. ही बोली भाषेच्या अगदी जवळची बोली आहे. केवळ शब्दांचा अपभ्रंश होऊन त्या बोलीची निर्मिती झालेली आहे. हया बोलीमध्ये काही शब्द मात्र पूर्णपणे स्वतंत्र आहेत. त्याचा अर्थ त्याचा अर्थ आपल्याला समजूनच घ्यावा लागतो. उदाहरणार्थ 'वावधान ' ही त्यांची कविता आणि त्या कवितेतील काही शब्द हे डांगाणी बोलीचे प्रतिनिधित्व करतात.

आभाळ भरून आगूट
अन् उभा माणूस सिजल असा उकाडा
पाणी पडायला लागला तं बचकायवढा शिंतोडा
झाडांचया माना मुरगाळीत
पालापाचोळा आभाळात भिरकावीत
पत्रं उडवीत अन् कौला फोडीत
जसा चिंदाड आवरत आला..

या कवितेत 'वावधान' म्हणजे वावटळ, वादळ असा अर्थ होतो. या कवितेतील 'अगोट','बचकाएवढा', 'चिंदाड' हे शब्द डांगाणी बोलीतील आहेत. थोडक्यात धांडे यांच्या कविता ज्या आहेत त्या मराठी मिश्रित आदिवासी बोलीमधील आहेत. त्यामुळे त्यांच्या कविताचे आकलन चटकन होते.

उषाकिरण आत्राम यांच्या कवितेतील गोंडी बोली–

उषाकिरण आत्राम यांच्या कविता प्रामुख्याने गोंडी बोलीतील आहेत. त्यांच्या 'मोटयारीन' या काव्यसंग्रहातील गोंडी बोली ही पूर्णपणे स्वतंत्र आहे. एदात्र घ्यायचे झाल्यास त्यांची 'कूक!'ही कविता महत्त्वाची आहे. त्यात त्या म्हणतात,

'नना हिल्ले लाक्सीका कूकू – सूर्यातिच्चोर लिंगो बाबा!
इमा नावा सिवलीपरो सूरीयाला मंदोनी!

कवयित्री उषाकिरण आत्राम यांची ही कविता पूर्णपणे स्वतंत्र गोंडी बोलीतील आहे. गद्यापेक्षा पद्यामध्ये बोलीचा समावेश करणे, काव्य निर्मिती करणे तसे जिकरीचे काम आहे.आदिवासी कवींनी हे काम अत्यंत लिलया पेलले आहे असे म्हणावे लागेल.

याव्यतिरिक्त भुजंग मेश्राम यांचा 'उलगुलान' हा काव्यसंग्रह गोंडी बोलीतील आहे त्यातील कवितांचे त्यांनी अनुवाद केलेला आहे. तर भावेश बागूल यांच्या 'पातरी' या काव्यसंग्रहातून स्वतंत्र डांगणी बोलीचा अविष्कार पाहायला मिळतो. या कवितांचा अनुवाद त्यांनी मराठीमध्ये केला आहे.

गद्याच्या बाबतीत मात्र स्वतंत्र आदिवासी बोलीतून कलाकृती अस्तित्वात नाही. याचे कारण या साहित्यकृतींना भाषिक दृष्टया काही मर्यादा आल्याचे जाणवते. कथा, कादंबरी, आत्मकथन, नाटक या

साहित्यकृतीमंध्ये बोलीतील जे संवाद आहेत किंवा पात्रांच्या तोंडचे निवेदन आहे ते अवतरण चिन्हामध्ये द्यावे लागते. त्यामुळे कलाकृतीत एक प्रकारे जिवंतपणा जाणवतो.

नजुबाई गावित यांच्या लेखनातील मावची बोली–

नजुबाई गावित यांनी आपल्या साहित्यामध्ये प्रामुख्याने मावची बोलीचा समर्थपणे वापर केलेला दिसतो. त्यांच्या 'तृष्णा' या आत्मकथनामध्ये अनेक लोकगीतं,रूढी, परंपरा ज्या रेखाटले आहेत त्या मावची बोलीतील आहेत. उदा. लग्नविधी मध्ये नवरा–नवरीची अंघोळ झाल्यानंतर ते कपडे बदलतात त्यावेळी एक गीत म्हटले जाते ते असे.

मसूरी लुगडा खोयटी काढे वा बेना ।
उकीडे चिंधडी कासडी काम रा लवंडा ।।

वरील ओळींचा असा अर्थ होतो की, नवरी जशी मसराइज् लुगडं नेसलेली. नवरा जसा उकिरडयावरच्या चिंध्या नेसलेला. आदिवासी बोलीचे खरं रूप पाहायचं असेल तर लिखित साहित्यापेक्षा मौखिक साहित्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये दिसते. नजुबाई गावित यांच्या 'आदोर', 'नवसा भिलणीचा एल्गार', 'भिवा फरारी' या कलाकृतीमंधून देखील आदिवासी बोलीचा प्रत्यय आलेला आहे.

## उषाकिरण आत्राम यांच्या लेखनातील गोंडी बोली –

आदिवासी साहित्यातूनही प्रतिमा विश्वाचा एक आगळा वेगळा आविष्कार तसेच आदिवासींचे निसर्गावलंबी स्वच्छंद महाविश्व प्रकटलेली दिसते. उदा. उषाकिरण आत्राम यांच्या 'अहेर' या कथासंग्रहातील संवाद तसेच उपमा आणि प्रतिमा निसर्ग घटकांनी कशा बहरले आहेत हे पाहण्यासारखे आहे. 'मधासारखा, चिकण्या माती सारखी, तिखाडी गवत फुलासारखे, रानजुई सारखी, कोंबा सारखी' अशी निसर्गातील रूपे आलेली आहेत.

याच कथासंग्रहात गोंडी बोलीतील अनेक शब्द, वाक्प्रचार, म्हणी आलेल्या आहेत. उदा. 'टोला' (वस्ती), 'निरोसा', 'बेलोसा', रेलॉ' असे असंख्य अस्सल गोंडी बोलीतील शब्द आलेले आहेत. गोंडी बोलीवर काही अंशी तेलगुचा प्रभाव असल्याचे दिसून येतो. थोडक्यात भिलोरी बोलीवर गुजरात राजस्थान आणि भाषेचा प्रभाव दिसतो तर आंध्र प्रदेशाला जवळ असणा–या महाराष्ट्राच्या सीमांत प्रदेशात गोंड, माडिया, कोलाम यांच्या बोलीवर तेलगुचा ठसा उमटलेला दिसतो.

## माधव सरकुंडे यांच्या लेखनातील आंध जमातीची बोली

प्रा. माधव सरकुंडे यांनी 'वाडा' या कादंबरीतून यवतमाळ परिसरातील आंध समाजातील बोलीचा अविष्कार प्रकट झालेला आहे. कादंबरीची सुरूवातच आंधवाडयापासून होते. या कादंबरीतील संवाद हे आदिवासी बोलीतील असले तरी ते मराठी भाषेच्या जवळचे आहेत. उदा. 'बरी आंधाडे हो! कर्ज नेतानी लाज वाट नाही, अन् देतांनी चावळया बावळया करता.' त्यांच्या 'सर्वा' 'ताडम' या कथासंग्रहांतील बोलीही याच प्रकारची आहे.

कृष्णा भवारी यांच्या लेखनातील मावळी बोली–

डॉ. कृष्णा भवारी यांची ही 'इधोस' ही कादंबरी प्रसिध्द आहे. त्याचबरोबर अलीकडेच त्यांचा 'मातेरं' नावाचा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. या दोन्ही पुस्तकांमध्ये त्यांनी पात्रांच्या तोंडचे संवाद अत्यंत चपखलपणे मावळी बोलीतील रेखाटले आहेत. त्यामुळे या दोन्ही कलाकृती वेगळया वळणाच्या ठरल्या आहेत. आपल्या 'इधोस' कादंबरीमध्ये ते लिहितात, 'आयच्यान रं बुवा, मिया नाय दडावला, आरं, मी हागून आले, म्हनला तमाकू खावा म्हणून बटवा काढला, तेवढयात माहया ध्यानात आले की ढोल नाय, म्हणून लगेच धोंडयाला उठवला. मी कहयाला दडवू. हया म्हनजे, 'इकतची कळ अन् भागुबाय सिंदळ,' अशी झाली माही गत.' " तसेच मातेरं " या कथासंग्रहातील 'टिपवण' या कथेतील संवाद पहा. 'झुबे वैनी, तुहा काय डॉका बिका फिरलाय का? एवढया राती– रूतीला एकटीचे येहरीकं चाललेय. मच बा तू दम धरला. डोळयात बॉट घातल्याना दिसत नाय,' या दोन्ही संवादावरून असे लक्षात येते की, मावळीबोली ही मराठीचा काहीसा अपभ्रंश होऊन निर्माण झालेली आहे. डांगाणी बोली आणि मावळी बोलीमध्ये बराच साम्य असल्याचे जाणवते. कारण हया दोन्ही बोलींचा भूप्रदेश हा जवळचा असल्यामुळे त्यामध्ये काही शब्दांमध्ये साम्य जाणवते.

याव्यतिरिक्त एम.डी. रामटेके यांच्या 'आम्ही माडीया' या पुस्तकातील माडिया बोली ही गडचिरोलीतल्या आदिवासींच्या जीवनावर भाष्य करणारी आहे. 'आम्ही माडिया' मध्ये लेखकाने अनेक ठिकाणी निवेदनाच्या

स्वरूपात ही बोली वापरलेली आहे. संवाद रूपात तर ही अनोखी बोली आपल्याला पाहावयास मिळते. या बोलीचे वैशिष्टये असे की, यातील शब्द हे मराठी भाषेच्या खूप दूरवरचे आहेत. त्यामुळे लेखकाने काही शब्दांचे अर्थ, संकल्पना मराठीमध्ये सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदा. या पुस्तकातील एक निवेदन पहा. 'वामाट रो! हिक्के वामाट रो, ईगो जेटले मांता वामाट रो, कात्तामतोर मारींगा आंगाट रो!' याचा अर्थ असा की, इकडे अस्वल आहे. मिळेल त्या झाडावर चढा, असं ते आम्हाला सांगत होते.

अशाप्रकारे आदिवासी लेखकांनी आपल्या बोलीचा प्रभावी वापर करून अनेक साहित्यकृती निर्माण केल्या आहेत. त्यामुळे आदिवासी साहित्याला एक प्रकारे संजीवनी आली आहे. आदिवासी साहित्याचे वेगळेपण हे त्यांच्या बोली वरून लक्षात येते. हे मान्य करावे लागेल. डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, 'आदिवासींची लोकभाषा, त्यातील शब्दवैभव आणि अर्थवैभव आदिवासी साहित्याची शक्तिस्थळे होत. या वैभवाचीच आदिवासी साहित्य इतरांच्या नजरेत चटकन भरणार आहे. ही वैभवी अस्तित्व आदिवासी साहित्यिकांनी टिपले तरच या साहित्याला वांग्मय वेगळेपण आणि सांस्कृतिक दृष्टया अर्थ व भविष्य असणार आहे.' म्हणूनच आदिवासी बोलींना अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे हे यावरून सिध्द होते.

## निष्कर्ष

आदिवासी साहित्यामध्ये आदिवासी बोली आल्यामुळे मराठी साहित्यापेक्षा आदिवासी साहित्याचे वेगळेपण सिध्द होते.

१. प्रत्येक आदिवासी जमातीच्या स्वतंत्र बोली असल्याचे आपल्या लक्षात येते. अलीकडे या बोलींचा अविष्कार आदिवासी लेखक आपल्या साहित्यकृतीतून मांडण्याचा प्रयत्न करत आहे.
२. आदिवासींच्या काही बोली हया मराठीच्या अगदी जवळच्या वाटतात तर काही बोली हया स्वतंत्र आहेत.
३. आदिवासी कलाकृतीमंध्ये विशेषत: पद्यामध्ये स्वतंत्र बोलींच्या रचना असल्याचे लक्षात येते परंतु त्या रसग्रहण करण्यास क्लिष्ट जात असल्यामुळे कवीने त्याचा मराठी अनुवाद सुध्दा काही रचनांचा दिलेला आहे.
४. कथा, कादंबरी, नाटक या सारख्या पद्यात्मक साहित्यात मात्र केवळ संवादापुरती किंवा पात्राच्या तोंडच्या निवेदनापुरती बोलींचा वार केल्याचे दिसते.
५. भौगोलिकदृष्या प्रत्येक आदिवासी जमातीची बोल ही भिन्न आहे. तरीही अनेक आदिवासींच्या चालीरिती रूढी परंपरा हया सारख्याच असल्याचे आपल्या लक्षात येते.
६. आदिवासींच्या बोलींमुळेच आदिवासी साहित्य सकस झाले आहे.

## संदर्भ

१. वाघमारे अमोल,'मावळी बोली व महादेव कोळी समाज जीवन', प्रफुल्ल प्रकाश, पुणे, प्रथमावृत्ती. २०१५.
२. तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन,' स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती. २०१२.
३. भवारी कृष्णा, (सं) 'आदिवासी साहित्य आणि साहित्यिक,' चेतक बुक्स, पुणे. प्रथम आवृत्ती. २०१३.
४. मुनघाटे प्रमोद, (सं) 'आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या,' प्रतिमा प्रकाशन, पुणे. २००७.

❖❖❖

# प्रज्ञा पवार आत्मभान देणारी कवयित्री

प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश
मराठी पद्वी पद्व्युत्तर, अध्यापन व संशोधन केंद्र,
सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९८२२४५५६१९

## गोषवारा

आजच्या या पुढारलेल्या जगात माणसाला अनेक प्रश्न सतावत असतात. निसर्गनिर्मित या पृथ्वीवर माणसाच्या रुपाने परमेश्वराने नितांत सुंदर निर्मिती केली. स्त्री व पुरुष ही एकमेकाला पूरक असणारी रुपे. पण पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला हीन लेखण्यात आले. यातूनच स्त्रीच्या वाट्याला कुंचबणा, अवहेलना आली. समाजजीवनात तिला हीन वागणूक मिळू लागली. तिच्या बाईपणावर अनेक बंधने घालण्यात आली. तिच्या जगण्याला एक प्रकारचा बकालपणा प्राप्त झाला. हाच जीवघेणा बकालपणा आपल्या कवितेतून मांडत असताना, स्त्रीजीवनाचा विद्रोहात्मक सूर प्रज्ञा पवार अत्यंत प्रखरपणे मांडताना दिसतात.

बीजशब्द– आत्मभान, प्रज्ञापवार, स्त्रीस्वातंत्र, स्त्रीजाणीवा, क्रांतीशलाका

## विषय विवेचन

मराठी कवितेला अतिशय प्राचीन परंपरा आहे. सुरूवातीच्या कालखंडात मौखिक पद्यमय स्वरूपातच साहित्याची निर्मिती झाली. मराठी भाषेच्या उत्पत्ती नंतर मराठी लिखित साहित्याचा प्रारंभ झाला. आणि मराठी साहित्याचा पहिला आविष्कार काव्याच्या रूपाने मराठीत आविष्कृत झाला. प्राचीन मराठी काव्य हे गायनाकुल होते. महदंबा ही मराठी साहित्यातील मध्ययुगीन कांलखंडातील आद्य कवयित्री. तिने मराठीत काव्यरचना करून मराठीत स्त्रीकाव्याचा प्रारंभ केला.यानंतर प्रत्येक कालखंडात मराठी काव्याच्या प्रांतात स्त्रीकवयित्रिंनी मोलाची भर घातली. आणि मराठी काव्याचा प्रवाह समृद्ध केला.

आधुनिक कालखंडात ही अनेक महत्त्वपूर्ण कवयित्री झाल्या. या कवयित्रिंनी स्त्रीजीवनातील अनेक पदर उलगडून दाखवत असताना,आपल्या मनातील अनेक भावभावनांना शब्दबद्ध केले. इ.स. १९६० साली स्त्रीवादी साहित्याचा स्वतंत्र प्रवाह उदयाला आला, आणि स्त्रीजीवनाचा विचार अधिक व्यापकपणे साहित्याच्या प्रांतात होऊ लागला. कवितेच्या प्रांतात इंदिरा संत, सरोजिनी बाबर, शांता शेळके, अनुराधा पोतदार, अरूणा ढेरे, अनुराधा पाटील,प्रभा गणोरकर इत्यादी अनेक कवयित्रिंनी मराठी काव्यात अत्यंत मोलाची भर घालून स्त्रीजीवनातील नवजाणीवांचा विचार शब्दबद्ध केला. इ.स.१९९० नंतरच्या कालखंडातील कविता महाजन, प्रज्ञा पवार, नीरजा, रजनी परूळेकर, ज्योती लांजेवार यांनसारख्या अनेक कवयित्रिंनी आधुनिक स्त्रीजीवनाचे अत्यंत भयावह व कारुण्यपूर्ण मार्मिक असे चित्रण आपल्या काव्यातून केले आहे.

प्रज्ञा दया पवार या अलिकडच्या कालखंडातील एक महत्त्वपूर्ण कवयित्री आहेत. त्यांचे ‘अंतस्थ’, ‘आरपार लयीत प्राणांतिक’(दीर्घ कविता), ‘उत्कट’, ‘जीवघेण्या धगीवर’,‘दृश्यांचा ढोबळ समुद्र’, ‘मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा’ हे अत्यंत महत्त्वपूर्ण कविता संग्रह आहेत. कविते शिवाय नाटक, कथा, ललितगद्य इत्यादी विवध साहित्याच्या प्रांतातही त्यांनी लेखन केले आहे. दलित कवितेलाच नव्हे तर संपूर्ण मराठी काव्याला एक नवा आयाम देणारी कवयित्री म्हणून प्रज्ञा दया पवार यांच्याकडेपाहिले जाते. आपल्या मनातील वेदना, विद्रोह, नकार अत्यंत स्फोटक शब्दात मांडणारी ही कवयित्री म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

‘मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा’ हा प्रज्ञा दया पवार यांचा कवितासंग्रह जानेवारी २००० मध्ये प्रकाशित झाला.हा कविता संग्रह त्यांनी ‘सावित्रीबाई जोतीराव फुले’ आणि ‘रमाबाई भीमराव आंबेडकर’ यांना अर्पण केला आहे. या कविता संग्रहात एकूण ६२ कविता आहेत. आपल्या कवितेबद्दल त्या म्हणतात,“माझी कविता अस्वस्थतेतून येते. काही जरा खुट्ट झालं आणि कविता झाली असे होत नाही. ती अस्वस्थता खोलवर आत मुरावी लागते.”[१] यातूनच त्यांच्या कवितेत दिसणारी विषण्णता, एक प्रकारची दाहकता, अस्वस्थता आपणाला व्यथित करते.

आजच्या या पुढारलल्या जगात माणसाला अनेक प्रश्न सतावत असतात. निसर्गनिर्मित या पृथ्वीवर माणसाच्या रुपाने परमेश्वराने नितांत सुंदर निर्मिती केली. स्त्री व पुरुष ही एकमेकाला पूरक असणारी रुपे. पण पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीला हीन लेखण्यात आले.यातूनच स्त्रीच्या वाट्याला कुंचबणा, अवहेलना आली.समाज जीवनात तिला हीन वागणूक मिळू लागली. तिच्या बाईपणावर अनेक बंधने घालण्यात आली. तिच्या जगण्याला एक प्रकारचा बकालपणा प्राप्त झाला. हाच जीवघेणा बकालपणा आपल्या कवितेतून मांडत असताना, स्त्रीजीवनाचा विद्रोहात्मक सूर प्रज्ञा पवार अत्यंत प्रखरपणे मांडताना दिसतात.

आई ही ईश्वराने स्त्रीला दिलेली नितांत सुंदर गोष्ट. पण या आईपणाच्या नावाखाली सहस्त्रावधी वर्षे तिच्यावर अन्याय, अत्याचार केला गेला.म्हणूनच 'आपण आता तिला काढू या बाहेर आईपणाच्या चौकटीतून' या कवितेत त्यांनी या आईपणाची असणारी रुपे स्पष्ट करताना, समाजाने याच आईपणाची वासनांध लक्तर अत्यंत सहजपणे वेशीवर टांगली आहेत. म्हणूनच ती म्हणते,

लेकी सुना जावयाच्या पुढ्यात
राजस्थानला केला गेला तिच्यावर
निघृण बलात्कार
आत्मभान जागे झाल्याची शिक्षा म्हणून [२]

या अशा बलात्कारी, दुबळ्या, स्वत्त्वाची हानी झालेल्या आईला परंपरेच्या चौकटीतून बाहेर काढायचे आहे. तिच्यात असणारे मनस्वीपण, तिच्यात असणारी क्रांतीशलाका समाजाला दाखवून द्यायची आहे.पारंपरिक अत्याचारी आईपणाच्या चौकटीतून तिला बाहेर काढून मुक्त जगण्याचा मोकळा श्वास तिला घ्यायला लावायचा आहे. अत्यंत संवेदनशील असा आईपणाचा नव साक्षात्कार ही कविता करते.

स्त्रीच्या संदर्भात असणारा वेश्या हा शब्द विशिष्ट अर्थाने घेतला जातो. खरतर वेश्या ही एक स्त्री असते. समाजात असणाऱ्या नैतिक अनैतिकतेच्या चौकटीत वेश्या ही अनैतिकतेची चौकट. या चौकटीत स्त्रियांचेचं एक वेगळे विश्व असते. हे स्वतंत्र विश्व वासनेने बरबटलेले असते. एकच गोष्ट स्त्री अथवा पुरुषाने केली तर पुरुषाला नैतिक आणि स्त्रीला अनैतिक ठरवणाऱ्या आपल्या समाजात,'वेश्या' ही स्त्रीजीवनातील असणारी अत्यंतिक जीवघेणी वेदना आहे. स्वत:ला सुशिक्षित समजणारा हा पांढरपेशी समाज रात्रीच्या काळोखात या जगण्याचा भाग होतो. दिवसा मात्र याच जगण्याकडे तुच्छतेने पाहतो. एखाद्या स्त्रीने जगण्यासाठी वेश्या व्यवसाय स्वीकारला असला तरी ती ही एक स्त्री आहे. तिलाही मन आहे.पोटाची खळगी भरण्यासाठी तिला दुसरा पर्याय नाही.म्हणूनच हा राजरोस होणारा बलात्कार तिला सहन करावा लागत आहे. शरीराचे माध्यमातून तिने जगण्याचा मार्ग शोधला आहे. पण या शरीराच्या अंतरंगात असणारी स्त्री ही तितकीच स्वच्छ, नितळ, निर्मळ  असते.म्हणूनच कवयित्री म्हणते,

तिच्या स्वच्छ गहन डोळ्यांत
आत्यंतिक तीव्रतेनं
वाटतं मला,
विश्वातल्या प्रतेक बाईचे
असेच असावेत डोळे
वेश्येसारखे
विश्वाचं रहस्य कळून चुकल्या सारखे [३]

शरीराभोवती असणारी अनैतिकतेची, अपवित्रतेची वलंय बाजूला सारून जगण्याचा एक नवा विचार ती सांगते. स्त्रीमनाचा असणारा हा आविष्कार आहे. हा आविष्कार करताना पिढ्यान्‌पिढ्यानची असणारी बंधने ती झुगारुन देत आहे.

स्त्री ही एक वस्तू नाही, ती गुलाम नाही. तर ती एक माणूस आहे. आजच्या यंत्रसंस्कृतीत पारंपरिक स्त्रीजीवनाचे स्वरूप बदललेले आहे. आज ती पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून प्रतेक क्षेत्रात कार्यरत आहे. स्त्रीची अनेक रूपे आज नव्याने आकाराला येत आहेत. परंतु या नव्या चौकटीतही ती परत एकदा जखडली जात आहे. यांत्रीक युगात ती एक यंत्र झाली आहे. पुरुषप्रधान समाजाने तिला दुय्यमतेच्या अधिपत्याखाली असणारे स्वातंत्र्य दिले. आणि स्त्रीजीवनाची बदलती प्रतिमा स्वत:ला हव्या त्या रुपात साकार केली. 'दार उघड बये, दार' ही कविता आजच्या स्त्रीजाणीवा कवेत घेते.जे पुरुषांना स्त्रीस्वातंत्र्य अपेक्षित आहे, स्त्रीवाद अपेक्षित आहे, त्यापेक्षा वेगळा जीवनाचा अधिकार स्त्रीला आहे.तिला आपल्या मनात येणारे विचार, भावना सहजपणे व्यक्त करता आले

पाहिजेत. पण असे होत नाही.तर नैतिकतेच्या आणि संस्काराच्या नावाखाली तिला नव्याने बंदिस्थ केले जात आहे. परंपरेची जुनीच साखळी नव्याने संस्काराच्या नावाने तिला घातली जात आहे.या साऱ्या बंधनातून मुक्त होऊन, तिने आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य जपत जगावे. ही तिच्या जगण्याची नवी सुरूवात होईल.

मूळापासून हादरवत एकमेकींना
घातला गोंधळ आर्त
दार उघड बये, दार उघड [४]

यासारख्या अनेक कवितातून आजच्या स्त्रीजीवनाची अत्यंत मूलभूत स्वरुपाची सैद्धांन्तिक अशी मांडणी प्रज्ञा पवार यांनी केली आहे. या आणि अशा कविता संपूर्ण स्त्रीजीवनाला आपल्या कवेत घेऊ इच्छितात. आजच्या भोगवादी संस्कृतीच्या नैतिक अनैतिकतेच्या मर्यादा ओलांडून पुढे जाणारी स्त्रीजीवनाची अभिव्यक्ती ह्या कविता करतात. आपल्या कवितातून स्त्रीजीवनाचा शोध घेत असताना, तो लैंगिकता आणि स्त्री या चौकटीत बंदिस्त न करता, लैंगिकता हा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलू पाहते.लैंगिकता ही पुरुषाप्रमाणेच स्त्रीजीवनाचा एक भाग आहे.याच दृष्टिकोनातून त्याकडे बघितलं जावं. पण लैंगिकता, पावित्र्य, नैतिक, अनैतिक या सगळ्या पार्श्वभूमीवर स्त्री अभिव्यक्तीची, स्त्री जीवनाची जी विटंबना केली जाते, ती न होऊ देण्यासाठी आजच्या स्त्रीने या साऱ्याला भेदून पार गेले पाहिजे. त्यासाठी तिने हव्या त्या रूपाचा स्वीकार केला पाहिजे. पारंपरिक चौकटीत न अडकता पुढे जाऊन जीवन जगण्याचा अधिकार तिला आहे.

'मी भिडवू पाहते समग्राशी डोळा' या कविता संग्रहातील कविता अत्यंत भेदक आणि वास्तव स्वरूपाच्या आहेत. आजच्या पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रीला या कविता आणि यातील संकल्पना ह्या काल्पनिक अशाच आहेत. परंतु तरीही आजच्या स्त्रीजीवनाला आपल्यात सामावून घेणारी, तिची चौकट बाजूला सारून समग्राशी भिडण्याचे सामर्थ्य देणारी ही कविता आहे.

## संदर्भ सूची

१–लोकसत्ता, चतुरंग, ३०सप्टेंबर २०१६
२–मी भिडवू पाहते समग्राशी डोळा, प्रज्ञा पवार, ग्रंथाली प्रकाशन, पुणे, पा.नं.२
३– तत्रैव, पा.नं.३
४– तत्रैव, पा.नं.८

❖❖❖

# वारकरी संतकवयित्रींचे काव्यधन

# Kavyadhan of Warkari saint poetess

डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे **Dr. Ravindra Vaijnathrao Bembere**
प्रमुख, मराठी विभाग, Head, Marathi Department,
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर, महाराष्ट्र (India)
Vai. Dhunda Maharaj Degalurkar College, Degalur, Maharashtra (India)
Email: rvbembare@gmail.com Mobile No.: 9420813185

(लेखक परिचय :– दै. महाराष्ट्र टाइम्स, दै. सकाळ, दै. देशोन्नती, दै. एकमत, दै. पुण्यनगरी अशा वर्तमानपत्रातून पंचावन्न लेख प्रकाशित. प्रतिष्ठान, पंचधारा, अनुबंध, माझी मराठी, साहित्यगाथा, विचारशलाका अशा नियतकालिकातून आणि विविध संपादित ग्रंथातून सत्तर लेख प्रकाशित. 'संत मन्मथ दर्शन', 'इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील शेतकरी' हे दोन ग्रंथ प्रकाशित. 'संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास' या विषयावर विद्यापीठ अनुदान आयोगाकडे लघु संशोधन प्रकल्प सादर.)

**गोषवारा**

समता आणि समन्वयशीलता स्वीकारून लिंग, वर्ण, जात अशा भेदभावाच्या पलीकडे जात माणसाला माणूस जोडण्याचे रचनात्मक कार्य वारकरी संप्रदायाने केले. लिंगभावाच्या पलीकडे जाऊन स्त्रीकडे पाहण्याची एक विवेकीदृष्टी वारकरी संतांनी दिली. यातून वारकरी संप्रदायात संतकवयित्री मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा, भागू, बहिणाबाई अशा संतकवयित्रीची एक समृद्ध परंपरा निर्माण झाली. आपली आध्यात्मिक अनुभूती आणि विचारांची अभिव्यक्ती यांनी अभंग छंदातून केली. स्त्रीसुलभ भावनांच्या उत्कट अभिव्यक्तीतून त्यांच्या अभंगवाणीला भावकवितेचे मोल प्राप्त झाले. त्याचप्रमाणे त्यातून प्रकट झालेल्या विचारातून वैचारिक उंचीचे दर्शन घडते. उच्च कोटीची प्रतिभा आणि प्रगल्भतेचा सहजाविष्कार संतकवयित्री मुक्ताबाईच्या अभंगातून झालेला आहे. संतकवयित्री जनाबाईच्या भावविश्वाचा केंद्रबिंदू विठ्ठल असला तरी त्यातून स्त्रीस्वातंत्र्याचा उद्घोषही झाल्याचे पाहायला मिळते. संत कवयित्री सोयराबाई आणि निर्मळा यांच्या अभंगातून जसे अस्पृश्यतेचे दुःख व्यक्त झाले, त्याचप्रमाणे विटाळ संकल्पनेबद्दल विवेकी दृष्टी प्रकटली आहे. गणिका कान्होपात्रेच्या अभंगातून प्रकटलेले कारुण्य हृदय पिळवटून टाकणारे आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीची पराधीनता संत कवयित्री बहिणाबाईच्या अभंगातून अधोरेखित झालेली आहे. अशाप्रकारे वारकरी संतकवयित्रींच्या योगदानातून मध्ययुगीन मराठी काव्यधारा विविधांगाने समृद्ध बनली आहे.

## Abstract:

By embracing equality and co-ordination, the Warakari sect did a constructive job of connecting man to man beyond caste, caste and creed. The Warakari saints gave a prudent view of going beyond gender and looking at women. This created a rich tradition of saints in the Warkari sect such as Muktabai, Janabai, Soyarabai, Nirmala, Kanhopatra, Bhagu, Bahinabai. They expressed their his spiritual experiences and thoughts through unbroken rhythms. Her abhangvani derived the value of rhetoric from her passionate expression of feminine sentiments. In the same way, the vision that emerges from it leads to the vision of ideological height. The instinctive discovery of high quality talent and prowess has taken place through the abhanga of the saint poetess Muktabai. Although Vitthal is the focal point of Santkavayitri Janabai's brotherhood, it also shows the proclamation of women's freedom.Just as the sorrows of untouchability are expressed in the abhangas of the saint poetess Soyarabai and Nirmala, so too is the prudent vision of the ugly concept revealed. The compassion manifested in the abhanga of the prostitute Kanhopatra is heart wrenching. In a patriarchal society, the subjugation of women is underlined by the abhanga of the saint poetess Bahinabai. In this way, medieval Marathi poetry has become rich in various ways due to the contribution of Warkari Saint poets.

## प्रस्तावना

जगाला समता आणि समन्वयशिलतेचा संदेश देण्यासाठी संत ज्ञानेश्वर नामदेवादी संतांनी तेराव्या शतकात वारकरी संप्रदायाची बांधणी केली. 'यारे यारे लहानथोर । भलते याती नारी नर।।' असा उद्घोष करीत सर्व भेदभावाच्या पलीकडे जाऊन माणूस जोडला. यामुळे विटाळाच्या नावाखाली पिढ्यानपिढ्यपासून सर्वदृष्टीने वंचित आणि उपेक्षित राहिलेल्या स्त्रीला परमार्थाचा अधिकार मिळाला.यामुळे वारकरी संप्रदायात संतकवयित्री मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई अशा संतकवयित्रीची एक समृद्ध परंपरा निर्माण झाली. आपली आध्यात्मिक अनुभूती आणि विचारांची अभिव्यक्ती यांनी अभंग छंदातून केली. स्त्रीसुलभ भावनांच्या उत्कट अभिव्यक्तीतून त्यांच्या अभंगवाणीला भावकवितेचे सौंदर्य प्राप्त झाले. त्याचप्रमाणे त्यातून प्रकट झालेल्या विचारातून वैचारिक उंचीचे दर्शन घडते.

ज्ञानेश्वरादी भावंडात सर्वात लहान असूनही उच्च कोटीच्या प्रगल्भतेचा आदर्श मुक्ताबाईंनी जगासमोर प्रस्थापित केला. मुक्ताबाईचे त्रेसष्ठ अभंग उपलब्ध आहेत. वारकरी संप्रदायात सर्वमान्य असलेल्या संतत्वाचा पहिला उच्चार मुक्ताबाईंनी केला. हेच संतत्व पुढे ज्ञानेश्वरीतून प्रकटले आहे. उद्विग्न होऊन मनाची ताटी मिटून बसलेल्या ज्ञानेश्वरांना जगाचा अपराध पोटात घेत जगाशी समरस होण्याची विनंती मुक्ताबाईनी आपल्या ताटीच्या अभंगातून केली. 'संत जेणे व्हावे । जग बोलणे सोसावे । तरीच अंगी थोरपण । जया नाही अभिमान । थोरपण जेथे वसे । तेथे भूतदया असे । रागे रावे कवनाशी। आपण ब्रह्म सर्व देशी । ऐसी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।' जगातील सर्व अज्ञजनांचे अपराध पोटात घेऊन जगाचा उद्धार करण्याचे उत्तरदायित्व संतांनी स्वीकारले पाहिजे. ज्यांच्या मनातील मोठेपणाच्या अहंकाराचे विसर्जन झाले, तोच संत असल्याचे मुक्ताबाई येथे सांगते. संतांच्या हृदयात सकल भुतमात्राबद्दल दयाभाव असलाच पाहिजे. जगातील चराचरात ब्रह्म पाहण्याची दृष्टी जर संताची असेल, तर कुणावर रागवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

लोकांचा अपराध पोटात घेणे हेच संतत्वाचे मुख्य लक्षण असल्याचे मुक्ताबाई सांगते. 'योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा । विश्व रागे झाले वन्ही। संत सुखे व्हावे पाणी । शब्द शास्त्र झाले क्लेश। संती मानावा उपदेश। विश्व पट परब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा।।' रागाने जग आग बनले तर ती आग विझवण्यासाठी संतांची पाणी होण्याची तयारी ठेवावी. जननिंदा ऐकून व्यथित न होता त्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे. निंदेतूनही उपदेश मिळवण्याची क्षमता संताकडे असली पाहिजे. आपल्या कृती आणि उक्तीतून क्षमा, दया आणि शांतीचा आदर्श संतांनी समाजासमोर प्रस्थापित करावा. 'संत तोची जगी । क्षमा दया ज्याचे अंगी।।' असे मुक्ताबाई सांगतात. आपल्या सद्गुणांचा आणि संतत्वाचा अहंकार बाळगणे मुक्ताबाईना मान्य नाही. 'एक आपण साधू झाले । येर कोण वाया गेले ।' असा अहंकार संतांनी कटाक्षाने टाळला पाहिजे, अशी भूमिका मुक्ताबाईंनी मांडली. विचार सौंदर्यामुळे मुक्ताबाईच्या अ ंगातील अनेक चरणांना मराठी भाषेत सुभाषित आणि म्हणीचे मोल प्राप्त झाले आहे. 'जी दाताने चाविली । कोणे बत्तीशी पाडिली ।।' किंवा 'चणे खावे लोखंडाचे। मग ब्रह्मपदी नाचे।।' किंवा 'शुद्ध ज्याचा भाव । त्याला दूर नाही देव ।।' असे अनेक अभंगचरण आज लोकव्यवहारात रूढ झालेले आढळतात. संताबद्दल मांडलेले चिंतन अत्यंत उच्च कोटीचे असून त्यातून मुक्ताबाईच्या वैचारिक उंचीचे दर्शन घडते.

'संत वाटिकेतील जाईची वेल' म्हणून मराठी संतपरंपरेत संतकवयित्री जनाबाईंचा गौरव करण्यात आला. संत नामदेवांच्या घरी दासी म्हणून काम करत असताना नामदेवांच्या सहवासात तिला विठ्ठल भक्तीचा छंद जडला. आपली पारमार्थिक साधना करून संतत्वापर्यंत वाटचाल केली. संत जनाबाईच्या अभंगातून निर्भय, धाडसी, कणखर आणि कनवाळू मनाचा सहजाविष्कार झालेला आहे. तेराव्या शतकात ती स्त्री स्वातंत्र्याचा विचार बेधडकपणे मांडते. 'डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी।' या अभंगातून जनाबाईंनी स्त्रीस्वातंत्र्याचा उद्घोष केला आहे. डोक्यावरचा पदर जरी खांद्यावर आला तरी, मी भरल्या बाजारात जाईन. कोणालाच घाबरणार नाही. मला जनरीतीची पर्वा किंवा भीती नाही. हातात टाळ घेईन, खांद्यावर वीणा घेईन मग मला कोण मनाई करणार ? मी पंढरीच्या पेठेत पाल मांडलेली दिसेल, तेव्हा माझी ही डुती आणि माझे स्वातंत्र्य ज्यांना सहन होत नाही, त्यांनी खुशाल मनगटावर तेल घालून बोंबला किंवा ओरडा मला त्याची अजिबात पर्वा नाही, असे जनाबाई म्हणते. तेराव्या शतकात जनाबाईंनी आपल्या अभंगातून अशा रीतीने मांडलेले चिंतन म्हणजे स्त्रीस्वातंत्र्याचा वारकरी साहित्यातील हा पहिला उद्घोष आहे.

स्त्रीकडे पाहण्याची जी सनातन मानसिकता आहे, त्याला जनाबाई धुडकावून लावते. स्त्री जन्माबद्दल खंत का करायची ? असा प्रश्न ती उपस्थित करते. 'स्त्री जन्म म्हणुनी का व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी।।' आपल्या वाट्याला स्त्रीचा जन्म आला म्हणून आपण उदास आणि निराश होऊ नये. असेच साधुसंतांनी सांगितले असल्याचे प्रमाण जनाबाई देते. स्त्री जन्माकडे नकारात्मक नजरेतून न पाहता सकारात्मकतेने पाहण्याची दृष्टी जनाबाईच्या या अ ंगातून मिळते. स्त्रीजातीचे मनोधैर्य उंचावून तिच्या मनातला आशावाद जागवण्याचा प्रयत्न जनाबाई करते. आपल्या अभंगातून जनाबाईंनी वारकरी संत परंपरेतील समत्व भावाचे दर्शन घडवले आहे. जनाबाईचा विठ्ठल हादेखील समता आणि ममतेचा प्रतीक आहे, याचा प्रत्येय 'विठु माझा लेकुरवाळा। संगे लेकुरांचा मेळा।।' या अभंगातून येतो.

संत चोखामेळा या वारकरी संतांची धर्मपत्नी म्हणजे संत कवयित्री सोयराबाई होय. अत्यंत निष्ठेने आपल्या पतीच्या पावलावर पाऊल ठेवत हीने पारमार्थिक जीवनाची वाटचाल केली. सोयराबाईबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही, केवळ बासष्ट अभंग सकलसंतवाणी मध्ये उपलब्ध आहेत. यातून सोयराबाईचे समृद्ध आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे. सोयराबाईच्या मनातील भक्ती पाहून विठोबास सोयराबाईच्या घरी यावे लागले. विठोबा दारात आल्यानंतर सोयराबाईला जी समतेची, अद्वैताची अनु ूती आली त्याचे दर्शन अभंगातून घडते. 'अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग । मी तूं पण गेलें वायां। पाहता पंढरीच्या राया। नाही भेदाचे तें काम । पळून गेले क्रोध काम। देही असोली तूं विदेही । सदा समाधिस्थ पाही। पाहते पाहणे गेले दूरी । म्हणे चोखियाची महारी।।' या अभंगातील रंग हा शब्द येथील विविध भेदभाव आणि विषमतेला अनुसरून सोयराबाईंनी वापरला आहे. सोयरबाईचा विठोबा समतेचा, ममतेचा आणि भक्तीप्रेमाचा प्रतीक आहे. सर्व प्रकारच्या भेदभावाला विसरून विठोबा आपल्या जीवनात रमला आणि रंगला. आपणही त्या विठोबासी तादात्म्य पावलो. जगातील सर्व प्रकारचे भेदभाव मीटून समतेची आणि ममतेची अनुभूती आल्याचे सोयराबाई येथे सांगते.

काम क्रोधादी विकाराचा अंत होऊन संतत्वाकडे सहजपणे वाटचाल झाली. याची देही याची डोळा मुक्तीची अनु ूती आली. यानंतर सोयराबाईंना विटाळ हे निरर्थक वाटते, म्हणून ती आपल्या अभंगात म्हणते, 'देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध। देहीचा विटाळ देहीच जन्मला। सोवळा तो झाला कवण धर्म। विटाळा वाचोंनी उत्पत्तीचे स्थान। कोण देह निर्माण नाही जगी। म्हणूनी पांडुरंगा वानितसे थोरी । विटाळ देहांतरी वसतसे । देहाचा विटाळ देहीच निर्धारी। म्हणतसे महारी चोखियाची।।' विटाळामुळेच स्त्रीला शूद्रा प्रमाणे परमार्थापासून वंचित ठेवण्यात आले. विटाळ हा देहाचा धर्म असला तरी आत्मा मात्र शुद्ध ज्ञानस्वरूप आहे. यामुळे देहाच्या विटाळावरून कोणालाही निषिद्ध मानता येत नाही. स्त्री देहातील विटाळामुळे हिंदू धर्मशास्त्रात स्त्रियांना धर्म उपासनेचा अधिकार नाकारण्यात आला. स्त्रीच्या गुणवत्तेला मारण्यात आले. सोयराबाईंनी मात्र आपल्या अभंगातून विटाळ संकल्पनेची निरर्थकता स्पष्ट करून स्त्रीचे मनोबल उंचावण्याचा प्रयत्न केला. सनातन परंपरने नाकारलेल्या उपेक्षित भारतीय स्त्रीचा आत्मविश्वास सोयराबाईनी जागवला. ज्या लोकांनी विटाळाला निषिद्ध मांनले, त्यांचाही जन्म विटाळातून झाला. जगातील सर्व संत—महात्मे आणि महापुरुषांचा जन्म विटाळातून झाला. म्हणूनच देहाच्या निसर्गदत्त विटाळावरून माणसामाणसात कोणताही भेदभाव करता येत नसल्याचे सोयराबाईंनी येथे सांगितले. अशाप्रकारे सोयराबाईच्या अ ंगातून परिवर्तनवादी आणि पुरोगामी विचाराचे दर्शन घडते. 'अवघे सुखाची सांगाती । दु:ख होता पळती आपोआप । भार्या पुत्र माता आणि पिता। हे अवघे सर्वथा सुखाचेचि।।' या अभंगातून मानवी जीवनातील कटू वास्तव सोयराबाईंनी अधोरेखित केली आहे. हाच विचार पुढे संत तुकारामांच्या अभंगातून प्रतिध्वनीत झालेला आहे.

संत चोखामेळाचा सर्व गोतावळा विठ्ठलमय झाला होता. संतकवयित्री निर्मळा संत चोखामेळाची बहिण, बंका महारांची पत्नी आणि संतकवयित्री सोयराबाईची नणंद आहे. निर्मळाचे श्रीसकलसंतवाणी मध्ये चोवीस अभंग आज उपलब्ध आहेत. खरे सुख संसारात नसून ते परमार्थातच असल्याची अनुभूती निर्मळांनी आपल्या अभंगातून व्यक्त केली आहे. परमेश्वर उपासनेच्या अनेकविध साधनांपैकी नामस्मरण हे साधन अधिक महत्त्वाचे आणि सुल असल्याचे ती वारंवार सांगते. हरीनामाची गोडी लागण्यासाठी पूर्वजन्मीचे सुकृत असणे गरजेचे आहे असे ती म्हणते. 'अनंत जन्माचे सुकृत पदरीं। तोचि उच्चारी हरिनाम।।' या अभंगातून हरीनामाचा महिमा निर्मळांनी विस्ताराने सांगितला आहे. परमार्थ कशाला म्हणावे? हे विशद करत असताना आपल्या अभंगातून निर्मळांनी मूल्यविचाराची मांडणीच केली आहे. कुणाची निंदा करणे, दोष प्रकट करणे, स्वार्थासाठी स्तुती करणे या गोष्टी परमार्थात वर्ज्यच असल्याची भूमिका निर्मळाची आहे. याहीपुढे जाऊन ती म्हणते, 'परद्रव्य परान्न परनारीचा विटाळ । मानावा आढळ

परमार्थी। निर्मळा म्हणे हाची परमार्थ। संतांचा सांगात दिननिशी ।।' दुसऱ्याची संपत्ती, दुसऱ्याचे फुकटचे अन्न आणि परस्त्री या गोष्टींचा परमार्थ साधकांनी विटाळच मानला पाहिजे. सदगुणांचा अंगिकार करण्यासाठी सतत रात्रंदिवस संतांच्या संगती मध्ये राहणे म्हणजे परमार्थ असेही ती येथे सांगते.

कान्होपात्रा ही मंगळवेढ्यतील शामा नायकिनीची मुलगी होती. दिसायला देखणी असल्यामुळे आईप्रमाणे ती एक नायकीनच बनावी अशी प्रस्थापित समाजाची रास्त अपेक्षा होती. परंतु कान्होपात्रा मात्र या अमानवी परंपरेला छेद देते. सनातन मानसिकते विरुद्ध बंड करून परमार्थाकडे वळते. स्वत:ला विठ्ठल चरणी अर्पित करते. त्यातूनच तिच्या जीवनात असंख्य संकटे उद्भवतात. या संकटातून स्वत:स वाचवण्यासाठी ती वेळोवेळी विठ्ठलाकडे धावा करते. थेट विठ्ठलाच्या सामर्थ्यालाच आव्हान करते.'पतितपावन म्हणविसी आधी। तरी का उपाधी भक्तामागे। तुझे म्हणवितां दुजे अंगसंग । उणेपणा सांग कोणाकडे। सिंहाचे भातुकें जंबुक पै नेता। थोरांचिया माथा लाज वाटे। म्हणे कान्होपात्रा देहसमर्पणें। करावा जातना ब्रिदासाठी ।।' तू पतितांचा उद्धारकर्ता असूनही तुझ्याच भक्तामागे संकटे का ? असा सवाल ती करते. हा देह मी तुला अर्पण केल्यानंतर त्याचा दुसऱ्यांनी उपभोग घेणे यात नामुष्की कोणाची आहे ? सिंहाचे भक्ष्य जर कोल्ह्याने पळवले तर ही गोष्ट सिंहासाठी अपमानास्पद आहे. मी तुला अर्पित असल्यामुळे दुष्टा पासून माझ्या देहाचे रक्षण करणे हे तुझेच उत्तरदायित्व आहे, असे कान्होपात्रा येथे म्हणते. 'नको देव रे अंत आता पाहू' या अभंगातील कारुण्य वाचकांचे काळीज हेलावून सोडणारे आहे. कान्होपात्रेचे आज केवळ सव्वीस अभंग उपलब्ध आहेत.

संत तुकाराम शिष्या बहिणाबाई सिऊरकर सतराव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण संत कवयित्री आहेत. श्रीसकलसंतवाणी मध्ये बहिणाबाईचे केवळ बत्तीस अभंग आज उपलब्ध आहेत. सर्वस्त्रावरील छळाने उद्विग्न न होता संयमाने आपल्या मार्गावर वाटचाल केली. तरीही स्त्रीजीवनातील पराधीनतेबद्दलची खंत त्यांच्या अभंगातून प्रकटली आहे. 'स्त्रियेचें शरीर पराधीन देह । न चाले उपाव विरक्तीचा।। शरीराचे भोग वाटताती वैरी। माझी कोण करी चिंता आता।।' स्त्री देहाच्या मर्यादांमुळे विरक्ती घेता येत नसल्याची खंत व्यक्त केली आहे.

## निष्कर्ष

संत कवयित्री मुक्ताबाई यांच्या अभंगातून उच्चकोटींच्या प्रगल्भतेचे सहज दर्शन घडते. संत संकल्पना संत संकल्पना यथार्थ रीतीने समजून घेण्याच्या दृष्टीने मुक्ताबाईचे अभंग अत्यंत उपयुक्त ठरणारी आहेत. स्त्रीस्वातंत्र्याचा पहीला उद्घोष मराठी कवितेत जनाबाईच्या कवितेत पाहायला मिळतो. प्रचंड प्रतिकूल काळात स्त्रीजन्माकडे सकारात्मक नजरेन ेपाहण्याची दृष्टी संत जनाबाईंनी दिली आहे. वारकरी संप्रदायातील समतेचा संदेश संतकवयित्री सोयराबाईच्या अभंगातून प्रकटला आहे. ज्या विटाळाच्या आधारे स्त्रीला कनिष्ठ लेखले गेले ती विटाळ संकल्पना धुडकावून लावण्याचे धैर्य सोयराबाईंनी दाखवले आहे. संत कवयत्री निर्मळांनी परस्त्री आणि परधनाबद्दल मनातील अभिलाषा हेच खरे विटाळा असल्याचे सांगितले. स्त्रीकडे उपभोगाचे साधन म्हणून पाहण्याची प्रस्थापित समाजाची दृष्टी आणि त्यातून तिचा होणारा छळ हे वास्तव कान्होपात्रेच्या अभंगातून अधोरेखित झाले आहे. संत कवयित्री बहिणाबाईच्या अभंगातून स्त्रीच्या पराधीनतेचे दु:ख प्रकटले आहे. एकंदर वारकरी संतकवयित्रींच्या अभंगातून व्यापक सहानुभाव, समर्पणभाव, संवेदनशीलता, उत्कटता, अनु वसमृद्धी, वैचारिकता, उच्च कोटींची प्रगल्भता, अंत:करणाची विशालता या गोष्टीचा पदोपदी प्रत्येय येतो. वारकरी संत कवयित्रींची कविता वैचारिक समृद्धीचे दर्शन घडवते. या संत कवयित्रींच्या कवितेने वारकरी संप्रदायाला एक भावबळ मिळाले आहे.

## संदर्भ ग्रंथ

१. श्रीसकल संतवाणी मराठी खंड – पहिला व दुसरा, गीता प्रेस गोरखपुर प्रथम संस्करण सन २० ६१
२. संतकवी आणि कवयित्री : एक अनुबंध, सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस पुणे. संस्कारित आवृत्ती –२००६
३. संत जनाबाई आणि मध्ययुगीन संत कवयित्री यांची कविता, विलास खोले, साहित्य अकादमी नवी दिल्ली. प्रथमावृत्ती २०१७
४. मराठी संत कवयित्री, मा.के.यादव, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस पुणे.प्रथमावृत्ती २०१२.चार भावंडे, डॉ. सदानंद मोरे, गंधर्व वेद प्रकाशन पुणे २०१८.

❖❖❖

# महानगरीय समाज जीवनाची मूलगामी चिकित्सा

प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत
सहयोगी प्राध्यापक,
कला व वाणिज्य महाविद्यालय चाकण.
Email : shivajiendait@gmail.com चलभाष : 9763895220, 8857867229

## गोषवारा (Abstract)

डॉ. आनंदा गांगुर्डे यांचा 'महानगरीय कादंबरीतील समाजदर्शन' हासमीक्षा ग्रंथ यशोदीप प्रकाशनाने(पुणे) डिसेंबर२०१८ मध्ये प्रकाशित केला आहे. कादंबरी साहित्यप्रकारांतून अभिव्यक्त झालेल्या महानगरीय जीवन-जाणिवांचा अभ्यास या ग्रंथातून मांडला आहे. महानगरांच्या अवतीभवतीच्या विकृत, बकाल, भणंग समाजवास्तवाचा वेध अभ्यासकाने घेतला आहे.

यांत्रिकीकरणाने महानगरांचा प्रचंड विस्तार झाला. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या. खेड्यापाड्यातील तरूणवर्ग उदरनिर्वाहाकरीता महानगरांकडे स्थलांतरीत झाला. यातूनच महानगरांच्या आजूबाजूला झोपडपट्ट्यांची संख्या बेफाम वाढली. भांडवलदार व कामगार हे दोन वर्ग महानगरीय अर्थव्यवस्थेत उदयास आले.गावखेड्यातून उपजिविकेकरीता स्थलांतरीत झालेला वर्ग महानगरीय जीवनात उपरा ठरला.तो पोटाकरीता स्पर्धा करू लागला. त्याच्या जगण्यात धावपळ, मूल्यशून्यता, स्वकेंद्रीवृत्ती, अनिश्चिचितता, असुरक्षितता वाढली. जगण्यात दुभंगलेपण आले.अमाप पैसा मिळविण्याच्या धडपडीत शहरातील सिमेंटच्या जंगलात तो 'स्वत्व' व 'सत्व' हरवून बसला. झोपडपट्टीतील जगण्यामुळे बकालपणा, गुंडगिरी, रोगट मानसिक मनोवृत्ती, लैंगिक विकृती, भ्रष्टाचारइत्यादीलाखतपाणी मिळाले.

महानगरीय झोपडपट्टीतील हे भयाण वास्तव अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी विविध साहित्यप्रकारातून शब्दबद्ध केले. ग्रंथकाराने महानगरीय कादंबरी निर्मितीमागील प्रेरणांचा, कारणांचाविषय-वैशिष्ट्यांचा शोध घेत, विविध कादंबऱ्यांतून अधोरिखित झालेल्या झोपडपट्टीतील विदारक आयुष्याचा, तेथील जीवन-जाणीवांचा परामर्श घेतला आहे.

बकालपणा, मूल्यशून्यता, अनैतिकता, भ्रमनिरास, बेकारी, दारिद्र्य, गुंडगिरी, मारामारी, व्यसनाधीनता, लैंगिक शोषण, चंगळवादी वृत्ती इ.विषय-वैशिष्ट्यांचा परामर्श तसेच अडाणी, अज्ञानी, अशिक्षित, अंधश्रद्धाळू, असंस्कृत, किडलेल्या मानसिकतेचे समाजदर्शन ज्या विविध कादंबऱ्यातून घडले, त्या तथ्यांचा शोध डॉ. आनंदा गांगुर्डे यांनीघेतला आहे. बकालपणे फिरणे, भणंग भटकणे, चोऱ्या करणे, दारू पिणे, मारामाऱ्या-गुंडगिरी, तुरूंगात जाणे, शिक्षा भोगणे, पोटाची व शरीराची भूक भागविण्यासाठी कष्ट उपसणे, वेळप्रसंगी वेश्या व्यवसाय करणे इत्यादी वृत्ती-प्रवृत्तींवर लेखकाने नेमकेपणाने भाष्य केले आहे.

भाषेच्यानुषगाने अभिव्यक्ती सामर्थ्यातील काही सौंदर्यस्थळे दर्शविण्याचा प्रयत्न अभ्यासकाने केला आहे. झोपडपट्टीतील बोलीचे रूप संमिश्र व त्यात मराठी, हिंदी व अन्य भाषांची भेसळ पाहयाला मिळते. प्रसंगी अपशब्द-शिव्यांचा वापर होतो. गुन्हेगारी जगताची भाषा येते. भाषिक अभिव्यक्ती सामर्थ्यांचा विचारामुळे हा ग्रंथ अधिक सर्वांग परिपूर्ण झाला असता, असे असले तरीही लेखकाने महानगरीय जीवनाचे घडविलेले समाजदर्शन तितकेच यथार्थ आणि वाङ्मयीनदृष्ठया महत्त्वपूर्ण असल्याने ग्रंथाला यथार्थ संदर्भमूल्य प्राप्त झाले आहे.

## विषय विवेचन

महात्मा जोतीराव फुले, राजर्षि शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक व कृतिशील प्रबोधनामुळे सामान्य तळागाळापर्यंतचा नवशिक्षितवर्ग अंतर्मुख झाला. साहित्यनिर्मिती करू

लागला, तो लिहिता झाला. 1960 नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिक प्रेरणा स्वीकारून दलित साहित्यिकांनी समाजव्यवस्थेतील शोषणाविरुद्धचा विद्रोह, नकार साहित्यातून मांडण्यास सुरूवात केली. तसेच, दलित लेखकांनी त्यांच्या व्यथा-वेदनांना कविता, आत्मकथनांच्या माध्यमातून शब्दरूप दिले. दलित साहित्य निर्मितीमुळे प्रस्थापित मराठी साहित्याला गावकुसाबाहेरचं जीणं, त्यांचे दुःख, त्यांचे भोग, होणारे शोषण ज्ञात झाले. दलित साहित्यामुळे प्रस्थापित मराठी साहित्याचा प्रवाह ढवळून निघाला. मराठी साहित्याचे भावविश्व् अधिक विस्तीर्ण व व्यापक झाले. दलित साहित्य निर्मिती व चळवळीमुळे विविध वाड्.मयीन प्रवाहांना पूरक वातावरण निर्माण झाले. ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, देशी साहित्य इत्यादी साहित्य चळवळींनी देखील साहित्याच्या माध्यमातून आपल्या अस्तित्वाचा व अस्मितेचा प्रश्न मांडण्यास सुरूवात केली. फुले-शाहू-आंबेडकरांच्या वैचारिक जागृतीमुळे प्रगल्भ झालेला तरूण लेखक प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारू लागला. आपल्या समाजातील दाहक अनुभवांची, अगतिक जगण्याची तो मांडणी करू लागला. या क्रांतिकारक  साहित्य परिवर्तनाने प्रस्थापित मराठी साहित्याच्या परिघालाच छेद दिला. स्वातंत्र्योत्तरकालात साहित्यपातळीवरील या बदलांबरोबरच महानगरीय जीवनात औद्योगिकीरणाने अमूलाग्र बदल घडविले. यांत्रिकीकरणाने महानगरांचा प्रचंड विस्तार झाला. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या. खेड्यापाड्यातील तरूण उदरनिर्वाहाकरीता महानगरांकडे स्थलांतरीत झाला. यातूनच महानगरांच्या आजूबाजूला झोपडपट्टयांची संख्या बेफाम वाढली. भांडवलदार व कामगार हे दोन वर्ग महानगरीय अर्थव्यवस्थेत उदयास आले. गावखेड्यातून उपजिविकेकरीता स्थलांतरीत झालेला वर्ग महानगरीय जीवनात उपरा ठरू लागला, तो पोटाकरीता स्पर्धा करू लागला. यामुळे त्याच्या जगण्यात धावपळ, मूल्यशून्यता, स्वकेंद्रीवृत्ती, अनिश्चिचितता, असुरक्षितता वाढली. जगण्यात दुभंगलेपण आले. गाव-खेड्यात 'स्वत्व' व 'सत्व' असलेला त्याचा चेहरा महानगरीय गर्दीत नाहीसा झाला. झोपडपट्टीत समुहाने एकत्र राहूनही त्याच्यात एकटेपणा वाढला. अमाप पैसा मिळविण्याच्या धडपडीत शहरातील सिमेंटच्या जंगलात तो 'स्वत्व' व 'सत्व' हरवून बसला. झोपडपट्टीतील जगण्यामुळे स्थलांतरिताच्या आयुष्यात बकालपणा, गुंडगिरी, रोगट मानसिक मनोवृत्ती, लैंगिक विकृती, भ्रष्टाचार इत्यादीचे खतपाणी मिळाले. महानगरीय झोपडपट्टीतील हे भयाण वास्तव अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी विविध साहित्यप्रकारातून शब्दबद्ध केले. त्यातील कादंबरी साहित्यप्रकारांतून अभिव्यक्त झालेल्या महानगरीय कादंबरीचा अभ्यास डॉ. आनंदा गांगुर्डे यांनी 'महानगरीय कादंबरीतील समाजदर्शन' या ग्रंथातून ग्रंथरूपाने मांडला आहे. यशोदीप प्रकाशनाने (पुणे), प्रकाशित  केलेल्या या समीक्षा ग्रंथातून महानगरांच्या अवतीभवतीच्या विकृत, बकाल, भणंग समाजवास्तवाचा वेध डॉ. आनंदा गांगुर्डे यांनी घेतला आहे.

ग्रंथकाराने महानगरीय कादंबरी निर्मितीमागील प्रेरणांचा, कारणांचा विषय-वैशिष्ट्यांचा शोध घेत, विविध कादंबऱ्यांतून अधोरिखित झालेल्या झोपडपट्टीतील विदारक आयुष्याचा, तेथील जीवन-जाणीवांचा परामर्श घेतला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, तसेच, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महानगरीय जीवनात अमुलाग्र बदल घडले. औद्योगिक क्रांतीने, यांत्रिकीकरणाने मानवी जीवनात अनेक उलथापालथी घडल्या. यंत्रवत झालेला श्रमजिवीवर्ग व भांडवलदारवर्ग अशी दोन रूपे महानगरीय जीवनात निर्माण झाले. भांडवलदारांकडे संपत्तीचा प्रचंड स्त्रोत निर्माण होत असतानाच, श्रमजिवी-कामगारवर्गाच्या जीवनात मात्र बकालपणा, भणंगपणा व गरीबी वाढत गेली. गरीबीमुळे झोपडपट्टीत, फूटपाथवर, प्लॅटफार्मवर राहण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय उपलब्ध नव्हता, यातूनच चोऱ्या, खून, गुंडगिरी, मटका, जुगार, व्यसनाधिनता, वेश्या व्यवसाय इत्यादींचे काळे जग महानगरात वाढत गेले. महानगरातील हे भयाण विषय वास्तव कादंबरीच्या केन्द्रस्थानी आले. भारताच्या अनेक काना-कोपऱ्यातून रोजी-रोटीसाठी मुंबईत आलेला माणूस मुंबईच्या नगरा-उपनगराभवतीच्या झोपडपट्ट्यांमध्ये राहू लागला. विविध जाती-धर्मातील, विविध प्रांतातील, अनेकविध बोली भाषा बोलणारा, विविध सांस्कृतिक वसा-वारसा असलेला मानवी समुह झोपडपट्टीत राहू लागल्याने

एक वेगळे संमिश्र भावविश्व निर्माण झाले. अशा गुंतागुतीच्या जीवनशैलीमुळे त्यांच्यात अनेक व्यामिश्र प्रश्न निर्माण झाले. भूक, दारिद्र्य, उपासमारी, व्यसनाधीनता, वेश्या व्यवसाय, गुंडगिरी, भ्रष्टाचार, जातीय ताणतणाव, शोषण इत्यादींचे चक्रव्यूह म्हणजे झोपडपट्टीतील जीणे झाले. या कटूसत्याचा शोध अनेक प्रतिभावंत साहित्यिकांच्या कादंबरीचा विषय झाला. अण्णा भाऊ साठे, भाऊ पाध्ये, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, अरूण साधू, अनंत कदम, भाल पाटील, प्र. ना. शेणई, सुभाष भेण्डे, ह. मो. मराठे इत्यादी कादंबरीकारांनी चित्रीत केलेल्या कादंबऱ्यातील समाजजीवनाचा सखोल अभ्यास लेखकाने या ग्रंथातून नेमकेपणाने उदघृत केला आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी ‘चिरागनगरची ‘भुतं’, ‘चित्रा’, ‘आघात’, ‘चंदन’ या कादंबऱ्यातून अगतिक, असाहय्य, निराधार उपेक्षितांचे संघर्षमय आयुष्य रेखाटले आहे. आंधळे, पांगळे, लुळे, भिकारी, फकीर इत्यादींच्या जीवनातील अंधार, त्यांचे होणारे शोषण; तसेच, कामगारांच्या चाळीतील वासनांध विकृत मानवी वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन चित्रीत केले आहे. महानगरीय कादंबऱ्या म्हंटले की, भाऊ पाध्यांचे नाव समोर येते. त्यांनी ‘डोंबाऱ्याचा खेळ’, ‘करंटा’, ‘वैतागवाडी’, ‘वासूनाका’, ‘बॅ. अनिरूद्ध धोपेश्वरकर’, ‘अग्रेसर’, ‘होमसिक ब्रिगेड’, ‘राडा’, ‘वणवा’, ‘वॉर्ड नं. 7 सर्जिकल’ व ‘जेलबर्डस’ इत्यादी कादंबऱ्यातून महानगरीय जीवन जाणिवांना शब्दबद्ध केले आहे. त्यांनी महानगरातील उच्चमध्यमवर्ग, मध्यमवर्ग, निम्न मध्यमवर्ग यांचे समाजवास्तव रेखाटले. कामगार विश्वातील राजकारण, एका सच्च्या कार्यकत्र्याच्या आयुष्याची शोकांतिका, तरूणांच्या अतृप्त लैंगिक वासना, कामगार चाळीतील अंतःकलह, मारामाऱ्या, संप, मोर्चे, राजकीय डावपेच, घरासाठी-जागेसाठी होणारी फरपट, स्वैराचारी-महत्वाकांक्षी नायिकेच्या आयुष्याची परवड, उच्चमूल्यांचा देखावा करणारी, पण व्यवहारात भ्रष्ट असलेली शिवसेना, नेतेपणातील, नात्यातील, संघटनेतील खोटेपणा, स्त्री-पुरुष संबंधातील गुंतागुंत, स्त्रियांचे लैंगिक शोषण, लैंगिक भूक व पोटाची भूक यातील संघर्ष इत्यादी विषयांची मांडणी भाऊ पाध्यांनी वरील कादंबऱ्यातून केलेली आहे. भाऊ पाध्ये महानगराच्या अंतःस्तराचा, तेथील व्यापक जीवनदर्शनाचा, महानगरीय संस्कृतीचा, चंगळवादाचा, उपेक्षितांच्या समस्यांचा सखोला शोध घेतात. ‘‘भाऊ पाध्ये विसाव्या शतकातील महानगरीय भारतीय संवेदनेचे मराठी कादंबरीकार आहेत’’ ग्रंथकाराचे हे निरीक्षण यथार्थच म्हणावे लागेल.

मधु मंगेश कर्णिक यांनी ‘माहिमची खाडी’ या कादंबरीतून झोपडपट्टीतील असहाय्य, बकाल जीवनाचे विदारक चित्रण केले आहे. पोटाची व वासनेची भूक भागविण्याच्या धडपडीत नीती-अनीतीची सर्व बंधने झुगारली जातात. दारिद्र्य आणि गरिबी हा कादंबरीतील संघर्ष, महानगरातील अंतःस्तरापर्यंत घेवून जातो. ‘चक्र’ मध्ये जयवंत दळवी यांनी झोपडपट्टीतील उपेक्षितांचे जीवनचित्रण केले आहे. महानगरीय कादंबरीत मैलाचा दगड असणाऱ्या या कादंबरीत चोरी, लुटालूट, गुंडगिरी, देहविक्री, अमली पदार्थांची तस्करी इ.चे चित्रण आले आहे. ‘‘गुन्हेगारीच्या चक्रव्यूहात अडकलेल्या व मुंग्यासारखे जीवन जगणाऱ्या तीन कुटुंबांची संघर्ष कथा जयवंत दळवींनी ‘चक्र’मधून रेखाटली आहे.’’ लेखकाचे हे निरीक्षण झोपडपट्टीतील समाजवास्तवाचा वेध घेते. प्र. ना. शेणई यांनी ‘वावर’ कादंबरीतून झोपडपट्टीत राहणाऱ्या दादू नावाच्या एका सज्जन माणसाच्या आयुष्याची शोकांतिका चित्रीत केली आहे. मुंबईतील गिरणी कामगारांना संपाचा शापच आहे, असे दिसते. गिरणी कामगारांच्या संपामुळे दादूचे आयुष्य उद्ध्वस्त होते. डॉ. गांगुर्डे यांची ही निरीक्षणे महानगरीय समाजवास्तवाला नेमकेपणाने अधोरेखित करीत आहेत.

‘हातभट्टी’, ‘झोपडपट्टी’ आणि ‘फूटपाथ नं.1’ या कादंबऱ्यातून मुंबईच्या झोपडपट्टीतील विदारक समाजवास्तव शंकरराव खरातांनी चित्रित केले आहे. प्रामाणिकपणे, सरळमार्गी जगणाऱ्या नानू आणि गिरजा यांच्या प्रपंचाची वाताहत व गिरजाच्या असाहय्यतेचा फायदा झोपडपट्टीतील सर्जादादा घेतो, याचे विदारक चित्रण शंकरराव खरातांनी ‘हातभट्टी’ कादंबरीतून केले आहे. गिरजा गुडांच्या पाशवी प्रवृत्तींची बळी ठरते. मुंबईच्या रेल्वे मालधक्क्याजवळच्या झोपडपट्टीतील समाजव्यवस्थेचा वास्तवदर्शी वेध खरातांनी

'झोपडपट्टी' कादंबरीतून घेतला आहे. महानगरातील ही झोपडपट्टीच कादंबरीची मुख्य नायिका होते आहे. गरिबी व दारिद्र्याने होरपळलेल्या जीवांची ही कहाणी आहे. झोपडपट्टीतील अनैतिक संबंध, गुंडगिरी, व्यसनाधीनता, किड्यामुंग्यासारखे जगणे, शंकरराव खरातांनी कादंबरीतून रेखाटले आहे. ''झोपडपट्टीतील विविध भावभावनांचे हृदयस्पर्शी वर्णन खरातांनी केले आहे.'' ज्यांना झोपडपट्टीत देखील राहण्यास जागा नसते, अशा अनेकांना उघड्यावरच जगावे लागते, किंवा फूटपाथचा आधार शोधावा लागतो. ही या मुंबईनगरीची शोकांतिका आहे. फूटपाथवरच्या बेकायदेशीर जगात जुगार, सट्टा, मटका, भांडणे, वेश्यागमन, व्यसनाधीनता, भांडणे, मारामाऱ्या इत्यादीचे चित्रण खरातांनी 'फूटपाथ नं. 1' कादंबरीत रेखाटले आहे. उपेक्षित, पद-दलितांच्या आयुष्यातील दुःखाला, भणंग जगण्याला खरातांनी या कादंबरीतून वाचा फोडली आहे. झोपडपट्टीतील या समाजदर्शना विषयीचे भाष्य लेखकाने नेमकेपणाने केले आहे.

विशाल, व्यापक जीवनपट लाभलेली 'वस्ती वाढते आहे' ही डॉ. भाल पाटील यांची कादंबरी वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांना उजागर करते. मुंबई महानगरपालिकेतील अर्थपूर्ण राजकीय भ्रष्टाराचा बुरखा फाडते, दोन झोपडपट्ट्यातील संघर्षावर प्रकाश टाकते आहे. दिवसाढवळ्या अंधकारमय जीवन जगणाऱ्या, लोकलमध्ये चॉकलेट, पेपरमिंटच्या गोळ्या विकणाऱ्या रामू व त्याच्या बालमित्रांच्या आयुष्यातील व्यथा-वेदनांचे चित्रण अनंत कदम यांनी 'दिवसातल्या अंधारात' कादंबरीत केले आहे. कामगार चळवळीपासून ते झोपडपट्टी बचाव संघटनेपर्यंत चालणाऱ्या कामाचे प्रत्यक्ष चित्रण रघू दंडवते यांनी 'वसेचिना' कादंबरीतून केले आहे. विसू कादंबरीचा नायक मुंबईच्या गर्दीत असूनही परका आणि पोरका ठरतो. उपरेपणाची भावना घेवून जगणारा वसू आणि अनाधिकृत झोपडपट्टीला आलेल्या महापालिकेच्या नोटीसा सर्वांनाच पोरके ठरविणाऱ्या आहेत. यातूनच झोपडपट्टीतील ही सर्व माणसे कशी उपरी, उपेक्षित आहेत, हेच लेखकाला दर्शवायचे आहे. चेंबूरच्या झोपडपट्टीत नरक यातना भोगणाऱ्या बारा-तेरा वर्षाच्या मुलाची दर्दभरी कहाणी 'झिपऱ्या' कादंबरीतून अरूण साधू यांनी मांडली आहे. बूट पॉलीश करणाऱ्या या अनाथ मुलांचे पोषण अनेक पातळीवरून घडते. या अनाथ मुलांच्या आयुष्यात कीर्तने मास्तरांसारखा एखादा समाजवादी मास्तर ज्ञानाचा प्रकाश लावण्याचे कार्य या महानगरीय झोपडपट्ट्यांतून करतो आहे, तेवढीच ही एक सुखद घटना आहे. महानगराचे प्रचंड आक्राळविक्राळ अंतरंग दर्शविण्याचे काम अरूण साधू यांनी 'मुंबई दिनांक' कादंबरीतून केले आहे. ''महानगरातील सामान्यांची धडपड, अस्वस्थ करणारे एकाकीपण, सत्तेचे राजकारण, स्मगलिंग, गुन्हेगारी, युनियनचे राजकारण, मध्यमवर्गीयांचे जगणे, कामगारांचे बकाल जीवन, शोषित -पीडितांचे जग'' इत्यादीचे तळ शोधण्याचा प्रयत्न अरूण साधूंनी 'मुंबई दिनांक'मधून केला आहे. अरूण साधूची पत्रकाराची दृष्टी असल्याने महानगरीय जगण्यातील बारीक-सारिक पैलूंचा ती शोध घेते आणि राजकारणातील सत्ता संघर्षातील बारकावे ती सहजपणे टिपते, इत्यादीची मांडणी साधूंनी 'सिंहासन' कादंबरीतून केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावून जावून पावन पगारे सुशीलेला घेवून माटुंग्याच्या गलिच्छ लेबर कॅम्पच्या झोपडपट्टीत दलित बांधवांच्या उद्धाराकरीता कार्य करतो आहे. मुंबईच्या विराट गर्दीत व गलिच्छ वस्तीत सुशीलेचा जीव गुदमरतो. पण भारवलेला पावन मात्र झोपडपट्टीतील या बकाल, भणंग लोकांच्या आयुष्यात प्रकाश पेरण्याकरीता संघर्ष करतो. दुर्दैवाने राजकारणाच्या चक्रव्यूहात तो सापडतो, स्वार्थी व फुटीर दलित कार्यकर्त्यांकडूनच त्याचा पराभव होतो. महानगरीय झोपडपट्टीतील हे जळजळीत समाजवास्तव तसेच, एका सच्च्या कार्यकर्त्या चे स्वप्न, त्याचे ध्येय साकार होत नसल्याचे सत्य बाबुराव बागुलांनी 'कोंडी' कादंबरीतून केले आहे. मनोहर ओक मुंबईतील गुन्हेगार आणि व्यसनाधीन लोकांचे आयुष्य 'चरसी' कादंबरीत रेखाटतात. महानगरातील मध्यमवर्गीय माणसाला इमाने इतबारे काम करूनही साधी राहण्यासाठी खोली भाड्याने मिळत नाही, ही खंत व दुःख प्रभाकर पेंढारकरांनी 'अरे संसार संसार' कादंबरीतून मांडले आहे. ''महानगरीय जीवनातील टोकाचे एकाकीपण, परात्मता, खाजगीकरण,

जगण्यातील अर्थशून्यता, अ-ऐतिहासिकता, न-नैतिकता आणि टोकाचा व्यक्तिवादी दृश्टिकोन 'सात सक्कं त्रेचाळीस' कादंबरीमधून किरण नगरकरांनी समर्थपणे मांडला आहे. महानगरातील गोदी कामगारांची संघटना बांधणाऱ्या, त्यांच्यावरील अन्यायाविरूद्ध लढणाऱ्या एका कामगार नेत्याची पन्नास वर्षाची धडपड भानू काळे यांनी 'कॉम्रेड' कादंबरीतून रेखाटली आहे. ''पन्नास वर्षाचा हा कालखंड समग्रपणे उभा करणे, कादंबरीकाराला जमलेला नाही,'' ग्रंथकाराचे हे निरीक्षण कादंबरीची मर्यादा दर्शविणारे आहे.

महानगरातील चंगळवादी संस्कृती, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, अनैतिक व्यवहार, भोगवादीवृत्ती, पोटाकरीता जीवघेणी स्पर्धा इत्यादीचे प्रत्ययकारी चित्रण सुभाष भेण्डे यांनी 'आधारवाटा' कादंबरीतून केले आहे. उद्योगव्यवसायात नवी मॅनेजमेन्ट फिलॉसॉफी आणू पाहणाऱ्या देशमुखांच्या भ्रमनिराशेची कथा ह. मो. मराठे यांनी 'सॉफ्टवेअर' कादंबरीतून मांडली आहे. संगणक क्रांतीमुळे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला, यांत्रिकीकरण व जागतिकीकरणामुळे महानगरात आत्मकेंद्रीवृत्ती रूजली. राखीव जागांमुळे सर्वणांच्या मनात द्वेष भावना जागृत झाली, अशा काही प्रश्नांना शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न संजीव खांडेकर, ह. मो. मराठे, गौरी देशपांडे, संजय जोशी या कादंबरीकारांनी केला आहे. महानगरीय जीवनातील हे अंतःस्तर विविध लेखकांनी अधोरेखित केलेले आहेत. या सर्व आशयसूत्रांचा मागोवा अभ्यासकाने नेमकेपणाने या ग्रंथातून नोंदविला आहे.

महानगरीय झोपडपट्टीतील उपेक्षितांचे आयुष्य, त्यांच्या विदारक वास्तवाचे कादंबरीकारांनी केलेले चित्रण हे मुंबई महानगराला समोर ठेवूनच अधिक केलेले दिसते. बकालपणा, मूल्यशून्यता, अनैतिकता, भ्रमनिरास, बेकारी, दारिद्र्य, गुंडगिरी, मारामारी, व्यसनाधीनता, लैंगिक शोषण, चंगळवादीवृत्ती इ. विषय वैशिष्ट्यांचा परामर्श लेखकाने या ग्रंथातून घेतला आहे. अडाणी, अज्ञानी, अशिक्षित, अंधश्रद्धाळू, असंस्कृत, किडलेल्या मानसिकतेचे समाजदर्शन ज्या विविध कादंबऱ्यातून घडले, त्या तथ्यांचा शोध अभ्यासकाने घेतला आहे. बकालपणे फिरणे, भणंग भटकणे, चोऱ्या करणे, दारू पिणे, मारामाऱ्या-गुंडगिरी, तुरूंगात जाणे, शिक्षा भोगणे, पोटाची व शरीराची भूक भागविण्यासाठी कष्ट उपसणे, वेळप्रसंगी वेश्या व्यवसाय करणे इत्यादी वृत्ती-प्रवृत्तींवर लेखकाने नेमकेपणाने भाष्य केले आहे. अण्णा भाऊ साठे, भाऊ पाध्ये, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, अरूण साधू, शंकरराव खरात, बाबुराव बागुल इत्यादी लेखकांनी झोपडपट्टीतील सामाजिक प्रश्न-समस्यांवर पुरेसा प्रकाश टाकला आहे. दुःख, दैन्य, दारिद्र्य, गरीबी, भूक, उपासमारी, व्यसनाधीनता यापुढे सर्व नैतिक मूल्यांचा कसा ऱ्हास होतो, त्यामागील कारणांचा नवा अन्वयार्थ मांडण्याचा प्रयत्न अभ्यासकाने केल्याचे दिसते. झोपडपट्टीतील समुहनिष्ठ उपेक्षित जीवनाचा अनेक लेखकांनी वस्तुनिष्ठपणे परामर्श घेतल्याचे दिसते. भाऊ पाध्ये, अरूण साधू यासारखे काही अपवादात्मक लेखकच समग्र महानगरीय जीवनाला कवेत घेतात, अशा काही मर्यादांचा स्पष्टपणे उल्लेखही लेखकाने केला आहे. तसेच, लेखकाने महानगरीय कादंबऱ्याच्या आशय वैशिष्ट्यांचा सविस्तर परामर्श घेतला आहे, त्याचबरोबर भाषेच्यानुशंगाने अभिव्यक्ती सामर्थ्यातील काही सौंदर्यस्थळे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. झोपडपट्टीतील रहिवाशी हा अशिक्षित, अडाणी असल्याने तसेच, भारतातील विविध कानाकोपऱ्यातून आला असल्याने त्यांच्या बोलीचे रूपही संमिश्र पाहयाला मिळते. परस्परांतील संवादात मराठी, हिंदी व अन्य भाषांची भेसळ पाहयाला मिळते. मारामारी, भांडण इ. प्रसंगी अपशब्द-शिव्यांचा वापर होतो. गुन्हेगारी जगताची एक भाषा आहे. लेखकाने झोपडपट्टीतील भाषिक वैशिष्ट्यांचा मागोवा ग्रंथातून घेणे अपेक्षित होते. भाषिक अभिव्यक्ती सामर्थ्यांचा विचारामुळे हा ग्रंथ अधिक सर्वांग परिपूर्ण झाला असता, असे असले तरी लेखकाने महानगरीय जीवनाचे घडविलेले समाजदर्शन तितकेच यथार्थ आणि वाङ्मयीन दृष्ठया महत्त्वपूर्ण असल्याने ग्रंथाला संदर्भमूल्य प्राप्त झाले आहे.

❖❖❖

# संतसाहित्यातील प्रबोधन

डॉ. प्रमोद देवके
मराठी विभाग
यशवंतराव चव्हाण कला, विज्ञान महाविद्यालय, मंगरूळ पीर
ता. मंगरूळ पीर, जि. वाशिम, महाराष्ट्र (India), भ्रमणध्वनी ९६०४६७४७२३

## गोषवारा (Abstract)

संत साहित्याकडे विशिष्ट धर्माचे साहित्य म्हणून बघितल्या जाते. या साहित्याचा विचार बुद्धीपेक्षा भावनेने केला जातो. या साहित्याकडे मानवी कल्याणाचे किंवा प्रबोधनाचे साहित्य म्हणून बघणे गरजेचे आहे. ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा किंवा ग्रामगीता यांना देवपाटात ठेवण्यापेक्षा डोक्यात ठेवणे योग्य राहील. जीवनाला मार्गदर्शन करण्याचे, तारण्याचे कार्य हे साहित्यकरू शकते. संत रामदासाचे श्लोक हे मानसिक पातळीला सुदृढ करण्याचे साधन आहे तर तुकारांचे अभंग जीवनाला खरी दिशा दाखविते. या पद्धतीने विचार करून आपण या साहित्याचे अनुकरण केले पाहिजे. संत साहित्य हे मानवी कल्याणाकरिता निर्माण झालेले आहे. भक्तीतून मानवी कल्याणाचा विचार त्यात मांडलेला आहे परंतु आपण भक्तीजवळच थांबलो. या साहित्याला सामाजिक अंगाने पारखणे गरजेचे आहे. संत साहित्याला धर्माच्या चौकटीतून बाहेर काढून मानवी प्रगतीचे विचार या हेतूने त्याचे अध्ययन, अध्यापन झाले तरच या साहित्याचा खरा उपयोग होईल.

## विषय विवेचन

अकराव्या – बाराव्या शतकापासून मराठीचा विकास होण्यास प्रारंभ झाला. विश्व कल्याणाचे दान मागणाऱ्या संत ज्ञानेश्वराने ज्ञानेश्वरीद्वारे गीता मराठीत आणली,श्री चक्रधरांचे लीळाचरित्र  अशा विविध साहित्याद्वारा  वाङ्‌मयीन परंपरेला या काळापासूनच सुरूवात झाली असे उपलब्ध साहित्यावरून वाटते. संत परंपरेने परमेश्वराच्या भक्तीतूनच मुख्यता आपली  साहित्य रचना केली. भक्ताच्या आर्ततेने भारवलेली ओवी, अभंगरूपी ही काव्यरचना जनमानसात रुजत गेली, संत नामदेव,  चोखामेळा, जनाबाई, सोयराबाई इत्यादी संत परंपरेतील कवी – कवयित्रींनी काव्य फुलविले, परंतु काव्य रचनेच्या हेतूने त्यांनी आपले साहित्य रचले नाही तर परमेश्वराची आराधना करता – करता त्यांच्याकडून ही रचना झाली आहे. त्यांच्या मनातील परमेश्वराची ओढ यातून प्रतीत होते, अतिशय समर्पक शब्दांतून रचल्या गेलेले हे कवण आर्ततेने जरी भरले असले तरी तत्कालीन धार्मिक क्षेत्राची, तसेच सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राची माहितीही या ओवी, अभंगातून मिळत असते. संत एकनाथांनी आपल्या भारुडातून अघ्यात्म व जीवन यांची सांगड घातली आहे, लोकपरंपरेतील या प्रकारातून त्यांनी रंजकशैलीतून अध्यात्म लोकांसमोर मांडले. संत तुकारामांनी आपल्या अभंगातून सामान्य जनतेला प्रबोधन करून जागृत करण्याचे कार्य केले. अतिशय वास्तववादी विचारसरणीने युक्त त्यांचे लिखाण समाजमानसास विचार करण्यास भाग पाडणारे आहे. संत रामदासांचे विचार आजही समाजास दिशा दर्शक आहे. आधुनिक काळातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांनी समाज मानसातील घाण साफ करून त्यांला दिशा देण्याचे कार्य केले.

संत साहित्याने स्व ओळखीबाबत मार्गदर्शन केलेल दिसते. माणूस आपल्यापेक्षा दुसऱ्याला ओळखण्याचा प्रयत्न करतो त्यातून तो त्याच्याविषयी  मत बनवतो. परंतु स्वतःचे परीक्षण तो करत नाही, आत्मपरिक्षण करून मी कसा आहे? याचा विचार ता करत नाही. सत साहित्यातून या संदर्भात विचार मांडले आहे. स्व ची ओळख माणसाचे व्यक्तिमत्व बदलवू शकते. स्वतःला बदलवा नंतर जगाला बदलवा असे म्हटले जाते ते त्याचमुळे. सोळाव्या शतकातील रामदास स्वामी यांनी लिहिलेले मनाचे श्लोक म्हणजे आत्मपरिक्षण करण्यासाठी निर्माण केलेले साहित्य होय असे म्हणणे योग्य ठरेल. त्याच्या साहित्यातून येणारे विचार हे मनाला म्हणजेच मानवी जीवनाला वळण कसे लावावे यासंदर्भात मार्गदर्शन करणारे आहे. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मनाचे श्लोकचा अभ्यास केला तर मनाला वळण लावण्याचे विविध मार्ग संशोधकाला यातून मिळतील एवढे मनाच्या संदर्भातील सूक्ष्म विचार यात आढळतात.

मना वासना दुष्ट कामा नये रे। मना सर्वथा पाप बुद्धी नको रे ।।
मना सर्वथा निति सोडू नको हो। मना अंतरी सार विचार राहो।।[१]

वरील ओळीतून येणारा विचार हा मानवी मनाला समाधानी जीवनाचा मार्ग सांगणारा आहे. या गतिमान युगात माणूस यंत्रवत झाला आहे. त्याला सर्वात पुढे जायचे आहे. या स्पर्धात्मक युगात मागे राहणे त्याला आवडत नाही. यातून निर्माण होत असलेली निराशा, वैफल्य, असफलता यामुळे मानवी मन व्यथीत होताना दिसते. या सर्वाकरिता तो बाह्य परिस्थितीतील कोणते घटक कारणीभूत आहे याचा विचार करत असतो. परंतु कधीतरी स्वत:च्या अंतरंगात डोकावून आपण काय करत आहो? का करत आहो? खरचं हे करण्याची आवश्यकता आहे काय? याचे आत्मचिंतन केले असते तर निश्चितच त्याच्या जीवन समाधानी झाले असते. परंतु आहे त्यापेक्षा जास्तची अपेक्षा माणसाचे जीवन चिंताग्रस्त करते. यासंदर्भात संत रामदासांनी मांडलेले वरील विचार हे मार्गदर्शन करणारे आहे. आधुनिकता ही कपडे, घर, गाडी, ऐश्वयर्याचा बडेजाव यात नसून समाधानी जीवन जगण्याची कला म्हणजे आधुनिकीकरण असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल. परंतु वर्तमानात आधुनिकतेची संकल्पना आपण भौतिक जगासोबत जोडली आहे, मानसिक शांतीबाबत जोडलेली नाही. 'मानवी मन हे लोभाने ग्रासलेले आणि त्यामुहे सद्सद्विवेक बुद्धीचा नाश होणे अपरिहार्य आहे. सध्याच्या काळात अशा अपवृत्तीचा प्रभाव वाढताना दिसतो. अशा वृत्तीची संगत माणसाच्या विनाशास कारणीभूत ठरते. रामदासांनी अशा अपवृत्ती मानसिकतेचा शेवट पाप संचयात व दु:खात होतो हे सप्रमाण सिद्ध केले आहे.'[२] गतिमान युगातील यंत्रवत झालेला माणूस आपल्याला दिसतो. अशा माणसास स्वत:ची ओळख, स्वत:चे सामर्थ्य आणि चांगले वाईट याची ओळख करून देण्यासाठी आत्मपरिक्षण करणे गरजेचे असते. याबाबतचे मार्ग संत रामदास यांच्या साहित्यात सापडतात.

संत तुकाराम यांचे साहित्य हे माणसाला प्रबोधन करताना स्वत:चा विचार करण्यास बाध्य करणारे आहे. आपली वर्तणूक, आपले अनुकरण हे मुळात अंधानुकरण असून त्यातून सुटका करून घ्यायची असेल तर स्वत:ला ओळखणे गरजेचे कसे आहे हे संत तुकारामांच्या अभंगातून साकार होते. साधू म्हटले की आपल्या डोळ्यापुढे येतो. भगवे वस्त्र धारण केलेला, जटा असलेला व्यक्ती या वरच्या रंगाला भुलत आपण त्याच्यापुढे नतमस्तक होतो. आपले मन त्याला संत माणते कारण परंपरेचा पगडा आपल्या मनावर असतो. अशा सवयीवर, अंधानुकरणावर तुकाराम म्हणतात,

'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले
तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावा'[३]

तुकारामांचे असे विचार माणसाला अंर्तमुख करतात व आपल्यातील अंधानुकरणाला दूर करण्यास मदत करतात. संत साहित्याचा अभ्यास करताना वाचकाचा मनावर धर्माचा पगडा नको तर तटस्थपणे त्यांनी मांडलेल्या विचारांचा विचार करणे गरजेचे असते. उदा. संत ज्ञानेश्वरांनी 'रेड्यामुखी वेद वदविले' असे नमूद केले आहे. संत ज्ञानेश्वर या मराठी चित्रपटातसुद्धा संत ज्ञानेश्वर रेड्याच्या मुखातून वेद वदवित असल्याचे दर्शविले आहे. ग्रामीण बोलीत 'हेल्याचे मस्तक' म्हणजे निर्बुद्ध माणूस असा अर्थ लाक्षणिक अर्थाने घेतला जातो. यादवकालीन धर्म ज्ञान हे मुख्यत्वे संस्कृत भाषेत होते. सामान्य जनांना संस्कृत येत नव्हती. संत ज्ञानेश्वरांनी गीतेतील ज्ञान तत्कालीन मराठीभाषेत आणले. सामान्य जनांना त्यांच्या भाषेतून ज्ञान मिळाल्यामुळे ती जनता साक्षर व्हायला लागली. आतापर्यंत निबुद्ध अवस्थेत असलेली जनता ज्ञानी होत आहे. हे रूपकात्मक पद्धतीने रेड्यामुखी वेद वदविले यातून सांगितले आहे. परंतु  अभिधा शक्तीनेच शब्दश: अर्थ घेतात व त्यातून खरा अर्थ समोर येत नाही. म्हणून संत साहित्याचा अभ्यास किंवा आकलन तटस्थ वृत्तीने करणे गरजेचे असते. संत साहित्य हे मानवी मनाला वळण लावण्याचे कार्य करते. संत साहित्याची उपयुक्तता कालातीत आहे. त्यातील विचार काळानुसार बदलत जात असलेल्या मानवी वृत्तीला योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य करते.

संत साहित्य मानवी वर्तनावर आधारित असते. आत्मभान करून देण्याचे सामर्थ्य यात असते. राष्ट्रसंतांनी मांडलेले विचार जर अमलात आले असते तर स्वच्छ भारत अस्तित्वात आला असता. परंतु आपले दुदैव हे की धर्मग्रंथ आपण देव्हाऱ्यात ठेवले आणि डोके व डोळे बंद करून त्यांची पूजा केली. संत एकनाथ सारख्या संताने भारूड या लोकप्रकारातून रंजनातून प्रबोधन करण्याचा यशस्वी उपक्रम राबविला. शिक्षण प्रणालीत आवड निर्माण करून शिक्षण देण्याचे प्रकार आता दिसत आहे परंतु याचे बीज संत एकनाथाच्या भारूडात आहे याबाबत आपण विचार का करत नाही? संत गाडगे बाबांनी संवाद शैलीतून प्रबोधन केले. व्याख्यान पद्धतीतील एकांगी प्रणाली व त्यातून विद्यार्थ्यांत निर्माण होणारा कंटाळा यावर विद्यार्थ्यांना प्रेरीत

करून अध्ययन अध्यापनात त्यांचा समावेश कसा करून घेता येईल यावर विचार मंथन होताना दिसते परंतु यावर संत गाडगे बाबा यांनीपूर्वीच प्रयोग केल्याचे आपण लक्षात घेत नाही. संत हे समाज अभियंता आहे या दृष्टीने विचार केल्यास त्यांच्या विचारातील, कृतीतील आधुनिकता आपल्याला दिसून येईल. संत साहित्याचा विचार मुख्यत्वे भक्तीपुरता आपण मर्यादित करतो. संत साहित्याचे एक प्रयोजन भक्ती असले तरी प्रबोधन हे महत्वाचे आहे. त्यांचे विचार हे वस्तुनिष्ठ आहेत. त्यातील विचारांची वैज्ञानिकता शोधणे गरजेचे आहे.

दिखाऊ कपडे, कोरडी ऐट नोकरपेशी थाटमाट
हे शिक्षणाचे नव्हे उद्‌दीष्ट ध्यानी घ्यावे हे नीट आधी[४]

तुकडोजी महाराज यांनी त्या काळात मांडलेला हा विचार आधुनिक काळातील शिक्षण व्यवस्थेतील अव्यवस्था, व्यावसायिक दृष्टी दर्शविणारा आहे. आजचे शिक्षण हे नोकरीसाठी आहे, मानवी मूल्याला, माणूस घडविणे हा त्याचा उद्‌देश नाही तर बाजारपेठेला आवश्यक असलेला माणूस नावाचे यंत्र तयार करणारे शिक्षण आज दिले जाते. त्यातून निर्माण होत असलेल्या समस्या आज आपल्या पुढे आहे. शिक्षणाने सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या योग्य माणूस निर्माण केला असता तर वर्तमान काळातील सामाजिक, सांस्कृतिक समस्या उभ्या झाल्या नसत्या.

संत साहित्य हे विशिष्ट धर्माचे किंवा जातीचे नसून मानव कल्याणसाठी आहे असा विचार करून त्यातील विचार जर आत्मसात केले तर संतांनी मांडलेली विश्व कल्याणाचे उद्‌दीष्ट पूर्ण होईल. या आधुनिक युगात माणूस भौतिकदृष्ट्यया प्रगत झाला. पक्के घर, वाहतूक सुविधा, आरामाचे सर्व भौतिक साधणे जवळ असलेल्या जीवन प्रणालीला आधुनिक म्हटले जाते. परंतु ज्या समातव्यवस्थेत चिंताग्रस्त, नैराश्यात जगणारा माणूस दिसतो, तिथे कुटूंब व्यवस्था व्यक्तीकेंद्री होत आहे तो समाज आधुनिक कसा होईल. आधुनिकता ही संस्कार, आचार, विचार यात दिसली पाहिजे आणि याबाबत योग्य मार्गदर्शन, प्रबोधन संत साहित्य करू शकते.

## निष्कर्ष

१. संत साहित्याकडे धर्माचे साहित्य म्हणून न बघता प्रबोधनाचे साहित्य म्हणून बघणे योग्य ठरते. यात येणारे विचार मानवी कल्याणचे असतात. ते कोणत्या जाती, धर्मापुरते मर्यादित ठेवणे चुकीचे ठरते.
२. संत साहित्याने मानवी जीवनाचा, मानवी मनाचा सखोल विचार केला आहे. मानवी मनाचा दिशा देण्याचे कार्य संतांनी केलेले आहे. त्यांचे विचार मानवी जीवनाला तारक ठरतात. अशा विचारांचा श्रद्धाशील मनाने विचार केल्यापेक्षा बुद्धीवादी दृष्टीकोनाने विचार केल्यास उपयुक्त ठरेल.
३. संत साहित्य हे तत्कालीन समाजाचे चित्रण करते. यातून त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाची उपयुक्त माहिती मिळते. संत साहित्याचा सामाजिक, भाषिक दृष्टीनेही अभ्यास होणे गरजेचे आहे.
४. संत साहित्य हे विचारवंतांचे साहित्य आहे. भक्तीच्या भूमिकेतून त्याकडे न बघता त्यातील विचार वर्तमानात कसे आचरणात आणता येईल आणि भक्ती व संसार यांचा समन्वय कसा साधता येईल याचा विचार समाजास उन्नतीकडे नेणारा राहील.

## संदर्भ

१. देवस्थळी भालचंद्र, सार्थ मनाचे श्लोक, ढवळे प्रकाशन, आवृत्ती पाचवी २००४, पान ६७
२. डॉ. देशमुख उषा, संतकाव्य:संचित, माया प्रकाशन, पहिली आवृत्ती २०००, पान १४७
३. अभंगाचा गाथा, प्रकाशक श्री विठोबा – रखुमादेवी देवस्थान संस्थान, देहू आवृत्ती तिसरी, २००१, पान ४६२
४. ग्रामगीता, संपादक स्व. सुदाम सावरकर प्रकाशक – महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती महामंडळ, पुणे,पुनर्मद्रन २०११ पान२०२

## संदर्भ ग्रंथ

१. सार्थ मनाचे श्लोक, भालचंद्र देवस्थळी,ढवळे प्रकाशन,
२. ग्रामगीता, संपादक– स्व. सुदाम सावरकर प्रकाशक – महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती महामंडळ, पुणे
३. अभंगाचा गाथा, प्रकाशक श्री विठोबा – रखुमादेवी देवस्थान संस्थान, देहू
४. संतकाव्य:संचित, डॉ उषा देशमुख, माया प्रकाशन

❖❖❖

# डोळे माझे सूर्य झाले : काव्यातील आंबेडकरवाद

प्रा. डॉ. मिलिंद भिवाजी कांबळे
विद्या विकास महाविद्यालय
समुद्रपूर, जि. वर्धा, महाराष्ट्र (India)
Email: milindkamble777@gmail.com भ्रमणध्वनी ९७६५७६८८३२

## गोषवारा (Abstract)

कवी संतीश नाईकवाडे यांची 'डोळे माझे सूर्य झाले' या काव्यातून समाजातल्या विषमतेवर, इथल्या वाईट परंपरेवर, इथल्या अमानवी मूल्यांवर प्रहार केला आहे. त्यांच्या मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या कवितून परिवर्तनाचा विचार आणि आंबेडकरी विचार येतो. कवी नाईकवाडे यांनी काव्यातून आंबेडकरवाद सांगतांना समता, स्वातंत्र्य आणि बंधूता या गोष्टीची समाजाला कशी आवश्यकता आहे.याचा सारासार विचार मांडला आहे. शेवटी कवीनी इथल्या मानवी प्राणी मानासाठी कल्याणाची आणि वैश्विकतेची भूमिका घेते असे मला वाटते आहे.

## प्रस्तावना

कविता हा माणसाच्या आतला आवाज आणि स्वभावातालचं जगणं शब्दांकिंत करत असते. साहित्य हा समाजाचा आरसा असतो जे जे समाजात चांगलं वाईट असतं ते ते साहित्याच्या माध्यमातून लेखक मांडत असतो. मग ती कविता, कथा अथवा कांदबरी असो लेखकाला सभोवतालचं सजीव निर्जिव जग शब्दात पकडायचं असतं डोळे माझे सूर्य झाले. या काव्यसंग्रहातून कवी सतीश नाईकवाडे यांनी आंबेडकरवादी जाणिवा पेरण्याचं काम केल आहे. कवीचे डोळे सूर्य झाले आहेत. त्याला आंबेडकरी क्रांती विज्ञानाची धार आली आहे. नाईकवाडे यांच्या कविता सूर्याप्रमाणे अग्नीच्या ज्वाला ओकतांना दिसतात. कवितेतुन कविंनी विषमता, अंधश्रध्दा, असंस्कृतता यावर कठोर शब्द प्रहार केला आहे. त्यांची कविता माणसाचं दुःख, वेदना, संघर्ष मांडते म्हणून ती माणूसकेंद्री कविता वाटती आणि आंबेडकरवादावर कठोर भाष्य करते. डोळयात प्रज्ञासूर्याला आणि शब्दात आंबेडकरी विचार घेऊन कविता मराठी कवितेच्या प्रांतात उतरते.

कवी सतीश नाईकवाडे यांचा डोळे सूर्र्य झाले हा तिसरा कवितासंग्रह आहे. या आधी त्यांचे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यात 'घाव' आणि सखा माझा अण्णाभाऊ या काव्यसंग्रहांनी त्यांना मराठीतील दर्जेदार कवी म्हणून नावलौकिक मिळवून दिला असे म्हणता येईल. डोळे माझे सूर्य झाले या काव्यसंग्रहाच्या सुरुवातलाच कवी नाईकवाडे म्हणतात,

" या स्वातंत्र्यात..........
लोकशाही नाक्या – नाक्यावर नागवली
महापुरुषांची जातवारगणना केली
जातीमुळे माणसांचे......
दिवस ढवळया मुडदे पाडली
रक्ताच्या थेंबा थेंबाने मनुसंस्कृती ओलीचिंब झाली
म्हणून डोळे माझे सूर्य झाले." [१]

कवी नाईकवाडे मुक्तिदाता कवितेत डॉ. आंबेडकरांना संबोधताना आणि एकुणच त्यांच्या कार्याची महती सांगतांना म्हणतात की,

"तू मानवतेचा रॉकस्टार
इथली बुरसटलेली
सडलेली, गंजलेली
मनुव्यवस्था.....
टराटरा फाडून
छिन्न विच्छिन्न केली

तुझ्या लेखणीच्या तलवारीने
हे समाजचिकित्सक वैज्ञानिका
तू शोधलास कारणे
बहुजनांच्या अधागतीची
दिलास संजीवनी विद्येची
दंड थोपटुनी लढल्यास
समतेच्या रणमैदानी
पुरुन उरलास
इतिहासाच्या पानापातूनी''[२]

कवीला सांगायचे आहे की, डॉ. बाबासाहेब सर्व समाजांचे मुक्तिदाता आहेत. त्यांनी इथल्या समाजव्यवस्थेला, इथल्या सडलेल्या मनुव्यवस्थेला फाडून टाकले आणि या देशात नवाइतिहास घडवला नवा मानवतावाद पेरला.

'वामनदादा' आणि 'पोचीराम' या दोन कवितेतून कवी नाईकवाडे यांनी खरा आंबेडकरवाद मांडला. वामनदादा आणि पाचीराम हे खरे डॉ.आंबेडकरांचे वारसदार आहेत त्याच्या रुपाने कवीने येथे आंबेडकरी विचार उभा केला तो असा,

''भीमरायाच्या भाष्यकारा
तू थाटलास संसार
आंबेडकरवादाची शब्द शब्दाने .....
केलीस सुरुंगपेरणी
तू गायलास शाहीरी
जशी वीज चमकली
क्षणार्धात कोसळली
मुनव्यवस्थेवर उद्‌ध्वस्त झाले
इथले धर्मव्यवस्थेचे इमले
चंदनासम झिंजुनी तू
दिला आंबेडकरी चळवळीला संजीवनी
शेवटच्या श्वासापर्यंत गायलास तू
मानवतेची गाणी, मानवतेची गाणी''[३]

तसेच कवी नाईकवाडेयांच्या पोचीराम काव्यातील आंबेडकरी विचार अंगावर क्षारे आणणारा, प्रेरणा देणारा आहे ती कविता पहा,

''पो— लादाला चि—रणारा भीमवीर तू
नाही कधी झुकविला, त्या रामा पुढं शिर तू
तुझ्या ओठात  भीम
श्वासात भीम
नसानसात भीम
तुला जाळतांना
ती चिताही बोलू लागली
जय भीम...... जय भीम ......
तुला जाळणारेही जळत आहे त आता
वणव्यासारखे.....
विद्यापीठांच नामांतर पाहून''[४]

कवी नाईकवाडे यांच्या बांडगुळ आणि बुजगावणं या कवितेतून माणूसपण कसं हरवत चाललं, नीतीमूल्ये कसे संपत चालले यांचे विदारक चित्रण या कवितेतून आले आहे त्या कविता पहा,

''बाबासाहेब

१४ ऑक्बेबर १९५६ ला
तुम्ही नव्याने लावलेल्या
बोधीवृक्ष
आता आकाशाला
गवसणी घालू लागलाय
फक्त माणसातला माणुसच
त्यांच्या छायेखाली येवू लागलाय
पण.....
माणसातला हरवलेला माणूस
बोधी वृक्षालाच्या फांद्या
कुरतडण्याचा''[५]

तसेच बुजगावंण कवितेतुन माणूस स्वत:ला आंबेडकर कसा समजतो, स्वार्थासाठी खूर्चीसाठी अशा एकमेकांनवर कुरघोडी करतो याचे चित्रण या कवितेत आले आहे. त्या कवितेच्या ओळी अशा,

''बाबासाहेब
तुम्हीच सांगितलेल्या मार्गाने
आम्ही इंचभरही,
इकड' तिकड न होता
मार्गक्रमण करीत आहोत पण......
तुमच्या माघारी तुमचे काही अनुयायी
स्वत:ला आंबेडकर समजण्याचा
बावळटपणा करीत आहेत
खुर्चीसाठी .....
एकमेंकांवर कुरघोडी करुन
तुमच्या लेकरांना,
दिशाहीन करीत आहेत
तेव्हा त्यांच्याकडे पाहून मला फारच कीव येत.''[६]

'उत्खनन ही कविता नाईकवाडे यांची अतिशय महत्त्वाची आहे. या देशातील अडाण्या, उभ्या विषमतेवर हल्ला करण्याचे काम उत्खनन कवितेतून आले आहे. या देशातील भयावह वास्तव कविने येथे शब्द रुपाने मांडले आहे ते कवितेच्या ओळीतून पहा.,

''या देशाच्या छिनाल संस्कृतीनं
३३ कोटी देवांचा अवतार
जात पात
स्पृश्य – अस्पृश्य
स्वर्ग –नरक
माणूस– माणसाचा गुलाम
दंतकथा, भाकडकथा
रामयण, महाभारत
वेंद गीता
कोण कुठे कधी
इसवीसनाचा मेळ नाही
सत्याची कसोटी नाही
विज्ञानाचा आधार नाही
स्वातंत्र्यांचे अर्धशतक उलटून गेले
तरीही माणूस अजून स्वतंत्र नाही''[७]

महामानव डॉ. आंबेडकरांनी रक्ताचे पाणी करुन नवा समाज उभा केला. भौतिक सुखाला लाथ मारुन समाजउध्दाराचे कार्य स्वीकारले. तळागाळातल्या, गावकुसा बाहेरच्या माणसांना विकासाच्या मुख्या प्रवाहात आणले. त्यांना विज्ञानवाद धम्म दिला. त्यांना कार्यप्रवन केल. लिहतं, बोलतं केलं पण हाच समाज कसा गटातटात, स्वार्थात पांगला याचं चित्रण 'चळवळ' या कवितेत कवी नाईकवाडे यांनी केले ती कविता पहा,

''बाबा
तुमची चळवळ
गटागटात पांगत आहे
आम्ही चखरे आंबेडकरवादी
म्हणत
समाजाला
जातीवाद्यांच्या दावणीला बांधत आहेत.
स्वार्थासाठी मनुवाद्यां पुढं
लहान बाळासारखे रांगत आहेत''[८]

## संदर्भग्रंथ

१) डोळे माझे सूर्य झाले, सतीश नाईकवाडे, प्रथम आवृती –२०१८, प्रतिमा प्रकाशन पुणे, पृष्ठ.क्र. १४
२) तत्रैव – पृष्ठ. क्र. ४५
३) तत्रैव – पृष्ठ. क्र. ४८
४) तत्रैव – पृष्ठ. क्र. ४९
५) तत्रैव – पृष्ठ. क्र. ५७
६) तत्रैव – पृष्ठ. क्र. ५८
७) तत्रैव – पृष्ठ. क्र. ६४
८) तत्रैव – पृष्ठ. क्र. ७०

❖❖❖

# निवडक नायिकाप्रधान पौराणिक मराठी कादंबऱ्यांचा आशय

गौरी बबन गावडे
पीएच.डी. संशोधन छात्रा
चां. ता. बोरा महाविद्यालय शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे, महाराष्ट्र (India)
Email: gauri18684@gmail.com भ्रमणध्वनी ९६२३७८८१७४

## गोषवारा (Abstract)

माणूस हा जरी वर्तमानकाळात जगत असला तरी आपला पौराणिक, ऐतिहासिक काळ त्याच्या मनावर छाप पाडतो. त्याबद्दल त्याच्या मनात उत्सुकता असते तसेच या कादबऱ्यांचे पडसाद त्याच्या आयुष्यावर नेहमीचे पडलेले दिसतात. जीवनमुल्यांची रुजवणूक ही याच कादंबऱ्यांच्या आधारे झालेली दिसते. मराठीत अनेक महत्वाच्या कादंबरीकारांनी पौराणिक कांदबरीलेखन कलेले आहे, परंतु नायिकाप्रधान पौराणिक कादंबऱ्या ह्या तुलनेने कमी आहेत.मराठीत मात्र बरेचसे लेखन हे पुरुषकेंद्री झालेले दिसते यास कादंबरीलेखनही अपवाद नाही. पौराणिक काळ असो की, ऐतिहासिक काळ, दोन्ही काळांत स्त्रियांचे स्थान हे दुय्यमच राहिले. परंतु या काळातही अनेक कर्तृत्ववान स्त्रियांचे कार्य योगदान दुर्लक्षित राहिले. समाजाला ज्ञात असलेल्या स्त्रियांवर आधारित कादंबरीकार कादंबऱ्या लिहू लागले द्रौपदी, कुंती, सीता, गांधारी या पौराणिक काळातील नायिका ह्या पौराणिक कादंबऱ्यांच्या नायिका ठरल्या त्यांच्या जीवन चित्रणावर वारंवार लेखन होऊ लागले परंतु पुराणकाळात, रामायण, महाभारत युगात अशाही काही स्त्रिया होऊन गेल्या ज्यांचा जीवनकाळ अजूनही समाजाला ज्ञात नाही केवळ त्या काळातील एक पात्र म्हणून त्यांची ओळख समाजाला आहे. लक्ष्मण पत्नी ऊर्मिला, रावणपत्नी मंदोदरी, कर्णपत्नी ऊरुवी, वृषाली, अभिमन्यूपत्नी उत्तरा, अप्सरा, ऋषी पत्नी ह्या नायिकांच्या जीवनावर कादंबरीलेखन जास्त प्रमाणात होणे गरजेचे आहे. या शोधनिबंधात नायिकाप्रधान पौराणिक कादंबरी म्हणजे काय ? व निवडक अशा पाच नायिकाप्रधान पौराणिक कादंबऱ्यांचा आशय थोडक्यात मांडला आहे.

## बीजशब्द

नायिकाप्रधान, पौराणिक, पुनर्संघटन, कर्तृत्ववान, मनोवृत्ती, दिव्यत्व, आत्मकथन, सात्त्विक.

## प्रस्तावना

'निवडक नायिकाप्रधान पौराणिक मराठी कादंबऱ्यांचा आशय' या शोधनिबंधात पाच नायिकाप्रधान पौराणिक मराठी कादंबऱ्यांचा आशय थोडक्यात मांडला आहे. त्याव्दारे कांदबऱ्यांच्या कथानकाची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट होते. कादंबरीकार या पौराणिक कादंबऱ्यांतून नायिकेचा जीवनपट कसा उलगडतात, स्त्री जीवन व स्त्रीचित्रण याचा शोध यातून केलेला दिसतो.

कादंबऱ्यांचा आरंभ हा नायिकेच्या जन्मावेळची परिस्थिती, मध्य हा नायिकेच्या संपूर्ण आयुष्यातील जीवन प्रवास, घटना प्रसंग, सुखदु:खे, संकटे याने वर्णिला आहे. तर शेवट हा त्या नायिकेच्या मृत्यूप्रसंगाने केलेला आहे. म्हणजेच आरंभ हा आनंददायी तर शेवट शोकजनक झालेला आहे. अशा या नायिकाप्रधान पौराणिक मराठी कादंबऱ्या ह्या आदर्शवत व प्रेरणादायी ठराव्यात व वाचक वर्गात त्या लोकप्रिय ठराव्यात यासाठी अशा प्रकारच्या कादंबऱ्यांचे लेखन हे मोठ्या प्रमाणात व दर्जेदार होणे गरजेचे आहे.

## नायिकाप्रधान पौराणिक कांदबरी म्हणजे काय ?

## पौराणिक कादंबरी

पौराणिक कथेवर आधारलेली पौराणिक कादंबरी म्हणजे मुळातच परिपूर्ण कलारुप पावलेल्या अनुभवांचे पुनर्संघटन असते.

पौराणिक कादंबरीला ऐतिहासिक कादंबरीप्रमाणे व्यक्ती किंवा प्रसंग, स्थले यांच्याविषयीची माहिती उपलब्ध करुन देणारी साधने नसतात. त्यामुळे पुराणातील व्यक्ती वा स्थळे यांचे उल्लेख सोडता पौराणिक कादंबरी

संपूर्णपणे कल्पनेच्याच आधारे निर्माण केली जाते. तरीही रामायण, महाभारतादी, महाकाव्यांतून विशेषतः ह्यातील व्यक्तींच्या आधारेच बव्हंशी पौराणिक कादंबऱ्या निर्माणझाल्या आहेत.[१]

## नायिकाप्रधान पौराणिक कांदबरी

कादंबरीतील नायक किंवा नायिका हे, मुख्य पात्र असते. हे मुख्य पात्र स्त्री प्रधान असेल तर त्या पात्रास नायिका म्हणतात. या नायिकेशी निगडीत अशा घटना कादंबरीत कथानकाव्दारे मांडल्या जातात. नायिकेचे बोलणे, वागणे, मनोवृत्ती, आशाआकांक्षा, चांगलावाईट स्वभाव यातून कथानक पुढे सरकत जाते. अशा नायिकेच्या व्यक्तीचित्रणावर भर देऊन ज्या कादंबऱ्या लिहील्या जातात त्यास नायिकाप्रधान कादंबरी म्हणतात. या नायिका जर पुराण, रामायण, महाभारत कथामधील असतील व त्यांच्या व्यक्तिचित्रणाव्दारे कादंबरीचे कथानक मांडले असेल तर त्या कादंबरीस नायिकाप्रधान पौराणिक कादंबरी म्हटले जाते यांत ती नायिका म्हणजे मुख्य पात्र तर नायक, खलनायक, नोकर, सैन्य, ऋषीमुनी, देवी देवता इ. गौणपात्र समजले जाते.

अशाच काही नायिकाप्रधान पौराणिक कादंबऱ्यांचा आशय थोडक्यात पाहूया आशयावरुनच कादंबऱ्यांचे कथानक आपल्याला समजु शकते. कथानकातील आरंभ, मध्य, शेवट यांची मध्यवर्ती कल्पना आपल्याला आशयाव्दारे लक्षात येते.

१. 'गोकुली' प्रफूल्लता जाधव (२००१),
२. 'अभिमन्यू पत्नी उत्तरा' सुधाकर शुक्ल (२०१०)
३. 'मी रुक्मिणी' सुवर्णा ढोबळे (२०११)
४. 'गौतमी', अनंत तिबिले (२०१३)
५. 'मेनका', इंद्रायणी सावकार (२०१६)

## १) 'गोकुली',प्रफुल्लता जाधव (२००१), (आशय)

'गोकुली' ही प्रफुल्लता जाधव यांची २००१ साली प्रकाशित झालेली पौराणिक कादंबरी असून त्यात राधेचा संपूर्ण जीवनपट रेखाटला आहे. मथूरेच्या साऱ्या यादवांनी, गोकुळच्या साऱ्या शोकाकुलांनी, व्दारकेच्या यादवांनी 'राधेकृष्ण' म्हणत राधेला अखेरचा निरोप दिला.यशोदा व नंदच्या आनंदी गोकुळातील एकमेव दु:ख म्हणजे राधेच्या यातना होत्या.लहानपणीच मातृछाया हरपलेली, पित्याचे छत्र असूनही नसल्यासारखे, पतीच्या प्रेमाला पारखी झालेली, सासरच्या छळात होरपळून निघणारी राधा शेवटी मात्र कृष्णाच्या दर्शनासाठीच आसुसलेली होती. कृष्णाचे दर्शन झाले आणि तिने आपले प्राण सोडले.

सदरच्या कादंबरीत राधा, कृष्ण यांची जन्मकहाणी, त्यांच्या बालपणीच्या लीला, त्या दोघांमध्ये एकमेकांबद्दलचे असलेले निस्सिम, निस्वार्थ प्रेम कादंबरीत व्यक्त केलेले आहे. कृष्णाने केलेल्या संकटाचा सामना यात वर्णिला आहे. कंसवधाला जाताना कृष्णाने आपली बासरी राधेकडे आठवण म्हणून दिली. शेवटी मरतानाही बासरी राधेच्या हातात कृष्णाला दिसली. अगदी असहाय पडलेली. कृष्णाने अनेक प्रसंगांना धैर्याने तोंड दिले पण राधेच्या नशिबी असलेले दु:ख त्याला दूर करता आले नाही हे दुर्दैवच होते.

राधा कृष्णाचे निस्वार्थ, निर्मळ प्रेमाचे दर्शन या कांदबरीत घडते. कुठेही प्रेमातील वासना दिसून आली नाही. तिचे सर्व आयुष्य कृष्णमय झाले होते. तिचा पती रायाणही सुधारला पण त्याचा तिला काहीही उपयोग झाला नाही. राधेच्या नशीबी पती प्रेमही नव्हते.

कृष्णावर जीवापाड प्रेम करणारी राधा, तिचा शेवट मात्र असा दु:खमय झाला हे फारच वाईट होते. कादंबरीच्या शेवटी राधेचा मृत्यू व व्दारकेतील शोकमय वातावरण वर्णिले आहे.[२]

## २) 'अभिमन्यूपत्नी उत्तरा',सुधाकर शुक्ल (२०१०), (आशय)

'अभिमन्युत्नी उत्तरा' ही सुधाकर शुक्ल यांची पौराणिक कादंबरी असून २०१० साली प्रकाशित झाली. या कादंबरीत त्यांनी 'उत्तरा' च्या जीवनातल संघर्षमय व दु:खद परिस्थितीचे वर्णन केलेले आहे.

विवाहापूर्वी आनंदात जगणारी, स्वैर, स्वातंत्र्याचा उपभोग घेणारी स्त्री जेव्हा विवाहबंधनात अडकते तेव्हा विवाहानंतरचा तिचा सर्वांत मोठा आधार हातीचा पती असतो. पतीसभोवती तिचे भावविश्व गुंतलेले असते.

विश्वास आणि प्रेम यांच्या सामर्थ्यावर ती सुखी जीवनाची स्वप्ने पाहत असते आणि अशा वेळी जेव्हा तिचा पती तिला सोडून जातो, मरण पावतो तेव्हा मात्र ती कोसळते. निराधार होऊन सारी दु:ख तिला छळू लागतात. याचेच प्रतिक म्हणून लेखकाने अभिमन्यूपत्नी उत्तरा हीचे जीवनचित्रण या कादंबरीतून मांडले आहे.

उत्तरा ही असेच दु:ख भोगणारी स्त्री अभिमन्यूशी तिचा विवाह होतो आणि काही महिन्यातच तो युध्दात मरण पावतो. पतीनिधनाचा हा सर्वात मोठा धक्का सहन करावा लागतो. त्या पाठोपाठ तिचा मुलगा परीक्षित याचाही मृत्यू तिला पण नियतीने तिचा मुलगा तिला परत दिला. पणतरीतिच्या दु:खाची तीव्रता कमी झाली नाही. कुरुघराण्याच सामर्थ्य व ऐश्वर्य तिच्या पाठीशी होते पण ती त्या सर्वात एकटी राहिली. एकाकी आयुष्य तिला जगावं लागल संघर्ष करता करता तिला अनेक हाल अपेष्टा, कष्ट आणि अपमान सहन करावा लागला पण जिद्दीने ती तिचे आयुष्य जगत राहिली. संघर्ष करता करता मात्र तिला विरक्तीचं आयुष्य जगाव लागलं.

उत्तरा धैर्याने आलेल्या दु:खाला सामोरी गेली व नियतीवरही तिने विजय मिळविला आपल्या मुलाला जीवंत पाहून तिला आनंद झाला. व तिने भगवंताचे आभार मानले अशा सुखद घटनेने कांदबरीची सांगता लेखकाने केली आहे.[३]

## ३) 'मी रुक्मिणी'सुवर्णा ढोबळे (२०११), (आशय)

'मी रुक्मिणी' ही सुवर्णा ढोबळे यांची २०११ साली प्रकाशित झालेली पौराणिक कादंबरी असून रुक्मिणीच्या भावविश्वाचे कथन या कादंबरीत केलेले आहे. केवळ 'रुक्मिणी स्वयंवर' या घटनेने रुक्मिणी सर्वज्ञात आहे परंतु व्दारकेची महाराणी, कृष्णपत्नी,प्रद्युम्नची माता म्हणून तिचे असणारे जीवन कांबरीत वर्णन केलेले आहे. कृष्णाची पट्टराणी म्हणून सुखी जीवन जगत असताना मात्र माहेरचा विरह, पुत्रप्रद्युम्नपासून झालेली ताटातुट, महाभारतासारखे धर्मयुध्द, यादवकुळ विनाश, सुवर्णमयी व्दारकेची उध्द्वस्तता अशा सारख्या घटनांनी तिच्या आयुष्यात दु:खाचा काळही आला पण या संकटांना तोंड देण्याची शक्ती तिच्यात आली ती केवळ कृष्णावरील तिच्या निम्सीम, निस्वार्थी व अतुट प्रेमामुळेच. अन्यायी राजांचा बंदोबस्त करण्यासाठी कृष्ण बरच काळ व्दारकेबाहेर राहत असे. त्या काळात व्दारकेची महाराणी म्हणून व्दारकेचा राज्यकारभार खंबीरपणे सांभाळते. निर्णयक्षम असलेली राज्यकर्ती म्हणून रुक्मिणीची या कादंबरीतून ओळख होते. तसेच कृष्णाच्या अन्य सात राण्यांवर प्रेममयी वचक ठेवून व स्नेहाचे संबंध प्रस्थापित करुन व्दारकेतील राणीवशातील वातावरण शांत, स्थिर व प्रेमळ ठेवण्याचे कर्तव्यही रुक्मिणी पार पाडते. व्दारकाधीश रुक्मिणीवर बिनधास्तपणे व्दारकेची जबाबदारी सोपवून तेस्वत: हस्तिनापूरातील घडणाऱ्या घटनांमध्ये सहभागी होताना दिसतात.

कारदंबरीतील आशय हा रुक्मिणीचे माहेर, रुक्मिणी स्वयंवर, व्दारकेतील तिचे सुखमयजीवन, हस्तिनापूरातील राजकीय घडामोडी, महाभारतयुध्दाचे अठरा दिवस, युध्दानंतरची परिस्थिती, व्दारकेचे नष्ट होणे, यादवकुळाचा संहार व शेवटी रुक्मिणीची कृष्णामागोमाग अनंतात विलीन होण्याची तयारी या घटनाप्रसंगानी व्यापलेला आहे. एकांतात असलेली रुक्मिणी व्दारकेबाहेरील सागराशी गुज करतानाही कादंबरीत दिसून येते. कादंबरीची नायिका जरी रुक्मिणी असली तरी ती तिच्या भावभावना व्यक्त करत श्रीकृष्णाच्या जीवनातील संपूर्ण घटनाक्रम तिच्याच शब्दांत उलगडत आहे. स्वत: लक्ष्मीचा अंश असल्याचा साक्षात्कार झालेल्या रुक्मिणीच्या दिव्यत्वापर्यंतचा प्रवास आत्मकथनाव्दारे ती कादंबरीत मांडताना दिसते.[४]

## ४) 'गौतमी' अनंत तिबिले (२०१३), (आशय)

अनंत तिबिले यांची 'गौतमी' ही पौराणिक कांदबरी असून २०१३ साली ती प्रकाशीत झाली. द्रोणपत्नी गौतमीच्या उपेक्षित जीवनाची कहाणी यात मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे.

अनाथ असलेली कृपी आपले पिता कोण हे समजले तरी ही तिला कोणताही लाभ नाही व आनंदही नाही असे वाटते. पित्याबरोबर आश्रमात राहणारी कृपी मात्र पित्याशी आपलेपणान न राहता आपला भाऊ कृप याच्यावर जीवापाड प्रेम करते. परंतु तोही शस्त्रास्त्रविद्या शिकण्यात व्यस्त होता याचे तिला वाईट वाटे. तिचा विवाहही ठरवताना तिला न सांगता कृप सर्व जमवून आला पण तरीही तिने त्याबद्दल विचारणा केली नाही. लौकीकवृत्तीसाठी, अमृतवृत्तीसाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या द्रौणाचार्याशी तिचा विवाह झाला. पराकोटीचे दारिद्र्य असणाऱ्या द्रोणांकडे राहताना तिने कसलीच तक्रार केली नाही. कंदमुळे, फळे खाऊन ते राहत असे पण जेव्हा अश्वत्थामा झाला तेव्हा मात्र तिच्यातील आई जागी झाली. बाळ पोटात असल्यामुळे तिची काळजी सुरु झाली.

आपल्या वाट्याला आलेले दारिद्र्य आपल्या मुलाच्या नशिबी असावे या विचाराने ती अस्वस्थ होत असे संसाराची पर्वा न करता द्रोणाचार्य महेंद्र पर्वतावर निघून गेले तेव्हा तिला अश्वस्थामाला एकटीनेच वाढवावे लागले त्याने जेव्हा दूध मागितले तेव्हा पाण्यात पीठ कालवून पाजणारी आई, तिच्या मनाची विकल अवस्था प्रकट करते.

शेवटी मात्र तिला या पुरुषजातीचाच राग येतो. केवळ स्वत:च्या मोहापायी आपल्याला जन्म देणारे पिता व अनाथ म्हणून वाढताना, पित्याच्या छत्रछायेखाली सुध्दा आपुलकी निर्माण होत नाही, केवळ शस्त्रास्त्र अभ्यास शिकण्यासाठी धडपणारा तिचा बंधू कृप, पुत्रप्राप्तीसाठी विवाह करणारे द्रोण व संसाराची पर्वान करता निघून जाणारे, लौकिकासाठी कष्टणारे आपले पती तसेच पित्याची आज्ञा म्हणून युध्दावर जाणारा अश्वत्थामा, या सर्वांमध्ये मात्र गौतमी एकटी पडते. केवळ स्त्रीधर्म निभावताना तिला झालेल्या यातना सहन करत ती गतप्राण होते.(५)

## ५) 'मेनका' इंद्रायणी सावकार (२०१६), (आशय)

'मेनका' ही इंद्रायणी सावकार यांची २०१६ साली प्रकाशित झालेली पौराणिक कादंबरीअसून मेनकाची जीवनकहाणी यात सांगितली आहे. समुद्रमंथनातून प्राप्त झालेल्या व इंद्राने हस्तगत केलेल्या अप्सरांपैकी मेनका ही अप्सरा अतिशय सुंदर रुपवान होती परंतु इंद्राने मात्र या अप्सरांना आपल्या शत्रूंना रिझवण्यासाठी व कार्यापासून परावृत्त करुन त्यांना वासनेत गुंतवून ठेवण्यासाठीच प्राप्त केले होते. मेनकाला मात्र या कामगिरीचा उबग आला होता. तिच्यात सात्त्विक वृत्ती निर्माण होत होती. तिला स्वातंत्र्यहवे होते. इतर सर्व अप्सरा पृथ्वीलोकात गेल्या होत्या पण केवळ मेनकाच स्वर्गलोकात असल्याने इंद्रतिला मुक्त करु इच्छित नव्हता. मेनकाही नीतिनियमांना डावलून स्वत:तिची मुक्तता करावी असे तिला वाटत होते. इंद्रदेवाचा सेवक वृषाकपि याचे मेनकेवर प्रेम होते. पण त्याने ते व्यक्त केले नव्हते. मेनकेसही वृषाकपि विषयी असलेल्या मनातील भावना नेमक्या कोणत्या हे उमगत नव्हते. वृषकपि मेनकेच्या सुटकेची प्रत्येक वेळी इंद्राकडे याचना करीत असे व इतरही प्रयत्न करत असे पण ते निष्फळ ठरत असे.

मेनकाच्या मनात हलक्या, सुंदर भावनांचा उगम होत होता. ती कामकन्या तर होतीच पण त्याबरोबर प्रेम, दया अन्यायाची चीड, दु:खी जनांची आस्था, सत्यासाठी झगडण्यासाठी शक्ती अशा अनेक सात्विक भावनाचा उद्‌गम तिच्या मनात निर्माण झाला. या भावना इंद्रदेवांना सहन होईनात. त्या भावनांचा नाश करण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. कट, कारस्थाने, षड्‌यंत्र रचली.कारण त्यांना मेनका स्वर्ग लोकातच हवी होती पण तिचे सहाय्य शेवटी इंद्राणीने म्हणजेच शचीने केले. मेनकाच्या मनात वृषाकपिबद्‌दलच्या प्रेमाची वाट तिनेच मोकळी करुन दिली. अखेरीस मेनकाच्या भावनांचा, तिच्या प्रेमाचाच विजय झाला. इंद्राने मेनका आणि वृषाकपिच्या प्रेमास संमती दिली व त्यांच्या विवाहासही परवानगी दिली. मेनका व वृषाकपिने शकुंतलेला म्हणजे मेनका व विश्वामित्राची मुलगी हिचा स्विकार केला. अनंत यातना दु:ख, स्त्री दास्यत्व, उदासीनता यावर प्रेम आणि सात्त्विकतेचा विजय होतो. पण त्यासाठी संयम आणि सहनशीलता असावी लागते हे या 'मेनका कादबंरीतून समजते.(६)

## निष्कर्ष

- नायिकाप्रधान पौराणिक कादंबऱ्यांचे लेखन हे तत्कालीन जीवनमानातील जीवनमुल्यांची रुजवणूक आजच्या काळातील वाचकांच्या मनात करणे या उद्‌देशाने केलेले आहे.
- पौराणिक काळातील स्त्रियांचे जीवनमान, तत्कालीन परिस्थिती, स्त्रियांविषयी असलेला दृष्टिकोन, स्त्रियांचे विचार हे आधुनिक स्त्रिला मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणारे आहेत.
- पुराणे, रामायण, महाभारतकालीन दुर्लक्षित स्त्रियांना कादंबरीव्दारे साहित्यातून वाचकां पर्यंत व समाजापर्यंत पोहचवण्याचे कार्य कादंबरीकार आजच्या काळात करताना थोड्याफार प्रमाणात दिसत आहेत.
- 'संघर्षातून कर्तृत्व' या नितीनूसार पौराणिक काळातील नायिका जगताना कांदबरीतून दिसतात.
- नायिकाप्रधान पौराणिक कादंबरीलेखनामागील प्रेरणा म्हणजे तत्कालीन नायिकेच्या व्यक्तिमत्त्वाबद्‌दल वाचकांच्या मनात असलेली लोकप्रियता असावी असे वाटते.
- मनोरंजन व प्रबोधन या हेतूने नायिकाप्रधान पौराणिक कादंबऱ्या लिहील्या गेल्या.
- अमूर्त गोष्टींना मूर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न कादंबऱ्यांमध्ये केलेला दिसून येतो. नैसर्गिक गोष्टींचे मानवी जीवनातील स्थान काही कादंबऱ्यांतून व्यक्त होते.

- उदा. 'मी रुक्मिणी' या कादंबरीत व्दारकेचा 'समुद्र' हा रुक्मिणीला अत्यंत जवळचा वाटतो. मनातील भावना व्यक्त करताना ती समुद्र जवळ करते.
- नायिकाप्रधान पौराणिक कादंबऱ्यांमध्ये नायिका स्वत: निवेदकाची भुमिका पार पाडते. आत्मकथनाव्दारे ती स्वत:च आपला जीवनप्रवास उलगडते.
- उपकथानकांचा उपयोग कथानकास झालेला आहे. कादंबरीत एका व्यक्तिच्या हकीकतीसारखी दुसऱ्या व्यक्तीची हकीकत सांगून कादंबरी आकर्षक केली आहे. तसेच मुख्य नायिकेकडून अन्य स्त्रीपात्रांकडेही लक्ष केंद्रीत केले जाते.
- उदा. 'गोकुली' या पौराणिक कादंबरीत राधा ही नायिका असून तिच्या जीवनचित्रणाबरोबर 'यशोदा' या गौण स्त्री पात्रावरही कादंबरीकाराने घटना प्रसंग रेखाटले आहेत.

## संदर्भ सूची

१. गणोरकर प्रभा व इतर (सं)'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, जी.आर. भटकळ फाऊडेशन, मुंबई ३४, पहिली आवृत्ती २००१, पृ. १२८
२. जाधव प्रफूल्लता, 'गोकुली', कॉन्टिन्टल प्रकाशन, २००१
३. शुक्ल सुधाकर, 'अभिमन्यूपत्नी उत्तरा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २०१०
४. ढोबळे सुवर्णा, 'मी रुक्मिणी', मेहता पब्लिशिंग हाऊस, सप्टेंबर २०११
५. तिबिले अनंत, 'गौतमी' रिया पब्लिकेशन, ऑगस्ट २०१३
६. सावकार इंद्रायणी, 'मेनका' रिया पब्लिकेशन, ऑगस्ट २०१६

❖❖❖

# ‘किंगरी’च्या निमित्ताने

डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे
सहायक प्राध्यापक
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर, महाराष्ट्र (India)
Email: mrudulajanglekar@gmail.com भ्रमणध्वनी ९९७५०३३०२७

## गोषवारा

माझ्या लहानपणी आमच्या गावी काही स्त्रिया किंगरी वाजवत येत आणि आपल्या गाठोड्यात आणलेल्या नाना तऱ्हेच्या वस्तू विकत. त्यामध्ये औषधी, मणी,पिसे, घोगले (खुळखुळ्यासारखा खेळणा) अशा अनेक वस्तू असत. या सर्वांमध्ये मला अधिक आकर्षण किंगरीचे होते. एखादवेळी ते हातात घेऊन वाजवण्याचा प्रयत्नही केला असेल. लहानग्या वयात या किंगरीविषयी फारशी माहिती नव्हती. २०१५ साली प्रकाशित झालेला ‘किंगरी’ हा कवी सुनील कुमरे यांचा कवितासंग्रह वाचनात आला. शिर्षक वाचून आशा पल्लवीत झाल्या. कवितासंग्रह वाचल्यानंतर त्यात आदिवासी जीवनाची व्यथा–वेदनाच दिसून आली. ते साहजिक असले तरी आता कुठेतरी लिखाणाचा आशय आदिवासी साहित्यिकांनी बदलवला पाहिजे. किंगरीचे स्वरूप दर्शवणारी एकही कविता यात नाही, याची खंत वाटली. आदिवासी साहित्यिकांनी तरी कमीतकमी आपल्या साहित्यातून संधी मिळेल तेव्हा आपल्या लोकसंस्कृतीला उजागर करायला हवे.

**बीजशब्द** –लोकसंस्कृतीचे प्रतिक–किंगरी, वेदनामयी अनुभव, अभावात्मक लेखन.

## प्रस्तावना

काव्यातून होणारी अभिव्यक्ती प्रभावशाली असते. ‘‘कविता ही मानवी सर्जनशीलतेची सर्वात देखणी आणि लाडकी लेक आहे’’, असे डॉ. यशवंत मनोहर यांनी म्हटले आहे. समाजमनावर त्याची छाप चटकन पडते. मराठी साहित्यातील १९६० नंतरच्या कालखंडात कवितेची संख्या मोठ्या प्रमाणावर दिसून येते. आदिवासी साहित्यातही कवितेच्या फॉर्मलाच अधिक हाताळल्या गेले आहे. आदिवासी हे त्यांच्या आगळ्यावेगळ्या लोकसंस्कृतीमुळे विशिष्टत्व मिळालेला समूह आहे. आधुनिकतेपासून दूर असलेला मात्र आदिमतेच्याही थोड्या अंतरावर हा समाज उभा आहे. गरिबी, दारिद्र्य, अज्ञान त्यांच्या पाचवीला पूजलेले. असे असूनही रानावनात, दऱ्या –डोंगरात स्वच्छंदी आयुष्य जगणारा हा समाज आहे. दुर्गम भागात राहत असल्याने आदिवासी आत्मनिर्भर आहेत. कलेच्या क्षेत्रात ते समृद्ध आहेत. पारंपरिक पद्धतींचा वापर करून त्यांनी आपली कला जोपासली आहे. त्यांना जेव्हा चित्र काढायचे असते तेव्हा त्यांच्या घरांच्या भिंती कॅनव्हास होतात, काड्या कुंचल्यांचे काम करतात आणि तांदळाचे पीठ, गेरू, फुले यांचे रंग वापरून सुंदर कलाकृती ते तयार करतात. दिवसभर थकून– भागून आलेले आदिवासी स्वत: बनविलेले दागिने, कपडे घालून स्वत: तयार केलेल्या वाद्यांवर मनमुराद नाचतात–गातात. आदिवासी संस्कृतीमध्ये संगीत, त्यासाठी लागणारी वाद्ये आणि नृत्य याला सामाजिक व धार्मिक महत्त्व आहे. नृत्य सादर करताना संगीत लागते. ही संगीतवाद्ये आदिवासी स्वत: तयार करतात. भोपळा, बांबू, लाकूड, कातडे, मडके, बिया, गाईची व हरणांची शिंगे यापासून वाद्ये बनविली जातात. तारपा, टाहरा, किंगरी, ढोल अशा अनेक वाद्यांची निर्मिती करणारे आदिवासी प्रस्थापित कलेच्या रांगेत मात्र फारच मागे आहेत. मागे आहेत असे म्हणण्यापेक्षा या रांगेत त्यांची वर्णीच लागत नाही असे म्हटले तरी वावगे होणार नाही. आदिवासी साहित्यिकांनी आपल्या वेगळ्या प्रपंच्यात आपल्या लोकसंस्कृतीची दखल घेतली आहे. काही साहित्यांत ती बऱ्यापैकी उजागर होते.

‘किंगरी’ नावाचा कवितासंग्रह कवी सुनील कुमरे यांनी २०१५ साली प्रकाशित केला.‘किंगरी’ या नावावरून कवितासंग्रहाचे वैशिष्ट्य वेगळे असावे, असे वाटले. मात्र हा संग्रह वाचल्यानंतर थोडी निराशा पदरी पडली. आदिवासी कविता एखाद्या तक्रारपेटीसारखी झाल्यागत वाटते. सतत तेच ते रडगाणं गायल्याने आदिवासी कवितेचा ताजेपणा कुठेतरी हरवल्यासारखा वाटतो. ‘मराठी कवितेच्या नव्या दिशा’ या पुस्तकात लेखक महेंद्र भवरे म्हणतात, ‘‘एखाददुसऱ्या कवीचा अपवाद सोडला तर अजूनही आदिवासी कवितेचे चाचपडणेच सुरू आहे असे

म्हणता येईल''. यावरून आपल्याला स्पष्ट होऊ शकते की जवळपास सगळ्याच कवींच्या कवितांमधून एक समान भावना रेखाटलेली आहे. दु:ख, वेदना यापलिकडे जाऊन त्यांनी त्यांच्या लोकसंस्कृतीची महता गायिली तर त्यांच्या लोप पावत चाललेल्या संस्कृतीला संजीवनी मिळेल. कवी सुनील कुमरे आपल्या 'विचारांच्या युद्धाची भाषा' या कवितेत खुद्द म्हणतात,

''केवळ दु:खांचा बाजार
मांडल्याने काय होणार ?
केवळ शाब्दिक विद्रोह
पाजळून काय होणार ?'' (किंगरी, पृ.क्र.५६)

कवीने या कवितासंग्रहात एकूण ४२ कविता समाविष्ट केल्या आहेत. पण त्यातील एकही कविता किंगरीला समर्पित नाही. 'किंगरी' हे शिर्षक त्यांनी कदाचित प्रतिकात्मक स्वरूपात वापरलेही असेल. पण त्या वाद्याचे वैशिष्ट्य, त्याचे वेगळेपण बाकी समाजापुढे येण्यासाठी वाव होता. केवळ 'टेंपा आणि काती' या कवितेत ,

''किंगरी –ढोल गेले
गोंदण –गाणे गेले '' (पृ.क्र. ४६)

अशी त्यांनी खंत व्यक्त केली आहे पण ते पुनर्जिवित करण्याची संधी कवीने गमावली असे वाटते. प्रा. रा.ग. जाधव म्हणतात, ''प्रतिमा आणि प्रतिके हे कवितेला श्रेष्ठत्वाकडे नेणारे एक महत्त्वाचे वाहन आहे. प्रतिमा व प्रतिके ही अशी चिन्हे असतात की त्यांचे अर्थ प्रत्येक वाचनाच्या वेळी अंशत: उलगडत जातात. कवितेचा सखोल अर्थ क्रमश: उलगडत ठेवण्याची किंवा राखण्याची किमया ही चिन्हे करीत असतात.'' आदिवासींची आदिम संस्कृती अस्सल स्वरूपात समाजापुढे मांडण्याचे कार्य आदिवासीच करू शकतात. प्रस्थापित समाजाच्या बहिऱ्या कानांना आदिवासींचे वेदनामयी हुंदके – उसासे ऐकू येणार नाहीत. त्यासाठी एक दमदार टाहराच पाहिजे किंवा आपल्या नजाकतीने हृदयात उतरणारी एखादी किंगरीच पाहिजे. तरच आदिवासी साहित्याचे वेगळेपण सिद्ध होणार आहे.

कवी सुनील कुमरे यांनी आपल्या 'किंगरी' या कवितासंग्रहाच्या मनोगतात किंगरीचे महत्त्व या शब्दांत मांडले आहे, ''किंगरी हे आदिवासींचे पारंपरीक संगीतवाद्य. विशेषत: थोटी (गोंडबुरूड), परधान जमातीचे आद्य वाद्य. त्यांच्या लोककथांमध्ये 'किंगरी'चे महत्त्व अधोरेखित आहे. गोंडी लोकगीतांचे सुश्राव्यगायन, कथाकथन, इतिहासकथनासोबत मनोरंजनाचे प्रभावी प्रस्तुतीकरण 'किंगरी' वर करण्याचे कसब या जमातीकडे होते. आजही गडचिरोली जिल्ह्यातील काही भागात व आंध्रप्रदेशच्या सीमावर्ती भागात 'किंगरी' वर इतिहासकथन व कथाकथनाचे कार्यक्रम होत असतात...........'किंगरी' या सांस्कृतिक वाद्याने मला नेहमीच भुरळ घातली.'' कवीने असे म्हटले आहे.अशीच भुरळ कवीने आपल्या शब्दनादातून वाचकांना घालायला हवी होती.

डॉ. विनायक तुमराम म्हणतात, ''प्रसंगानुरूप काव्यनिर्मिती करणारा आदिवासी केवळ रचियताच नाही तर तो गायक आणि नर्तकही आहे. गाणे, वाजविणे आणि नाचणे हे तर त्याच्या रक्तातच भिनले आहे. अनेक अनामिक आदिवासींच्या काव्यरचना काळाच्या उदरात गडप झाल्या व काही हाती लागल्या. त्यांना आपण 'लोकगीते' म्हणून संबोधतो. काव्याच्या निर्धारित कसोट्यांवर ती उतरत नसली तरी 'सहजस्फूर्त प्रगटन' असे त्यांचे वर्णन करता येईल.'' या लोकगीतांचा धावता आढावा जरी घेतला तर आपल्याला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की या लोकगीतांचा आशय त्यांच्या लोकसंस्कृतीत दडला आहे. जागतिकीकरणामुळे जगभरातल्या कितीतरी संस्कृती नामशेष झाल्या. कित्येक भाषा लोप पावल्या. आदिवासी लोकसंस्कृती, त्यांची भाषा याच वाटेने जाऊ नये असे वाटत असेल तर आदिवासी साहित्यिकांनी आपल्या लोकसंस्कृतीचा आधार घेऊन नवनव्या शब्दांसह, अनुभवांसह साहित्य जगतात यायला हवे. परधान, थोटी समाजाला त्यांच्या 'किंगरी'च्या माध्यमातून अजरामर करण्याचे कसब या लिखित स्वरूपातील साहित्यातच आहे. 'किंगरी' पुस्तकाच्या मुखपृष्ठावर किंगरीचे चित्र रेखाटले आहे. नव्या पिढीला ती गाते कशी हे समजण्यासाठी शब्दांचा आधार घ्यावाच लागेल.

## निष्कर्ष

१. केवळ वेदनेची दुनिया आपल्या साहित्यातून उभी करण्यापेक्षा आपल्या उदात्त लोकसंस्कृतीचे गोडवे आदिवासींनी गायिले पाहिजेत.
२. 'किंगरी' या कविता संग्रहात कवी सुनील कुमरे यांच्या लिखाणाची वेगळी छाप पडत नाही. ४२ कवितांमधून एकही कविता किंगरीवर नाही.

३. हळूहळू लुप्त होत चाललेल्या आदिवासी संस्कृतीला आणि त्यातील प्रत्येक घटकाला नवजीवन साहित्य देऊ शकते, ही जाणीव ठेवून आदिवासी साहित्यिकांनी आपल्या साहित्याची निर्मिती केली पाहिजे.

## संदर्भ

१. 'आदिवासी कविता', बोथीकर सुधाकर, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१५.
२. 'आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन', तुमराम विनायक, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१५.
३. 'किंगरी', कुमरे सुनील, प्रकाशक उद्धव आत्राम, प्र.आ. २०१५.
४. 'मराठी कवितेच्या नव्या दिशा', भवरे महेंद्र, लोकवाङ्.मय गृह, मुंबई, प्र.आ. २००७
५.'श्रेष्ठ कविता म्हणजे काय?', संपा. प्रा.डॉ. पुष्पलता मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. २.

❖❖❖

# शाहू महाराजांच्या शिक्षणकार्याचे स्वरूप व व्याप्ती

डॉ. अनमोल शेंडे
गोविंदराव वारजुकर कला—वाणिज्य
महाविद्यालय नागभीड, जि.चंद्रपूर ४४१२०५, महाराष्ट्र (India)
E-mail: shendeanmol@gmail.com भ्रमणभाष ९४०४१२०४०९

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या ज्या महापुरूषांचे योगदान आहे, त्यात छत्रपती शाहू महाराज यांचा गौरवाने उल्लेख करावा लागतो. शाहू महाराज यांचे कार्य हे चौफेर स्वरूपाचे होते. जीवनाला व्यापून असणा—या सा—या क्षेत्रात मुलगामी स्थित्यंतर घडून आले पाहिले याकडे त्यांचा विशेष कटाक्ष होता. बहूजन समाजाचा विकास हा त्यांच्या धोरणातील स्थायी भाव होता. कुठल्याही प्रकारची विषमता शाहू महाराजांना अमान्य होती. महाराष्ट्रातील सामाजिक जीवन अत्यंत गढूळ झालेले आहे याची जाणीव असल्यामुळे यात सुधारणा करण्याचे धोरण त्यांनी कसोशीने पाळले. सामाजिक विषमतेचे समुळ उच्चाटन केल्याशिवाय महाराष्ट्राची प्रगती होऊ शकणार नाही हे त्यांनी मुळातच समजून घेतल्यामुळे न्याय व समतेच्या तत्वांचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला. शाहू महाराजांच्या विचारसरणीमध्ये परिवर्तनसन्मुखता व दुरदृष्टी असल्यामुळे त्यांनी कोल्हापूर संस्थानात विचारांचे बीज पेरले. अर्थात, शाहू महाराजांच्या नजरेसमोर केवळ कोल्हापूर संस्थान नव्हे, तर एकूणच देशाचे वातावरण सकारात्मक झाले पाहिजे, सर्वसामान्यांना मोकळा श्वास घेता आला पाहिजे हा विचार घेऊन ते आयुष्यभर कार्यप्रवण राहिलेत.

हजारो वर्षापासून या देशात चातुर्वर्ण्य व्यवस्थेने नंगानाच घातला. खालच्या जातीत जन्माला आलेल्या प्रामाणिक गोरगरीब, कष्टकरी, शेतमजूर यांचे शोषण केले. या शोषणव्यवस्थेचा अभ्यास शाहू महाराजांनी केला व या दलदलीतून बहूजन समाजाला बाहेर काढावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांच्या दृष्टीने हेरले होते. चार्तुवर्ण्य व्यवस्थेने बहूजन समाजाची हजारो वर्षापासून शिक्षणबंदी केलेले असल्यामुळे बहूजन समाजाच्या अज्ञानाचे गुलामीचे मुळ शिक्षण न घेण्यात आहे याची स्पष्ट जाणीव शाहू महाराजांना झाली होती. विद्येचा प्रचार व प्रसार खालच्या स्तरापर्यत पोचला तर त्यांच्यामध्ये चेतना निर्माण होईल. स्वाभीमानाची ज्योत त्यांच्या मनात पेटेल. पर्यायाने महाराष्ट्राचे नैतिकदृष्टया चांगले भरणपोषण होईल असे शाहू महाराजांना वाटत होते. त्यादृष्टीने त्यांनी शिक्षणकार्याचे स्वरूप निश्चित केले.

इ.स. १८८४ साली दत्तकविधीने शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर बसले.  परंतू ख—या अर्थाने कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार त्यांनी हाती घेतला तो १८९४ या सालात! या सुमारास शाहू महाराज केवळ वीस वर्षाचे होते. मध्यंतरीचा काळ त्यांचा शिक्षणात गेला. याच कालखंडामध्ये त्यांच्या विचारसरणीमध्ये खुप परिवर्तन झााले शिक्षणामुळे शाहू महाराजांच्या विचार करण्याच्या पध्दतीमध्ये स्पष्टता येत गेली. कोल्हापूर संस्थानाची सुत्रे ज्या कालखंडात शाहू महाराजांनी हाती घेतली त्यावेळेला उच्चवर्णीयांची मिरासदारी जोरात सुरू होती.  कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक महत्वाच्या पदावर हीच माणसे होती.  त्यामुळे परिवर्तनाला कुठलीच जागा उरली नव्हती. स्थितीवाद भक्कम करणे व सर्वसामान्याचे शोषण करणे हाच या उच्चवर्णीय अधिका—यांचा उद्देश होता. त्यामुळे कोल्हापूर संस्थानाला एककल्ली स्वरूप प्राप्त झाले होते.  शाहू महाराजांना ही जाणीव होताच त्यांनी आपल्या विश्वासातील माणसांची अनेक महत्वाच्या पदावर नेमणूक केली.  ब्राम्हण्यांनी पीडीत शुद्र आणि अतिशुद्रांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शैक्षणिक धोरणे निश्चित केली. त्यामुळे शिक्षण संस्था स्थापन करणे, अभ्यासक्रमाची रचना करणे, मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून सवलती प्रदान करणे, अशा अनेक गोष्टीचा त्यात समावेश होता. त्याचबरोबर विविध जाती—जमातीतील विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध करून देणे, कोल्हापूर संस्थानाच्या बाहेरी शिक्षणसंस्थांना आर्थिक मदत देऊन या संस्थांना प्रोत्साहित करण्याचेही शाहू महाराजांनी निश्चित केले.  या सर्व कार्याना मूर्त रूप देण्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणीला त्यांनी सुरूवात केली.

राजर्षी शाहू महाराज शिक्षणाकडे "परिवर्तनाचे फार मोठे हत्यार या अंगाने पाहत होते." त्यांनी या कार्याला अभियानाचे स्वरूप दिले. शिक्षण न घेतल्यामुळे बहुजन समाजाची अवनती झाली होती. ते दैववादी बनले होते. दारिद्रयाने त्यांची पुरती वाट लावली होती. आत्मविश्वास गमावलेला हा समाज गलितगात्र झालेला होता.

त्यामुळे बहूजन समाजाची अस्मिता जागृत व्हावी या दृष्टीने त्यांनी शिक्षणकार्याचा प्रारंभ उदात्त उद्देश घ्यानात घेऊनच सुरू केलेला होता. हे कार्य सुरू करतांना कुठल्याही प्रकारची गफलत होऊ नये, आपल्या मुळ उद्देशाला पूर्णपणे स्पष्टता यावी यासाठी शाहू महाराजांनी शिक्षणक्षेत्रापती आस्था बाळगणा—या काही जाणकारांसोबत चर्चाही केली होती. खरे तर ज्योतीराव फुले यांनी शिक्षणक्षेत्रात केलेल्या क्रांतीचे उदाहरणही शाहू महाराजांच्या समोर होते. ज्योतीराव फुले यांनी पुरोहितशाहीला, रूढीवादी परंपरेला आणि वर्णवर्चस्वाला कडाडून विरोध केला होता. शिक्षणाची सुरूवात केल्यानंतर ब्राम्हणी वृत्तीने ज्योतीराव फुले यांच्यावर प्रचंड हल्ले केले. परंतू त्यांची प्रज्ञा जराही वाकली नाही. कुठल्याही शक्तीसमोर ते झुकले नाही. हा इतिहास राजर्षी शाहू महाराजांना चांगलाच ठाऊक होता. त्यामुळे निर्धार करूनच शाहू महाराजांनी शिक्षणकार्याचे तेज अनेक भागात पसरविण्याला सुरूवात केली. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची संख्या वाढविली. अनेक अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली. ही पुनर्रचना करतांना विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे, त्यांचे शहाणपण वृध्दीगत व्हावे, त्यांचा विवेक जागृत व्हावा हा दृष्टीकोण त्यांनी कायम ठेवला. शिकणारे विद्यार्थी हे बहूजन समाजातील व मुळातच गरीब असल्यामुळे अनेक प्रकारच्या शिष्यवृत्या सुरू केल्या. विशेषत: विद्यार्थ्यांना शिकविणारे शिक्षक जर बाणेदार नसतील, ते स्वत: बुध्दिमान नसतील, शिक्षणाचा मुळ उद्देश काय आहे हे त्यांना माहित नसेल तर विद्यार्थी संभ्रमीत होण्याचा धोका अनेक पटीने वाढतो. या गोष्टीची पूर्ण जाणीव छत्रपती शाहू महाराजांना असल्यामुळे त्यांनी शिक्षक नेमतांना निश्चित अशा कसोटया लावल्या. अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये चेतना जागृत व्हावी, अन्यायाविरूध्द बंडखोरी करण्याची ताकद निर्माण व्हावी हा त्यामागचा शाहू महाराजांचा उद्देश होता. हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी, स्पर्धात्मक परीक्षा देण्यासाठी त्यांनी काही विद्यार्थ्यांना परदेशातही पाठविले. विशेष म्हणजे १९१२ साली कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

छत्रपती शाहू महाराजांच्या कादकिर्दीत २० विद्यार्थी वसतिगृहे जातीनिहाय होती. परंतू विद्यार्थ्यांच्या मनात परकेपणाची भावना येऊ नये यासाठी ही बोर्डींगे शेजारी राहावीत याचेही नियोजन त्यांनी केले. विद्यार्थ्यांना सकस भोजन मिळावे यासाठी ते जातीने लक्ष घालीत असत. कोल्हापूरात स्थापन केलेल्या व्हिक्टोरिया मराठा बोर्डींगमध्ये मराठयांच्या विद्यार्थ्यांबरोबर गवळी, कोळी, माळी, मुस्लिम जातीचे विद्यार्थी एकत्र राहत असत. "अशा त—हेच्या कार्याला आरंभ करण्यात शाहूंचे दोन उदेश होते. पहिली गोष्टी म्हणजे सामाजिक उच्चनीच भावनेची धार बोथट करणे आणि आपल्या समाजाच्या उध्दारासाठी अशी वसतीगृहे व शाळा काढतील असे कार्येकर्ते तयार करणे ही दुसरी गोष्ट होय. यास्तव शाहूंनी अनेक जातीच्या पुढा—यांची एक बैठक भरवली व त्यांचे आपापसातील मतभेद मिटविले. त्यांच्या मनावर शिक्षणाचे महत्व बिंबविले आणि शिक्षणाचा प्रसार आपापल्या जातीत करावा व त्यासाठी सहकार्य द्यावे अशी विनंती केली. अशा पध्दतीने कार्य केल्यास सामाजिक संघटनेच्या कार्याला गती मिळेल आणि शिक्षणाचा प्रसार ब्राम्हणेतरांमध्ये जलद गतीने होईल अशी शाहू महाराजांची धारणा होती."[१] विद्यार्थ्यांच्या नैतिक उन्नतीसाठी झटावे. विद्यार्थ्यामध्ये बांधिलकीची भावना रूजावी. स्वत:च्या जातीच्या उन्नतीबरोबर राष्ट्राच्या उन्नतीकडे विद्यार्थ्यांचे आकर्षण वाढावे यासाठी शाहू महाराजांनी पध्दतशिरपणे प्रयत्न केले. अनेक वसतिगृहांना आणि संस्थांना सढळ हाताने देणग्या दिल्या. यात कुठल्याही प्रकारचा पक्षपात शाहू महाराजांनी केला नाही. स्त्रियांच्या प्रगतीबद्दलही महाराज सजग होते. कृष्णाबाई केळवकर हया बुध्दिमान विद्यार्थीनीला मुंबईच्या ग्रॅंट मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविले. १९०२ साली सहायक डॉक्टर म्हणून आलबर्ट एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल येथे तिची नेमणूक तर केलीच, शिवाय तिला शिष्यवृती मिळवून देऊन वैद्यकीय ज्ञानात निष्णात व्हावे आणि सुतिकाशास्त्रात प्राविण्य मिळविण्यासाठी डब्लिन येथे पाठविले. शाहू महाराज अशा व्यापक दृष्टीने स्त्रियांच्या उन्नतीकडे पाहत असत.

विद्यार्थ्यांना शिकवितांना शिक्षकाने दुजाभाव करू नये याकडे ते कटाक्षाने लक्ष देत. सर्व जाती धर्माच्या मुलांना एकत्र बसवण्यात यावे अशी सक्त ताकीद शाहू महाराजांनी दिलेली होती. दलित समाजातील मुले आता कुठेतरी शिकू लागली आहेत. या विद्यार्थ्यांनी शिकून आपल्या समाजाचे कल्याण साधावे, त्यांच्यात शिकण्याची उमेद जागावी म्हणून प्रोत्साहनपर आणि आवश्यक स्कॉलरशिप तथा सवलतीही शाहू महाराजांनी प्रदान केल्यात. ब—याचदा मुले शेतीची वा अन्य मजूरीची कामे करतात. अशा वेळेला शाळा सुरू ठेवल्यास ते शिकू शकणार नाहीत. ही स्थिती लक्षात घेता शाहू महाराजांनी मुलांसाठी शाळांच्या वेळा त्यांच्या सोयीने ठेवण्याचे आदेश दिले. विद्यार्थ्यांच्या हिताची अशी काळजी घेणारा राजा इतिहासात शोधूनही सापडणार नाही. "छपत्रती शाहू महाराज यांनी शिक्षण क्षेत्रात विचारपूर्वक व दुरदर्शीपणाने आखलेले धोरण, त्यांची निर्धारपुर्वक व कठोरपणाने केलेली

अंमलबजावणी, त्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम व दाखविलेले धैर्य, त्याचा बहूजन समाजावर झालेला दुरगामी परिणाम आणि त्यामुळे घडून आलेली सामाजिक प्रगती या गोष्टीचा महाराष्ट्रातील जनतेवर विशेष प्रभाव पडला. एवढेच नव्हे तर अशा त–हेचे मुलभूत स्वरूपाचे शैक्षणिक काम बहूजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आपापल्या भागात आपणही करावे. अशी दुर्दम्य प्रेरणा महाराष्ट्रातील बहूजन समाजाच्या नेत्यांमध्ये प्रकर्षाने निर्माण झाली."[२] बहूजन समाजाचा उध्दार व्हावा यासाठी अनेक महापुरूष, समाजसुधारकांनी शाळा, महाविद्यालये स्थापन केली. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेकांसमोर शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आदर्श होता. शाहू महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन अनेकांनी सार्वजनिक कार्यात उडी घेतली. समाजबांधवांचे हित साधावे यासाठी आयुष्यभर ते झटलेत.

छत्रपती शाहू महाराजांनी बहूजन समाजातील छोटया छोटया समाजगटाच्या कल्याणाचा बारकाईने विचार केला. या समूहामध्ये शिक्षण जावे यासाठी जीवापाड मेहनत घेतली. महाराष्ट्रातील अस्पृश्यांसकट तमाम मागासलेल्या बहूजन समाजाचा उध्दार हे माझे पवित्र जीवनकार्य आहे, असे ते नेहमी म्हणत असत. स्पष्टवक्तेपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे देखणे वैशिष्टय होते. सत्य बोलतांना ते कुणाचीही भिडमुर्वत करीत नसत. मागासवर्गीय घटक आर्थिक बाबतीत मजबूत व्हावा, प्रशासनामध्ये जाण्याची त्यांना संधी मिळावी, तसेच तिथे कुठल्याही बाबतीत जातीभेदास थारा नसावा, याकरीता मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकरीत ५०% आरक्षणाची तरतुद केली. बहूजन समाजाच्या हिताची जी–जी धोरणे शाहू महाराजांनी राबवली, त्या त्या वेळेला पुरोहितशाहीने शाहू महाराजांवर टिका केली. असहकाराचे, टिकेचे शस्त्र त्यांच्यावर उगारले. खरे तर ब्राम्हणी प्रवृत्तीच्या संधीसाधूपणाला व धूर्त मनोवृत्तीलाच शाहू महाराजांनी आग लावल्यामुळे संघर्ष अटळ होता. याहीवेळेला शाहू महाराज कुणाच्याही टिकेसमोर जराही वाकले नाही. त्यांच्या प्रत्येक निर्णयात कणखरपणा होता. राजकारण करतांना मनुष्याला मनुष्याप्रमाणेच वागविले पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. संस्थानाचा किंवा राज्याचा विकास करावयाचा असेल तर सर्वांना समानता प्रदान केल्याशिवाय पर्याय नाही या वृत्तीवर ते ठाम होते. ब्राम्हणांनी विद्येचे लोण सर्वसामान्य माणसांपर्यंत न पोचविल्यामुळे कुठली अरिष्टे निर्माण झाली हे शाहू महाराजांना चांगले ठाऊक होते. बहूजन समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी जे जे करता येईल ते ते सर्व शाहू महाराजांनी अत्यंत निष्ठेने व प्राणपणाने केले. नितिमत्तेचा त्यांनी कधीही विसर पडू दिला नाही. "राजर्षींनी केवळ अज्ञान, विषमता व निरक्षरता या विरूध्दच प्रचार केला नाही तर स्वतः पुढाकार घेऊन त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा अंमलात आणल्या. अस्पृश्यतेविरूध्द मोहीम काढली आणि अस्पृश्य मानल्या जाणा–या जातीच्या विकासासाठी प्रयत्न केले. सामाजिक जीवनात परिवर्तन घडवू पाहणा–या सर्व प्रकारच्या चळवळींना आणि प्रयत्नांना पाठिंबा दिला."[३] शिक्षणाबरोबर सामाजिक सुधारणेची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली. समाजाच्या भल्याचा विचार करणा–यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहिले.

राजर्षी शाहू महाराजांनी रयतेच्या उन्नयनासाठी जीवापाड मेहनत घेतली. प्रजेच्या कल्याणातच राष्ट्राचे हित आहे हे समजून त्यांनी प्रजेवर आई –वडीलांच्या ममतेने प्रेम केले. शिक्षणाचे धोरण राबवितांना जातीधर्माचा जराही अंश असू नये, सर्व जातीधर्माच्या लोकांना शिक्षण प्राप्त व्हावे ही त्यांची मुळातच तगमग असे. शाहू महाराजांनी ब्राम्हणी मक्तेदारीतून शिक्षण मुक्त केले व त्याला सार्वजनिक स्वरूप प्राप्त करून दिले. शिक्षणाच्या माध्यमातून शाहू महाराजांना एकसंध, पुरोगामी समाज निर्माण करायचा होता. बुध्दिमान विद्यार्थी हे समाजाचे अॅसेट असतात यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. सामाजिक प्रबोधन हा त्यांच्या शिक्षणधोरणातील मुख्य घटक होता. शाहू महाराजांच्या ठायी तरल संवेदनशीलता, सर्वव्यापक सहानुभूती, विवेकशीलता आणि राष्ट्राचे हित सामावले असल्यामुळे शैक्षणिक चळवळीला त्यांनी सुंदर प्रारूप बहाल केले. आधी सामाजिक स्वातंत्र्य की राजकीय स्वातंत्र्य असा वाद महाराष्ट्रातून सुरू असतांना काहींनी आधी राजकीय स्वातंत्र्याची बाजू घेतली. हे करतांना मात्र वास्तवाचे भान त्यांना राहिल्याचे दिसत नाही. सामाजिक समतेशिवाय राजकीय स्वातंत्र्याला खरे तर कुठलाही अर्थ नसतो. स्वातंत्र्य ही संकल्पना सर्वार्थाने योग्य असली तरी स्वातंत्र्य केव्हा आणि कुठल्या गोष्टीचे असावे याचे भान बाळगणे गरजेचे असते. महाराष्ट्रात हे भान फारसे बाळगल्याचे दिसत नाही. शाहू महाराज या सर्वच परिस्थितीला नीट समजून होते. त्यामुळेच शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक सुधारणेचे कंकण त्यांनी आपल्या हाताला बांधले आणि नवा इतिहास देशासमोर उभा केला. "सामाजिक विषम व्यवस्था संपवायची, शोषण संपवायचे, जात धर्मभेद संपवायचे, समतेवर आधारलेला नवा समाज निर्माण कराचा यासाठी शाहू महाराजांनी प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष केला. त्यांची ही भूमिका अत्यंत मोलाची होती. एका बाजूला संघर्ष आणि दुस–या बाजूला जीवन उभारणारे

विधायक कार्य त्यांनी केले. या कार्याला तोड नाही."[४] सामान्य जणांच्या मनात दुर्दम्य आशावाद निर्माण करणे हे काही सोपे काम नव्हे. पण हे काम शाहू महाराजांनी अत्यंत निष्ठेने केले. शैक्षणिक सुधारणेसाठी त्यांचा संघर्ष म्हणजे एक युध्दच होते. परिवर्तनाच्या चळवळीचे चक्र गतीमान करण्यासाठी शाहू महाराज आयुष्यभर झटलेत.

शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे स्वरूप आणि व्याप्ती पाहत असतांना जेव्हा आजच्या महाराष्ट्राकडे आपली नजर जाते तेव्हा मन विषण्ण होते. अनेक प्राथमिक शाळांना एकशिक्षकी शाळेचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. अध्यापनाशिवाय शिक्षकाला शासनाने मतदार याद्या तयार करण्यासारखे अनेक निरूपयोगी कामे दिलेली असतात. त्यामुळे शिक्षकांच्या अध्यापनकार्यात उत्कटतेची आपण कशी अपेक्षा करणार? प्राथमिक शिक्षणाची अशी सर्वत्र हेळसांड होतांना आपल्याला दिसते. अलिकडे सरकारला प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याची आठवण आली. हे पुर्वीच झाले असते तर आज शिक्षणक्षेत्राला भरभराटीचे स्वरूप प्राप्त झाले असते. महाराष्ट्रात प्राथमिक, माध्यमिक शिक्षणातील गळती प्रचंड आहे. अजूनही ग्रामीण भागातील दलित, आदिवासी, भटके विमुक्त आणि इतर मागासवर्गीयांची मुले शिक्षणापासून वंचितच आहे. त्याकडे शासन फारशा गांभीर्याने पाहत नाही. जागतिकीकरणाच्या विळख्यात उच्च शिक्षण सापडले आहे. खाजगीकरणाने सर्वसामान्यांच्या प्रगतीच्या वाटा अरूंद केलेल्या आहेत. शिक्षण घेण्यास बंदी नसली तरी ज्यांच्याकडे आर्थिक क्षमता आहे त्यांनी शिकावे आणि ज्यांच्याकडे आर्थिक क्षमता नाही त्यांनी घरी बसावे, अशी नवी व्याख्याच या खाजगीकरणाने केलेली आहे. साध्या मॉन्टेसरीत प्रवेश मिळवायचा असेल तरी आज भरघोस देणग्या द्याव्या लागतात. शिक्षणाला एकूणच धंद्याचे स्वरूप आले आहे. देशात शैक्षणिक अराजकतेला सुरूवात झालेली आहे. शाहू महाराजांचा जयजयकार करणारे पुढारी त्यांच्या शैक्षणिक धोरणाकडे दुर्लक्ष करतात. विरोधी निर्णय घेतात. नाव शाहूंचे घ्यायचे, वर्तन मात्र त्यांच्या भुमिकेच्या विरोधात ठेवायचे असे आजचे स्वरूप आहे. कल्याणकारी राज्यसंस्थेचे पार खोबरे झालेले आहे. भारतीय राज्यघटनेच्या विरोधात आपण शैक्षणिक धोरणे राबवतो आहोत याचा मागमूसही आपल्या निर्णयात नसतो. लोकशाहीचा डोलारा हा सुजाणतेवर, विवेकावर उभा असतो. विद्यार्थी हा जबाबदार, कर्तव्यनिष्ठ आणि समाजदेही बनवण्याची जबाबदारी ही शिक्षणाची आहे. यात आपण जराशीही चूक केली तर पुढील काळात लोकशाही व्यवस्था डळमळीत तर होईलच, शिवाय देशात अनागोंदीचे वातावरण निर्माण होईल. ज्या व्यापक पातळीवरून शाहू महाराजांनी शिक्षणव्यवस्थेचा विचार केला, सामाजिक ध्येयाच्या संदर्भात शैक्षणिक क्रांतीचा विचार केला, तो जर आजच्या परिप्रेक्षात लक्षात घेतला तर त्यातून निश्चितपणे काही नव्या दिशा गवसतील. त्यासाठी जबर राजकीय इच्छाशक्तीची मात्र गरज आहे.

## संदर्भ


१) धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरे पुनर्मुद्रण २०१७, पृ.११५.

२) विलास संगवे, राजर्षी शाहू महाराजांचे अभूतपुर्व शिक्षणकार्य : व्याप्ती व फलश्रुती ( राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ: संपादक–जयसिंगराव पवार) महाराष्ट्र इतिहास प्रबोधीनी प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती २००७, पृ.५९८.

३) अशोक चौसाळकर, राजर्षी शाहू महाराज (समाजसुधारक आणि अंधश्रध्दा: संपादक स.मा.गर्गे), महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, २००३, पृ. ८८.

४) प्रल्हाद लुलेकर, भुमिकांचा ऐवज, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, २०२० पृ.४३


❖❖❖

# ‘डमोफून’ कवी केतन पिंपळापुरे

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
E-mail: vikrantmeshram1976@gmail.com भ्रमणध्वनी ८७८८७११४८४/९४०३४०५४९०

## गोषवारा (Abstract)

नवोदोत्तर आंबेडकरी साहित्यामध्ये कवि केतन पिंपळापुरे हे एक महत्वपुर्ण नाव आहे. त्यांचे एकूण ०६ कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. आंबेडकरी चळवळीत, आंदोलनात एक हाडामासाचा सच्चा कार्यकर्ता म्हणून राबत असतांना त्यांच्या कवितेच जन्म झाला. त्यांच्या काव्यसंग्रहाचे नांव पाहिले तर कविच्या प्रतिभेची व तत्वज्ञानाची प्रचिती येते. विषमतावादी समाजरचना बदलून समतेवर अधिष्ठीत समाज रचना निर्माण होण्याकरीता माणसाला नैतिक अधिकार मिळाले पाहिजे. हया करीता ते सातत्याने आंबेडकरी चळवळीत राबले व कवितेच्या माध्यमातून आवाज बुलंद केले. आंबेडकरी साहित्यात कवि केतन पिंपळापुरेचा अभ्यास चिंतन केल्याशिवाय पुढे जाताच येत नाही.

## विषय विवेचन

१९६० हा दशक आंबेडकरी साहित्याचा प्रारंभ. १९६० च्या पूर्वी अस्पृश्य जातीत जन्मलेल्यांनी जे साहित्य निर्माण केले त्याला आंबेडकरी साहित्य म्हणता येईल काय तर नाही: पूर्वीश्रमीचे दलित साहित्य आणि सुधारित आंबेडकरी साहित्याचे प्रेरणा, उर्जास्तोत्र, आदर्श हे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. दलित साहित्याची अनेक प्रतिभावंतानी व्याख्या, संज्ञा केल्या आहेत. जो पिढीत, सोषित, उपेक्षित तो दलित असा एकंदर अर्थ त्या संज्ञातुन प्रतिपादीत होतो. मात्र जसे–जसे दलित साहित्य प्रकाशित होत गेले तेव्हा लक्षात आले की, दलित साहित्यिक स्वत:ला म्हणवून घ्यायचे मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराशी बेइमानी करायचे.

मित्रांनो.. आंबेडकरी साहित्याची एक अट आहे ती अशी की, आंबेडकरी म्हणून घेण्यासाठी परमेश्वर आत्मा, परमात्मा, नशीब, धर्म, पूनर्जन्म, खोटया रुढी परंपरा नाकारावे लागते. जो नाकारतो तोच खऱ्या अर्थाने आंबेडकरी होतो. आंबेडकरी होणं ही सगळयात अवघड गोष्ट आहे. म्हटलं तर ती एक जोखिम आहे. आंबेडकरवादी जो तो जातीतून सगळयात आधी बाहेर पडतो. आंबेडकरवादी जो तो प्रदेशातून, वंशातून, वेगवेगळया पंथामधून स्वत:ला बाहेर काढतो, पडतो. आंबेडकरवादी तो जो नेहमी ग्लोबल भाषा बोलत राहतो आणि आपल्या दु:खाची नाळ जागतिक दु:खाशी जोडत राहतो. मी तर असा म्हणतो जो आतून आणि बाहेरुन पूर्णत्वाने आंबेडकर स्विकारतो तो खऱ्या अर्थाने आंबेडकरी, खरा आंबेडकरी तो असतो. या सगळया गोष्टीचा आपण विचार केला तर प्रत्येकाने स्वत:लाच प्रश्न विचारावा की, आंबेडकरवादी कोण आहेत आणि कोण नाहित. कारण आंबेडकरवादी होण्यासाठी सुध्दा एक मोठी किंमत चुकवावी लागते. उर्जा कमवावी लागते. संघर्ष करुन पात्रताही कमवावी लागते. बहुतेक वेळेला आपण अनुवंशिकतेने आंबेडकरी होतो. किंमत न चुकवता आंबेडकरवादी होतो. त्यामुळे गफलती सुध्दा खूप होतात. असाच एक आंबेडकरवादी कवी केतन पिंपळापुरे यांच्या कवितासंग्रहाचा आपण अभ्यास केला तर लक्षात येईल.

कवी केतन पिंपळापुरे यांचे एकूण सहा कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. सूर्यकंकण, मार्शल रेस, डेमोफुन, हेमलॉक, मकाबी, नोबलटुथ हया साठी कवितासंग्रहाच्या नावावरुन एक गोष्ट अधोरेखित होते ती ही की, कालकथित, स्मृतिशेष कवी केतन यांना आपली दु:खाची नाळ जगातील दु:खीत बांधवाशी जोडली आहे. कवी केतन खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी कवी आहेत. त्यांची जडण–घडण, वैचारिक पातळी समता सैनिक दलात राबतांना घडली आहे. कवी केतनच्या ‘डेमोफून’ या कवितासंग्रहावर आज भाष्य करणार आहे.

‘डेमोफून’ ची ग्रीक पौराणिक कथा लिहणारा लेखक कथाकार महापुरुष होता. या कथेवर विविध काळात विविध भाष्य लिहिली गेली असावित. ‘डेमोफून’ या ग्रीक कथेवर आधारित कविता संग्रह आहे. डेमोफून महापुरुष झालाच नाही, तो सर्व सामान्य मनुष्यच राहिला. दु:ख, दारिद्रय, वेदना त्याच्या वाटयाला आले. आजच्या दु:खी

मानव जगाला दु:खातुन मुक्त करणारा महापुरुष याच मातितून येईल असा विश्वास डेमोफून या राजपुत्राच्या मातेला असतो. म्हणून ती लहान पणापासूनच 'डेमोफून' ला वेगवेगळया पातळीवरचे जगणे जगविते. दु:खातून मुक्त करण्यासाठी डेमोफूनची ती जडण—घडण करते.

आज आपल्या देशात अनेक समस्या आहेत. त्यातल्या त्यात आंबेडकरी समुदायामुळे या समस्येतून दु:खातून मुक्त करणारा माणूस याच मातीतून जन्म घेईल असा विश्वास 'डेमोफून' हा काव्यसंग्रह वाचल्यानंतर लक्षात येतो. 'डेमोफून' हया काव्यसंग्रहात 'महापुरुष' आहे तो बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या

The bodhisattva is now beyond time and space. He is one with infinity, but he still retains name-rupa Out of his great compassion for all beings.

(The Buddha And His Dhamma- Page. 77)

कवी केतनच्या 'डेमोफून' वाचल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे वास्तवता.

*त्यांना प्रिय आहे देशापेक्षा मंदिर*
*आणि संविधानापेक्षा त्यांचे धर्मग्रंथ*

(वर्शिपींग कॉल्स डेमॉक्रसी / पृ. ८३)

या काव्यओळीतून त्यांनी सनातन काळापासून तर आजतागायतची वास्तवता अधोरेखित केली आहे.

सभ्यतेचे बागबगिचे तुडवीत
उधळणारा हे बेकनचा मस्तवाल घोडा
म्हणून भौतिक विकासवादाच्या पाठीवर
वैज्ञानिक जीवनवादाची मांड ठोकून
जेव्हा बलदंड बलाने वळविली जाईल
बेकनची घोडदौड सृजनाच्या दिशेला
तेव्हाच जीवन शाश्वत सुंदर होईल आणि
शेक्सपिअरसह बेकनही बुध्दचरणी लीन होईल.

(बेकनचा चौखूर उधळलेला घोडा — पृ. ७८)

हया काव्यपंक्तीतून कविनं मानवाच्या उत्थानासाठी हवी असणारी नीतीमत्ता स्वच्छ व पारदर्शकपणे मांडलेले आहे.

रोजचाच दिवस आमच्या दारात वारंट घेऊन उभा राहतो.
काळ असा की जगण्यासाठी घेतलेल्या.
चार श्वासाचांही टॅक्स मागतो.
आणि लोचनांचा किनारा आसवांनी झिरपलेलाच दिसतो.
सारे गावच वणव्याने पोळलेले.
आयुष्यातून उठून जावे.
असे वास्तव रोज ब्लॅकमेल करीत असते.
सृजनाने मुक्तपणे व्हावे अभिव्यक्त असे नवे युग येणार आहे.

(असे नवे युग येणार आहे, पृ. ४)

दु:ख, दैन्य, दारिद्रयातून, सुटका होईलच, विचारवंताच्या विचाराला बंधिस्त करता येणार नाही त्याच्या अन्याय—अत्याचारावर शोषणावर मुक्तपणे बोलता येईल असे नवे युग येणार आहे. हा आशावाद त्यानी मांडला आहे.

बुध्दाची प्रज्ञा ही संपूर्ण विश्वातील प्रत्येक बौध्द प्रज्ञावंताची प्रज्ञा आहे. या संदर्भात

मी अडीच हजार वर्षापूर्विच केली आहे
त्यांच्या मेंदूची शवचिकित्सा
मी आहे प्रज्ञा... (ब्रेनगॅग्रीन, पृ. ८)

माझ्या युगाच्या क्षितीजावरील अस्वस्थ पाखरांनो या असे जवळ या
पंखांना एकमेकांच्या जवळ, घ्या आपनच उचलू या हे अंधाराचे जाळे आणि
आपणच होऊ या मुक्तिच्या स्वप्नांचे आभाळ निळे... निळे....

(माझ्या युगाच्या क्षितिजावरी अस्वस्थ पाखरांनो, पृ. १०४)

मला हवे आहे माझ्या जखमांसाठी ज्वालांचे सळसळणे,
मला हवे आहे आकांतासाठी
इच्छांचे मनापासून जळजळणे
मी हाक देईन तेव्हा उठले पाहिजे रान
सळसळले पाहिजे बोधीवृक्षाचे पान न् पान
असे युगंधर जत्थे
सळसळून झाले पाहिजेत एका पुकाऱ्यावर हे सत्यसुगता
या विझलेल्या प्राणांच्या मशालीसाठी
मला हवे आहे आणखी एक अग्निवादळ.
(माझ्या ओंजळीतील आसवांची लाख लाख फुले होवोत, पु. ६९)

तु धरतीच्या प्रारंभाचा आरंभ बिंदू
तुझ्याशिवाय चंद्र, सूर्य तारे
ग्रह, दिशा, आरंभ, अंत,
भूत, वर्तमान, भविष्य
आणि आकाश – पाताळ शुन्य.
(डेमोफून, पृ. ४१)

भूक आणि भौतिक सुखाच्याही पुढे सुरु होणाऱ्या अनाकलनीय विश्वाची...
यापूर्वी कुणीच केली नव्हती चिंता आणि सम्यक चिकित्सा
श्रमशोषणाच्या आर्थिक चिंतनविश्वातही असलेली ही तूट
त्याने सव्याज भरुन काढली आणि तो झाला विश्वविजेता.
(बाबासाहेब आंबेडकरांनी, पृ. ६७)

ही वास्तवता त्यांच्या कवितेतून जाणवते. आसवांची फुले होणे म्हणजे मानवाचे दु:ख नष्ट होणे होय. अन्नाची भूक शोषित वर्गाच्या पोटात व भौतिक सुखांची भूक शोषक वर्गाच्या देह–भानात असल्याने मानव दु:खात आहे. मार्क्सवादी विचारात असलेली कमतरता डॉ. बाबासाहेबांनी भरुन काढावी हा आशावाद कविच्या कवितेतून व्यक्त होतांना दिसतो.

माझ्या ओंजळीतील आसवांची लाख लाख फुले होवोत. (पृ. ७४)

ही वास्तवता, आशावाद त्यांनी कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त केला आहे.

## निष्कर्ष

- 'डेमोफून' ही संकल्पना ग्रीक पौराणिक कथेतून घेतली आहे.
- वास्तवतेवर आधारीत कविता आहे.
- आंबेडकरी साहित्यिक होण्यासाठी आधी देव, धर्म, आत्मा, परमात्मा नाकारावा लागतो.
- आंबेडकरी तो जो आतून आणि बाहेरुन आंबेडकर स्विकारतो.
- 'डेमोफून' हया काव्यसंग्रहात वास्तव जिवन जाणीव आहे.
- मानवाच्या उत्थानासाठी हवी असणारी नीतीमत्ता स्वच्छ व पारदर्शकपणे मांडली आहे.

## संदर्भ

कांबळे उत्तम : आंबेडकरी साहित्य.
थोरात डॉ. मा.प. डेमोफून आंबेडकरी सौंदर्यदृष्टीतून एक आकलन.
मोरे सतेकुवर : अध्यक्षीय भाषण – तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन वर्धा.
मोरे सतेश्वर : प्रस्तावना निलपेख कविता संग्रह.

❖❖❖

# कोविड–१९ आणि शिक्षण व्यवस्थेसमोरील नवी आव्हाने

प्रा. डॉ. स्वाती दीपक दामोदरे
सहायक अधिव्याख्याता, भाषा विभाग,
श्रीमती ल रा तो वाणिज्य महाविद्यालय,
रतनलाल प्लॉट्स, अकोला, महाराष्ट्र (India)
निवास: ज्ञ –११, शिवस्पर्श सहनिवास, भारत गॅस समोर,आगरकर मार्ग, रामदास पेठ अकोला ०५
E-mail: swatidamodare07@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१८३६७९७

## गोषवारा

भारताची पुरातन अध्ययन–अध्यापन पध्दती ही गुरुकुल पध्दती आहे या पध्दतीनुसार वयाच्या एका विशिष्ट टप्प्यावर मुलांना गुरुगृही रवाना करण्यात येत असे. गुरूच्या घरी राहून सर्व प्रकारची विद्या ग्रहण करतानाच शिष्यांना व्यवहाराचे ज्ञान, सामाजिक–सांस्कृतिक घडामोडी, इतिहास ,पर्यावरणाचे ज्ञान आपोआप प्राप्त होत असे. नंतरच्या काळात काही विशिष्ट वेळ गुरूच्या संपर्कात राहून विद्यार्थ्यांना ज्ञानग्रहण करता येऊ लागले. त्यासाठी घराचा आणि आई–वडिलांचा त्याग करण्याची गरज उरली नाही. दिवसाकाठी विशिष्ट वेळ अध्ययन अध्यापनासाठी देऊन शिक्षण संस्कृतीची पुढील वाटचाल होत राहिली. मात्र वर्तमान काळात शिक्षकांपासून दूर राहून ज्ञानग्रहण करण्याची वेळ विद्यार्थीनांवर आलेली आहे. हे विद्यार्थीसाठी पालकांसाठी जसे आव्हान आहे तसेच शिक्षकांसाठी आणि आपल्या शिक्षण पध्दती समोरही एक आव्हानच आहे. विद्यार्थीयांना जास्तीत जास्त मजकुराचे आकलन व्हावे, त्यांचा अध्ययनातील रस टिकून रहावा आणि त्याच्या कल्पना स्पष्ट व्हाव्यात असा प्रयत्न या ऑनलाईन शिक्षणाच्या पध्दतीतून करणे हे शिक्षकांसाठी खरोखर कौ'ल्याचे काम असणार आहे. अर्थात या शिक्षण पध्दतीचे काही फायदे आणि तोटे ही नजीकच्या काळात आपल्याला दिसून येतील. त्याचा विचार करणे हाच प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

## Abstract

The Gurukul system is the oldest teaching and learning system in India. According to this method, children are sent to Gurugriha at a certain age. Now a days there is no need to give up home and parents for students to acquire knowledge . If a certain amount of time is given for teaching and learning during the day, then the education culture will continue. But now it is time for students to learn from teachers in a remote education way. There is a challenge for the teachers as well as for their teaching methods. It is a matter of skill for the teachers to try to make the students understand the text as much as possible. The purpose of this article is to consider what you will see in the near future regrading this online education system.

## प्रस्तावना

Covid-19 च्या काळात आपल्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तने येत आहेत. शाळा, महाविद्यालये, वाचनालये, प्रवासाची साधने, मंदिरे,बाजारपेठा मॉल्स यावर घातल्या गेलेल्या बंदीमुळे सर्वसामान्य जीवन, व्यापार आणि शिक्षण या सगळ्याच बाबी प्रभावित झाल्या आहेत. मार्च २०२० च्या दुसर्या आठवड्यात साधारणपणे भारतात कोविड–१९चा प्रभाव जाणवायला सुरुवात झाली. हा अतिशय संसर्गजन्य आणि प्राणघातक रोग असून त्यात मृत्युदर मोठ्य प्रमाणावर असल्यामुळे, भारत सरकारने प्रतिबंधक उपाय योजना तातडीने सुरु केली.

श्शाळा महाविद्यालय बंद ठेवणे , नियोजित केलेल्या परीक्षा लांबणीवर टाकणे हा शासनाने केलेल्या उपाय योजनांपैकी एक अपरिहार्य भाग होता– ज्याचा परिणाम अर्थातच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाावर – करिअरवर होणार होता, आणि झालाच– या समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी काही काळाचा अवधी जावा लागला – पण जसजसे रोगाचे स्वरूप उग्र होत चालले होते आणि श्शाळा महाविद्यालय बंद ठेवण्याची स्थिती अंदाज लावण्यापलीकडे लांबत चालली होती अशावेळी श्शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी काही उपाययोजना करता येतील का याचा विचार सुरू झाला. परिणामी ज्या उपायांची योजना करण्यात आली त्याचे शिक्षण क्षेत्रावर चांगले

आणि वाईट दोन्ही परिणाम झाले. शिक्षण प्रक्रियेसंदर्भात काही नवीन आव्हाने Covid-19 मुळे आपल्या समोर उभी ठाकली.

## ऑनलाइन एज्युकेशनचा प्रारंभ

लॉकडाउनच्या सुरुवातीच्या काळात परीक्षा हा ऐरणीवरचा प्रश्न होता –मार्च–एप्रिल महिन्यात ,लॉकडाऊन मुळे परीक्षा लांबणीवर टाकल्या गेल्या. या काळापर्यंत सहसा सगळे अभ्यासक्रम पूर्ण होत असल्यामुळे शैक्षणिक नुकसानाचा प्रश्न नव्हता. प्रश्न फक्त परीक्षेचा असल्यामुळे शिकवण्याची प्रक्रिया लांबणीवर पडणार आहे, याची फार तीव्र जाणीव ,एप्रिल –मे –जून या महिन्यांमध्ये झाली नव्हती. हा कालावधी संपून पुढील सत्र सुरू होईपर्यंत एखाद्या परिणामकारक व्हॅक्सिनचा शोध लागेल ,अशी पण एक आशा जनमानसात मूळ धरून होती. त्यामुळे स्वाभाविकच जून महिन्यानंतर कदाचित शाळा–महाविद्यालये उघडता येतील असे वाटत होते. पण जसजसा काळ समोर सरकत गेला आणि रुग्णसंख्या, रुग्णांचा मृत्यूदर , रोगाच्या प्रसार–प्रचार याचे स्वरूप, हे उग्र रूप धारण करत गेले , तसतसे अनिश्चित काळापर्यंत शाळा महाविद्यालये बंद ठेवावी लागणार आहेत ,हे चित्र स्पष्ट होत गेले. आणि भारतीय शिक्षण प्रणालीत ऑनलाइन शिक्षणाची पहाट झाली.

वास्तविक यासाठी आवश्यक असणारी साधने आणि इंटरनेट आपल्याकडे यापूर्वीही उपलब्ध होते. पण त्याकडे आपण शैक्षणिक साधने म्हणून गांभीर्याने कधी पाहिले नव्हते आणि ती वेळ आता येऊन ठेपली होती.

## ऑनलाइन एज्युकेशनचे फायदे

ऑनलाइन आणि ऑफलाईन (किंवा पारंपरिक) एज्युकेशन पध्दतींची तुलना होणे खरे तर योग्य नाही पण एका पध्दतीतून दुसऱ्या पध्दतीत प्रवेश करत असताना दोन पध्दतींची तुलना होणारच. अर्थातच दोन्हीचे काही फायदे ,काही तोटे आहेत–पण काळाची गरज हा मुद्दा या फायदा तोटयांपेक्षा महत्वाचा आहे. आणि त्या पार्श्वभूमिवर सध्या ऑनलाइन एज्युकेशानला पर्याय नाही.

ऑनलाइन शिक्षण पध्दतीचा सगळ्यात मोठा फायदा हा , की एका शिक्षकाला अनेक विद्यार्थ्यांपर्यंत सहजतेने पोहोचता येते. आपल्याकडे शिक्षकांचे आणि विद्यार्थी संख्येचे अपेक्षित असलेले प्रमाण प्रत्यक्षात नसल्यामुळे समस्या उद्भवत आहेत य त्या समस्यांवर ऑनलाइन शिक्षण पध्दती हे उत्तर असू शकते – व्हॉट्सपचे ग्रुप, टेलिग्रामचे ग्रुप, युट्युबचे व्हिडीओ ,गुलच्या क्लास रुम, झुमअँप– गुगल अँप या आणि अशा असंख्य माध्यमातून शिक्षकांना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे फार सोपे आहे. अर्थात त्यासाठी थोड्या प्रशिक्षणाची, थोड्या सरावाची गरज शिक्षकांनाही आहे. मात्र कोविड – १९ च्या काळात अनेक शिक्षकांनी धडपड करून हे कौशल्य प्राप्त केले. आणि जुलै महिन्यापासूनच शाळा महाविद्यालयातील शिक्षक ऑनलाईन शिक्षण्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू लागले.

ऑनलाइन शिक्षणाचा दुसरा महत्त्वाचा मोठा फायदा म्हणजे खर्चात कपात– कमी शिक्षकांच्या मदतीने सुध्दा अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे शक्य असल्यामुळे शिक्षणाांवर खर्च होणारी रक्कम कमी करणे शिक्षण व्यवस्थेला शक्य हाणोर आहे. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी येण्याची गरज नसल्यामुळे त्यांचा वाहतुकीचा खर्च वाचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इंधन बचतीचा थेट फायदा वायूप्रदूषण कमी करण्यासाठी, अर्थात निसर्गसंवर्धनासाठी होऊ शकतो. वाहनांचा वापर कमी होताच रस्त्यावर होणारी गर्दी,ट्रॅफिक जॅम,अपघात यांचे प्रमाणही कमी होण्यास मदत होणार आहे.

याच ऑनलाइन एज्युकेशन प्रणालीचा तिसरा आणि महत्त्वाचा फायदा म्हणजे या माध्यमातून विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, नोट्स ,गाईड, रजिस्टर्स यावर खर्च करण्याची फार आवश्यकता राहिलेली नाही –पीडीएफ स्वरूपात सहजासहजी नोट्स विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येत आहेत. शशैक्षणिक विषयांवरचे युट्युब व्हिडीओ विद्यार्थ्यांना सहजासहजी उपलब्ध होत आहेत. नुकतेच आपण सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील परितेवाडीच्या शाळेतील रणजितसिंह डिसले या शिक्षकांना मिळालेल्या अवार्ड बद्दल वाचले आहे. त्यांनी ऑनलाइन माध्यम वापरूनच शिक्षणाच्या क्षेत्रात ही क्रांती आणायला सुरुवात केली आहे. शैक्षणिक साहित्याचे छोटे व्हिडिओ करून पुस्तकांमध्ये त्या पाठात बारकोड स्टिकर वापरून त्यामाध्यमातून मुलांपर्यंत पुस्तकी ज्ञान प्रत्यक्ष स्वरूपात जिवंत करण्याची किमया त्यांनी साधली आहे. आणि त्यांच्या तंत्राचा अवलंब बालभारती सारख्या संस्थांनी करायला

सुरुवात केली आहे. हे ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे वरदानच म्हटले पाहिजे. जवळपास ८८ वेगवेगळ्या देशातील तज्ज्ञ मंडळींची आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांशी ऑनलाइन माध्यमातून डिसले सरांनी भेट करून दिली आहे.
ऑनलाइन शिक्षणाचा आणखीन एक फायदा असा की एखाद्या शाळा महाविद्यालयातील शिक्षकांना अतिथी व्याख्यानासाठी दुसऱ्या शाळा महाविद्यालयात जर आमंत्रित केले गेले असेल तर, त्यांना त्या तासांपुरती पर्यायी व्यवस्था करून दुसऱ्या ठिकाणी प्रत्यक्ष हजर व्हावे लागत असे. जर शिक्षक बाहेरगावचे असतील तर त्यांना प्रवास करून अतिथी व्याख्यानासाठी यावे लागे. आता मात्र गुगल मीट किंवा झूम मीट च्या माध्यमातून कुठल्याही शहरातील कुठल्याही शिक्षाकांना, कुठल्याही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे शक्य होत आहे. भागोलिक अंतरे क्षणार्धात कमी झाली आहेत. त्यामुळे प्रवास, वेळ , प्रयत्न आणि पैसा या चारही गोष्टींची बचत होऊन सध्दा विद्यार्थ्यांना अनेक शिक्षकांची व्याख्याने सहजासहजी उपलब्ध होत आहेत.

ऑनलाईन शिक्षणांचा अजून एक फायदा म्हणजे नवीन इमारती बांधणे नको की नवीन शिक्षक नको. नोट्स डाउनलोड करून फोन मध्येच वाचता येत आहेत. त्याचप्रमाणे असाइनमेंट सुध्दा फोनच्या मदतीने तयार करून, पीडीएफ स्वरूपात गुगल क्लासरूम मध्ये जमा करता येणे शक्य झाले आहे.या पेपर बचतीमधून आपण पर्यावरणावर संवर्धनाकडेही वाटचाल करीत आहोत,कारण कागद निर्मिती साठी वृक्षांची कत्तल अपारीहार्यपणे केलीच जाते. एक फायदा असाही आहे की शहरात मिळणारे दर्जेदार शिक्षकांचे दर्जेदार शिक्षण आपल्या ग्रामीण भागातील मुलांना सध्दा उपलब्ध करून देता येत आहे. या तंत्रज्ञानामुळे ग्रामीण आणि शहरी भागातली दरी कमी होण्याची शक्यता आहे.

ई पी जी पाठशाला हा एक मोठा प्रकल्प. ज्यात पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी असंख्य विषयांवरचे असंख्य व्हिडिओ उपलब्ध आहेत. हिंदी ,इंग्रजी ,मराठी अशा भाषाय इतिहास, तत्त्वज्ञान यासारखे विषय ई पी जी पाठशाला या पोर्टलच्या मदतीने समजून घेणे खरंच शक्य आहे. एचआरडीसीने या पोर्टलची निर्मिती खरं तर याआधीच केली आहे. मात्र Covid-19 च्या काळात त्याचे महत्त्व खऱ्या अर्थाने आपल्याला समजून आले आहे. तीच गोष्ट यु अकॅडमी किंवा यूजीसीच्या स्वयम् पोर्टल सारख्या पोर्टल बाबत म्हणता येईल. इथे लहान–मोठे पदविका अभ्यासक्रम किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम हे चार आठवडे, सहा आठवडे, दहा आठवडे अशा स्वरूपात अक्षरक्षरू शेकड्यांनी उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमांसाठी टेक्स्ट आणि व्हिडीओ ची रचना प्रशिर्क्षनार्थी विद्यार्थी किंवा प्राध्यापकांसाठी केलेली आहे– परीक्षा देण्यास इच्छुक असलेला विद्यार्थी किंवा प्राध्यापक परीक्षेला सध्दा बसू शकतो आणि प्रत्यक्ष प्रमाणपत्र सुध्दा प्राप्त करू शकतो. तसे नसेल तर केवळ ज्ञान संवर्धनासाठी हे व्हिडिओ पाहणे आणि टेक्स्ट वाचणे, समजून घेणे,असे देखील करू शकतो. यातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे आपण कोणत्या ज्ञानशाखेत शिकतो आहोत याचे बंधन न राहता आपण कुठल्याही विद्याशाखेची माहिती मिळवू शकतो– उदाहरणार्थ कॉमर्सला शिकणारा विद्यार्थी हा भाषांतराचा अभ्यासक्रम सुध्दा करू शकतो. किंवा विज्ञान शिकवणारा प्राध्यापक देहबोली वरील अभ्यासक्रम पूर्ण करू शकतो. व्यवसाय क्षेत्रात किंवा आयात निर्यात क्षेतात जागतिकीकरणाने जशी क्रांती घडवून आणली ,तशीच ऑनलाइन ,ज्युकेशनने भारताच्या शैक्षणिक परिस्थितीत एका प्रकारे क्रांती घडवून आणायला सुरूवात केलेली आहे.

## ऑनलाइन एज्युकेशनचे तोटे

ऑनलाइन शिक्षण पध्दतीचे काही तोटेही आहेत. जसे– जर शिक्षकांची गरज कमी झाली तर शिक्षक एम्प्लॉयमेंटचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. लहान गावांमध्ये किंवा खेड्यांमध्ये जिथे नेट सुविधा उपलब्ध नाही किंवा नेट स्पीड उपलब्ध नाही तिथे शिक्षकांनी केलेले व्हिडिओ किंवा टेक्स्ट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे, त्यांनी ते बघणे, ऐकणे अवघड होऊ शकते –काही पालकांजवळ पाल्यांना ऑनलाईन क्लास करू देण्यासाठी मोबाईल नाहीत. काही पालकांजवळ आहेत पण त्यांची कामे आणि पाल्यांचे तास ,काचवेळी असले तर ,काला कोणाला तरी वंचित रहावे लागते–एका कुटुंबात दोन शाळकरी मुले असल्यास त्यांना स्वतंत्र स्वतंत्र मोबाईलची गरज आहे. आर्थिक समस्या असणाऱ्या पालकांना हे जड जात आहे.शिवाय नेटपॅक चा खर्च निराळाच.

आत्तापर्यंत आपण शाळकरी मुलांच्या हाती मोबाईल का देऊ नयेत यावर बरेच बोलत होतो. महाविद्यालयांमध्ये तर मोबाईल जॅमर्स लावण्याच्या योजना होत्या आणि काही ठिकाएणी त्या कार्यान्वितही झाल्या होत्या. मात्र आता विद्यार्थ्यांच्या हाती मोबाईल देण्याीिवाय पर्याय नाही.खरोखरच आताही मुले गैरवापर करु

शकतात,अनावश्यक किंवा चुकीच्या साईटस् वर जाऊ शकतात. या काळात हा धोका अधिकच वाढू शकतो. फसवाफसवी,सायबर फ्रॉड्स,आर्थिक फसवणूकींना चालना मिळण्याचा धोकाही उद्‌भवू शकतो.

कदाचित सुरुवातीला मोफत ऑनलाइन शिक्षण देणा—या या कंपन्या नंतर या सेवांसाठी चांगले पैसे मोजून घेऊ लागतील. ऑनलाइन शिक्षण देणा—या या कंपना शुल्कामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांना हे ऑनलाइन शिक्षण परवडणार नाही. त्यामुळे शाळा स्तरावर तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण आणि वर्गातील सत्रांमध्ये घट, या पध्दतीमुळे शालेय शिक्षण धोक्यात येईल आणि त्यामुळे कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलांना शालेय शिक्षाणात अडचणी निर्माण होतील. याचबरोबर प्रत्यक्ष शिकवण्याचा आनंद शिक्षकाला मिळणे आणि समोरासमोर उभ्या असलेल्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांनी नवीन गोष्टी शिकणे या पध्दतीची तुलना करता , ऑनलाइन एज्युकेशनच्या माध्यमातून शिकवण्यात एक प्रकारे कृत्रिमता आणि एक प्रकारचा दुरावा निर्माण होत आहे. आणि त्यामुळे शिक्षणाची परिणामकारकता कमी होणे असे तोटे जाणवत आहेत.

विद्यार्थी हा शिक्षकांच्या किंवा प्राध्यापकांच्या प्रत्यक्ष सहवासातूनही अनेक गोष्टी शिकत असतो. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अनेक गोष्टीशी त्याचा परिचय किंवा बाहेरच्या जगाशी तोंडओळख या माध्यमातून होत असते. ही गोष्ट मात्र ऑनलाइन एज्युकेशानच्या माध्यमातून शक्य होत नाही आहे. इंटरनेटच्या कमी जोडण्या (२०१९मध्ये ३६ टक्के) आणि वापरकर्त्यांमधील सामाजिक दरी यांमुळेही शालेय शिक्षणााची दुरावस्था होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ऑनलाईन परीक्षेसाठी भारतातील महत्त्वाच्या विद्यापीठांनी पावले उचलली आहेत मात्र त्यात येत असलेल्या अडचणींबाबत आपण रोजच वर्तमानपत्रांमधून वाचत आहोत किंवा त्याचा अनुभव सुध्दा घेत आहोत. विद्यापीठांना प्रक्रिया अमलात आणणे कठीण जात आहे. काही ठिकाणी तर महाविद्यालय स्तरावरच अंतिम सत्राच्या पदवी परीक्षाा घेण्यात आल्या आहेत. एकूणच या प्रक्रियेत उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन या विस्तारपूर्वक लिहिलेले प्रश्न तपासून मुलांकन, ही प्रक्रिया शक्य नसल्यामुळे फक्त उ—ब—ु— या पध्दतीची परीक्षा घेतली जात आहे. विद्यार्थ्यांनी काय ज्ञान ग्रहण केले आहे हे केवळ या एका पध्दतीने तपासून मूल्यांकन करणे किंवा त्यांना पदवीदान करणे हे चुकीचे ठरू शकते.

शिक्षकांनीही सगणक, वायरलेस, इंटरनेट किंवा अभ्यासासाठी विशिष्ट ठिकाण या सुविधांशिवाय विद्यार्थ्यांना विद्यादान कसे करता येईल हा प्रश्नच आहे. काळानुसार विद्यार्थ्यांची गरज काय आहे याचा अभ्यास करून, त्या पध्दतीने अभ्यासक्रमाची रचना करावी, असा विचार आता पुढे येऊ लागला आहे.

दूरस्थ शिक्षण म्हणजे फक्त ऑनलाइन शिक्षक असे नाही तर संमिश्र माध्यमातून शिक्षक होय. अशा प्रकारच्या शिक्षणाचे उद्दिष्ट टीव्ही, रेडिओ आणि लघुसंदेश सेवा या माध्यमांतून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे, हे असते. टीव्हीव्दारे मुलांना शिक्षण देण्याच्या प्रक्रियेला पश्चिम बंगालमध्ये सुरुवातदेखील झाली आहे.

सर्वात महत्त्वाचा तोटा म्हणजे शाळकरी मुले काय महाविद्यालयातील विद्यार्थी काय, किंवा मोठमोठ्य परिषदांना उपस्थिती लावणारे प्राध्यापक काय ,फोन किंवा लॅपटॉप च्या माध्यमातून जेव्हा विचारांची अशी देवाण—घेवान किंवा शैक्षणिक आदान—प्रदान चालू असते ,तेव्हा स्वत:च्या फोन मधील कॅमेरा आणि मायक्रोफोन बंद करून ते फक्त उपस्थिती दर्शवू शकतात. काहीही न ऐकता,काही ही ग्रहन न करता सुध्दा उपस्थितीचे प्रमाणपत्र मिळवू शकतात. याचा परिणाम नक्कीच शिक्षणाच्या गुणवत्तेवर होऊ शकतो. या पध्दतीने विद्यार्थ्यांचे सर्वंकष मूल्यमापन होणे शक्य नाही.

खरं तर सरकारने नवीन शैक्षणिक धोरण आखले आहे. आणि त्याच्या अंमलबजावणीस लवकरच सुरुवात होईल. मात्र यात केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा किंवा वाचण्यापेक्षा कृतीशीलतेवर भर दिला जा.ार आहे. प्रत्यक्ष फिल्डमध्ये काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे हे सर्व ऑनलाइन एज्युकेशानच्या माध्यमातून मात्र शक्य नाही. प्रत्यक्ष कृती करण्यासाठी, कृतीतून शिकण्यासाठी विद्यार्थ्यांना फिल्डमध्ये यावे लागेल. स्वत: कृती करून पहावी लागेल. आणि त्यातून शिकावे लागे. यासाठी ऑफलाइन एज्युकेशन हाच पर्याय असू शकणार आहे. शाळकरी वयापासूनच जी इंटर्नशिप विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न न्यू एज्युकेशन पोलिसी मधून केला जाणार आहे ,त्यासाठी सुध्दा ऑनलाइन एज्युकेशान नावाची व्यवस्था उपयोगाची नाही.

अशाप्रकारे ऑनलाईन एज्युकेशानचे काही फायदे आणि काही तोटे सध्या आपल्या दृष्टीपथात आले आहेत. जसजसा काळ पुढे सरकेल आणि परिस्थिती पालटेल तसतसे खरे दृष्य आपल्या दृष्टीपथात यायला

सुरुवात होईल. जर नजीकच्या काळात कोविड–१९ साठी परिपूर्ण औषधी योजना किंवा व्हॅक्सिन विकसित करण्यात यश आले तर संपूर्ण जीवन मूळपदावर येऊ शकेल. मात्र एक गोष्ट निश्चितपणे नमूद करावीशी वाटते की,शाळा महाविद्यालये उघडून पारंपरिक शिक्षण पध्दतीने शिक्षण घेणे शक्य झाले, तरीही ऑनलाइन एज्युकेशान मधून मिळणारे फायदे मात्र शिक्षण व्यवस्थेने सोडता कामा नयेत. ऑनलाइन एज्युकेशनची बहुउपयोगी पध्दतही कायम ठेवावी आणि ब्लेंडेड मेथड किंवा दोन्हीचा समावेश असणारी उत्तम पध्दती विकसित करण्यात यावी असे वाटते.

## निष्कर्ष

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येते Covid-19 च्या काळात ऑनलाइन एज्युकेशान हा एकमेव पर्याय, शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी असू शकतो.

Covid-19 च्या परिणामकारक औषध योजनेनंतरही, जीवन मूळ पदावर आल्यावर देखील ऑनलाइन एज्युकेशनचे बरेच फायदे होण्यासारखे आहेत.

खर्च आणि भौगोलिक अंतर या पार्श्वभूमीवर ऑनलाइन एज्युकेशन केव्हाही ,कोणत्याही काळात फायदेकारक ठरणार आहे. विज्ञान, वाणिज्य किंवा कला अशा शाखांपलीकडे जाऊन कुठल्याही विद्यार्थ्याला कुठल्याही विषयाचे एजुकेशन घेता येण्यासाठी विकसित करण्यात आलेली पोर्टल्स हा शिक्षण क्षेत्राच्या कक्षा रूदांवणारा आहे.

मात्र ऑनलाइन एज्युकेशनचा खर्च वाढू शकतो किंवा हातात नेट मोबाईल सारखी साधने आल्यानंतर विद्यार्थी वर्ग चुकीच्या मार्गाकडे वळू शकतो. त्याचबरोबर प्रत्यक्ष संपर्कातून शिकण्याच्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या वाटेला ऑनलाइन शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून येत नाहीत, हे काही ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे तोटेही असु शकतात.

## संदर्भ

1)https://elearningindustry.com/9-benefits-of-elearning-for-students
2)https://e-student.org/advantages-of-e-learning/
3)https://www.psychologicalscience.org/observer/online-teachingproblems-and-solutions

❖❖❖

# रमेश बुरबुरे यांच्या अप्रकाशित गझला
# आस्वाद आणि आकलन

प्रा. डॉ. सिद्धार्थ भगत
सहयोगी प्राध्यापक, कला वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव, महाराष्ट्र (India)
E-mail: nisin7123@rediffmail.com भ्रमणध्वनी ९८२२७१२३८०

अलीकडच्या काही वर्षामध्ये झालेल्या कविसंमेलन आणि मुशायऱ्यामध्ये रमेश बुरबुरे हे नाव ठळकपणे दिसायचेच. मलाही या नावाचे कुतुहल होते, कौतुकही होते. जुजबी भेटीसाठी आणि बोलणे होत होते. मग मुंबईला गझलवेध संमेलनाच्या निमित्ताने झालेल्या भेटीत त्याने त्याचा पहिला काव्यसंग्रह हाती ठेवला. शीर्षक होते 'अस्वस्थ वर्तमानाचे संदर्भ.' मला माझ्या गझल पुस्तिकेची आठवण झाली. 'अस्वस्थ वर्तमानाच्या नोंदी.' एक समधर्मी गझलकार आपल्या अवतीभवती आहे याचा विलक्षण आनंद झाला. त्याच्या त्या संग्रहातील गझला वाचल्या. दिशा स्पष्ट आहे. पहिलाच संग्रह असल्यामुळे पहिलेपणाच्या खाणाखुणाही आहेत. रमेश मला असा भेटला.

दरम्यान कार्यक्रमाच्या निमित्ताने अधूनमधून त्याची भेट व्हायचीच. एक दिवस अचानक त्याचा फोन. सर नवीन गझलसंग्रह काढतोय, प्रस्तावना पाहिजे. मी हो म्हटले आणि तो पुढील उद्योगाला लागला. काही दिवसातच त्याच्या गझलसंग्रहाचे डीटीपी पार्सल मिळाले. जमेल तसे ते वाचत राहिलो. काही ओळींवर रेंगाळलो, काही भराभर वाचल्या. काही डोक्यात गेल्या आणि काही डोळयातसुध्दा. मध्येच त्याचा फोन. सर, काही ठिकाणी इस्लाहची आवश्यकता आहे असे मला वाटते. म्हटले बघू या! आणि प्रस्तावनेला कशी सुरुवात करावी याचा विचार करीता राहिलो. अचानकच त्याच्या ओळी समोर आल्या—

'घे जरा जयभीम माझा कर नमो बुध्दाय मित्रा
माणसांना जोडण्याचा ना दुजा पर्याय मित्रा'

विद्यमान समाज वास्तवाकडे ढोबळपणे पाहिले तरी लक्षात येते की माणसे आपल्या गटागटात बंदिस्त झालेली आहेत. हे गट जातीचे आहेत, धर्माचे आहेत, पंथाचे आहेत आणि पक्षाचे सुद्धा आहेत. एक दुसऱ्यांवर गरळ ओकणे एवढाच एक कलमी कार्यक्रम बाकी आहे. त्यामुळे माणसे एकमेकांपासून दुरावत चालली आहेत. धार्मिक संवेदना जरा अधिकच तीव्र झाल्या आहेत. याची परिणिती अंधश्रध्दा आणि अंधभक्तीत होते याची जाणीवच कोणाला उरली नाही. परिणामी सारासार विचार करण्याची क्षमताच आपण घालवून बसलो आहोत. द्वेष वाढीला लागला आहे. हिंसाचार, अनाचार यांनी सर्व वातावरण गढूळ झालेले आहे. अशावेळी आपापसातील मैत्रीभाव जपला पाहिजे. जाणीवपूर्वक तो वाढविला पाहिजे. यावाचून दुसरा पर्याय नाही, असे कवीला वाटते. मैत्रीभाव वाढविण्यासाठी जयभीम आणि नमो बुध्दाय अशा शब्दसंहितेचे कवीने केलेले उपयोजन हे विशिष्ट गटासाठी नाही. हे वैश्विक आहे. कारण ते मानवतावादी विचारांना कलेले अभिवादन आहे. हे मात्र वाचकांनी ध्यानात घेतले पाहिजे.

बरेचदा असे होते की आपल्या जीवनविषयक काही भूमिका असतात आणि आपण आपल्या भूमिकांशी प्रामाणिक असतो. परंतु प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमे यांचा रेटा इतका प्रचंड वाढतो की आपणच आपल्याकडे संशयाने बघायला लागतो. आपण घेतलेल्या भूमिकेबद्दल आपणच साशंक होतो. कारण अवतीभोवती जे दिसते ते आणि आपण जे शिकलो ते यांच्यामध्ये प्रचंड तफावत दिसते. आपण गोंधळून जातो. आपले हे असे गोंधळून जाणे सत्ताधाऱ्यांच्या पथ्यावर पडणारे असते. किंबहुना आपला गोंधळ उडावा अशीच त्यांची व्यूहरचना असते. या अशा आवर्तात प्रत्येकच पाऊल आपल्याला जपून टाकायचे असते. खरे तर हे मार्गदर्शन लोकशाहीमध्ये प्रसारमाध्यमांनी करावे अशी अपेक्षा असते. मात्र आता प्रसारमाध्यमांचे रूप आणि स्वरूप आपल्या समोर येते, ते अत्यंत हिडिस आणि ओंगळवाणे आहे. वृत्तपत्रे आणि दूरदर्शन वाहिन्या भाटगिरी करण्यात धन्यता मानत आहेत. चुकीच्या बातम्या देऊन लोकांची दिशाभूल करीत आहेत. सकारात्मक काही दिसेनासे झाले आहे. लोकशाहीचा हा चवथा स्तंभ खिळखिळा तर झालेला आहेच. आता तो ढासळतो की काय, या अवस्थेला येऊन ठेपला आहे.

लोकशाही अंतर्गत हुकूमशाही कशी नांदू शकते, ती कशी राबवली जाऊ शकते याचे आपला देश म्हणजे एक अत्यंत नमुनेदार उदाहरण आहे. अशावेळी प्रसारमाध्यमांनी घेतलेली भूमिका अत्यंत लज्जास्पद आहे. म्हणून तर कवीला म्हणावेसे वाटते–

‘छाप तू छापायचे तर वास्तवाला
बातम्यांना तू नको लाऊ मसाला
आणि
डाग चारित्र्यास नाही त्यांचिया जर
भीत इतके कां असावे लेखकाला **?** ’

प्रसारमाध्यमांनी आपल्या लेखण्यांशी सौदा केलेला असला तरी लेखकवर्गाच्या नाडीचे ठोके अजून जिवंत आहेत. तो सहजासहजी शरण जाणाऱ्यांपैकी नाहीच! जगातली सर्व सरकारे वचकून असतात ती लेखक कवींनाच! त्यांच्या शब्दांची ताकद काय असते याचा प्रत्यय जगातल्या प्रत्येकच सत्ताधाऱ्यांनी कधी ना कधी घेतलेला असतो. एल्गार परिषदेचे उदाहरण ताजे आहे. सचिन माळी सारख्या कवीला नक्षलवादी ठरवून त्याच्यावर खटले भरण्यात आले. हे उदाहरण काय सांगते. लेखणीला सरकार घाबरते! रमेशने ते आपल्या शब्दात अचूक पकडले आहे.

आपल्या देशाची समाजरचना संकीर्ण स्वरुपाची आहे. विविध जाती, धर्म, पंथाचे लोक आपल्याला विविध स्वरूपाच्या जीवन जाणिवांसह; श्रध्दा, निष्ठा यांसह नांदत आहेत. यात आक्षेपार्ह असे काहीच नाही. समस्या तेव्हा निर्माण होते की जेव्हा कालबाहय टाकाऊ विचारांचे अतिक्रमण विज्ञाननिष्ठ विचारांवर होते. प्रकरण हातघाईवर येते. अटीतटीचा संघर्ष होतो. कुणीच माघार घ्यायला तयार नसतो. तेव्हा बुध्दीवादाची कसोटी लागते. बुध्दीवाद तर आपल्याला कायमच हे सांगत आला आहे की–

‘मी भारतीय आधी जाती नि धर्म नंतर
इतके मला कळाले घटनेस वाचल्यावर’

जी बाब कवीला कळते, तुम्हा आम्हाला कां कळू नये **?** की कळून सुध्दा न कळल्याचे हे सोंग आहे. आपल्या दुकानदाऱ्या बंद होण्याची भीती आहे **?**

सामान्य माणसाला उन्मत्त राजकारणाशी काही घेणे देणे नसते. त्याला वेठीला धरुन सत्ता त्याला आपल्या दावणीला बांधू इच्छिते. त्याचा बरेचदा नाइलाज होतो. कालपर्यंत आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या शेजाऱ्यांच्या गळयात गळा आणि सुरात सूर मिळवणे त्याला प्रचंड कठीण वाटू लागते. त्याचे अंतर्मन मात्र सारखे म्हणत राहते–

‘काळजाची कापणी कर
मग धुऱ्याची वाटणी कर’

भाऊबंदकी आपल्याला नवीन नाही. महाभारत कमी अधिक सर्वांनाच माहीत आहे. जीवाला जीव देणारी माणसं कोणत्यातरी भौतिक स्वरूपाच्या कारणाने एकमेकांपासून दुरावतात. हे दुरावणे इतके पराकोटीचे होऊन बसते की मग मने जुळता जुळत नाहीत. त्यासाठी आधीच दक्ष राहून ही काळजी घ्यावी लागेल! मग धुऱ्याची वाटणीही होणार नाही आणि त्यासाठी काळजाची कापणीही करावी लागणार नाही. कवीचा हा आशावाद भाबडा ठरू नये अशी अपेक्षा आहे.

संविधान हा या देशाचा मानबिंदू, प्राणबिंदू! सर्वसामान्य जनतेला सन्मानाने जगता यावे यासाठीचा जागता पहारा. आता संविधानाचे अस्तित्व धोक्यात आल्याचे जाणवायला लागले आहे. मग सर्वसामान्य जनतेने विश्वासाने ज्याच्याकडे बघावे अशी कुठली यंत्रणा, व्यवस्था, आस्थापना या देशात उरली नाही. तरीही संविधानावरचा आपला विश्वास ढळता कामा नये. अन्यथा, आपणही अराजकाचे राजकीय भागीदार होऊ याचे भान आपल्याला असले पाहिजे. कवीकडे ते आहे. म्हणूनच तर तो म्हणतो–

'मीच नाही, चालतो हा देश त्यावर
स्वाक्षरी आहे तुझी ज्या पुस्तकावर'

खरे तर संविधानाव्यतिरिक्तही अनेक पुस्तकांवर बाबासाहेबांची स्वाक्षरी आहे. त्यातील एक जरी ग्रंथ आधारभूत मानून आपल्या राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला तरी आपले कल्याण होऊन जाईल. पण हे होणे नाही. सत्तेला जनता लागते. ती भोळी असावी लागते. ती सुज्ञ झाली तर सत्ता गाजवायची कुणावर आणि कशी ? म्हणून तर लोकांना मूर्ख बनवण्याचे फंडे आणि हथकंडे वेगवेगळया स्वरूपात आपल्या समोर येताहेत. दिशाभूल करण्यासाठी साऱ्या राजकीय यंत्रणा दावणीला बांधल्यागत कार्य करताना दिसतात. सगळीकडे संदिग्धतेचे वातावरण आहे.

'कोण आपुले कोण परके हेच समजत नाही.'

अशी सर्वव्यापी संभ्रमावस्था आहे. या संभ्रमावस्थेतून आपण शक्य तेवढे लवकर बाहेर पडले पाहिजे. तथापि हे वरवर वाटते तेवढे सोपे नाही. बाह्य शत्रुंशी मुकाबला करणे सोपे असते. पण अंतर्गत शत्रू कोण याचा शोध घेऊन त्याच्याशी लढणे महाकठीण कर्म! जगातल्या सर्व लढायांमध्ये किंवा महापुरुषांच्या चळवळीमध्ये फंदफितुरी हा एक घटक आपल्याला कायम भेटत आला आहे. अनेक मोठमोठया चळवळी या फंदफितुरीमुळे गारद झाल्या आहेत. शेकडो उदाहरणे आपल्या अवतीभोवती विखुरलेली आहेत. हे थांबले पाहिजे.

'पेटता दिसता मला दुसऱ्या कुणाची झोपडी
विझविण्यासाठी तिला धावून गेलो पाहिजे.'

या विश्वात्मक भावानेच, विश्वासानेच आपण वावरले पाहिजे. अन्यथा शेजारचे जळते घर आपल्या घरालाही पेटविल्याशिवाय राहणार नाही याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. रमेशच्या गझलांमधून असे विश्वबंधुत्वाचे, मानवतावादाचे विचार झिरपत राहतात. त्याला कारण आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध! या महामानवांचे विचार एकदा आत्मसात केले की कवी मानवी बोलीच बोलतो. तो दुसरे काही बोलूच शकत नाही.

आंबेडकरी विचारधारेवर आधारलेली रमेशची गझल मानवी जीवनातील इतर भावभावनांकडे दुर्लक्ष करते असे मात्र मुळीच नाही. अवतीभवती वावरणारी माणसे, त्यांचे परस्परांशी असणारे साहचर्य, त्यातून निर्माण होणारी राग-लोभादी प्रकरणे, निसर्ग, शेती, माती हे सर्व आपल्या गझलेतून आविष्कृत करण्याचा रमेशने प्रयत्न केला आहे.

'शेत ओलेचिंब झाले आसवाने
कां दिला इतका दगा या पावसाने'

अलीकडच्या काही वर्षांमध्ये विदर्भ प्रदेशात पाण्याचे दुर्भीक्ष तीव्रतेने जाणवायला लागले आहे. शेतीचे अस्तित्व त्यामुळे धोक्यात आले आहे. सिंचनाची व्यवस्था नाही. असली तरी विजेचा लपंडाव. त्यामुळे डोळयादेखत उभे पीक वाळून जात असल्याबद्दलची हतबलता रमेशने अचूक टिपली आहे. तथापि वाच्यार्थाच्या पलीकडेही मानवी दु:खाचे स्वर निनादत असल्याचा प्रत्यय उपरोक्त ओळींमधून येतोच!

'धरावी कास्तकरांच्या मुलांनी लेखणी हाती
तयांच्या फक्त वाटयाला निरे वखरण नको आहे'

कास्तकारीचे आणि कास्तकारांचे दु:ख संवेदनशील मनाच्या कुठल्याही माणसाला चटकन कळते. पण ते तसे अभिव्यक्त करता येईलच याची शाश्वती नसते. म्हणून नांगर, वखराच्या जोडीला लेखणीही हाती घेतली पाहिजे हा गझलकाराचा अट्टाहास अनाठायी नाही. कृषीवलांच्या वाटयाला आलेले जीवन, त्यांचा कर्जबाजारीपणा, त्यातून होणाऱ्या आत्महत्या हे सारे विषय गझलांचे विषय करण्यामागे एका संवेदनशील गझलकाराचे व्याकुळ मन आहे हे पदोपदी जाणवते. उदाहरणे खूप देता येतील. परंतु वानगीदाखल एवढेच.

कवी, लेखक मनाच्या टिपकागदाने जे काय टिपून घेतो ते आपल्या वाङ्मयकृतीतून मांडण्याचा प्रयत्न करतो. हा टिपकागद व्यक्तीपरत्वे भिन्न भिन्न असतो. व्यावहारिक आणि वाङ्मयीन भूमिका घेतल्याशिवाय तुम्हाला तुमचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही. म्हणून भूमिका आवश्यकच. भूमिका असणे आणि भूमिका वठवणे यात फार मोठे अंतर आहे. आपल्या विचारसणीचा एकंदर बाज आपली भूमिका मांडत असतो. रमेश हा असा कलावंत आहे की त्याची भूमिका शोधावी लागत नाही. त्याचा संग्रह चाळला तरी तो काय विचार करतो याचा सहज अंदाज बांधता येतो. बुद्ध, आंबेडकर, सावित्री, जोतीराव आणि मानवतावादाच्या संदर्भात ज्यांच्या स्पष्ट भूमिका आहेत, ते रमेशच्या आदराचे विषय आहेत. त्यांना केवळ अभिवादन करुन चालत नाही. तर बदलत्या सामाजिक परिप्रेक्ष्यामध्ये त्यांच्या विचारांचे उपयोजन कसे करता येईल याची मांडणीही करावी लागते. रमेशने हे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा हा प्रयत्न फलद्रुप होवो या अपेक्षेसह त्याला सुयश चिंतितो!!

## संदर्भ ग्रंथ सूची :–

साधन सूची

१. अस्वस्थ वर्तमानाचे संदर्भ (गझल संग्रह), रमेश बुरबुरे
२. रमेश बुरबुरे यांच्या अप्रकाशित गझला

सहायक सूची

१. उगवतीचे गझलरंग, डॉ.आशा श्रॉफ, पुस्तकश्री प्रकाशन, मुंबई, २०१९
२. गझलायन (ई पुस्तक), संगीता जोशी, ई साहित्य प्रतिष्ठान, २०१९
३. मराठी गझलशास्त्र, सय्यद आसिफ, सय्यद आसिफ प्रकाशन, २०१८
४. छंदोमैल कविता-गझल (ई पुस्तक), संगीता जोशी, ई साहित्य प्रतिष्ठान, २०१९

❖❖❖

# लोकनाट्य : स्वरूप व परंपरा

डॉ. देवमन दत्तुजी कामडी
नवप्रतिभा महाविद्यालय
आयुर्वेदिक ले आउट, मिरची बाजार, नागपूर, महाराष्ट्र (India)
E-mail: dev.kamdi53@gmail.com भ्रमणध्वनी ७६२०१६२०९७, ७७७४८२३६५८

## गोषवारा Abstract :—

लोकनाट्याचा उगम हा 'यातुविधी'तून झालेला असतो. ही विधी प्रामुख्याने निसर्गसंवादी जीवनसरणीतील आदिम अवस्थेशी निगडित असून सृष्टीतील घडामोडीशी तो संबंधित असतो. शेतकऱ्याच्या मेहनतीतून नवीन धान्य येण्याचा आणि वृक्षलतेला फळण्या—फुलण्याच्या सुफलन काळी हा विधी साजरा केला जातो. कष्टाचे दिवस संपल्याने मनावरचा काहीसा ताण हा शेतकऱ्याचा संपलेला असतो, त्यामुळे समूहमनाला मुक्ततेचा, आल्हादाचा आणि समाधानाचा अनुभव येतो. यावेळी अभावग्रस्त संकटाचा काळ संपला असून अनिष्टाचा नाश झालेला असतो आणि इष्ट हंगामाचा काळ आलेला असतो तो म्हणजे सुगीचा. या काळात निसर्गशक्तीविषयी आदर, कृतज्ञता आणि आनंद साजरा करण्याच्या भावनेतून आदिम काळातील समूहाने केलेले सामूहिक यातुविधीच उत्सवरूप व नाट्यरूपाच्या माध्यमाने साजरे केले जाते यातूनच लोकनाट्य प्रसूत झाले.

लोकनाट्याचा उगम हा पुराणकथातून झालेला असून त्यांची वैशिष्ट्ये अभ्यासताना यातुविधी म्हणजे काय? लोकनाट्याचा प्रवास कसा झालेला आहे आणि यातून रंजकता अशी निर्माण होते तसेच या नाट्याला कुठलीही लिखित संहिता नसते हे कळते. लोकनाट्याच्या पूर्वरंग आणि उत्तररंगातून हा प्रकार कसा लोकाभिमुख होत गेला हे प्रत्ययास येते.

## प्रस्तावना :—

लोकपरंपरेवर अथवा धर्मविधीवर अधिष्ठित असलेल्या अव्यावसायिक, अव्यक्तिगत, सामूहिक जानपद नाट्याविष्काराचा निर्देश मुख्यत्वे 'लोकनाट्य' या संज्ञेत केला जातो. या लोकनाट्याचा आविष्कार हा लोकरंगीभूमीवरून जगभर प्रचलित असल्याने त्यात वैविध्य आणि विपुलता असल्याचे आपणास ते आस्वद्याताना दिसून येते. लोकनाट्याचा उगम हा कोणत्या ना कोणत्या 'यातुविधी'तून झालेला असतो. ही विधी प्रामुख्याने निसर्गसंवादी जीवनसरणीतील आदिम अवस्थेतून निर्माण होऊन सृष्टीतील घडामोडीशी संबंधित असते. कृषकाच्या मेहनतीतून नवीन धान्य येण्याचा आणि वृक्षलतेला फळण्या—फुलण्याच्या सुफलन काळी हा विधी साजरा केला जातो. कष्टाचे दिवस संपल्याने मनावरचा काहीसा ताण हा शेतकऱ्याचा संपलेला असतो, त्यामुळे समूहमनाला मुक्ततेचा, आल्हादाचा आणि समाधानाचा अनुभव येतो. यावेळी अभावग्रस्त संकटाचा काळ संपला असून अनिष्टाचा नाश झालेला असतो आणि इष्ट हंगामाचा काळ आलेला असतो तो म्हणजे सुगीचा. या काळात निसर्गशक्तीविषयी आदर, कृतज्ञता आणि आनंद साजरा करण्याच्या भावनेतून आदिम काळातील समूहाने केलेले सामूहिक यातुविधीच उत्सवरूप व नाट्यरूप पावले आणि लोकनाट्य प्रसूत झाले.

जगाच्या दृष्टीने ग्रीक आणि भारत या नाट्योदयाच्या दृश्टीने प्राचीनतम संस्कृती आहेत. तेथील आद्य स्वरूपाची नाटके विधिनाट्येच (रिच्युअल ड्रामा) होती.प्राचीन ग्रीस संस्कृतीमध्ये द्राक्षाच्या सुगीच्या मोसमात डायोनासस ह्या मद्यदेवतेच्या धार्मिक उत्सवात भक्तगण 'डिथिरॅम' नावाची 'वृंदगीते' गात असत. त्यातून ग्रीक नाटक उगम पावले, हेच आद्य लोकनाट्य होय. अशाच धर्तीवर आधारित लोकनाट्ये उगम पावलेली सर्वत्र दिसून येतात. युरोपमध्येही धार्मिक विधिनाट्यातून पारंपरिक लोकनाट्ये आविष्कृत झालेली आहेत. ब्रिटिश बेटांमध्ये 'ममिंग प्ले' किंवा 'सेंट जॉर्ज प्ले' व 'प्लाऊ मंडे प्ले' अशी दोन प्रकारची आदिम लोकनाट्ये प्रचलित होती. 'ममिंग प्ले' हा अंत्यविधीशी तसेच वसंतोत्सवातील सुफलन विधीशी संबंधित नाट्यप्रकार आहे. अनिष्ट ऋतूचा अंत हा आनंददायक इष्ट ऋतूचा प्रारंभ असतो म्हणून हा अंत्यविधी इष्टतेचा सूचक असल्याने ब्रिटनमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर तो सर्वदूर पसरलेला आहे. वेस्ट इंडिजच्या नेव्हिस व सेंट किट्स या बेटांवरही या नाट्याचे प्रयोग होत असल्याचे पुरावे मिळतात.त्यांच्या संहिता या मौखिक परंपरेतून चालत आलेल्या असूनही त्यात सुसूत्रता असे. 'प्लाऊ मंडे प्ले' हा इंग्लिश लोकमहोत्सवात 'ट्वेल्थ नाइट'नंतर येणाऱ्या सोमवारी साजरा करतात. तो ममिंग

किंवा सेंट जॉर्ज प्लेशी जवळीकता साधतो.[१] भारतामध्ये आदिवासी अवस्था संपल्यानंतर जो प्रगतावस्थेचा काळ आला त्यात मनोरंजनाच्या माणसाच्या रूची पालटल्या म्हणून आदिवासी नृत्याऐवजी लोकनाट्य परंपरा अस्तित्वात आली. लोकनाट्य हे ग्रामीण संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. या नाट्याच्या बदलत्या स्वरूपावरून धार्मिकतेचा आणि देवदेवतांचा प्रभाव लोक मनोरंजनासाठी करू लागले. 'रामायण' आणि 'महाभारता'तील कथा लोकनाट्यातून संकरित होऊ लागल्या.

## लोकनाट्य म्हणजे काय? :–

लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीच्या सर्वच अंगोपांगाचा विकास झालेला आहे. लोककथा, लोकगीत, लोकनाट्य या साहित्यातून प्रसूत झाले. लोकनाट्यचा संशोधिक अंगाने विचार केल्यास लोककलेतील नाट्य किंवा लोकांचे नाट्य ते 'लोकनाट्य'असे म्हणणे सयुक्तिक वाटते. जगाच्या पाठीवरची लोकनाट्ये अभ्यासताना आद्य नाट्यरूपे ही देवासुरसंग्रामाच्या नाट्यातून निर्माण झाल्याचे लक्षात येते. आदिम यातुविधी ही आद्य नाट्यरूपे होत. त्यातून लोकनाट्य विकसित झाले. भारतीय परंपरेत यातुशक्तीची जागा लोकदैवतांनी घेतली आणि लोकदैवतांसाठी केले जाणारे विधी व लोकोत्सव यातून लोकनाट्य जन्माला आले आणि विकसित झाले. म्हणूनच आपल्या देशातील लोकनाट्य हे प्राय: धार्मिक बैठकीवर उभे आहे. कोणत्या ना कोणत्या देवतोपासनेचा भाग म्हणून अनेक लोकनाट्यांचे प्रचलन होते. सर्व लोकसाहित्यविधांची निर्मिती ही समूहमनाच्या प्रेरणेतून होते व त्यांचे संगोपन–संवर्धनही समूहमनाच्या प्रेरणेतून होते. सामान्यत: कोणत्याही पारंपरिक नाट्यविधांसाठी 'लोकनाट्य' हा शब्द सैलसर अर्थाने वापरला जातो; परंतु काही भारतीय लोकसाहित्यिकांनी त्याच्या शास्त्रोक्त व लोकपरंपरेच्या पद्धतीने व्याख्या सांगितल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे–

१. लोकसाहित्यातून प्रक्षेपित झालेली व्याख्या :–''लोकांचे लोकांनी केलेले लोकांसाठीचे जाहीर प्रदर्शन म्हणजे लोकनाट्य होय.''[२]

२. प्रा. अ. म. जोशी :– ''लोकनाट्य हा ग्रामीण जनांची नैतिक, भावभावनात्मक आणि रंजनात्मक अशा विविध प्रकारची भूक भागविणारा किंबहुना त्याच्या समग्र आंतर व्यक्तिमत्त्वास व्यापून टाकणारा करमणूक प्रकार होय.''[३]

३. रंगाचार्य :– ''नाटक एकच असले तरी अभिरुचीप्रमाणे त्याचे स्वरूप बदलते. लोकांना आवडते म्हणून ते लोकनाट्य आणि अशा लोकनाट्याचे माध्यम लोकभाषा असते.''[४]

४. ''बहुजनांचे विषय घेऊन बहुजनांच्या मनोनिवेदनासाठी बहुजनांतील काही कलावंतांनी सादर केलेले सहज सुलभ नाट्य म्हणजे लोकनाट्य.''[५]

## संशोधनाची उद्‌दिष्टे :–

१. लोकनाट्याचे स्वरूप कळावे आणि त्याच्या परंपरांचा परिचय होणे.
२. लोकनाट्याचा वाड्मयीन अभ्यास होणे.
३. लोकनाट्यातील सौंदर्य न्याहाळताना भावसौंदर्याचा आस्वाद घेणे.
४. लोकनाट्याची पारंपरिक वैशिष्ट्ये अभ्यासणे.
५. लोकनाट्याविष्कारातील सर्जनशील बाबींचे संशोधन करणे.

## तथ्यसंकलन :–

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता संशोधित संकलन हे विविध ग्रंथ, वर्तमानपत्रांतील लिखित साहित्यातून केलेले आहे.

## गृहीतकृत्ये :–

१. लोकनाट्याचे स्वरूप आणि परंपरेच्या अभ्यासामुळे सद्य:कालीन सामाजिक परिवर्तनात यथोचित बदल होऊ शकतो.

२. लोकनाट्याच्या संशोधनाने या नाट्याचा वर्तमान परिस्थितीत आणि भविष्यकालीन परिस्थितीवर सांस्कृतिक मूल्यमापनाच्या दृष्टीने कसा परिणाम होतो हे अभ्यासता येते.

३. साहित्याच्या अभ्यासाच्या परिघात भाषिक, वाङ्मयीन आणि शैलीशास्त्रीय अंगाने लोकनाट्याचा अभ्यास करता येऊ शकतो.

४. लोकनाट्याच्या अभ्यासाने लोकजीवनावर गतकालीन घटनांचा कोणत्या अवस्थेत कितपत परिणाम आणि विकास झाला हे कळण्यासाठी लोकनाट्य एक साधन ठरू शकते.

## लोकनाट्याची वैशिष्ट्ये:—

लोकनाट्याचा अभ्यास करताना किंवा त्याचा संशोधित आराखडा लक्षात घेता त्याची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आपणास दिसून येतात. ज्यामुळे या प्रकाराची स्वरूप निश्चिती आणि लोकनाट्याची निर्मिती, त्याचे वाङ्मयीन महात्म्य अभ्यासणे फार सोपे जाते. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत —

१. यातुविधी :— मानवी संस्कृतीच्या आदिपर्वातील समूहमन हे यातुश्रद्धेने भारलेले मन होते. विश्वात्मक यातुशक्ती ही विशिष्ट समुहात केंद्रित करण्यासाठी समुहाने केलेले यातुविधी (मॅजिकल राईट) हे नाट्याचे आदिरूप होय. त्यात समुहाचे विधी व व्यक्तीने करावयाचे विधी असे दोन प्रकार पडतात. समूह जेव्हा एखादा विधी करतो; तेव्हा समुहाचे शरीरमन त्याच्याशी पूर्णत: एकात्म पावलेले असते. परंतु कालांतराने समुहात सहभागी होणारे व तो विधी काहीसा तटस्थपणे पाहणारे असे दोन गट पडले की, प्रेक्षक हा विधी करण्यापासून त्याच्या श्रद्धेपासून तेवढ्य प्रमाणात दुरावतो आणि यातुविधीच नाट्यरूपात अवतरतो. काही विधींमध्ये नाट्य (प्रेक्षकसापेक्षत:) प्रबळ होते, तो नाट्यमय विधी होतो. राज्याभिषेक विधी हे नाट्यमय विधीचे उत्तम उदाहरण होय. यातुश्रद्धावस्थेतून देवताविषयक श्रद्धावस्थेत जेव्हा समाज येतो तेव्हा प्रारंभी जे यातुविधी इष्टकामनापूर्तीसाठी होत, त्यांचेच बदलते रूप असलेली विधिनाट्येही इष्टदेवतोपासनेचा भाग म्हणून समुहाच्या कामनापूर्तीसाठी होतात.

२. लोकनाट्याचा प्रवास :— या नाट्यात जसजसा देवताविषयक श्रद्धेचा भाग उणावत जातो आणि प्रेक्षकसापेक्ष दर्शनीय नाट्यात्मक भावनेला प्राधान्य मिळत जाते, तसतसा हा प्रवास विधिनाट्याकडून लोकनाट्याकडे होत जातो. लोकपरंपरेत भूतकाळाच्या खाणाखुणा कधीही नष्ट होत नाही. लोकव्यवहारात कोणत्या ना कोणत्या परंपरेत त्याचे जतन केले जाते. तमाशाचे आजचे रूप हे पूर्णपणे लोकनाट्याचे असले तरी त्याच्या प्रारंभीची गणगौळण किंवा त्यांच्या परंपरेतील कलगी आणि तुरा हे संप्रदाय या काही खुणा तमाशाची मुळेही कधी काळी धर्मश्रद्धेत रुजलेली असल्याची साक्ष देतात. या प्रक्रियेने लोकनाट्य धार्मिक बैठकीवर उभे असते. मात्र क्रमाने त्यातील धार्मिकता, श्रद्धाभाव उणावत जातो व नाट्यात्मक भान विकसित होते.

३. रंजकता :— लोकनाट्याची सुरुवात जरी धार्मिक विधीने होत असली तरी त्या विधीतील नाट्यात्मक भागाने रंजनही होत असते. यातील श्रद्धा जसजशी उणावते तसतशी रंजकता विकसित होत जाते. यातील पात्रांची रंगभूषा भडक व अधिक उग्र असते. मंद उजेडात ती अधिक उठून दिसते. काही ठिकाणी रंगभूषेऐवजी लाल व काळा रंग विशेषत्वाने वापरला जातो. देवांसाठी निळा व गुलाबी हे रंग वापरले जातात. राक्षस पात्रे उग्र व आक्राळविक्राळ दाखवतात. दशावतारी नाटकाचा शेवट देव—दानव युद्धाने होतो. या सर्व प्रसंगांतून पाहणाऱ्यांचे रंजन होते.

४. लोकनाट्याची संहिता लिखित नसते :— लोकनाट्याचे स्वरूप हे मौखिक, परंपरागत असते. बहुप्रचलित पुराणकथांचे साचे त्यात ठरलेले असतात. त्यातील कथासूत्रांची गीते मात्र पारंपरिक असतात व ती बहुतेकांची पाठ असतात. तरी बहुधा सूत्रधार ती गीते गातो व बाकीची पात्रे उत्स्फूर्तपणे, समयसूचकतेने प्रसंगाला अनुरूप असे संवाद बोलतात. पात्रांचे चातुर्य व वक्तृत्व यांना त्यात भरपूर वाव असतो. सर्वच प्रकारची मुक्तता व लवचिकता हे एकूणच लोककलांचे वैशिष्ट्ये लोकनाट्यात विशेषत्वाने आढळते.

लोकनाट्यांनी कितीतरी वर्षे ग्रामीण सर्वसामान्य समाजावर आपले प्रभुत्व गाजविले. त्यांना जगण्याची नवी शिकवण दिली, नीतिमूल्ये दिली, त्यांच्या प्रबोधनासोबतच त्यांचे रंजन केले, त्यामुळे आतापर्यंत या लोकनाट्याचा प्रभाव समाजावर कसा होता हे वरील वैशिष्ट्यांवरून आपणास दिसून येते.

लोकनाट्याचा चिकित्सक अभ्यास करताना स्थूलमानाने त्याचे दोन भाग आहेत पूर्वरंग आणि उत्तररंग. या दोन्हीही भागांचा विचार पुढीलप्रमाणे करता येतो.

## लोकनाट्यातील पूर्वरंग :—

यातील पूर्वरंग हा धार्मिकतेशी निगडित अशा विधीशी कमी अधिक प्रमाणात संबंद्ध असतो. भरताच्या नाट्यशास्त्रातील पूर्वरंगातील नांदीविधी हा नाट्यांतर्गत आनुष्ठानिक आदिम श्रद्धेचेच विकसित व शास्त्रशुद्ध केलेले रूप आहे. त्या अशुभ निवारण्यासाठी अनिष्ट देवता, समुद्र, वृक्ष इत्यादींसारखे निसर्गतत्त्वे या सर्वांसाठी प्रार्थना केल्या आहेत. भारतातील बहुतेक लोकनाट्यांच्या प्रारंभी गणपती (क्वचित शिवशंकर), सरस्वती, इष्ट ग्रामदेवता, पंचमहाभूते, लौकिक जीवनातील आदरणीय व्याक्ती (उदा., कोकणात गावचा खोत इ) यांचे स्तवन होते. पूर्वरंगातच विदूशकदृश्य पात्रे हास्यनिर्मितीसाठी हमखास अवतरतात. तसेच लोकजीवनात एरवी जाचक ठरणाऱ्या सत्ताधारी समाजकंटकांना हास्यकारण बनविले जाते. व त्यांची खिल्ली उडवली जाते. दशावतार, लळित यासारख्या प्रकारात धर्मसत्ता राबवणारा भटजी—पुरोहित—वर्ग व अर्थसत्ता राबवणारा गावाचा पाटील, सावकार वर्ग अशी पात्रे हास्यकारक रूपांत दाखविली जातात. लोकमनातील या संस्थाविषयीच्या असंतोषाला अशा प्रसंगातून वाट मिळते व लोकभवनांचे विरेचन होते. पूर्वरंग धर्मानुष्ठानाच्या गांभीर्याने सुरू होतो आणि हास्यनिर्मितीचे समूहमन भानमुक्त करीत संपतो. आता प्रेक्षक मुक्त मनाने नाट्यास्वादाकडे वळण्यास सिद्ध होतो व पूर्वरंग संपतो.

## लोकनाट्याचा उत्तररंग :—

पूर्वरंग संपल्यावर आरती हाते व रंजनाचा उत्तरार्ध सुरू होतो. त्यात इष्टदेवतेचे लीळाचरित्राख्यान किंवा पुराणातील एखादे आख्यान समूह उत्स्फूर्तपणे सादर करतो. रामायण, महाभारत यांतील कथा अधिक लोकप्रिय असतात. कथाभाग सर्वज्ञात असतो व तो परंपरेने सिद्धझालेल्या गीतांतून सादर होतो. पारंपरिक गायक व वादक साथीला असतात. विविध भागांत विशिष्ट जमाती लोककलावंत म्हणून पिढ्यान्पिढ्या ही कामे करतात. कोकणातील दशावतारी बहुधा गुरव व तिलोरी कुणबी आहेत, तर सिन्नर भागात बोहाडा करणारे शिंपी आहेत. तमाशातील नृत्यपरंपरा कोल्हाटी जमातीतील स्त्रियांनी चालवली आहे, तर गायक—वादक म्हणून पूर्वास्पृश्य महार, मांग जमातींनी कौशल्य प्रकट केले आहे. अलीकडे पुराणकथांचे प्रचलन मागे पडले असून ऐतिहासिक व सामाजिक कथा अनेक लोकनाट्ये सादर करतात. तमाशातील कथाभाग वग म्हणून ओळखला जातो. नृत्य, गायन, वादन व कथाभागाला उचित अशा उत्स्फूर्त गद्य संवादांतून कथानक सादर होते. प्रेक्षकांची इच्छा व स्थलकाल यांना अनुसरून कथेचे संवाद व सादरीकरण अत्यंत लवचिकपणे होते. पौराणिक कथेतील पात्रांना लोककलावंत आपल्या प्रतिभेने व उत्स्फूर्त वक्तृत्वशैलीने लौकिक जीवनातील रंगात रंगवतात. लौकिक—अलौकिकाच्या सीमारेषेवर लाकनाट्य रेंगाळत असते, अशारीतीने नोकनाट्यातील उत्तररंग वैविध्याने कलावंत सादर करीत असतात.

## निष्कर्ष :—

आपल्या देशात प्रादेशिक संस्कृतीची वैशिष्ट्ये दर्शविणारी विविध लोकनाट्ये रूढ आहेत. महाराष्ट्रातील तमाशा, दशावतारी नाटके, बोहाडा या लोकनाट्यांप्रमाणेच कर्नाटकातील यक्षगान, गुजरात व राजस्थानमधी भवाई, बंगाली जात्न इत्यादी आपल्या विशिष्ट वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहेत; परंतु दिवसेंदिवस लोकनाट्याचे स्वरूप बदलत आहे. त्यातील धार्मिकतेचा संकोच होत आहे. शेतकऱ्यांच्या जीवनसरणीतून आधुनिक विकासाची जी वाटचाल होत आहे ती भयावह आहे. कारण पारंपरिक धर्मविधीयुक्त लोकनाट्य नष्ट होऊन त्याजागी भ्रामकता, बीभत्सता आणि ग्राम्यतेची जी रेलचेल होत आहे ती संस्कृतीचे वाभाडे काढणारी आहे. तरीही या नाट्यातील उत्स्फूर्तता, आवेग, आवाहकता, नृत्य, वाद्य व संगीत या स्थायी कलागुणांच्या परंपरेच्या प्रभावामुळे लोकनाट्याची परंपरा चालू राहिली आहे, हे सत्यही नाकारता येत नाही.

## संदर्भ टीपा :—

१. 'लोकसाहित्य', संदर्भ क्लासेस, पुणे, पृ. क्र. ७८
२. 'लोकनाट्य : दशा आणि दिशा', संपादक, डॉ. मधुकर नंदनवार, सर साहित्य केंद्र, नागपूर, पृ. क्र. ७४
३. तत्रैव, पृ. क्र. ७७
४. तत्रैव, पृ. क्र. १०२
५. तत्रैव, पृ. क्र. १४२

## संदर्भग्रंथ सूची :—


१. साहेब खंदारे, 'लोकसाहित्य : शब्द आणि प्रयोग', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.
२. डॉ. तारा भवाळकर, 'लोकपरंपरा आणि स्त्रीप्रतिभा', लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई
३. डॉ. पुरुषोत्तम कालभूत, 'लोकसाहित्य : स्वरूप आणि विवेचन' विजय प्रकाशन, नागपूर
४. डॉ. प्रभाकर मांडे, 'लोकरंगभूमी' मधुराज प्रकाशन, पुणे
५. वि. कृ. जोशी, 'लोकनाट्याची परंपरा'
६. डॉ. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, १९७८
७. मेरजे गंगाधर, 'लोकसाहित्य : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र' दस्ताने रामचंद आणि कंपनी, पुणे, १९९३
८. डॉ. पुरुषोत्तम कालभूत, 'लोकनाट्य उद्‌गम आणि विकास' विजय प्रकाशन नागपूर, १९९९
९. डॉ. शैलजा देवगावकर, 'महाराष्ट्रातील आदिवासींचे लोक साहित्य', साईनाथ प्रकाशन, नागपूर


❖❖❖

# दलित कविता – कवी नारायण सुर्वे

प्रा. रेखा व्ही. इंगोले
मराठी विभाग प्रमुख
मा.सु.पा.कला,विज्ञान व कै.पां.ठा. वाणिज्य महाविद्यालय,मानोरा, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
E-mail: rekhaingole02@gmail.com भ्रमणध्वनी ९४०४५४७२७८

## गोषवारा Abstract :

सर्वे हे एक जेष्ठ कवी आहेत त्यांचा 'जाहीरनामा' आजच्या नावाने आमच्या दलित–शोषितांच्या दु:खाच्या नावाने पुकारला जात आहे. त्यांच्या काव्याची वैशिष्टये अशी

१) हा विद्रोहीमत्त्वाचा कवी आजच्या परिवर्तनकारी युगाचीच भाषा बोलतो. म्हणून व्यक्तीच्या सुख दु:खाचे कढ व उमाळे सुर्वे समष्टीशी जोडतात.

२) त्यांच्या कवितेचे केंद्र 'माणूस' आहे आणि मुख्यत: माणसाच्या 'भुके'शी तिचे घट्ट नाते आहे. आर्थिक शोषणाविरुध्द लढ्याची भाषा वापरुन संघर्षाची ती प्रेरणा देते.

३) जीवनाची व्यापकता व सखोलता प्रत्ययकारीपणे पण स्वाभाविक रीतीने कवितेतून आविष्कृत होते. चीड विद्रोहाबरोबरच व्यापक प्रेमभावनेचा आविष्कार व दु:खदर्शन घडविणारी समर्थ कविता.

४) त्यांची अभिव्यक्ती ही अधिक प्रांजळ नि प्रामाणिक आहे. ती समाजपरिवर्तनाची प्रेरणा देते. ती आजच्या युगाची व नव्या मनोधर्माची कविता आहे.

थोडक्यात, कामगार जीवनाप्रमाणेच जनसामान्यांचे अनुभव नारायण सुर्वे आपल्या कवितेतून प्रत्ययपूर्वक मांडतात. त्यांचे लेखन वैविध्यपूर्ण व अनुभवसंपन्न असते.

## प्रस्तावना :

दलित जीवनाचे साहित्य वा दलित वाङमय हा मराठी वाङ्.मयाचा अत्याधुनिक व अपूर्व असा नवा अविष्कार आहे. समाजसुधारणेच्या बाबतीत ज्याप्रमाणे दलित दृष्टीकोण व दलितेतर दृष्टीकोण यात अंतर पडत असल्याचे आपण पाहतो. त्याच प्रमाणे प्रस्थापित मराठी साहित्य आणि मराठी दलित साहित्य हे दोन वाङमय प्रवाह सुध्दा मुळात एक नसून वृत्ती–प्रकृतीने, दृष्टीने व जाणिवेने परस्पर भिन्न असलेल्याचे दिसून येईल.

जीवनदृष्टी स्पष्ट व्हावी म्हणून आजच्या दलित साहित्याच्या उद्‌गमनापूर्वी 'दलित' विषयक जाणिव अर्वाचीन मराठी वाङ्.मयामध्ये प्रगट झालेली आहे. वाङमयाचे अंत:स्वरुप सांगताना प्रा.ग.बा.सरदार म्हणतात' वाङमयाचा मुख्य विषय मानवी जीवन हा आहे. मनुष्यांच्या मूलभूत प्रेरणा व त्यांच्या परिपूर्तीसाठी चाललेली त्याची धडपड विशिष्ट परिस्थितीमध्ये त्याच्या नैसर्गिक शक्तीचा होणारा विकास अथवा कोंडमारा सामाजिक संबंधाची रुपे आणि त्यातील जिव्हाळा व तणाव सहकार्य व संघर्ष, विचार व विकार आत्मप्रत्यय व अगतिकता इत्यादी व्दंव्दे हे विषय या ना त्या स्वरुपात साहित्यात येतात त्या बरोबरच सृष्टीचे सत्य स्वरुप जाणून घेण्याची व ते प्रगट करण्याची क्षमता साहित्यात आढळते.

## दलित साहित्याचे प्रथम स्फूरण – दलित काव्य :

माणूस शोधणाऱ्या कोणत्याही वाङमयातील ललित शाखेचे साहित्यबीज हे सर्वप्रथम स्वतंत्र नि सृजनशील अंत:करणाच्या काव्यभूमीत लवकर रुजते. तिथेच ते पहिल्यांदा अंकुरते. प्रा.रा.ग.जाधव लिहितात, ''दलित साहित्याचा जन्म स्वातंत्र्याच्या गर्भातून झाला. तीव्र भावना, उत्कट जाणिवा या नेहमीच काव्य–भाषेतून प्रथम व्यक्त होतात. आणि स्वातंत्र्याच्या जाणिवेइतकी तीव्रोत्कट जाणीव दुसरी कोणती असू शकते? दलितांना ज्यावेळी पुरातन काळापासूनच्या प्रखर परतंत्रतेची तीव्र कल्पना आली नि त्या परतंत्रतेचा नि:पात करण्याची अनावर पण न्याय्य आकांक्षा स्फुरली, त्यावेळी पाहिला उद्‌गार काव्य–भाषेतूनच उमटला.

मराठी काव्य क्षेत्रात अलीकडे एकच खळबळ निर्माण करणारी दलित कविता म्हणजे सनातन प्रवृत्तीच्या दंभ, अहंकार आणि आत्मगौरव पोसणाऱ्या सदाशिवपेठी मराठी साहित्याला एक आव्हान आहे. प्रस्थापित मराठी

भाषेचे जुने बंध आणि सर्व झिरझिरीत आकृतिवेष्टनेच दलित कवितेने दूर सारले. साहित्यनिर्मितीला एक नवा तोंडवळा, वेगळी आशयघनता आणि अभिव्यक्तीचे निराळे स्वरुप आणून आपले एक नवे नि स्वतंत्र विश्व निर्माण केले. तिची ही निरलस स्वतंत्र व पूर्ण मुक्त अभिव्यक्ती, हे दलित साहित्याचे वैशिष्टय आहे.

आधुनिक मराठी काव्य–क्षेत्रातील पहिले क्रांतीकारी कवी केशवसुत व दुसऱ्या टप्प्यावरील नवकाव्याचे प्रवर्तक मर्ढेकर या दोन प्रभावी कळणानंतर १९६० नंतरच्या मराठी कवितेने दलित काव्याच्या रुपाने तिसरे आणि नवे वळण घेतले. मराठी कवितेला असे तिसरे वळण देणाऱ्या मानकऱ्यांपैकी महत्त्वाचे कवी म्हणून श्री नारायण गंगाराम सुर्वे येतात. सुर्व्यांच्या काव्यनिष्ठा सामाजिक संदर्भात 'दलित' जाणिवांच्या अपेक्षेत काहीशा वेगळया मानल्या जातात. पण त्यांच्या कवितेचे केंद्र 'माणूस' हेच आहे. माणसाविषयीची त्यांची जाण सखोल व जीवनस्पर्शी आहे, हे त्यांच्या भूमिकेवरुन स्पष्ट होते. 'कविता आणि मी' या निबंधात ते म्हणतात, ''माणसाविषयी आणि माणसासाठीच लिहिणारे आपण आहोत, ही भूमिका मी कधीही विसरत नाही. ह्या कोट्यावधी लोकांपासून स्वत:ची नाळ कापून मी अलग होऊ इच्छित नाही. हेच लोक माझ्या रचनेचे विषय आहेत. स्वत: जगताना जे बरेवाईट अनुभव येतात, त्यांचा सजीव आविष्कार, त्यातील संघर्ष, वैश्विक अनुभव ह्यांचे जर जिवंत, कलात्मक आणि यथार्थपणे मी माझ्या कवितेमध्ये केले आहे. असा पुरोगामी दृष्टीकोण, विद्रोहाची जाणीव व समष्टीची चेतना सुर्व्यांच्या कवितेत ठासून भरली असल्यानेच त्यांची कविता दलित अनुभूतीशी निगडित आहे. ती सहकंपन व सहजाणीव ठेवून प्रवास करणारी, आजची सक्षम व भक्कम पाया असलेली कविता म्हणून ओळखली जाते. नारायण सुर्वे हे मराठी कवितेच्या तिसऱ्या वळणावरील दलित काव्याच्या प्रारंभीचे जेष्ठ कवी म्हणून एक प्रवाहवाहक समजले जातात.

''ऐसा गा मी ब्रम्ह'' (१९६२), ''माझे विद्यापीठ'' (१९६६), ''जाहीरनामा'' (१९७५), ''सनद'' (१९८२) या काव्य संग्रहांनी केलेल्या क्रांतीयुध्दाने १९६० नंतरच्या कवितेच्या नव्या युगाची नांदी लावली.

सुर्वे यांची कविता म्हणजे त्यांचा तळस्पर्शी अनुभव आहे. एक दलित स्तरातील कुटुंबातच त्यांचा जन्म झाला असल्यामुळे त्या जीवनाची 'भूक' त्यांनी तळमळीने व्यक्त केली आहे. सामाजिक विषमता त्यांनाही होरपळते आहे. समाजामधील सगळी दैन्य–दुरवस्था विद्रोहाच्या उढाऊ ताकदीने त्यांच्या कवितेत प्रगटली आहे, ते लिहितात कवी हा कोणी अवचित आकाशातून तुटलेला तारा नाही. त्याच्या भोवतालची परिस्थिती, त्याचे संस्कार, त्याची आंतरिक घालमेल ह्या गोष्टीही खुपशा प्रमाणात कारणाभूत असतात.

नारायण सुर्वेच्या कवितेचा जन्म असा त्यांच्या जगण्यातून झाला आहे. दारिद्रय भूक, उपदेश–अपमान छळ सहन करीत गेल्यामुळे शेवटी दु:खाचेच अस्तित्व साकारत पुढे येते. 'माझी आई' या कवितेतून ते वाचकांचे अंत:करण असे हलवून सोडतात.

'त्याच रात्री आम्ही पांचांनी । एकमेकांस बिलगुनी
आईची मायाच समजून । घेतली चादर ओढून
आधीचे नव्हतेच काही । आता आई देखील नाही
अश्रूंना घालीत अडसर । जागत होतो रात्रभर'७

कविने हे सर्व दु:ख अंतरी साठवून जपून ठेवले आहे. कवी आशावादी असल्यामूळे आपल्या या वेदनेतच नवनिर्माणाचे क्षितीज रुंदावलेले पाहतो.

'आज माझ्या वेदनेला अर्थ नवा येत आहे
आणि मेघांच्या डफावर थाप बिजली देत आहे.
आज मरण आपुल्याच मरणाला भीत आहे
आज माझ्या कोरडया गा स्वप्नात आग येत आहे
आणि नव्या सृजनाचे क्षितीज रुंद होत आहे'९

दु:खव्यथेच्या शब्दात अंगार ओतणारा हा कवी 'अमुची दुनियाच निराळी' असल्याची जाणीव सतत जागी ठेवतो. आणि आपल्या निराळया दुनियेचा हुंकार विश्ववेदनेच्या सुरांशी बेमालूमपणे जोडून देतो. तो सर्व निसर्गशक्तीत ह्या नव्या विश्वाचा कविला सांज सकाळ येणारा अनुभूतीप्रत्यय असतो. या कविच्या नव्या मानवी विश्वात त्याला कपोलकल्पीत असे दुसरे काहीच दिसत नाही. कवी म्हणतो –

' बोंब मारुन बोलवावा असा स्वर्ग आहेच कुठे?
ज्यासाठी आमचे आतडे तिळतिळ तुटत होते

...उठ! तेवढी ती कोपऱ्यातली तलवार शोधून ठेव
एकेकाळी तिच्यावर मी माझे नशीब घासले होते'१०

या कवितेतील 'तलवार' विध्वंसाचे वा रक्तपाताचे साधन नसून शुरत्वाचे बंड प्रवृत्तीचे 'प्रतीक' आहे. आणि तो शब्द इथे प्रत्ययकारी घेवून आलेला आहे.

'पंख फुटणारे आपले अस्तित्व हे एक सत्य' पाहतांना 'सर्वांसाठी आपण' अशी समूहभावना कवी व्यक्त करतो. नवी समाजरचना आणण्याचे कविचे स्वप्न आहे. ते साकारण्यासाठी मधल्या अडसरांना नाकारणे ही त्यांची भूमिका आहे.

'इथल्या वस्त्यांना हुंगणारा केवळ कातळाचा काळोख
कंदील खोपटास खोवून वावरु नये, तर काय करावे?...
जंना जन्मभर दु:ख, दैन्य, दारिद्रयच मिळाले असेल
त्यांनी तपशीलासह सर्वच नाकारु नये, तर काय करावे?'११

या रुढीपरंपरागत धार्मिक, दैविक संस्कृतीत भयावह व मूल्यहीन आयुष्य जगणाऱ्या माणसांचा विचार कवीला अस्वस्थ करतो, परंतु तो निराश न होता नव्या उमेदीने संघर्षाच्या धुमाळीतच सामील व्हायचा कवी येथे निश्चय करतो. 'माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय' नोंदवतो तो असा –

'जर कधीकाळी अस्वस्थसे आम्ही
देहाच्या वाती वळून, प्रज्वलीत करुन...
एका नव्या क्रांतीकडे, नव्या प्रकाशाकडे
आमचे घोडे उधळले, तर हे देशा
कृतघ्नतेचे आरोप आमच्यावर करु नकोस
तुझ्या आकाशतील आम्हीही तारे आहोत
हे विसरु नकोस'१२

नारायण सुर्वे यांच्या कवितेला एक विशिष्ट भूमिका आहे त्यांचा आपला एक दृष्टीकोण वा जीवनदृष्टी आहे आणि सामाजिक जाणिवेच्या परिबंधाचे भानही ते कधी सोडत नाहीत आपल्या अभिव्यक्तीमधून जीवनदृष्टीला अनुषंगिक अशा ठोस स्वरुपाच्या प्रतिमा ते वापरतात. 'भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली' (दोन दिवस) 'मेघांच्या डफावर थाप बिजली देत आहे' (क्षितीज रुंद होत आहे), 'कधी विचार असे येतात जसे थकून यावेत तिसऱ्या पाळीचे कामगार घरात' (विचार), या प्रतिभा त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात.

## संदर्भ ग्रंथसूची :


१) दलित साहित्य उद्‌गम आणि विकास – श्री मंगेश प्रकाशन डॉ.योगेंद्र मश्राम
२) कविता आणि मी जाहीरनामा – नारायण सुर्वे पाप्युलर प्रकाशन मुंबई (१९७५)
३) नारायण सुर्वे – उक्त
४) 'ऐसा गा मी ब्रम्ह' – नारायण सुर्वे (पॉ.प्र.मु.१९६२)
५) 'माझे विद्यापीठ – नारायण सुर्वे (पॉ.प्र.मु.१९६६)
६) 'दलित कविता' अस्मितादर्श – डॉ.म.सु. पाटील


❖❖❖

# श्री गुलाबराव महाराजांची स्त्रीगीते : चिकित्सा

डॉ. संजय नीळकंठ पाटील
प्राध्यापक व विभाग प्रमुख,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ७८८७९६३११८

## गोषवारा Abstract :—

संत गुलाबराव महाराज म्हणजे विसाव्या शतकातील एक आश्चर्यच. अवघ्या चवतीस वर्षांच्या अल्प आयुष्यामध्ये त्यांनी बालांध असतांना वैविध्यपुर्ण अशा स्वरुपाची साहित्यनिर्मिती केली. त्यामध्ये सूत्र, भाष्य, शास्त्र, आकर, भक्ती, योग, सांख्य, संगीत, आयुर्वेद, प्रकरण, गाथा, निबंध, संवाद, चरित्र, पत्रव्यवहार, लोकगीते, स्त्रोत्र, नाटक, भाषा, क्रिडाविषयक रचनांचा समावेश आहे. प्रस्तुत निबंधामध्ये त्यांच्या लोकसाहित्याच्या स्वरुपातील स्त्रीगीतांची वैशिष्टये जाणून घ्यायची आहेत.

**बीजशब्द** :— गुरुपादसेवा, शय्यागाणी, बालरक्षा, कौशल्यावचन, द्धष्णावताराची, झोपाळ्यावर, परमार्थाची तळमळ, स्त्रीसुलभ भावना

## प्रस्तावना :—

श्री गुलाबराव महाराजांनी वर म्हटल्याप्रमाणे वैविध्यपूर्ण साहित्यरचना केली. यामध्ये स्त्रीगीते ही लोकसाहित्याच्या स्वरुपाची रचना त्यांनी केलेली आहे. ही गीते मोठी वैशिष्ट्यपूर्ण अशी दिसून येतात.

तुंबडीप्रमाणे महाराजांनी स्त्रीगीते हाही प्रकार यशस्वीरितीने हाताळला आहे. लोकपरंपरेत स्त्रीगीते सर्वत्र आढळतात. त्यामधून स्त्रीजीवनाचे भावरम्य दर्शनही होते. लोकगीतांत स्त्रीगीते हा एक स्वतंत्र व कौटुंबिक भावनेचा भाग दिसून येतो. पण श्रीकृष्णभक्तीची जोड असलेली ही कौटुंबिक प्रसंगावरील गाणी संताच्या मनोभूमिकेचे मधूर दर्शन घडवितात.

महाराजांनी पदाच्या गाथेमध्ये स्त्रीगीते ह्या शीर्षकाखाली एक प्रदीर्घ रचना दिली आहे. त्यात काही वेगवेगळे भाग आहेत जसे की, स्त्री गीते या सदरात ३४ ओव्या आहेत. तर शय्यागाणी या शिर्षकाखाली ६ ओव्या बालरक्षा म्हणून ११ ओव्या आलेल्या आहेत. जेवणाच्या वेळची ओवीरचना तसेच कौशल्यावचन या शीर्षकाखाली आलेल्या ओवीरचना वेगळ्याच आहेत.

स्त्रीगीतांतर्गत ज्या ३४ ओव्या आलेल्या आहेत त्यामध्ये महाराज म्हणतात— मेघश्याम तनु असलेला माझा प्राणनाथ मिळविण्यासाठी थोडी गुरुपादसेवा आवश्यक आहे. मी आज त्या प्राणनाथाची दासी झालेली आहे. त्यामुळे कोटी जन्मांच्या काशी तीर्थाच्या सेवेची अनुभूती मला आली. संतांच्या संगतीने पाषाण जर मुक्त झाले तेथे माणसाची काय कथा आहे? संतांच्या संगतीमुळे तरला नाही असे एकही उदाहरण नाही. माझा प्रियकर सखा परमेश्वर हा अखंड निर्विकार असून माझ्यासारख्या दीनांचे रक्षण करण्यासाठी मात्र तो विकारी वाटतो. स्वयंमवरामध्ये त्या कृष्णाला वरुन मी ह्या विश्वाचे मातृत्व निभविण्यासाठी म्हणून लोकांमध्ये आले. पहिल्यांदा न्हाण आल्यानंतर श्रीकृष्ण हा घडीताचा (सृष्टीनिर्मितीचा) खेळ खेळायला लागला. पहिल्यांदा मी गर्भवती राहिली. स्वानंदरुप माझ्या पोटी ह्या विाचा जन्म झाला.

निर्मल अशा त्या देवाला चौरंगावर बसवून त्याला उटणे लावले. असा हा माझा कृष्णनाथ मूळचाच ब्रह्मचारी, परंतु तुम्ही सर्व स्त्रीया त्याचे गाऱ्हाणे करत आहात. तुमचा हा बाळ तुम्हाला गोड वाटो आणि तुमची कामेच्छा पूर्ण होवो. तुम्ही सर्व स्त्रीया धांगड्या (कामूक स्त्रीया) असून तुमचे नेहमी त्याप्रकारचे चाळे चाललेले असतात. एरव्ही माझा बाळ पाचच वर्षाचा आहे. हा नंदनंदन माझ्या मनामध्ये सतत बसावा. तोच माझा सुखसंपन्न असा स्वामी असून त्याच्याशिवाय मला अन्य कोणीही नाही. आपल्या नावाच्या ब्रिदासाठी हा यशोदेचा बाळ भक्तांच्या दारोदारी हिंडत असतो त्याच्यासाठी सर्व नरनारी हे समसमान आहेत. ह्या भक्त काजासाठी त्याने आपला कौस्तुभमणी बाजूला सारुन ह्या गोकुळामध्ये गुंजाच्या माळा परिधान केलेल्या असुन यामध्ये त्याला लाज वाटत नाही. असा माझा कृष्ण तान्हा भक्तांच्या प्रेमाचा भुकेला आहे. म्हणुनच तर आपला क्षीरसागर सोडून तो गोकुळामध्ये राहतो. तो मोकळा आहे तुम्ही जर तशाप्रकारचा भाव दाखविला तर तो तुम्हा सर्वांना मुक्त करेल. कारण बंधन हे

तुम्हीच स्वीकारलेले आहे. सुरुवातीला तो जरी साहुसारखा वाटला तरी तो दह्याची चोरी करतो. यशोदा ह्या गोपींना म्हणते की तुम्हीच दही खाऊन त्याचे तोंड माखून टाकता. यापेक्षा तर तुम्ही हे गोकुळ सोडून इतरत्र सुखाने जावे. तुम्ही अशा रागावू नका. प्रत्यक्ष डोळ्यांनी त्याच्या खोड्या बघा आणि मगच त्याची तक्रार करा. तो तर केवळ प्रेमाचा भुकेला आहे. तुम्ही उगाच खोटा आळ त्याच्यावर घेता. त्यांची पुन्हा तक्रार अशी की हा रात्रीला खडे मारुन सर्व लोकांना जागे करतो. यावर यशोदा म्हणते की, तुम्ही विनाकारण माझ्या बाळाला बोलू नका. आपापल्या घरी निघून जा. सर्व मुनिजन स्तुती करतात तो मात्र आम्हाला फुकट मिळालेला आहे. सर्व वेद ह्याची कीर्ती गातात म्हणून खोडकर ठरवून ह्याला कोणीही टाळू शकणार नाही. उनाड असला तरी तो माझा मला असून तुम्ही दारी अजिबात पाय टाकू नये. माझ्या बाळाला दूध पाजण्यासाठी गाय ही हंबरत आली आहे. कोणत्या तरी सवतीमुळे मला झोप सुध्दा नाही. माझा बाळसुध्दा दूध पेईनासा झाला आणि सुकला आहे. माझ्या कृष्णासाठी मी गळनाडे टोचीन, शिवदीक्षा घेऊन त्याच्यासाठी रामरक्षा आणेल. तुझी आई म्हणताना मला लाज वाटते. कंसाला मारुन तू जगावर उपकार केलेस. मी मात्र एकटी दु:खी आहे. सर्व जगाला कृपावंत आणि मातेप्रती निष्ठूर असा दुसरा मी कोणीही पाहिला नाही. अशाप्रकारचे आजचे कृष्णगीत ऐकून परमेश्वराने तृप्त व्हावे, असे महाराज म्हणतात. यामधून यशोदेचा मातृसुलभ भाव व्यक्त झालेला आहे.

शय्यागाणी शीर्षकाखाली ज्या सहा ओव्या आलेल्या आहेत त्या कृष्णाला झोपविण्यासाठी म्हणून यशोदेनी जणू गाणे म्हटलेले आहे. यशोदा म्हणते, माझा कृष्णबाळ हा फार हट्टी असून तो दुधासाठी हट्ट धरुन आपले रडणे थांबवतच नाही. इतरांच्या बाळापेक्षा माझा हा कृष्ण गुणांचा आहे हे बाळा, तू आता झोप क्षणभर तरी माझ्या लेकराला विश्राम लाभू दे. मी तुझा प्रेमाने पाळणा हालविते. पाळणा हलवू हलवू माझे हात दुखायला लागले परंतु त्याला झोप नाही. कोणाची तरी दृष्ट लागली असेल म्हणून मंत्रून त्याला पाणी देऊ. दिवसभर खेळून खेळून रात्री त्याचे पाय दुखत असतील तर मी ते चेपून देईन. माझे बाळ जेवण करत असताना माझ्या दारी अनेक मुले गोळा होतात. त्याला कोणाची बरे नजर लागली असेल. अशाप्रकारचे स्त्रीसुलभ यशोदेचे मन याठिकाणी दिसून येते.

बालरक्षा अंतर्गत आलेल्या गीतांमधून कृष्णाचे रक्षण व्हावे ही मनिषा व्यक्त झालेली आहे. नंदगृही बाळकृष्णाचा जन्म झाला त्यामुळे संपूर्ण गोकुळामध्ये आनंद झाला. त्याची सुंदर श्यामतनू डोळे भरुन पाहिल्यानंतर असे वाटते की आपले सर्वस्व त्यावर ओवाळून टाकावे. डोळ्यानी हे मोहनरुप पाहिल्यानंतर प्रत्यक्ष डोळ्यांपुढे वेदमुनींचे ध्यान साकार झाल्याचे अनुभवाला येते. हा मोठा प्रजापालक असल्यामुळे त्याचा वंशसुध्दा मोठा होवो आणि त्यासाठी पाण्यामध्ये वराह, जमिनीवर वामन आणि अरण्यामध्ये नरहरी या सर्व अवतारांनी त्याचे रक्षण करावे जेणेकरुन दैत्याची समाप्ती होईल. म्हणून चौघीनी त्याचे निंबलोण सुध्दा करा. ज्याच्या मनामध्ये प्रथम हरीविषयीचा भाव नाही त्याने सुध्दा त्याला पाहिल्यानंतर भक्तिभाव निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांनी ह्या सगुणाचे दर्शन घेतल्यानंतर ते कसे बरे निष्काम होतील? म्हणजेच ह्या सगुण दर्शनाने भक्त त्याच्या भक्तमध्येच रममाण होतील म्हणून सर्व काम त्यागून नंदगृही चला. गोविंद नाम घेताना माझ्या मनाला आनंद होतो. श्रीकृष्णाबद्दल जेव्हा मनामध्ये आसक्ती वाढेल तेव्हा कोटी जन्माच्या श्रमाने प्राप्त होणारे प्रेम सुलभपणे प्राप्त होईल. ओमकाराचे स्मरण जेव्हा संपते तेव्हा त्या प्रणवापलिकडची भक्ताला प्राप्ती होते. जेवणाच्या वेळी म्हटलेल्या प्रासंगिक दोन ओव्या येथे आलेल्या आहेत. ही रचना अशी आहे की जणु ज्ञानेश्वरांनी हे गाणे म्हटलेले आहे. भात, भाजी, कढी, वडा हे देवाला सर्व तिखट म्हणून तुम्ही आधी तुप आणि पुरणपोळीचे जेवण करा. जेवणाचे वेळी श्रीकृष्ण आपल्याबरोबर आहेत. तेही जेवत आहेत. या जाणीवेतून जेवणाचे वेळीच्या ओव्या आहेत. स्वयंपाक तिखट, खारट हा भाग असणारच कधी पोळ्या जाड होणारच, अशावेळी महाराज म्हणतात.

भजा भात कढी भाजी । बाई तिखट सर्व देवा ग ।
म्हणुनी तुम्ही आधी । तूप पुरणपोळी हे जेवा ग ।

दुसऱ्या ओवीमध्ये म्हणतात की, सर्व गाई गोवर्धन पर्वतावर निघून गेल्यामुळे माझ्या कन्येला प्रत्यक्ष श्रीकृष्ण दूध पाजत आहेत.

कौशल्यावचन म्हणून ज्या ओव्या आलेल्या आहेत त्यामध्ये पहिली ओवी फक्त कौसल्येची असून बाकी सर्व कृष्णाच्या संदर्भात असल्याने त्या यशोदेच्या आहेत असे म्हणता येईल. सुरुवातीच्या ह्या पहिल्या ओवीमध्ये रामाबद्दलचे वर्णन असून बाकी सर्व कृष्णवर्णन आलेले आहे. आणि हे असे का व्हावे याचे उत्तर सुध्दा याचठिकाणी महाराजांनी दिलेले असून ते म्हणजे, "समहि दोन्ही भावे । अखंड कृष्णमूर्ती ग ।" अशाप्रकारे राम

आणि कृष्ण हे दोन्हीही एकच होत. महाराज येथे म्हणतात की, हरीभक्तिशिवाय कर्म हे फलकटाप्रमाणे निरर्थक होय. म्हणुन हरिशिवाय मी कोणाकडे बघू? ध्यानाच्या बळाशिवाय मन हे ध्येयाकार होऊ शकत नाही. गोंविद नामस्मरण करता मन हे गोविंदरुप होऊन जाते. आणि कृष्णरुपाने गो—ब्राह्मणाची सत्कीर्ती निर्माण होते. कृष्णचरणी जीव हे शीवरुप होतात. कृष्ण हा मनुष्ययोनीमध्ये असून त्याने सर्पयोनीमध्ये असलेल्या कालीयाचा उध्दार केला. ईश शक्तीपुढे अशाप्रकारे विजातीय योनीचा सुध्दा उध्दार होतो. भक्तांच्या भावनेने कृष्णप्राप्ती होते परंतु सदगुरु हा भावनातीत अशाप्रकारची ठेव आहे. देवाच्या भक्तीमुळे विश्वामध्ये व्दैत तर सदगुरु भक्तीमुळे विश्वाच्या ठिकाणी ब्रह्मद्वैत निर्माण झाले. निर्विकल्प समाधीने जो हरी प्राप्त होत नाही तो पुतनारी (कृष्ण) मला राधेसह दिसला. हे नंदाचे बाळ डोळे भरुन पाहिल्यानंतर सोनेसुध्दा तुच्छ वाटायला लागते. श्रुतिशास्त्रांना अगम्य असलेला वनमाळी बघुन डोळ्यांचे पारणे फिटले. त्याच्या नामापुढे अजपाजप (गायत्री मंत्र) सुध्दा कमी पडेल. त्याच्या प्रेमासाठी कैवल्यसुध्दा थोडे कमीच वाटते. अशा कृष्णासारखा बाळ, नंदासारखा राजा, यशोदेसारखी राणी यांचे नेहमीच माझ्या मुखाव्दारे उच्चारण होवो. त्या बाळाहून पंचप्राण ओवाळून टाकावे. त्याला कोणीही दृष्टी लावू नये अशी इच्छा महाराजांनी व्यक्त केलेली आहे.

कृष्णावताराची कथा महाराजांनी स्त्रीगीताच्या माध्यमातून व्यक्त केलेली आहे. कुऱ्हा येथे महाराजांना सोपान देवांचा साक्षात्कार झाला त्यावेळचे हे गाणे आहे. ते रोचक आहे. ह्या भूमीवर पापांची गर्दी झाली. ही वार्ता ब्रह्मदेवाजवळ पोचली. ब्रह्म सर्व देवांना म्हणाला की तुम्ही विष्णूला आठवा—स्मरण करा. देव ब्रह्मदेवाला म्हणायला लागले की, आम्हाला विष्णू माहिती नाही. तेव्हा ब्रह्म सर्व देवांना म्हणाला की तुम्ही सर्व माझ्याबरोबर चला. म्हणून जेथे तो नारायण होता त्या ठिकाणी जाण्यासाठी सर्वजण निघाले. तेथे जाऊन सर्वानी नारायणाचा नमस्कार घेतला. सर्वानी करुणा ऐकून द्वारकेचा राजा विचारायला लागला की तुम्ही तेथे कशासाठी आलात ? आणि तुमच्या पाठीशी कोण बरे लागले? देव त्यांना सांगायला लागले की आम्हाला दैत्य त्रास देत आहेत. तेव्हा नारायण त्यांना बोलले की मी अवतार घेऊन सर्व दैत्यांचा नाश करेन. देवकीच्या पोटी जन्म घेऊन मी सर्व दासांचा साहयकारी होईन. तुम्ही आपापल्या घरी जावे आणि आपले चित्त ज्ञानेश्वराकडे ठेवावे; गोकुळामध्ये द्धष्णाचा जन्म झाला. यशोदेला आनंद झाला. आपण सर्व मैत्रिणी मिळून जाऊ आणि गोविंदाला डोळे भरुन बघू. ज्याने ही संपूर्ण सृष्टी निर्माण केली तो गवळ्याच्या घरी जन्माला आला. त्याला डोळे भरुन पाहता ज्ञानेश्वरांबद्दल मनामध्ये आवड निर्माण होते. वैशाख कृष्ण अष्टमी बुधवार रोजी जो आनंद झाला तोच हा कृष्ण जन्मोजन्मीचा सांगाती आहे.

पदांचे गाथेव्यतिरिक्त आणखीही स्त्रीगीते महाराजांनी रचलेली आहेत. ह्या गीताचे स्त्रीगीत संग्रह ह्या नावाने एक पुस्तक निघाले. “घरगुती कामे करितांना किंवा फावलवेळी झोपाळ्यावर बसून अथवा अनेक मंगलप्रसंगी गाणी म्हणण्याकडे स्त्रीयांची स्वाभाविक प्रवृत्ती, त्यांच्या नेहमीच्या सवयीतल्या चाली, आवडती गाणी वारंवार म्हणावीशी वाटत असल्यामुळे त्यांच्या आवर्तनाने मनावर होणारा साहजिक परिणाम आदीकरुन गोष्टींचा विचार केला असता ही स्त्रीगीतांची योजना किती सुंदर आहे हे कळून येईल. ही गाणी बहुतेक सोपी सरळ व प्रेमभरीत असून स्त्रीपुरुषांना आपापल्या वृत्तीचा परिचय करुन देणारी असल्यामुळे त्यांचा अर्थ चटकन लक्षात येऊन ती मनुष्याला विचार करायला लावतात व दुसरे त्यात श्रुतिस्मृतींच्या अभिप्रायानुसार निरनिराळ्या परिस्थितीनुरुप प्रक्रिया व सख्य वात्सल्यादि भक्तीचे प्रकार गोवले असल्यामुळे प्रचलित निरर्थक व ग्राम्य गाण्यांचा संस्कार नष्ट करुन त्यांच्या जागी नियमादृष्ट उत्पन्न करणारे सुसंस्कार दृढ करण्यात त्यांचे केव्हढे सहाय्य होते हे निराळे सांगावयाला नको”[१]. स्त्रीगीतसंग्रह ह्या पुस्तकामध्ये १०९२ ओव्या ५ प्रकरणामधून आलेल्या असून त्यामधुन सद्‌गुरुभक्ती ही साधनदशेपासून सिध्ददशेपर्यत कशी चढती—वाढती असते. तीच पुढे फलरुप कशी होते वगैरे वेदान्तविचाराने भरलेली गीते आहेत. “रोजची व्यवहाराची घरगुती कामे करतांना, झोपाळ्यावर बसून गाणी म्हणतांना त्यातुन व्यक्त झालेली स्त्रीयांची स्वाभाविक प्रवृत्ती. त्यांच्या आवडीनिवडी, चालीरिती यांचे दर्शन तर होतेच शिवाय स्त्रीयांच्या ठिकाणी परमार्थाची आवड निर्माण व्हावी हाच त्यांच्या स्त्रीगीत निर्मीती करण्यामागचा उद्देश यामध्ये विविधता आहे. सद्‌गुरुचे महात्म्य, श्रीकृष्णसेवेची आवड, स्वत:ची दुर्बल स्थिती, भक्ति, ज्ञान, वैराग्य या साधनांचा प्रत्यय येतो एकूण अद्वैत ज्ञानोत्तर भक्तीचा सिध्दांत सामान्यजनांपर्यत पोहचविण्याचा त्यांचा उद्देश यातुन सफल झालेला आहे.”[२] पण त्यांचे वैशिष्ट्ये असे की ती अगदी अडाणी स्त्रियांनाही समजेल अशी श्रवणमधूर प्रासादिक रचना झालेली आहे. या सर्व ओव्या गेय असून त्यांच्या आठ चाली आहेत.

झोपाळ्यावर बसून महाराज व सौ. मनकर्णिकाआई (महाराजांच्या पत्नी) हे दोघे मिळून गोड गळ्याने ही गीते म्हणत तेव्हा सर्वजण तल्लीन होऊन जात.

"यामध्ये भावनांची उत्कटता तर आहेच पण त्याबरोबरच बुध्दी आणि भावना यांचा सुंदर समन्वय साधलेला नजरेस येतो. सासरी जाणाऱ्या आपल्या मुलीला उपदेश करणाऱ्या आईची येथे आठवण येते. तसेच पती गावी नसेल तर क्रिडा करणे, नटणे, मुरडणे, उत्सवाला जाणे, हास्य विनोद करणे आणि परगृही राहाणे इत्यादी सर्व कटाक्षाने टाळावे अशा तऱ्हेच्या पातिव्रत्याच्या आणि सुशीलतेच्या व्यावहारिक उपदेशातुन विवेकनिष्ठ जीवनदृष्टीचा साक्षात्कार घडल्याशिवाय राहात नाही. स्त्रीयांना पारमार्थिकतेची जोड प्राप्त करुन देणारी गीते म्हणून त्यांच्या स्त्रीगीतांना अधिक महत्व आहे"[३] प्रापंचिक विषयातून सोडवून, गुरुप्रेम, हरिहरोपासना, अद्वैतज्ञान आणि पराभक्ती या क्रमाने स्त्रियांची पारमार्थिक उन्नती करण्याचा महाराजांचा हा प्रयत्न आजच्या धकाधकीच्या काळातही स्त्रियांना मार्गदर्शक आहे. यातील रचना इतकी सोपी आणि वेधक आहे की ती वाणीवर सहज रेंगाळत राहते.

मायबाप बंधू । सोयरे गणगोत ।
संसारी बुडविती । धरुनी माझा हात ।
जंव घरी धन । तोवरी याना याना ।
आपुल्या अर्थासाठी । लोक म्हणती काका नाना ।
संसार दुःखमूळ । विंगळ्याचा माज ।
किंचित सुख येथे । नाही गुरुराया मज ।

ही सरळ सोपी रचना मनातील विषयांना दूर सारुन क्षणभर का होईना पण वैराग्याचा विचार मनात ठसविते. "धर्म, परमेश्वराविषयी प्रेम व गुरुभक्ती यामुळे सात्विकगूण वाढतो. अंतःकरण धर्मावाचून कोणत्याही साधनाने प्रगल्भ होणे शक्य नाही. तोच सर्वोत्कर्षाचा मुळ पाया आहे. हाच मधुराव्दैताचा सोपन आहे. या तीन गोष्टींचा संस्कार महाराजांच्या शिक्षण पध्दतीचे आद्यसूत्र आहे. त्यांच्या स्त्रीगीत संग्रहात या तत्त्वाचे वर्णन वारंवार पाहावयास मिळते. या गीतांना असे एक तात्त्विक अधिष्ठान आहे की जे समाजाच्या नैतिक विकासाकरीता आवश्यक आहे. गीतांची रचना चित्तशुध्दी करणारी, सुसंस्कार दृढ करणारी, मन प्रेमरसात तल्लीन करणारी आहे. समाजातील अनैतिकता, दुराचार, ईश्वराविषयी अंधश्रध्दा, दयाशुन्यता, प्रापंचिक कामाची हेळसांड इत्यादी दोष नाहीसे करणे व पतिप्रेम, सदाचरण, ईश्वरभक्ती, नैतिकतेची व आदर्श जीवनमुल्यांचे संस्कार करण्याचे सामर्थ्य महाराजांच्या या स्त्रीगीतसंग्रहात आहे. समाजातील स्त्रीयाचे विचार परवर्तन करण्याचे सामर्थ्य त्यांच्या संग्रहात आहे"[४] सगुण निर्गुण समसमान आहेत हा उपदेश पुढील ओवीत

सगुण विरलावस्था । ते निर्गुण ।
निर्गुण धनी भाव गं बाई । साकार नारायण ।

किती सोप्या रितीने सांगितला आहे ते लक्षात येईल. प्रथम वैराग्य होण्यासाठी सुवासिनी स्त्रियांनी परमोर म्हणून पतीचीच सेवा करावी पुढे वैराग्यादी साधनसंपन्न झाल्यानंतर मात्र सर्व संसाराचा त्याग करुन भक्तिसंपन्न व्हावे आणि शेवटी जीवनमुक्तीसुख अनुभवू लागावे. असे येथे उपदेशिले आहे.

देवाची दंभपूजा । पतीलागी वाकुडे ।
तिचा व्यर्थ गेला जन्म । कल्पवरी नको पडे ।
स्वासीनी बाईयांनो । भावे करा पतीसेवा ।
विधवांनो तुम्ही मनी । आठवा रमामाधवा ।
ओळविलेल्या मना । पुन विषय न द्यावे ।
उन हीव सुख दुःख । अगे सहन करावे ।
वैराग्य झाल्यावरी । सोडावा सर्व संग ।
गुरुसी शरण जावे । निर्लज्ज होऊनिया ।
गुरुचे गुणदोष । पाहुच नये ग कधी ।

"अशाप्रकारे विसाव्या शतकाच्या सुरवातीला स्त्रियांना केलेला उपदेश त्यांना मानसिक समाधान आणि पारमार्थिक जोड करुन देणारा आहे. पारमर्थिक तळमळ लागल्याशिवाय भगवत्सुख प्राप्त होणे शक्य नाही म्हणुन संसाराविषयी वैराग्य शिकवून स्त्रीयांना परमार्थाच्या मार्गाची गोडी लावण्यासाठी ही स्त्रीगीते रचली आहेत"[५].

"स्त्रीगीतांची भाषा अधूनमधुन वऱ्हाडी असून सरळ व सोपी आहे. त्या गीतांत भावनांची उत्कटता आहे. संसारात राहुनही परमार्थाची तळमळ असणाऱ्या स्त्रीयांनी आपले वागणे कसे ठेवावे याविषयी श्री महाराजांनी आपले विचार स्त्रीगीतांतून प्रकट केले आहेत. स्त्रीयांच्या ठिकाणी निसर्गतःच राहत असलेल्या वात्सल्यप्रेमाचा ओघ त्यांनी

संसारातील आपल्या मुलामुलींकडे न वळवता परमानंदरुप सदगुरु भगवंताकडे वळविल्यास तेच प्रेम अखंड निर्विकल्प समाधी साधण्यात सहाय्यभूत होऊ शकते. या प्रेमालाही ज्ञानाची बैठक आवश्यक आहे. त्यामुळेच श्री महाराजाच्या गीतसंग्रहातुन अद्वैतज्ञान पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे"[६]. म्हणून असे म्हणता येते की, "त्यांची प्रज्ञा केवळ अध्यात्मिक विषयातच रमत नाही तर व्यावहारिक गोष्टीचेही ती चिंतन आणि मार्गदर्शन करते हे त्यांच्या उपदेशामृत पत्रावरुन व स्त्रीगीतावरुन दिसून येईल. यात त्यांनी पतिप्रताधर्म, विधवाधर्म, पुत्रधर्म गुरुचे लक्षण इत्यादी अनेक व्यावहारिक विषयांचे सखोल चिंतन व मार्मिक मार्गदर्शन केले आहे"[७].

## स्त्रीगीतांचे विशेष :–

"महाराजांचा स्त्रीगीतसंग्रह हा विशेषत्वाने स्त्रियांनी अभ्यासनीय आहे. हयातील गीतरचना ह्या प्रासंगिक असल्या तरी स्त्री समाजात भक्तिभाव वाढविण्याच्या दृष्टीने सर्वत्र प्रिय झाल्या आहेत. साध्या गीतांतून सद्गुरुभक्ती व दृढविश्वास वाढविण्याचे कार्य उत्तम रीतीने साधले आहे. शुध्द भावातून सद्गुरुपायी शरण गेल्यास देव आपला उध्दार करतो, ही शिकवणही आली आहे.

सद्गुरु ग स्तुतीगीत । वाचतील ग ज्या कोणी ।
देईल ग चक्रपाणी । स्वपद त्या ।

गुरुची सेवा ही जन्मोजन्मी आपल्याला घडावी ही भक्तीची भावना ह्या गीतांतून दिसते. संसार दु:खाचे मूळ आहे. ह्यातुन तरुन जाण्यासाठी भक्ती वैराग्याची आवश्यकता आहे असे ते म्हणतात. सौभाग्यवती स्त्रियांना पती हाच गुरुदेव आहे. तर विधवांना रमामाधव हा स्वामी आहे. सर्व स्त्रियांनी पतीसेवेचा भाव व विधवांनी रमामाधवाची भक्ती करावी असे म्हटले आहे. सद्गुरु लक्षणात सद्गुरुचे लक्षणवैशिष्ट्य सांगितले आहे.

चित्ती ज्ञान भुतदया ग बाई । त्याचे काय वर्णू गुण ।
ऐसिया लक्षणांनी युक्त । जो गुरुरावो ।

जो ज्ञानेश्वरांच्या शिकवणीप्रमाणे शिष्यावरही पुत्राप्रमाणे प्रेम करीत असतो. अशा सद्गुरुचे जाती, धर्म, वर्ण, कुळ हे काहीच बघायचे नसते. कारण तो देहरहित असतो. तो वेदवेत्ता ब्रह्मनिष्ठ असतो. तोच खरा ब्राह्मण असतो. शांती, क्षमा, भूतदया व ब्रह्मज्ञान हयांनी पूर्ण असणारा विरक्त कर्मयोगी हरिभक्त असा सद्गुरु आपल्या माया बंधनाचा नाश करीत असते. सद्गुरुचे अत्यंत स्पष्ट शब्दांत केलेले विवेचन यात आलेले आहे"[८].

"…..श्रीकृष्णाच्या बाललीला प्रकरणात आईची वात्सल्याची भावना आली आहे. कौशल्या रुपातील रचनेत हा भावनेचा खळखळाट नसला तरी रघुरायाच्या विविध स्वरुपांचे व कार्याचे त्याच वात्सल्यातून दर्शन घडते. स्त्रीगीतांच्या चालीतही विविधता आली आहे. एकच गाणे तीन चार पाच चालीवर म्हटले जाते. रचनेतही हा फरक स्पष्ट केला आहे. जसे की– तीन चार स्त्रिया येऊन श्रीकृष्णाची वेगवेगळी तक्रार करीत आहेत. हा सर्वच भाग संवादरुप आहे.

वऱ्हाडी बोलीतील कविता रचना आणि बोलीच्या दृष्टीने या संग्रहाचे आगळेच वैशिष्टय होय. वऱ्हाडातील परिचित चालीवरील या स्त्री गीतांतून लोकगीताचेच दर्शन घडते.

स्त्री–गीतातील शब्दरचना स्त्रीसुलभ भावनेतून तर आहेतच पण सोपी व प्रेमाने पूर्ण आहे. ती वाचकांना घरगुती वातावरणात नेणारी आहे.

महाराजांनी स्त्रीगीतांमधून स्त्रीजीवनातील अनुभवांना अध्यात्माची बैठक दिली आहे. आईचे दुध पिणारा कृष्ण. पूतनेचा अरी, शय्येवर झोपणारा श्रीकृष्ण ही सर्वच रुपे स्त्री भूमिकेतून विशद केलेली आहेत व महाराजही ह्या प्रसंगवर्णनात विशेष रममाण झालेले दिसतात. जसे की लहानग्या बाळाला आई अंगाई गीत म्हणून झोपवित असते त्याप्रमाणेच शय्यागीत म्हटले गेले आहे. सुंदर श्रीकृष्णाला दृष्ट लागेल ही त्यातील कल्पना मनोरम आहे. जगाच्या नियंत्याला दृष्ट ती लागणार ? आणि कोणाची ? हा त्या त्या मानवी भावप्रवृत्तीचा अविष्कार प्रेमाने निराकार निर्गुणावर केला आहे. सगुणस्वरुपाची ही भक्ती त्यातही कृष्णाचे–वात्सल्यातून अनुभवाचे–बाळरुप–मानवी देहाच्या धर्माप्रमाणे महाराजांनी त्या सगुणरुपाची केलेली ही विविध भावदर्शनरुप भक्तीच होय !

श्रीकृष्ण हा ज्ञानेश्वरकन्येचा सौभाग्यतिलक ! तोच या पदरचनेचा केद्रबिंदू, त्यामुळे कृष्णाच्या सर्व लीला, सर्व भूमिका यात याव्या ही अपेक्षा स्त्री–गीत संग्रहात हे मनोज्ञ दर्शन घडते. ते मात्र या निवडक गीतांतून (पदांच्या गाथेतील) होत नाही"[९].

"भक्तीचे लालन, वात्सल्य व माधुर्य असे तीन प्रकार आहेत. या तीनही प्रकारातील भक्तीच्या अनेक छटा महाराजांच्या गीतातून प्रकटल्या आहेत.

सर्वसामान्य स्त्रियांनाही समजेल अशा सोप्या भाषेत ही गीते आहेत. त्याचबरोबर स्त्रियांच्या मनाला मोह घालतील अशा भाववृत्तीच्या अनेक छटा या काव्यातून प्रकट झाल्या आहेत"[१०].

या गीतांमधून काही ठिकाणी लोकसंकेत व्यक्त झालेले दिसून येतात उदा.

नीजता नीज नाही । कोण्या सवती पायी ।
हरि माझा कोमावीला । पीयेना स्तन्य काही ।
टोचीन गळनाडे । घेईन शिवदिक्षा ।
माझीया द्धष्णासाठी । आणीन रामरक्षा ।

त्याचप्रमाणे

पाळणा हालविता । दुखले माझे बाहू ।
कोणाची दृष्ट झाली ग बाई । मंत्रुनी पाणी देऊ ।

पुढील ओवीमधून रुपकात्मक रचनेचा नमुना बघता येईल —

बीजे ती श्रुतिशास्त्रें । फळ त भगवत ।
प्रेमाच्या रसामध्ये गं बाई । पूजीला रमाकांत ।

स्त्री गीते ही वऱ्हाडी बोलीमध्ये असल्यामुळे येथील शब्दकळा देखील वैशिष्टयपूर्ण दिसून येते. उदा. बरह्मा, माहया, चल्लाव, मंग, झन, जिथ, तिथ, सम्दे, आयकून कारुना, दारकीचा दइत, तहा बोला, राकेस, शाहाकारी , ठुवावे, गोकुई, किरनाचा, जलम, हरिख, गडनी मिवून, सायया, गोइन्दु डोया, सियष्टी, मुरती, पाह्यता इत्यादी.

## निष्कर्ष :—

अशाप्रकारे स्त्रीसुलभ भावनांच्या अभ्यासाव्दारे — त्याचा आधार घेऊन अध्यात्मशास्त्रातील प्रमेये अत्यंत सोप्या भाषेमध्ये सांगून ती सर्वसामान्य स्त्रीयांच्या आकलनकक्षेमध्ये आणण्याचे महाराजांचे हे कसब त्यांच्यातील मानसशास्त्रज्ञाचा निश्चित आपल्याला परिचय करुन देणारे आहे. तसेच अशा ह्या तत्त्वज्ञानाला लोकसाहित्यांची डूब देऊन जे महाराजांचे रचनाकौशल्य दिसून येते ते एकमेवाव्दितीयच म्हणावे लागेल.

## संदर्भ :—

१. श्री निवासशास्त्री हरदास (लेख — श्री गुलाबराव महाराजांची स्त्रीगीते), डॉ. राम पंडित, संपादक, श्री. गुलाबराव महाराज : विभूति आणि साहित्य, पंचलतिका ग्रंथ न्यास, मुंबई (पृ. ३०१)
२ डॉ. शालिनी मोहोड (श्रींच्या स्त्रीगीतातील मर्म) प्रज्ञाचक्षु—जीवन आणि कार्य, डॉ. वंदन मोहोड, संपादक, वंदन प्रकाशन, अमरावती (पृ. ६० )
३. कित्ता (पृ. ६१, ६२)
४. प्रा. शितल बुरघाटे (श्री. गुलाबराव महाराजांचे स्त्रीगीत दर्शन) प्रज्ञाचक्षु—जीवन आणि कार्य, डॉ. वंदन मोहोड, संपादक, वंदन प्रकाशन, अमरावती (पृ. ९८ ते १०१)
५. डॉ. शरद कोपर्डेकर, श्री. गुलाबराव महाराज : जीवन आणि तत्त्वज्ञान, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, ३ री आवृत्ती १९९१ (पृ. ५०)
६. प्रा. शितल बुरघाटे (श्री. गुलाबराव महाराजांचे स्त्रीगीत दर्शन) प्रज्ञाचक्षु—जीवन आणि कार्य, डॉ. वंदन मोहोड, संपादक, वंदन प्रकाशन, अमरावती (पृ. ९७, ९८)
७. प्रा. शितल बुरघाटे (श्री. गुलाबराव महाराजांचे मधुराद्वैत दर्शन) प्रज्ञाचक्षु—जीवन आणि कार्य, डॉ. वंदन मोहोड, संपादक, वंदन प्रकाशन, अमरावती (पृ. ४०)
८. डॉ. वि.ग. कावळे, गुलाबगुच्छ, संपादक, श्री गुलाबराव महाराज जन्मशताब्धी प्रकाशन, नागपूर १९८१
९. कित्ता (पृ. २७, २८)
१०. डॉ. शरद कोपर्डेकर, श्री. गुलाबराव महाराज : जीवन आणि तत्त्वज्ञान, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे (पृ. ४९)

❖❖❖

# 'चाकाची खुर्ची' आत्मकथनातील नसीमा हुरजूक यांच्या दिव्यांग जीवनाचे चित्रण

प्रा. डॉ. फुला बागुल
(संशोधक मार्गदर्शक)
एस.पी.डी.एम.महाविद्यालय, शिरपूर
जि.धुळे (महाराष्ट्र)

श्री. संदीप रमेश चौधरी
(संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग)
क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव, महाराष्ट्र, (India)
मेल: sandiprc.79@gmail.com
भ्रमणध्वनी: 9574485358

## गोषवारा Abstract :–

मराठी साहित्य अनेक साहित्य प्रवाहांनी समृध्द झाले आहे. उदा. दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, ग्रामीण साहित्य, मुस्लिम साहित्य, अहिराणी साहित्य, कोकणी साहित्य, युवा साहित्य, मराठा साहित्य, संत साहित्य, विदर्भ साहित्य, सावरकर साहित्य अशा प्रकारे भाषा, उपभाषा, जात, धर्म, पंथ, प्रदेश, मनुष्य यावरुन अनेक साहित्य प्रवाह मराठी साहित्यात निर्माण झाले व मोठे झाले.या प्रवाहांनी त्या त्या साहित्य प्रकारांना समृध्द तर केलेच पण मराठी व इतर भारतीय साहित्यालाही नवी दिशा देऊन समृध्द केले. परंतु मराठी साहित्यात अजूनही अनेक साहित्य प्रवाह सुप्त स्वरुपात प्रवाहीत होत आहेत. ज्यावर संशोधन होणे बाकी आहे. त्यातीलच एक म्हणजे 'दिव्यांग साहित्य प्रवाह'.

हा साहित्य प्रवाह मराठी साहित्य सरीतेत आहे. नऊ अखिल भारतीय दिव्यांग साहित्य संमेलने भरवली गेली आहेत. मराठी साहित्य क्षेत्रात त्यावर कोणीही म्हणावे तसे लक्ष दिलेले नाही. दिव्यांगांच्या नावाने आजपर्यंत भारतीय साहित्याच्या मुख्य प्रवाहात दिव्यांग साहित्याला स्थान मिळालेले नाही. प्रा.अरविंद जाधव यांच्या मते मराठी साहित्यात दिव्यांगांच्या " ज्या यातना, वेदना, दु:ख आहे ते उत्कट भावनेतून अभिव्यक्त व्हावयास हवे."[१]

त्यासाठी दिव्यांग साहित्याची समीक्षा व संशोधन होणे आवश्यक आहे. ते झाले तरच दिव्यांग साहित्याला मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळेल. ज्याप्रमाणे डॉ.स्वाती अमराळे–जाधव यांना सरकार व समाजाचे दिव्यांगांच्या आत्मनिर्भरतेचे कार्य हे "गोगलगाईची वाटचाल"[२] वाटते, त्याप्रमाणेच मराठी साहित्यातही दिव्यांग साहित्याची समीक्षा व संशोधन गतिशुन्य अवस्थेत आहे.

दिव्यांग साहित्यात अनेक पुस्तकांचा समावेश होतो. त्यात मोठया प्रमाणावर आत्मकथने, चरित्रे, नाटक, कविता यांचा समावेश होतो. उदा. डॉ.सुधीर देवरे यांनी लिहिलेले 'पंख गळून गेले तरी', 'सहज उडत राहिलो' ही आत्मकथने, एम.के.भामरे लिखित बुदुम्बा, भालचंद्र करमरकर लिखित 'फिटे अंधाराचे जाळे', अनिल साबळे यांचा 'अंधाराला विचार जाब' हा काव्य संग्रह, मंजिरी भोयर यांचा 'दहा बाय दहा' हे काव्यसंग्रह बलराम नागरे लिखित 'अपंगा' कादंबरी, वृंदा भार्गव यांची 'व्हाय नॉट आय' ही कादंबरी, जयवंती दळवी लिखित 'नाती गोती' अशी अनेक पुस्तके दिव्यांग जाणिवांचे, त्यांच्या व्यथा वेदनांचे चित्रण करतात. दिव्यांगांच्या जाणिवा, व्यथा, वेदना, दु:ख हया इतर साहित्य प्रवाहा इतकेच वास्तव, प्रामाणिक, तटस्थ व समष्टीकडे नेणाऱ्या आहेत. दिव्यांग साहित्यातील नसीमा हुरजूक लिखित "चाकाची खुर्ची" हे दिव्यांग साहित्य प्रवाहातील प्रमुख आत्मकथन असून दिव्यांग साहित्याच्या कक्षा रुंदावणारे आहे.

## बीजशब्द :

दिव्यांग साहित्य, दिव्यांग जाणिवा, चित्रण समाज शिक्षण, आजारपण, वेदना, संघर्ष, नोकरी, विवाह, दिव्यांग पुनर्वसन, स्वाभिमान, आत्मनिर्भर.

## चाकाची खुर्ची आत्मकथनातील दिव्यागांचे चित्रण :

डॉ. कुंडलिक पारधी यांच्या मते, "आत्मकथन म्हणजे स्वत:च्या जीवनाविषयीचे कथन"[३] जीवनाच्या विशिष्ट टप्प्यावर इतरांना सांगण्यासारखे अनुभव लिखित स्वरुपात कथन करणे म्हणजे आत्मकथन. 'आत्मचरित्र' व 'आत्मकथन' का लिहावी याविषयी विद्वानांमध्ये मते मतांतरे आहे. प्रा.अ.म.जोशी यांच्या मते, "मला माझ्या स्वत:बददल जितकी माहिती असेल तितकी दुसऱ्या कोणाला असणे शक्य नाही."[४] म्हणून आत्मचरित्र किंवा

आत्मकथनाचे लेखन करावे. डॉ.सुधीर देवरे यांच्या दृष्टीने "ज्यांच्याकडे चाकोरीबध्द जीवनाव्यतिरिक्त स्वत:च्या आयुष्यातील जबरदस्त घटना सांगण्यासारखा आहेत, त्यांनी आत्मचरित्र लिहावचं."(५) स.ग.मालशे आत्मचरित्राविषयी आपले मत मांडतांना लिहीतात, "आत्मचरित्र आपण कसे आहो यापेक्षा आपण लोकांना कसे दिसावे, याच दृष्टीकोनातून लिहिलेले दिसते"(६) असे अनेक दृष्टीकोन व भूमिका आत्मचरित्र व आत्मकथनाच्या लेखनामागे दिसून येतात.

लेखिका नसीमा हुरजूक यांनी 'चाकाची खुर्ची' या आत्मकथनात त्यांच्या दिव्यांग जीवनातील व्यथा, वेदना, संकटे, संघर्ष यश–अपयश आजारपण, सहकारी, सामाजिक कार्य यांचे चित्रण केले आहे. वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत खेळात, नृत्यात भाग घेण्यासाठी आघाडीवर असणारी नसीमा अचानक पाठीच्या दुखण्याचे नेमके कारण डॉक्टरांना न समजल्याने कायमस्वरुपी 'पॅराप्लेजिक' होते. त्यानंतर लेखिकेच्या जीवनातील संकटांची मालिका सुरु होते.

आत्मकथनाच्या शेवटी इतक्या संघर्ष व संकटानंतरही ही स्त्री जीवंत कशी राहते व इतके मोठे कार्य कसे करते? असे प्रश्न वाचकाला नक्की पडतात. चाकाची खुर्ची या आत्मकथनात मुखपृष्ठ, शीर्षक यापासून तर मलपृष्ठापर्यंतच्या भागात दिव्यांगाचेच चित्रण दिसून येते. उदा.'चाकाची खुर्ची' ही दिव्यांगासाठीच असते तेच वापरतात. त्यामुळे तेथे दिव्यांगाचे चित्रण आलेले दिसते. 'चाकाची खुर्ची' हे शीर्षक आत्मकथनाच्या मुखपृष्ठावरील चाकाच्या खुर्चीला पंख लावून उडणाऱ्या दिव्यांग मुलीचे चित्र हे दिव्यांग जाणीवा चित्रित करते. आत्मकथाच्या लेखनामागची भूमिका मांडतांना लेखिका लिहितात.

"ते वाचल्यानं 'पुढचा शहाणा' झाला तर त्याला कमी ठेचा बसतील. मग ती कोणी अपंग व्यक्ती असो, वा एखादी सार्वजनिक संस्था असो." (चाकाची खुर्ची,मनोगत, पृ.१०)

पुस्तक लिहितांना देखील स्वत:पेक्षा दिव्यांगांच्या व त्यांच्याशी संबंधित सार्वजनिक संस्थेच्या हिताचाच विचार दिसून येतो. लेखिकेचे बालपण इतरांसारखे हसत खेळत आनंदात जात होते. पण वयाच्या सोळाव्या वर्षी अचानक पाठीत दुखू लागले. उपचारानेही दुखणे थांबले नाही. तिच्या नाचण्या खेळण्यावर मर्यादा आल्या. डॉक्टरांना तिच्या दुखण्याचे निदान करता आले नाही व ती कायमस्वरुपी 'पॅरोप्लेजिक' झाली. दिव्यागांला आजारपणाचा सर्वात जास्त मार बसतो तो शिक्षणावर. त्यावेळच्या एस.एस.सी म्हणजे अकरावीत हुशार असूनही आजारपणामुळे फर्स्टक्लास मिळाला नाही. पण पास झाली. सायन्स विभागात जायची इच्छा असूनही डॉक्टरांच्या सल्ल्याने आर्ट्सला प्रवेश घेतला. आजारपण मात्र वाढतच होते. तेव्हा देखील कशीबशी परीक्षा देऊन बी.ए.पास झाली. असहय वेदना व जीवघेण्या आजारपणानंतर लेखिकेला हळूहळू आपण कायमच्या दिव्यांग झालो आहोत याची जाणीव होत होती. दिवसभर रडणं सुरु असायचे. त्या अवस्थेचे वर्णन करतांना लेखिका लिहिते, "शरीराच्या वेदना कमी झाल्या होत्या, पण मनाच्या वेदनांना अंत नव्हता." (चाकाची खुर्ची, पृ.२१)

एके दिवशी लेखिकेची आई कढत गरम पाण्याने तिची आंघोळ करत होती. नंतर बिछान्यावर झोपवून पावडर लावायाला गेली. तर कमरेपासून पूर्ण भाजले होते. तिला जरासुध्दा जाणीव नव्हती. तिची आई रडायलाच लागली. ती स्वत:लाच दोष देत होती. आधीच शरीराची विचित्र अवस्था आणि आता या जखमांमुळे पालथे झोपून राहणे नशिबी आले. तरीही लेखिकेने आईला वाईट वाटेल म्हणून कुरकूर केली नाही. ताप आला की ग्लानीत पडून राहिल्याने बरं वाटायचे. लेखिकेला पॅराप्लेजिक झाल्यावर कसे वाटत होते, त्या दिव्यांग मनोअवस्थेचे चित्रण करताना लेखिका लिहिते, " लहानपणी गोष्टीत वाचलं होतं, एका राजाला कोणीतरी शाप दिल्यावर त्याचं अर्ध शरीर, दगडाचं होतं आणि तो एकाच जागी अनेक वर्ष खिळून राहतो, मग कोणीतरी येतं आणि उ:शाप मिळून तो पूर्ण माणूस बनतो. माझं कमरेच्याही वरपासून खाली तळपायापर्यंतच अर्ध शरीर दगडाचं झालं होतं गोष्टीतला राजा उभा होता. मी मात्र बिछान्यावर आडवी होते. आयुष्यात परत माझं दगडाचं अर्ध शरीर जिवंत होणार नव्हती." (चाकाची खुर्ची, पृ.२२,२३)

कुमारवयातील स्वप्नातही लेखिकेला दिव्यांगाशी संबंधित स्वप्ने दिसत होती. पॅराप्लेजिक स्त्री आजारपणमुळे ज्या कठीण अवस्थेतून जाते त्याचे वर्णन कदाचित वाचकाला किळसवाणे वाटू शकते. पण ते वास्तव आहे. 'चाकाची खुर्ची' आत्मकथनात नसीमा हुरजूक तिच्या असह्य दैनंदिन त्रासाचे चित्रण पुढील शब्दांत करते,

"लघवी–संडासाची संवेदना नसल्यानं सर्व विधी अंथरुणात होत. वास आल्यावर बिछाना स्वच्छ करायला मला कुशीवर वळवायला चार–चार लोक लागत. पावडर, सेंट यांच्या सहाय्यानं दुर्गंधी दूर केली जाई. अगरबत्ती

लावून रेडिओ लावला जाई. गोष्टीचं पुस्तक हाताशी ठेवत. पंखा सुरु असे आणि इतकं करुनही माझे अश्रू थांबले नाहीत. उशी भिजतच राहिली, तर झोपेची गोळी दिली जाई. त्यावेळी माझं वय होतं सोळा वर्षाचं, कोणीतरी केवळ कल्पना करावी मला काय वाटत असेल याची! देवाजवळ मरण मागत होते." (चाकाची खुर्ची, पृ.२३)

व्हिलचेअरवरुन बसमध्ये बसवतांना तिला लहान मुलासारखे उचलून बसवावे लागत असे तेव्हा बसमधील लोक तिच्याकडे कधी सहानुभूतीने तर कधी त्रासून म्हणत, "या एवढया लहान वयात तरुणपणी हे काय भोग? सर्व घरादाराला त्रास! गेल्या जन्मी केलेल्या पापाचं फळ!. "(चाकाची खुर्ची, पृ.२९) लेखिकेला हे शब्द ऐकणं नकोसे वाटे. आपण कुटूंबाला मदत करण्याऐवजी ओझे बनून आहोत या जाणिवेने तिला खूप दु:ख होई. पॅराप्लेजिक झाल्याने अशा प्रकारच्या मरण यातना लेखिका भोगत होती. शारीरिक वेदनांसोबतच मानसिक व भावनिक वेदना अनुभवत होती. या वेदनांना अंतच नाही असे तिला वाटत होते.

अशा कठीण काळात 'बाबूकाका दिवाण' लेखिकेच्या जीवनात आले आणि तिचे संपूर्ण आयुष्यच बदलले. स्वत: पॅराप्लेजिक असलेल्या बाबूकाकांना व्हिलचेअरवर पाहिले तेव्हा "व्हीलचेअरवरचा माणूस इतका दिलखुलास हसू शकतो." (चाकाची खुर्ची, पृ.३३) यावर लेखिकेचा विश्वास बसला नाही. बाबूकाकांच्या विचार आचाराने प्रभावित होऊन लेखिकेने शिक्षण सुरु केले. तसेच स्वावलंबन, खेळ व कोल्हापूरमधील दिव्यागांसाठी कार्य करण्यासाठी प्रेरित झाली. दुसऱ्यांवर अवलंबून असणारी लेखिका आता स्वत:ची कामे स्वत: करायला शिकू लागली व इतरांनाही मदत करण्याचा प्रयत्न करु लागली, उदा. स्वयंपाक घराची रचना बदलून लेखिका चपाती, भाजी, भात, आमटी करु लागली, भांडी घासू लागली, शिलाई मशीन हाताने चालवायला शिकली आणि दिवसातला बराच वेळ मशीनच्या कामात स्वत:ला गुंतवून घेतले. बाबूकाकांच्या मार्गदर्शनाखाली लेखिकेने १९७२ मध्ये 'अपंग सहाय्यक संस्था' स्थापन केली. एवढेच नव्हे तर तिने दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धेतही भाग घेतला व भरपूर बक्षिसे मिळवली. १९७२—७३ च्या क्रीडा स्पर्धेत तिला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की तिच्यासारखी स्पर्शज्ञान गमावलेली, लघवी संडासाचा त्रास असलेली एकही 'पॅराप्लेजिक' स्त्री सहभागी झाली नव्हती. ही परिस्थिती बदलण्यासाठी पुढील काळात लेखिकेने स्वत:ला झोकून दिले. बाबूकाकांचे स्थान लेखिकेच्या जीवनात अनन्यसाधारण होते. त्यांनी लेखिकेसाठी किती केले त्याचे वर्णन एक घटना सांगतांना लेखिका लिहिते. "त्यांनी मला डाव्या हातात सर्जिकल हॅडग्लोव्हज् घालून स्वत:चं पोट कसं साफ करायचं हे सांगितलं. सुरुवातीला मला खूपच त्रास झाला. आपल्याला हे जमणारच नाही, असं वाटलं पण हळूहळू जमू लागलं आणि ज्याच्यामुळे मरण हवसं वाटत होतं, तो त्रास नाहिसा झाला. रोज सकाळी उठल्या उठल्या पोट साफ होऊ लागलं." (चाकाची खुर्ची, पृ.३७) या चित्रणातून बाबूकाकांच्या दिव्यांगांविषयीच्या निरपेक्ष व समर्पित सेवेचे दर्शन घडते. स्वत: पॅराप्लेजिक असल्याने त्यांनी त्यांच्याजवळील ज्ञान, कौशल्य, पैसा सर्व काही दिव्यांगांच्या कल्याणासाठीच खर्ची घातले. क्रीडा स्पर्धेतील यशामुळे लेखिकेची इंग्लडमध्ये दिव्यांगांसाठी होणाऱ्या क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली. पण तिच्यासोबत येणाऱ्या मदतनीसच्या असहकार्यामुळे व विदेशातील खेळाचा अनुभव नसल्यामुळे लेखिकेला तिथे यश आले नाही. बाबूकाकानंतर हेलन केलर व हेन्री व्हिसार्डी या दिव्यांगांच्या पुस्तकांचा प्रभाव लेखिकेवर झाला. जेव्हा जेव्हा ती निराश होते, तेव्हा त्यांच्या पुस्तकांचे वाचन लेखिका पुन्हा पुन्हा करते.

एकीकडे लेखिका दिव्यांगांच्या संकटातून बाहेर पडण्यासाठी धडपडत होती. पण तिच्या जीवनात दिव्यांगामुळे येणारी संकटे कमी होत नव्हती. एकदा लेखिकेची बहीण रेहानासाठी लेखिका पाणी गरम करत असतांना तिच्या अंगावर पाणी सांडले. स्पर्श असलेल्या जागेची कातडी सोलून निघाली पण स्पर्शज्ञान नसलेल्या खालच्या भागावर कातडी सोलून निघाली तरी त्रास जाणवला नाही. ही गोष्ट लपवल्यामुळे जखम खूपच वाढली. अनेकवेळा रेल्वेतून प्रवास करीत असतांना रेल्वेच्या नियोजनशुन्य कारभारामुळे लेखिकेला खूप त्रास झाला. अधूनमधून कॅथेटरचा त्रास होतच राहायचा. अशा संघर्षमय अवस्थेतून लेखिका जीवन जगत होती.

बाबूकाकांनी लेखिकेला लग्नाविषयी मार्गदर्शन करतांना "लिंग, जात, पात न बघता शुध्द मैत्री कर. योग्य वाटलं तर लग्नही कर, पण कोणताही निर्णय भावनेच्या आहारी जाऊन घेऊ नकोस." (चाकाची खुर्ची, पृ.६५) हा मोलाचा सल्ला दिला होता. लग्नाचा विचार करतांना लेखिका स्वत:चे दिव्यांगपण विसरु शकत नव्हती. त्यामुळे लग्नाविषयीचे तिचे विचार वेगळे होते. ते चित्रित करतांना लिहिते, "मला लग्न करावसं वाटणं अशक्य होतं. स्वत:चच आयुष्य एक मोठे ओझं असताना हे ओझं कोणावर लादण्याची माझी इच्छा नव्हती. या पुरुषांचा काय नेम? सुरुवातीला लग्न करतील आणि नंतर माझी असमर्थता बघून इतर स्त्रियांकडे वळतील." (चाकाची खुर्ची, पृ. ६५) पॅराप्लेजिक स्त्री म्हणून तिला जे आयुष्य सोसावे लागत होते ते दुसऱ्यांवर लादायचे नव्हते. तसेच लग्न

केल्यावरही जोडीदार चांगलाच राहिलच याची शाश्वती तिला नव्हती. इतर दिव्यांग व पॅराप्लेजिक स्त्रीयांच्या संसाराच्या अनुभवाने लेखिका शहाणी झालेली दिसते. त्यामुळे कदाचित लेखिका आयुष्यभर अविवाहीत राहिली. या गोष्टीला दुसरी देखील एक बाजू आहे. लेखिकेचे मन पूर्णपणे दिव्यांगांच्या कार्याकडे वळले होते. तेच लेखिकेच्या जीवनाचे ध्येय झाले होते. त्यामुळेही लेखिका नसीमा हुरजूक लग्न करुन संसारात गुंतू इच्छित नव्हती. पण म्हणून लेखिकेने तिचे विचार इतर दिव्यांगावर लादले नाहीत. लेखिकेने स्थापन केलेल्या 'हेल्पर्स...' संस्थेतील दिव्यांगांचे व तिच्या जीवनात आलेल्या दिव्यांगांचे लग्न जुळवून देण्यात मदत केली. उदा.महेंद्र. एवढेच नव्हे तर दिव्यागांसाठी वधू–वर विवाह संस्था स्थापन करुन तिची जबाबदारी रजनी करकरे या आपल्या मैत्रीणीवर सोपवली.

दिव्यांगांच्या पूनर्वसनासाठीच लेखिकेने पुढील आयुष्य वाहून घेतले. ती स्वत: दिव्यांग असल्याने तिला दिव्यागांच्या व्यथा, वेदना, अडचणी, समस्या अधिक चांगल्याप्रकारे माहित होत्या. लेखिकेच्या मते,"अगदी लहान वयातच अपंग पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु केल्यास खरं सर्वांगिण पुनर्वसन होईल हा विश्वास होता. बालकांपासून त्यांची सुरुवात शस्त्रक्रिया, कृत्रिम साधनं, शिक्षण, कला–क्रीडा, व्यावसायिक प्रशिक्षण, सर्वात शेवटी वैवाहिक पुनर्वसन "(चाकाची खुर्ची, पृ.६६) असे टप्पे ठरवून लेखिकेने कार्यास सुरुवात केली. परंतु लेखिका ज्या 'अपंग साहाय्यक संस्थेमार्फत' हे कार्य करीत होती त्यांनी सहकार्य केले नाही. शेवटी लेखिकेने संस्थेचा राजीनामा दिला. अशातच लेखिकेला बॅक ऑफ इंडियाच्या परीक्षेचा कॉल आला. लेखी परीक्षा पास होऊन तोंडी परीक्षेला "लेजर कसं उचलणार, ऑफिसला कसं येणार" (चाकाची खुर्ची, पृ.६८) असे वैयक्तिक प्रश्न विचारुन नोकरी नाकारली. नंतर लेखिकेला केंद्रीय अबकारी व सीमा शुल्क खात्यात लोअर डिव्हीजन क्लार्कचा कॉल आला. लेखी परीक्षा चांगली झाली. पण अगोदरच्या अनुभवामुळे ती तोंडी परीक्षेच्या आधी अबकारी विभागाच्या कलेक्टरला भेटली. तिच्या मते, "वशिला लावणं आवडत नव्हतं. पण माझ्या अपंगत्वाला न्याय मिळायला हवा होता. कामाची कुवत असतांना फक्त चालता येत नाही, पायात ताकद नाही म्हणून नकार का? "(चाकाची खुर्ची, पृ.७०) हा प्रश्न तिच्या मनात होता. या मुलाखतीमुळे लेखिकेला अडचण न येता नेमणूकीचे पत्रही मिळाले. अनेक शारीरिक अडचणी व्याधींवर मात करत लेखिका प्रामाणिकपणे व जिद्दीच्या जोरावर नोकरी करु लागली. संस्था सोडली तरी अनेक दिव्यांग लेखिकेकडे मदतीसाठी येत. परंतु त्यालाही मर्यादा होत्या. शेवटी कागलच्या राणी सरकार श्रीमती विजयादेवी घाटगेंच्या आग्रहाने लेखिकेने नवी संस्था 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डीकॅप्ड, कोल्हापूर' स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून लेखिका दिव्यांगांच्या पूनर्वसनाचे कार्य करु लागली.

पुरुषांच्या विचित्र वागण्याचा लेखिकेला त्रास होऊ लागला. शरीराची दुर्गंधी लपविण्यासठी लेखिका परफ्युम वापरत असे. तिचे दोन्ही भाऊ विदेशात नोकरीला असल्याने तिच्याकडे परदेशी साडया व परफ्युम खूप होत्या. परंतु त्या साडया व सेंटच्या सुवासाने पुरुष जवळ येत आहेत हे लक्षात येताच तिने सर्व परदेशी साडया मैत्रिणींना देऊन टाकल्या. सेंट वापरणं बंद केले. फक्त पांढरे कपडे वापरु लागली. दिव्यांग असल्यामुळे व दिव्यांग पूनर्वसनाचे कार्य करायचे असल्याने लेखिकेने नोकरीत मिळणाऱ्या पदोन्नती नाकारल्या. कितीही काळजी घेतली, तरी दरवर्षी लेखिकेला दोन तीन वेळातरी दवाखान्यात ठेवून औषधांचा कोर्स करावाच लागे. त्यासाठी नाकातून आत पोटात नळी घालत, घशात जखमा होत. रात्री झोप लागली नाही, तर गोळया घ्यावा लागायच्या. त्या यातनांपेक्षा लेखिकेला मरण बरे वाटायचे. आत्महत्येचेही विचार यायचे. आत्महत्येचा प्रयत्नदेखेल केला. पण त्यातूनही ती वाचली. नंतर तिने दिव्यांगांच्या कार्यात स्वत:ला पूर्णपणे वाहून घेतले. 'हेल्पर्सच्या' माध्यमातून अनेक दिव्यांगांच्या पूनर्वसनाचे कार्य लेखिकेने हाती घेतलं. त्यात काही वेळा यश येत होते तर काहीवेळा अपयश येत होते. त्यातून पुढे जात लेखिकेने अनेक प्रकल्प सुरु केले. त्याचा उपयोग दिव्यागांच्या पुनर्वसनाविषयी झाला. दिव्यांगाच्या पूनर्वसनाविषयी लेखिकेची स्वतंत्र मते होती. त्यांना केवळ मदत करणे एवढयापुरते लेखिकेला दिव्यांगांचे पूनर्वसन अभिप्रेत नव्हते. दिव्यांगांना स्वाभिमानाने जगायला शिकवणे व त्यांना आत्मनिर्भर बनविणे यांवर त्यांचा विशेष भर होता. त्यासाठी ते शिबीर घेत त्यात "मुलांना समाजात त्याचं स्थान मिळवून देण्याचा, निर्भिडपणे जगात आपल्या अपंगत्वाची लाज न बाळगता वागण्यास शिकवणं, त्यांचं मनोधैर्य वाढवणं." (चाकाची खुर्ची, पृ. १०६) यावर त्यांचा भर असे. एकदा लेखिका दिव्यांग मुलांना बगिच्यात घेऊन गेली. पण वॉचमनने पायात बूट आहेत म्हणून व चाकाच्या खुर्च्या आहेत. म्हणून बगिच्यात मंदिरापुढून जाण्यास मनाई केली. लेखिकेने त्याला समजावून सांगितले की, "या चाकाच्या खुर्च्या वाहन नसून आमचे पाय आहेत. त्याशिवाय आम्ही आत जाऊ शकणार नाही. "(चाकाची खुर्ची, पृ.१०६) तरी देखेल वॉचमनने ऐकले नाही. शेवटी लेखिकेने आवाज चढवला बगिच्यातील लोकांना घटनेविषयी सांगितले. लेखिकाही जिद्दीला पेटली. जोपर्यत मुलांना बागेत जाऊ दिले नाही,

तोपर्यंत लेखिका तिथून हलली नाही. शेवटी मुलांना बागेत जाण्याची परवानगी मिळाली. अशा प्रकारच्या हीन वागणुकीने लेखिकेला यातना होत होत्या. पण दुसऱ्या दिवशी लेखिका मुलांशी या घटनेबद्दल बोलली तेव्हा मिळालेले उत्तर अनपेक्षित होते. "दीदी आपल्याला हवं असलेलं गोड बोलून, वागून न मिळाल्यास वेळप्रसंगी भांडून, झगडून ते मिळवायला हवं, हा धडा आम्हाला काल मिळाला. तुमच्यासारखं धैर्य आमच्यात नाही. पण आम्ही यापुढे प्रयत्न करु." (चाकाची खुर्ची पृ.१०६) मुलांच्या या उत्तराने मिळालेले समाधान शब्दातील होते. लेखिकेच्या डोळयात येऊ पाहणारे दु:खाचे अश्रू समाधानाने वाहू लागले.

दिव्यागांच्या पुनर्वसनाच्या कार्यासाठी स्वत:च्या दिव्यांगाची पर्वा न करता लेखिकेने दिवसरात्र मेहनत केली. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांपासून भारताच्या पंतप्रधानांना भेटली. त्यासाठी पुणे, मुंबई, बडोदा, दिल्लीपासून कोलकातापर्यंत पॅराप्लेजिक शरीराच्या सहाय्याने प्रवास केला. अनेक अपमान सहन केले. आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, शारीरिक, भावनिक अडचणींना तोंड देत कोटयावधी रुपयांची मदत दिव्यांगांना करु शकली, मोठ मोठया इमारती बांधू शकली याचे समाधान लेखिकेला आहे. आयुष्याच्या संध्याकाळी दिव्यांगासाठी बरेच काही करण्याची इच्छा लेखिकेच्या मनात अजूनही आहे.

## समारोप व निष्कर्ष –

अशा प्रकारे चाकाची खुर्ची या आत्मकथनात नसीमा हुरजूक यांनी त्यांच्या जीवनातील दिव्यांगांमुळे अनुभवलेल्या घटना, करावा लागलेला संघर्ष, निर्माण झालेल्या समस्या आणि केलेले कार्य यांचे वास्तव व प्रामाणिक चित्रण केलेले दिसते. नसीमा हुरजूक दिव्यांग झाली म्हणून रडत न बसता संघर्ष करीत समर्थपणे जीवन जगली. या आत्मककथनातील दिव्यांग नसीमा ही नायिका म्हणजे "बंडखोर, जिद्दी, कामाविषयी प्रामाणिक, वास्तवांचा स्वीकार, चुकांचा स्विकार करणारी इतर दिव्यांगाविषयी पराकोटीची सहानुभूती, मातृह्रदयी, कुटूंबवत्सल, निरपेक्ष, भावनेने कार्य करीत राहणे, यश व अपयश दोन्ही पचवणे, उत्कृष्ट खेळाडू, उत्तम प्रशासक, नेतृत्वगुण, धर्मनिरपेक्ष " अशा अनेक गुणांचे चित्रण या आत्मकथनांत दिसून येते.

'चाकाची खुर्ची' या आत्मकथनातून पुढील निष्कर्ष हाती येतात.

१) 'चाकाची खुर्ची' हे आत्मकथन 'रिपोर्ताज' स्वरुपाचे आहे. त्यातून दिव्यागांच्या जाणिवा प्रकटल्या आहेत.

२) या आत्मकथनाची भाषा प्रवाही व प्रासादिक आहे.

३) 'चाकाची खुर्ची' या आत्मकथनातील नायिकेचा जीवन दृष्टीकोन सकारात्मक आहे. नायिकेचे जीवन दिव्यागांसह इतरांनाही प्रेरणादायी आहे.

४) दिव्यांगांकडे समाजाने उपेक्षेने किंवा दयाबुध्दीने न पाहता समाजाचा महत्वपूर्ण घटक म्हणून पाहावे, असे नायिका सुचवू पाहते.

५) 'चाकाची खुर्ची' या आत्मकथनावरुन असे दिसून येते की, दिव्यांगांचे जीवन अतिशय संघर्षमय, समस्या व अडचणींनी भरलेले दिसते.

६) दिव्यांगांना संधी मिळाल्यास ते 'आत्मनिर्भर' बनून कुटूंबाला व समाजाला मदत करु शकतात, हा संदेश या आत्मकथनातून दिला जातो.

७) आत्मकथनात आलेल्या घटना व प्रसंग यांचे वर्णन सुक्ष्म, वास्तव व उत्कट स्वरुपाचे आहे.

**साधन ग्रंथ** : हुरजूक नसीमा, 'चाकाची खुर्ची' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती सप्टेंबर २०१५.

## संदर्भ :


१) जाधव अरविंद, दै.पुण्यनगरी, दि.३/१२/२०१९

२) अमराळे–जाधव डॉ.स्वाती, दै.तरुण भारत, दि.४/१२/२०२०

३) पारधी कुंडलिक, 'आकांत' आत्मकथन: एक आकलन, यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे–३०, प्रथम आवृत्ती ऑक्टोंबर २०१९, पृ.२१,२२

४) जोशी अ.म., 'चरित्र–आत्मचरित्र', स्नेहवर्धन प्रकाशन चतुर्थ आवृत्ती जाने.२००१, पृ.८९

५) देवरे सुधीर, 'पंख गळून गेले तरी', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, ऑक्टो.२००७, पृ.४

६) मालशे स.गं., शोधनिबंधाची लेखन पद्धती, (सुधारित आवृत्ती: संपादन मिलिंद मालशे, लोकवाङ्‌मय गृहवाङ्‌मय गृह प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती, ऑक्टो. २०१४ पृ.३६)


❖❖❖

# "वारे वाहतायत..."
# समकालीन सामाजिक अगतिकतेचा उच्चार

डॉ. नीलांबरी मंदार कुलकर्णी
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
रामनिरंजन झुनझुनवाला स्वायत्त महाविद्यालय
घाटकोपर (पश्चिम), मुंबई–४०००८६, महाराष्ट्र (India)
ई–मेल neelambari.kulkarni@yahoo.com भ्रमणध्वनी ९८३३०७०७५०

परिचय १. "संरचनावादी साहित्यशास्त्राच्या दृष्टिकोणातून रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास" या विषयावर डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली Ph.D. पदवीसाठी संशोधन.
२. मुंबई विद्यापीठाचा अ. का. प्रियोळकर सर्वोत्कृष्ट पी.एच.डी.प्रबंध पुरस्कार प्राप्त.
३. अनेक मान्यताप्राप्त नियतकालिके, पुस्तके यांमधून संशोधनपर लेख प्रसिद्ध.

## गोषवारा

प्रस्तुत शोधनिबंधात "वारे वाहतायत..." या अनिल कांबळीलिखित कवितेची रूपवादी परिप्रेक्ष्यातून समीक्षा करण्यात आलेली आहे.समीक्षेच्या अशा विशिष्ट पद्धतीच्या प्रत्यक्ष उपयोजनामुळे साहित्यकृतीच्या आकलनात तर भर पडतेच पण संबंधित समीक्षापद्धतीची उपयुक्तता सिद्ध होते. प्रस्तुत शोधनिबंधात रूपवादी समीक्षापद्धतीच्या उपयोजनामुळे 'वारे वाहतायत' या कवितेची आशयसूत्रे तर समकालीन संदर्भात किती महत्त्वाची आहेत ते सिद्ध होतेच पण तिचा रूपबंधही तिच्या आशयसूत्रांशी संवादी असल्याचे सिद्ध होते. त्यामुळे तिच्या गुणवत्तेला नवे परिमाण प्राप्त होते. साहित्यकृतीच्या रूपालाही आशय असतो व त्याचे साहित्यकृतीच्या आशयाशी नाते तपासणे एकूण वाङ्मय व्यवहारासाठी महत्त्वाचे असते हे तत्त्वही अधोरेखित होते.

## बीजशब्द

"वारे वाहतायत..." – अनिल कांबळीलिखित कविता – रूपवादी परिप्रेक्ष्यातून समीक्षा–– अनेकार्थता – परस्परविरोध– विरामचिन्हांची अर्थपूर्णता– आशयसूत्र व रूपबंधाचे संवादी नाते

## Abstarct

In the present dissertation, Anil Kambli's poem 'Vare Vahatayat' has been reviewed from the perspective of Formalist Criticism. The actual application of such a specific method of criticism not only enhances the understanding of the literary work but also proves the usefulness of the method of related criticism. The use of Formalist method of criticism in the present dissertation not only proves the importance of the poem 'Vare Vahatayat…' in the contemporary context but also proves that its form is in harmony with its theme. So the poem quality gets a new dimension. It also underscores the fact that the form of a literary work has meaning and it is important for overall literary practice to examine its relation to the content of a literary work.

## Key Words

Vare Vahatayat…' - Poem written by Anil Kambli - Review from a perspective of Formalist Criticism – Ambiguity of Meaning - Pradox - Meaningfulness of punctuation- Harmonious Relation between Content and Form

## प्रस्तावना

प्रस्तुत शोधनिबंधात "वारे वाहतायत..." या अनिल कांबळीलिखित कवितेचे रूपवादी समीक्षापद्धती वापरून विश्लेषण केले जाणार आहे.त्यासाठी गुणात्मक संशोधनपद्धती वापरली जाणार आहे. कवितेच्या

आशयसूत्रांचा समकालीन सामाजिक संदर्भांशी असलेला अनुबंध तर तपासायचा आहेच. पण या कवितेचा रूपबंधाची वैशिष्ट्यांचा शोध घेऊन त्यांचे कवितेच्या आशयसूत्रांशी असलेले नाते तपासायचे आहे.

## विषय विवेचन

"वारे वाहतायत..." या अनिल कांबळीलिखित कवितेमधील मुख्य विषय आहे तो म्हणजे समकालीन सामाजिक वास्तव आणि विविध बाजूंनी येणारी सामाजिक संकटे होत. आपल्या समाजातील मूल्यव्यवस्था वेगाने बदलते आहे. जागतिकीकरणामुळे व्यक्तिकेंद्री, उपभोगवादी, चंगळवादी अशी नवी सामाजिक मूल्यव्यवस्था आकाराला येत आहे. जागतिक दहशतवादाचे सावट संपूर्ण जगाला भेडसावत आहे. अमेरिकाप्रणीत व्यावसायिक, राजकीय सत्ताकांक्षेच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या या भस्मासुरामुळे एक अनिश्चितता आपल्या सगळ्यांच्या जीवनाला ग्रासून टाकते आहे. अमेरिकाप्रणीत युद्धखोरीच्या प्रयत्नांनाच कदाचित उत्तर म्हणून, प्रतिक्रिया म्हणून जन्म झाला आहे तो इस्लामी आणि पाठोपाठ हिंदू मूलतत्त्ववादी विचारसरणीचा होय. धर्म, जात, भाषा, प्रदेश यांच्या नावाखाली पेटणार्या दंग्यांची, जीवितहानीची टांगती तलवारदेखील दहशतवादी हल्ल्यांइतकीच भयप्रद झाली आहे. या सगळ्यामुळे आपल्या सामाजिक पर्यावरणात दहशतीचे एक दडपण निर्माण झाले आहे. ही परिस्थिती यथार्थपणे उमटते ती "वारे वाहतायत" या प्रतिमेतून होय.

कवितेतील प्रतिमा ह्या केवळ संवेदनाकृतीतूनच निर्माण होत नसतात तर संवेदनांशी जोडल्या गेलेल्या विचार, भावना यासारख्या मानसिक संदर्भांची साधर्म्यवैधर्म्य संबंधावर आधारित ती रचना असते. असे सुधीर रसाळ म्हणतात. (रसाळ, १९८२, पृ. २२२) प्रस्तुत कवितेतही वाऱ्याच्या प्रतिमेतून सुखद स्पर्शसंवेदना मात्र त्याच्याशी वैधर्म्याचे नाते असणारी वाऱ्याची विध्वंसकता अभिव्यक्त होते.

वारे वाहणे हे वातावरणातील बदलाचे सूचक समजले जाते. हवेच्या खेळतेपणाचे लक्षण मानले जाते. कवितेतील 'मी' इथे सामाजिक वातावरणातील बदल आणणाऱ्या घटनांविषयी किंवा विघ्नांची मालिका आणणाऱ्या परिस्थितीविषयी बोलतो आहे. त्यामुळे इथे 'वारा' या शब्दाला दुसरा अर्थ आहे तो सद्य सामाजिक वास्तवातील बदलांचा होय. या वाऱ्याबरोबर जी विघ्ने वाहून आणली जात आहेत. त्यामुळे सामान्य माणूस कसा धास्तावला आहे, हे सांगताना कवितागत 'मी' म्हणतो —

जड होत एकेक श्वास
दडपली जातेय छाती ह्याची त्याची

वाऱ्यांच्या संदर्भात आपला अनुभव असतो तो सुखदतेचा, प्रसन्नतेचा किंवा आल्हाददायक अशा वार्याछच्या झुळुकीचा होय. पण या कवितेतील वारे ज्या सामाजिक परिस्थितीचे सूचन करतात, त्या परिस्थितीला सुखद म्हणता येणे शक्यच नाही. वारा आणि तरीही दु:खद, त्रासदायक अशा जाणिवा या परस्परविरोधी घटकांना या प्रतिमेतून एकत्र आणले जातात. आभाळस्पर्शी झाडे एकामागोमाग एक कोसळल्याने हे वारे अपशकुनी सूर आळवीत आहेत. आता हे वारे एका भीषण वादळाच्या स्वरूपात उभे ठाकतात.

आभाळस्पर्शी झाडे ही प्रतिमा सूचन करते ते समाजातील जुन्या जाणत्या पिढीतील तत्त्वनिष्ठ नेते, समाजकारणी आणि उत्तुंग अशा सामाजिक व्यक्तिमत्त्वांचे होय. जनहिताच्या ध्येयाने वेडावलेल्या, स्वहित उधळून देणाऱ्या जुन्याजाणत्या नेत्यांची अनुपस्थिती आज आपल्याला प्रकर्षाने जाणवते. तत्त्वासाठी, मूल्यांसाठी त्याग करणारी, जनतेला सावली देणारी ही नेतेमंडळी मूकपणे मागे सरली आणि त्यांची जागा घेतली आहे ती एकांतिक विचारसरणी असणार्या मूलतत्त्ववादी नेतेमंडळी, तथाकथित धार्मिक गुरू, मुल्लामौलवी आणि आध्यात्मिक सेलिब्रिटींनी होय. पुनरूज्जीवनवादीआणि हुकुमशाही प्रवृत्ती असलेल्या या मंडळींनी स्वत:चे स्वत:लाच जनतेचे उद्धारकर्ते म्हणून घोषित करून टाकले आहे. याविषयी बोलताना कविगत 'मी' म्हणतो आहे

कोसळतायत आभाळस्पर्शी झाडे एकामागोमाग एक
निरोपाचं न बोलताच
जरब दाखवीत खणखणतायत
स्वयंघोषित जगद्गुरूंचे धर्मदंड

पहिल्या तत्त्वनिष्ठ पिढीच्या अस्तंगत होण्याबद्दलचे दु:ख इथे व्यक्त झाले आहे. त्याबरोबरच तथाकथित धर्ममार्तंड आणि धार्मिक मूलतत्त्ववादी मंडळींच्या एका प्रकारच्या दहशतवादी, दादागिरीच्या प्रवृत्तीचा उपहास केला आहे तो 'स्वयंघोषित' या शब्दातून होय. पूर्वीच्या उत्तुंग नेत्यांनी आपल्या वर्तनाने जनतेचा आदर कमविला होता.

आजचे हे पुनरूज्जीवनवादी नेते दहशतीने आदर वसूल करीत आहेत. त्यांचे नेतेपद स्वयंघोषित आहे. नेत्यांच्या दोन पिढींतील विरोधसंबंध इथे व्यक्त झाला आहे.

याच दहशतवादी, दादागिरीच्या प्रवृत्तीचे सूचन करण्यासाठी गडगडाटाची प्रतिमा येते. वादळी वाऱ्यांबरोबर ढगांचा गडगडाट येतोच. मात्र प्रस्तुत कवितेत हा गडगडाट प्रश्नांचा आहे. ”काव्यात्म भाषा अनेक ठिकाणी व्याकरणिक नियमांचे,रूढीचे,आदर्शांचे व काव्यसंकेतांचे उल्लंघन करत असल्याचे दिसून येईल.“(पाटील,ह्य्ब्ब,पृ. ह्य६) या कवितेत ‘गडगडाट’ या नामाचा व ‘प्रश्न’ या नामाचा परस्परयोग्यतासंबंध जुळत नाहीत.गडगडाट ढगांचा असतो प्रश्नांचा नाही. त्यामुळे गंगाधर पाटील म्हणतात त्याप्रमाणे व्याकरणिक नियमांचे उल्लंघन करून समाजावर पडलेल्या दहशतीच्या काळ्या सावटाचे सूचन केले जाते.

मूलतत्त्ववादी, आक्रमक अशा या समाजकारणाचे, राजकारणाचे वारे आज काळ्याकुट्ट प्रश्नांचे ढग आपल्यापुढे उभे करीत आहेत. पण या प्रश्नांची उत्तरे मिळू नयेत,याची सोय या मंडळींनी आधीच करून ठेवली आहे. म्हणूनच या गडगडाटाला कवितागत ‘मी’ ‘उपहासगर्भ गडगडाट’ असे म्हणतो आहे.जनतेच्या भावनांना धार्मिक, जातीय, भाषिक, प्रादेशिक अस्मितांचे आवाहन करून त्यांची मने भारून टाकली की काळाकुट्ट प्रश्न त्यांना दिसणार कसे?राजकारणातील ह्या वैचारिक दहशतवादाला म्हणूनच कवितागत ‘मी’ ‘उपहासगर्भ गडगडाट’ असे म्हणतो आहे.

सामान्य माणसाने आज आपली विवेकबुद्धी गहाण ठेवली आहे. आपल्या मेंदूचा ताबा या मूलतत्त्ववादी समाजकारणी, राजकारणी मंडळींनी घेतला आहे. जसे आपण जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या चंगळवादी जीवनशैलीला, व्यक्तिकेंद्री आणि अर्थकेंद्री मूल्यव्यवस्थेला शरण गेली आहोत. तसेच आपण धर्माच्या नावाखाली चालणार्या या वैचारिक दहशतीला बळी पडतो आहोत. आपली विचारशक्ती खुंटली आहे. या आपल्या विवेकबुद्धीला चुकीच्या भावनिक आवाहनाचे जे संमोहन पडते आहे त्या अर्थाचे सूचन मेंदूला पोखरणारी कीड आणि पिकांवरील कीड या प्रतिमेतून होते. ‘कीड’ हा एरवी साधा वाटणारा शब्द विचारशक्तीला संमोहन पडलेल्या मानवासाठी वापरला गेल्यामुळे अनेकार्थवाचक झाला आहे.

“अनेकदा सुटेपणाने अर्थदृष्ट्या एकारलेला,साधा वाटणारा शब्द कवितेतील विशिष्ट रचनेमुळे,त्या शब्दाच्या अवतीभोवतीच्या संदर्भामुळे अर्थसमृद्ध होताना दिसतो.” (वसंत पाटणकर, २०११,पृ. ११६)

वास्तविक पाहता पिकांवर पडलेली कीड नष्ट करण्यासाठी औषध फवारले जाते. अन इथे मात्र माणसांच्या मनावरच कीड फवारली जाते आहे. समाजातील माणसांनी आपले मेंदू गहाण ठेवण्याविषयीचा उद्वेग कवितागत ‘मी’ ‘फवारणे’ आणि ‘अनिर्बंध फैलावणे’ या शब्दांतून व्यक्त करतो आहे. —

ही कोणती कीड फवारली जाते वाऱ्याबरोबर
जी करीत चाललीये उभी पिकं भुईसपाट
अन् मेंदू पोखरीत फैलावत चाललीये मनामनांतून अनिर्बंध?

या सामाजिक दहशतीच्या वातावरणामुळे अनेक लोकांच्या इच्छा, स्वप्ने अपुरी राहत आहेत. या दहशतीला, धार्मिक दंगलीला बळी पडणाऱ्याच्या कुटुंबियांचे आक्रोश, मोडलेली स्वप्ने, उद्ध्वस्त संसार यांचेही आक्रोश हेच वारे वाहून आणत आहेत. आणि या सगळ्याचा जाब कवितागत ‘मी’ जगनियंत्या शक्तीला विचारतो.

‘तरी झरतच नाही कशी तुझी भोळी करुणा?

‘भोळी करुणा’ हे शब्द आधीच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर उपरोध कडवटपणे व्यक्त करतात.

समाजातील अनेकांना या नव्या परिस्थितीमुळे गोंधळून जायला झाले आहे. वाट दाखवणार्यान मार्गदर्शकांचा अभाव आहे. कोणती दिशा योग्य, ते समजत नाही. म्हणून समाजाला अशा वैचारिक गोंधळात टाकणार्यो बदलांना कवितागत ‘मी’ विध्वंस अधोरेखित करणारे उधाणवारे म्हणतो आहे. कारण कोणत्याही समाजाचे वैचारिक पारतंत्र्य व उथळ विचारसरणी ही अखेर त्या समाजाला विध्वंसाकडे नेत असते. आपल्या समाजाच्या या वैचारिक गुलामगिरीविषयी अभिव्यक्त होताना वार्याकबरोबर वाहून नेल्या जाणाऱ्या आणि स्वत:च्या इच्छेविरुद्ध उडत जाणार्याय पतेऱ्याची, पालापाचोळ्यांची प्रतिमा आली आहे.

शरीरावर उठणारे फोड एखादा संसर्ग, आजार, अशुद्ध रक्त यांचे निदर्शक असतात. जात, भाषा, प्रांत यांचे हुकमी एक्के वापरून आपल्या भावनांना आवाहन करणारे भंपक नेते, मूलतत्त्ववादी आक्रमक राजकारणी यांच्या विचाराचा संसर्ग झाल्यामुळे समाजाचे स्वास्थ्य बिघडले आहे. त्याविषयीची घृणा फोडाच्या प्रतिमेतून व्यक्त

झाली आहे. तर आपल्या समाजाची परिस्थितीमुळे आलेली अगतिकता, हतबलता वार्याथबरोबर उडणाऱ्या पतेऱ्याच्या प्रतिमेतून व्यक्त होते. स्वत:ची आणि समाजाची ही परिस्थितीशरणता पुढील शब्दांत व्यक्त होते. –

वारे वाहतायतय
त्वचेवर उठलेत टपोरे फोड
आणि वाहून नेले जातेय आपल्यालाही
आपल्या इच्छेविरुद्ध
पतेऱ्यासारखे...

'पतेऱ्यासारखे...' या शब्दांपुढील टिंबांतून नुसतीच अगतिकताच नाहीय तर माणसाच्या अस्तित्वाला आलेल्या पाचोळ्यासारख्या क्षुल्लक, पराधीन स्वरूपाविषयीचे दु:ख अत्यंत अबोलपणे अभिव्यक्त होते. "कथा–कादंबरी, नाटक या प्रकारांबाबत आपण प्रतिमा–प्रतीके आणि विशेषत: विरामचिन्हे, ओळींची लांबीरूंदी, मोकळा अवकाश यांचा विचार क्वचितच करतो. "(वसंत पाटणकर,ह्मञ्घघ,पृ.घघ६)या कवितेत टिंब या चिन्हाचा वापर असाच सक्षमतेने करण्यात आला आहे.

याचप्रकारे 'हे वारे... उधाणवारे!' या दोन शब्दांमधील अंतरदेखील वार्यामुळे येऊ घातलेला विध्वंस अचूकपणे व्यक्त करते. कवितेच्या शीर्षकातही टिंबांचा वापर असाच अनेकार्थसूचक झाला आहे. 'वारे वाहतायत...' समाजातील वैचारिक बदल, बदलणारी मूल्ये व सांस्कृतिक बदल अशा अनेक बदलांचे आणि त्याच्या परिणामांचेही सूचन या टिंबटिंबातून होते.

कवितेची रचना मुक्तछंदात झाली आहे. भावनांच्या प्रवाहानुसार कधी प्रदीर्घ तर कधी तुटक अशी लयबद्धता या कवितेतील ओळींना आहे.

उदा –वारे वाहतायत,
वाहून आणतायेत महामालिका विघ्नांची
जड होत एकेक श्‍वास
दडपली जातेय छाती ह्याची त्याची

'वारे वाहतायत' नंतर विराम येतो तर दुसर्या मोठ्या सलग ओळींमुळे श्‍वास कोंडण्याची भावना निर्माण होते,जी पुढच्या दोन ओळीतून तुटकपणे व्यक्त झाली आहे. घाबरणारे कुणी विशिष्ट नाही तर तर सगळेच अगतिक झालेले आहेत. या विघ्नांपुढे व्यक्तिविशिष्टता नष्ट झालेली आहे. हे 'ह्याची त्याची' या सर्वनामांच्या वापरामुळे अधोरेखित होते.

'ह्याची त्याची' या शब्दांतून नुसती भीतीची सार्वत्रिकता दर्शविली जात नाही तर पुनरावृत्तीतून दोन मात्रांची लय व्यक्त होते. जणू माणसाच्या धडधडणाऱ्या हृदयाची लय त्यातून पकडली जाते. " कवितेमधील प्रास,अनुप्रास, यमकादी शब्दालंकार,शब्द, शब्दबंध, वाक्यबंध, नादप्रतिमा, आदी घटकांची नियमित अंतराने होणारी पुनरावृत्ती कवितेचे सारे घटक विविध प्रकारच्या नादलयींनी गुंफीत असते.शब्दबंध, चरणबंध, आदींच्या नियमित अंतराने होणाऱ्या प्रमाणबद्ध सुतंत्र पुनरावृत्तीला कवितागत समांतरता (parallelism) म्हणतात असे म्हणतात. "(पाटील २००१, पृ. ३०) प्रस्तुत कवितेत वारे वाहतायत या पदबंधाची पुनरावृत्ती होते ती भय, दु:ख, अगतिकता अशा भावनांचे प्रकटीकरण करत आशयाला अधिक गडद करत नेते.

दुसऱ्या कडव्यात पहिली पिढी व दुसरी पिढी या घटकांतील (आभाळस्पर्शी झाडे व स्वयंघोषित जगद्‌गुरू), तर तिसर्या कडव्यात काजळकुट्ट प्रश्नांचे ढग व उत्तरे मिळूच नये म्हणून होणारा गडगडाट यातील विरोध संबंधाने तोल राखला जातो. क्लिअंथ ब्रूक्सच्या मते काव्यातील भाषा विरोधाभासात्मक असते. दोन परस्परविरोधी कल्पनांचा किंवा मूल्यांचा संघर्ष काव्यात बघायला मिळतो. (रा. भा. पाटणकर, २००१,पृ. ४१२) या कवितेतही वर उल्लेखिलेल्या घटकांमधील संघर्षामुळे कवितेला पोत प्राप्त होतो.

कवितेच्या शेवटी समाजाच्या अगतिकतेविषयी, घृणास्पद अशा वैचारिक आजारपणाविषयी खेद व्यक्त झाला आहे. कवितेच्या सुरुवातीला विघ्नांची मालिका वाहून आणणाऱ्या वार्योविषयीची धास्ती व्यक्त होते तर कवितेच्या शेवटी या सामाजिक बदलाच्या वाऱ्यांमुळे निर्माण झालेल्या आजारपणाविषयी घृणा, चिंता व्यक्त झाली आहे. इथे वाऱ्याचा प्रवास छाती दडपविण्यापासून आपल्यालाच उडवून नेण्यापर्यंत पूर्ण होतो. मग कवितागत 'मी'

कोणत्या विध्वंसाविषयी बोलत आहे ते स्पष्ट होते. परिस्थितीसमोरची ही अगतिकता, धास्ती, वैचारिक दुबळेपणा, स्वतंत्रपणे बुद्धीचा वापर न करणे हाच तो विध्वंस आहे.

## निष्कर्ष

रूपवादी समीक्षेच्या परिप्रेक्ष्यातून 'वारे वाहतायत...' या कवितेची चिकित्सा केल्यावर असा निष्कर्ष काढता येतो की प्रस्तुत कवितेच्या आशयसूत्राशी या कवितेचा रूपबंध संवादी नाते साधतो. कवितेचे आशयसूत्र दहशतीखाली चिरडले गेलेले समाजमन व बुद्धिवरील संमोहनामुळे त्या दहशतीची जाणीवच नसणे हे आहे. आशयाच्या दोन घटकांमधील हे संघर्षात्म व्यामिश्र नाते, परस्परविरोध व विशिष्ट लयबद्धता या रूपबंधाच्या तत्त्वांतून साकारले जाते. समकालीन परिस्थितील दहशतवाद, मूलतत्त्ववादी राजकारण व धार्मिक दंगलींची भीती अशा अनेक दडपणांना सामोरे जाणार्या, भयग्रस्त समाजमानसाची उत्कृष्ट अभिव्यक्ती अनिल धाकू कांबळी यांच्या 'वारे वाहतायत...' कवितेतून झाली आहे. उपरोध व उद्वेग हे या कवितेचे बलस्थान आहे आणि आशयाशी रूपबंधाचे संवादी नाते हे या कवितेला मूल्ययुक्ततेत भर टाकते हे या अभ्यासाचे फलित आहे.

## संदर्भ

१. पाटणकर, रा.भा. (२००१). सौंदर्यमीमांसा (तिसरी आवृत्ती). मौज प्रकाशन.
२. पाटणकर, वसंत (२०११). कवितेचा शोध. मौज प्रकाशन.
३. गंगाधर (२००१). समीक्षेची नवी रूपे (दुसरीआवृत्ती). मॅजेस्टिक प्रकाशन.
४. रसाळ, सुधीर (१९८२). कविता आणि प्रतिमा. मौज प्रकाशन.
५. कांबळी, अनिल (२००९) वारे वाहतायत.... समाविष्ट, भारती निरगुडकर, श्रद्धा राणे, धनाजी गुरव आणि इतर (संपा.) अनवट वाटा (पहिली आवृत्ती, पृष्ठे ८०–८१). नासिकरोड,वाङ्मयसेवा प्रकाशन.

## परिशिष्ट

"वारे वाहतायत..." या कवितेचे कवी अनिल कांबळी यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९६० रोजी झाला. ते व्यवसायाने डॉक्टर आहेत. 'अनुष्टुभ' या प्रतिष्ठित वाङ्मयीन द्वैमासिकातून त्यांच्या बऱ्याच कविता प्रकाशित झाल्या आहेत. 'रंगहोळी', 'किलकिल्या उजेडाची तिरीप' हे काव्यसंग्रहही त्यांच्या नावावर जमा आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'वायदाणी' पुरस्कार, 'इंदिरा संत उत्कृष्ट कवितासंग्रह' पुरस्कार आणि 'वसंत सावंत पुरस्कार' अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित झाले आहेत.

❖❖❖

# वैदिकसंस्कृती अर्थ व प्रसार

**प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर**
**सहयोगी प्राध्यापक**
**मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**
Mail – santoshchatur78@gmail.com भ्रमणध्वनी ९४२२८१६२२६

## सारांश

**निसर्गामध्ये जीवनोत्कर्षाला अनुकूल असे बदल करून, म्हणजेच निसर्गावर काही संस्कार करून मनुष्य आपला जीवनरथ चालवितो. मनुष्य हा देखील भोवतालच्या निसर्गाचा एक भाग आहे. तो केवळ भौतिक पदार्थावरच संस्कार करतो असे नव्हे, तर स्वतःच्या देह, मन, बुद्धी यांच्यावरही संस्कार करून स्वतःमध्ये बदल घडवून आणतो. 'संस्कृती' या शब्दात वरील दोन्ही प्रकारचा बदल किंवा संस्कार अभिप्रेत आहे. काळाबरोबर मानवाचा विकास झाला. या विकासाबरोबर मानवी संस्कृतीमध्ये अनेक परिवर्तने झाली. आर्यांनी अनार्यांचा पराभव केल्यानंतर स्वतःची संस्कृती निर्माण करून तिचा प्रसार सुरू केला. आर्यांच्या संस्कृतीचा प्रसार पूर्ववैदिक संस्कृती व उत्तरवैदिक संस्कृती या दोन अवस्थांमधून झाला. या अवस्थांमध्ये तयार केलेल्या वैदिक वाङ्मयातून वैदिकसंस्कृतीचे आविष्करण होते. वैदिक वाङ्मयामध्ये चार वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, वेदांगे, उपवेद, महाकाव्ये, पुराणे इत्यादींचा उल्लेख करता येतो. आर्यांच्या संस्कृतीत वेदांना अधिक महत्त्व असल्यामुळे तसेच वैदिक वाङ्मयामधून या संस्कृतीचे आविष्करण होत असल्यामुळे आर्यांची संस्कृती वैदिकसंस्कृती या नावाने ओळखल्या जाते.**

## प्रस्तावना

भारतीय संस्कृती निरनिराळ्या संस्कृती प्रवाहांच्या सरमिसळीतून तयार झाली आहे. भारतीय संस्कृतीचा अभ्यास आदिम लोकांच्या संस्कृतीपासून करावा लागतो. भारतात आर्यांचे आगमन झाल्यानंतर त्यांचा येथील मूळ निवासी असलेले आदिम ज्यांना आर्येतर, अनार्य असे संबोधले यांच्याशी संघर्ष झाला. आर्यांची आक्रमक वृत्ती, तीरकमान सारखे शस्त्र व वेगवान धावणारा घोडा यासर्वांपुढे समाधानी व शांतता प्रिय वृत्ती असणाऱ्या अनार्यांचा प्रतिकार अधिक काळ टिकला नाही. अनार्यांचा पराभव होऊन आर्य विजयी झाले. हा संघर्ष दोन संस्कृतीमधील संघर्ष होता. वेदबाह्य असणारे 'लोक' किंवा 'अनार्य' तर वेदांची निर्मिती करणारे आर्य म्हणून ओळखले जाऊ लागले. लोकांची जीवन जगण्याची पद्धती म्हणजे 'लोकसंस्कृती', तर वेदांमधून व्यक्त होणारी आर्यांची संस्कृती म्हणजे 'वैदिकसंस्कृती' होय. आर्यांनी निर्माण केलेल्या वैदिकसंस्कृतीचा अर्थ व प्रसाराचा शोध घेणे हाच प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

## बीजशब्द

लोकसंस्कृती, वैदिकसंस्कृती, ऋग्वेदकाळ, ब्राम्हणकाळ, उपनिषदकाळ, महाकाव्ये व पुराणकाळ

## वैदिकसंस्कृती शब्दाचा अर्थ

वैदिकसंस्कृती निर्माण करणाऱ्या आर्यांच्या मूळस्थाना संदर्भात इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. फ्रेंच संस्कृत पंडित केअरहू आर्यांचे मूळस्थान युरोप मानतो. प्रा. मायर्स यांनी दक्षिण रशिया हे आर्यांचे मूळस्थान मानले. ऱ्होड व मॅक्समुलर आर्यांचे मूळस्थान मध्य आशिया मानतात. लोकमान्य टिळक उत्तर धृव, तर गाईल्स हा विद्वान ड्यानूब नदीचे खोरे, दक्षिण रशिया या ठिकाणांपैकी आर्यांचे मूळस्थान मानतो. आर्यांच्या मूळस्थानासंबंधी मा. म. देशमुख यांच्या मते, ''आर्यांचे मूलस्थान आग्नेय, युरोप, मध्य आशिया अथवा दक्षिण रशिया होते असे म्हणता

येईल.''[१] आर्य ईराणमधून, खैबरखिंडीमार्गे सप्तसिंधूप्रदेशात आले असावेत असे काही इतिहासकारांचे मत आहे. सप्तसिंधूच्या प्रदेशातील मूळ निवासी लोकांची प्रगत संस्कृती, सुखसोई, नदीचा सुपीक भाग पाहून आर्यांनी येथील मूळ निवासी लोकांवर अनेकदा हल्ले केले. मूळ भारतीयांची वृत्ती समाधानी, शांतता प्रिय होती. आर्यांजवळ हल्ला करण्यासाठी वेगवान धावणारा घोडा हा प्राणी व दुरून मारा करण्यासाठी तीरकमान हे शस्त्र होते. दुसऱ्याला जिंकणे, परास्त करणे ही विचारधारा मूळ निवासियांची नसल्यामुळे व दुरून मारा करणाऱ्या शस्त्राच्या अभावामुळे मूळ निवासी आर्यांपुढे पराभूत झाले. विजयानंतर आर्यांनी सप्तसिंधूच्या प्रदेशाला आपले निवासस्थान बनविले. आर्यांनी येथील मूळ निवासी लोकांना अनार्य संबोधले.

आर्यांनी आपली संस्कृती निर्माण केली. आर्यांच्या संस्कृतीची माहिती वेदांमधून मिळत असल्यामुळे ही संस्कृती वैदिकसंस्कृती या नावाने ओळखल्या जाते. वैदिकसंस्कृतीबद्दल मा. म. देशमुख म्हणतात, ''वैदिक वाङ्. मयात या संस्कृतीची माहिती मिळत असल्यामुळे हिला वैदिकसंस्कृती म्हणतात.''[२] म्हणजेच आर्यांनी त्यांची संस्कृ ती वेदांमध्ये बद्ध केली. डॉ. कोलारकर यांच्या मते, ''सिंधुसंस्कृतीनंतर भारतात जी महान संस्कृती उदयाला आली आणि उत्कर्षाप्रत पोहोचली तिला वैदिकसंस्कृती असे नाव मिळाले. ज्यांनी या संस्कृतीला जन्म दिला ते स्वतःला आर्य म्हणवून घेत असे.''[३] यावरून असे स्पष्ट होते की, वैदिकसंस्कृती निर्माण करणारे स्वतःला आर्य समजत असे. संस्कृतमध्ये आर्य या शब्दाचा अर्थ उच्चकुलीन असा होतो. डॉ. एस. एल. नागोरी म्हणतात, ''सिंधू सभ्यता को नष्ट कर सप्त सिंधू प्रदेश में एक नई सभ्यता का विकास किया जो आर्य सभ्यता के नाम से प्रसिद्ध है। चुंकि इस सभ्यता को जानने का एकमात्र साधन वेद है, इसलिए यह वैदिक सभ्यता के नाम से भी प्रसिद्ध है।''[४] आर्यांनी वैदिकसंस्कृतीची निर्मिती करून वेदांद्वारे तिचा प्रसार सुरू केला.

## वैदिकसंस्कृचा प्रसार

वैदिकसंस्कृती प्रसाराच्या पूर्ववैदिक संस्कृती व उत्तरवैदिक संस्कृती या दोन अवस्था मानल्या जातात. या अवस्थांच्या प्रारंभ व शेवटाबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद दिसतात.

## अ) पूर्ववैदिक संस्कृती

पूर्ववैदिक संस्कृतीची सुरुवात ऋग्वेदकाळापासून मानली जाते. आर्यांच्या सप्तसिंधूत आगमनापासून सर्व घडामोडींची माहिती ऋग्वेदात मिळते. त्यामुळे हा काळ ऋग्वेदकाळ या नावानेही ओळखल्या जातो. या काळात धार्मिक जीवनामध्ये वरुण, इंद्र, पृथ्वी, अग्नी, उषा, सूर्य, यम, रुद्र इत्यादी देवतांचे महत्त्व वाढले. येथे आर्यांनी स्वतःच्या देवता निर्माण करताना अनार्यांच्या देवतांचा स्वीकार केलेला दिसतो. या देवतांची निवासस्थाने, नीतिकल्पना, तत्त्वज्ञान इत्यादी संबंधी कथा निर्माण करून कथांचे धार्मिक जीवनात महत्त्व वाढीस लागले.

## ब) उत्तरवैदिक संस्कृती

उत्तरवैदिक संस्कृतीच्या तीन अवस्था मानल्या जातात; पण या अवस्थांमधील ग्रंथाच्या निर्मिती काळाबद्दल अभ्यासकांमध्ये मतभेद आढळतात.

### १) ब्राह्मणकाळ

या काळात धर्मविधींची व धर्मविधी करणाऱ्या ब्राह्मणांची संख्या वाढली. यासंबंधी मा. म. देशमुख म्हणतात, ''या काळात महत्त्वाचे धार्मिक बदल झाले. धर्मविधींची संख्या वाढल्यामुळे ब्राह्मणांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊन त्यांचे महत्त्व वाढले. म्हणून या काळाला ब्राह्मणकाळ असे म्हणतात.''[५] या काळात धार्मिक जीवनामध्ये प्रजापिता, विष्णू व रुद्र इत्यादी देवतांना महत्त्व प्राप्त झालेले दिसते. प्रजापित्याने विश्व निर्माण केले अशी कल्पना रूढ झाली. प्रजापिता व अग्नीचे ऐक्य सांगून यज्ञ पद्धती व मंत्रतत्रांना महत्त्व आले. सर्वांचा पालनकर्ता विष्णू देवतेला मानले. रुद्र ही देवता ऋग्वेदकाळातही होती. बहुसंख्य लोक (अनार्य) या रुद्र देवतेची पूजा करीत. सिंधू संस्कृतीमध्ये सापडलेल्या पशुपतीच्या मूर्तीशी या रुद्र देवतेचे साम्य दिसते. रुद्र म्हणजे पशुपती (शिव) असावा. तसेच ''शिव (शंकर) हा अनार्यांचा लोकप्रिय देव होय.''[६] ब्राह्मण काळात प्रजापिता, विष्णू व रुद्र (शिव) यांना देवत्व दिले. या काळात यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, ब्राह्मणे, आरण्यके इत्यादी वैदिकसंस्कृती वाढविणारे ग्रंथ निर्माण झाले. ब्राह्मण काळातील यज्ञ संस्थेवर बऱ्याच सुधारणा सुचविणे सुरू झाले. या विचार मंथनातून उपनिषद तत्त्वज्ञानाचा उदय झाला.

## २) उपनिषदकाळ

ब्राह्मणकाळातील यज्ञ संस्कारामुळे आत्मशांती मिळत नाही किंवा अंतिम सत्य प्राप्त होत नाही, असे वाटल्यामुळे यज्ञ संस्कारासंदर्भात मत भिन्नता झाली. यावर विचारमंथन सुरू झाले. यामधूनच विचारवंताचे लक्ष तत्त्वचिंतन व तपश्चर्येकडे आकर्षित झाले. त्यातूनच उपनिषद तत्त्वज्ञानाचा उदय झाला असावा.

उपनिषद काळात धार्मिक जीवनात तत्त्वचिंतनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. जिज्ञासू व्यक्ती गुरूजवळ बसून ज्ञानधारणा करू लागले. उपनिषदे (गुरूजवळ बसून शिकलेला ज्ञानाचा संग्रह) निर्माण झाली. याकाळात उपनिषदे, वेदांगे, उपवेद इत्यादी वैदिकसंस्कृतीचा प्रसार करणारे ग्रंथ निर्माण झाले. वैदिकसंस्कृतीचा ग्रंथविस्तार येथपर्यंतच थांबला नसून, पुढे महाकाव्ये व पुराण यांची निर्मिती होऊन वैदिकसंस्कृतीचा प्रसार होत राहिला.

## ३) महाकाव्ये व पुराणकाळ

महाकाव्ये व पुराणांमधील घटना व लेखनकाळ यासंबंधी अभ्यासकांमध्ये एकमत नाही. महाकाव्यांमध्ये रामायण व महाभारत या दोन महाकाव्यांचा अंतर्भाव होतो. रामायणाचा कर्ता वाल्मिकी, व महाभारताचा कर्ता व्यास यांना मानल्या जाते. महाकाव्यांच्या निर्मितीत अनेकांनी भर घातली असावी, हे महाकाव्यांमधील वाढत गेलेल्या श्लोकसंख्येवरून दिसते.

महाकाव्यांना जसे मानवी जीवनात महत्त्वाचे मानले, तसेच पुराणांनाही महत्त्वाचे मानले आहेत. पुराणांमध्ये प्राचीनकाळच्या कथांचा व आख्यायिकांचा संग्रह आहे. याबरोबरच राजवंशावळ, धर्मभावना, विधी, धर्माचार, व्रतवैकल्ये, देवतांची निर्मिती, सृष्टीची निर्मिती इत्यादी संबंधी कथा आहेत. पुराणांची संख्या १८ मानल्या जाते व तेवढीच संख्या उपपुराणांची मानतात.

## निष्कर्ष

आर्यांनी अनार्यांचा पराभव केल्यानंतर स्वत:ची संस्कृती निर्माण करून तिचा प्रसार सुरू केला. आर्यांच्या संस्कृतीचा प्रसार पूर्ववैदिक संस्कृती व उत्तरवैदिक संस्कृती या दोन अवस्थांमधून झाला. या अवस्थांमध्ये तयार केलेल्या वैदिक वाङ्मयातून वैदिकसंस्कृतीचे आविष्करण होते. वैदिक वाङ्मयामध्ये चार वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, वेदांगे, उपवेद, महाकाव्ये, पुराणे इत्यादींचा उल्लेख करता येतो. आर्यांच्या संस्कृतीत वेदांना अधिक महत्त्व असल्यामुळे तसेच वैदिक वाङ्मयामधून या संस्कृतीचे आविष्करण होत असल्यामुळे आर्यांची संस्कृती वैदिकसंस्कृती या नावाने ओळखल्या जाते.

## संदर्भ

१) देशमुख मा. म., 'प्राचीन भारताचा इतिहास', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, जानेवारी १९९८, पृ.३९.
२) देशमुख मा. म., तत्रैव, पृ.३७.
३) डॉ. कोलालकर श. गो., 'भारताचा इतिहास—आरंभापासून ते १६०५ पर्यंत', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, १९८४, पृ.३०.
४) डॉ. नागोरी एस. एल., 'भारतीय संस्कृती', बोहरा प्रकाशन, जयपूर, पहिली आवृत्ती, १९८५, पृ.१५.
५) देशमुख मा. म., उनि., पृ.५३.
६) देशमुख मा. म., उनि., पृ.६५.

❖❖❖

# कोरोना आणि डिजिटलायझेशन

# Corona and Digitalization

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## गोषवारा

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सर्वत्र गंभीर वातावरण निर्माण झालेलं आहे. लॉकडाऊन किंवा 'वर्क फ्रॉम होम'च्या काळात डिजिटलायझेशन ही एक अनिवार्यता झाली आहे. या काळात साहित्यिकांची, कलाकारांची आणि शिक्षण क्षेत्राची सर्वाधिक सक्रियता पाहायला मिळाली, ती सोशल मिडियावर. भविष्यात शाळांमध्ये शिकविले जाणारे शिक्षण हे ऑनलाईन पद्धतीने होऊ लागले तर त्यासाठी विविध प्रकारचे ऑनलाईन साहित्य निर्माण करावे लागेल. फक्त पाठ्यपुस्तके पीडीएफ करून हे काम होणार नाही तर डिजिटल माध्यमांसाठी मातृभाषेतील मजकूर म्हणजेच कंटेट तयार करावा लागेल. ग्रामीण आणि शहरी भागात 'डिजिटल विषमता' आहे. मात्र विविध अडचणींवर मात करीत येणाऱ्या परिस्थितीला डिजिटालायझेशनच्या माध्यमातूनच सामोरे जावे लागणार आहे.

## Abstract

The outbreak of the corona virus has created a serious atmosphere everywhere. Digitalization has become a necessity in times of lockdown or 'work from home'. During this period, the greatest activism of writers, artists and the education sector was seen on social media. In the future, if the teaching in schools is to be done online, a variety of online materials will have to be created. This will not only be done by PDFing the textbooks, but also by creating content in the mother tongue for digital media. There is 'digital inequality' in rural and urban areas. However, the situation of overcoming various difficulties will have to be faced only through digitization.

**बीजशब्द** : कोरोना, डिजिटलायझेशन, लॉकडाऊन, सोशल मिडिया, युनिकोड

## प्रस्तावना

चीनमधील वुहानमध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण आढळला, त्याला आता एक वर्ष पूर्ण झालं आहे. चीनमधील कोरोना रुग्णांची संख्या कमी होत गेली, त्याच वेळी जगात आणि विशेषत: अमेरिका आणि युरोपमध्ये या रोगाने थैमान घातलं. भारताचा विचार केला तर अजूनही कोरोनाचा धोका संपलेला नाही. दुसरी लाट काही भागात आल्याचे निदर्शनास येते. महाराष्ट्राची स्थितीही याबाबतीत फारशी समाधानाची नाही.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सर्वत्र गंभीर वातावरण निर्माण झालेलं आहे. प्रत्येक दिवशी देशात आणि राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये कोरोनाचे रुग्ण आढळत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून सरकारतर्फे नागरिकांनी घरात राहण्याचं वारंवार आवाहन केलं जात आहे. गर्दीची ठिकाणं टाळा असे सल्ले सतत देण्यात येत आहेत. प्रारंभी देशभरात जनता कर्फ्यू पाळला गेला. अत्यावश्यक सेवा देणाऱ्या व्यक्तींचं कौतुकही केलं गेलं आणि देशाने लॉकडाऊनचा अनुभवही घेतला.

आज आपण सर्वजण अशा परिस्थितीतून जातोय जिथे उद्या काय होईल हे कुणालाच सांगता येणार नाही. आपल्या मनात सध्या प्रचंड भीती आहे. अजूनही आपण आपल्या घरी बंद खोलीत राहतोय. बाहेरच्या

जगाशी आपला फारसा संपर्क होत नाही. अशा लॉकडाऊन किंवा 'वर्क फ्रॉम होम'च्या काळात डिजिटलायझेशन ही एक अनिवार्यता झाली आहे.

## विषय विवेचन

कोरोनासारखी परिस्थिती आजच आली, असे नाही. साधारणत: दर शंभर वर्षांनी कोणती ना कोणती मोठी आरोग्यविषयक संकटे जगावर आलेली आहेत.

ब्रिटिश लेखक डेनियल डेफो यांनी 1722 साली एक पुस्तक लिहिलं होतं ज्याचं नाव होतं 'ए जर्नल ऑफ द प्लेग इअर'. डेफो यांनी या पुस्तकात 1665 साली ब्रिटनची राजधानी लंडनमध्ये पसरलेल्या प्लेगच्या साथीबाबत विस्तृत लिहिलं आहे. तेव्हाचं भयावह चित्रण या पुस्तकात केलं गेलं आहे. प्लेगच्या साथीमुळे जे तिथे आरोग्य संकट आलं त्याचा संपूर्ण लेखाजोखा या पुस्तकात मांडण्यात आला आहे. सद्यपरिस्थितीशी मिळतं जुळतं हे पुस्तक आहे.

तेव्हा लंडनमध्ये नवीन नियम लागू झाले होते. हे नियम तसेच होते, जसे आत्ता लॉकडाऊनच्या काळात आपण सगळे पाळतोय. तेव्हा लंडनमध्येही सार्वजनिक कार्यक्रम, बार, ढाबे, हॉटेल अशा सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमण्यावर बंदी घालण्यात आली होती. मैदानं, स्टेडियम्स सर्वकाही बंद होतं. डेनियल डेफो म्हणतात, "लंडनचे नागरिक हे नियम काटेकोरपणे पाळत नव्हते. ते बेफिकिर होते आणि लंडनसाठी हेच सर्वाधिक घातक ठरत होतं. सामान खरेदी करण्यासाठी गर्दी करायचे. बघता बघता प्लेगने हिंसक वळण घेतलं. संपूर्ण कुटुंब, वस्तीतले रहिवासी सगळ्यांचा प्लेगनं मृत्यू होत होता." या घटनेला आता तीनशे वर्षे पूर्ण होत आहेत.

भारतातही 100 वर्षांपूर्वी प्लेगची साथ आल्यावर परिस्थिती भीषण झाली होती. त्यावर भाष्य करणारी साहित्यनिर्मिती विपुल प्रमाणात झाली होती. वृत्तपत्रांतून विस्ताराने बातम्या आल्या होत्या.

अशा या वातावरणात कला आणि साहित्य आपल्या एकटेपणाला दूर करतं. आपल्याला वास्तवापासून थोडं बाजूला करत दिलासा देतं. बंद खोलीत आपली मैत्री पुस्तकांशी होते, म्हणूनच जागतिक आरोग्य संकटावर आधारित असलेल्या पुस्तकांची मागणी आज वाढली असल्याचे निदर्शनास येते.

संशोधनात्मक निबंध व वृत्तपत्रीय लेखांप्रमाणेच अशा अनेक कथा, कादंबऱ्या, कविता निर्माण झाल्या आहेत की ज्या जागतिक आरोग्य संकटाचं वास्तव मांडतात. एखाद्या डायरीप्रमाणे या पुस्तकांमध्ये माहिती असते. या संकटाला धीरानं कसं सामोरं जायचं हे ती पुस्तकं सांगतात.

आज जगभरात थैमान घालणाऱ्या जीवघेण्या कोरोना व्हायरसनं साहित्यसृष्टीला आणि मनोरंजन सृष्टीलासुद्धा धडक दिली आहे. काही साहित्यिकांना, काही कलाकारांना या व्हायरसची लागण झाली. या विषाणूचा प्रकोप वाढत गेला तसे साहित्यातून आणि विविध कलांमधून त्याचे चित्रण होत गेले. छपाईची कामे बंद झाल्याने आणि नियतकालिके, वृत्तपत्रेही काही काळासाठी पूर्ण बंद झाल्याने सोशल मिडिया व डिजिटल कटेंटच्या माध्यमातून साहित्य निर्माण होत होतं. नंतर नियतकालिके आणि वृत्तपत्रांच्या ऑनलाईन आवृत्त्या निघणे सुरू झाले आणि साहित्यिकांना पुन्हा व्यासपीठ उपलब्ध झाले.

या काळात साहित्यिकांची आणि कलाकारांची सर्वाधिक सक्रियता पाहायला मिळाली, ती सोशल मिडियावर. त्यातही सोशल नेटवर्किंग आणि शेअरिंग साईटपैकी फेसबुक, व्हॉट्सअप, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट, यू ट्युब, ट्विटर, ब्लॉग्ज या माध्यमांवर अधिक निर्मिती होत होती आणि आताही होत आहे.

यात कोणी बॉलिवूडच्या गाण्यांवर कोरोना व्हर्जन तयार केली तर कोणी कविता रचल्या. मार्च महिन्यात बिग बी अमिताभ बच्चन यांनी भोजपुरी भाषेत कोरोना व्हायरसवर एक कविता लिहिली होती. त्याचा व्हिडीओ त्यांनी त्यांच्या ट्विटरवरून शेअर केला होता, ज्याचं मराठी व्हर्जन अभिनेता सुनिल बर्वे यांनी सादर केलं. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला.

'वर्क फ्रॉम होम' म्हणजेच घरून काम करण्याची वेळ आज अनेकांवर आली आहे. पण हा बदल तात्पुरता नसून, आता हीच कार्यपद्धती कायमची करता येईल का, याचा जागतिक पातळीवर विचार होतो आहे. टीसीएस म्हणजेच टाटा कन्सलटन्सी सर्विस सारख्या कंपन्यांनी २०२५ पर्यंत आपले ७५ टक्के कर्मचारी घरून कसे काम करतील, या दिशेने प्रयत्नही सुरू केले आहेत. जगभरात अनेक कंपन्या हे करीत आहेत. अनेक शाळा-महाविद्यालयांनी 'लर्न फ्रॉम होम' सारख्या घोषणा करत ऑनलाइन शिक्षण द्यायला सुरुवात केली आहे.

याचाच अर्थ माणसे अधिकाधिक वेळ घरी राहणार आहेत. घरी असलेली माणसे घरातील लोकांशी प्रत्यक्ष आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जगाशी अप्रत्यक्षरीत्या संवाद साधणार आहेत. त्यांच्या या घरातील आणि जागतिक संवादाच्या भाषा कदाचित वेगवेगळ्या असू शकतील. 'मातृभाषा या स्वयंपाकघरात बोलण्याच्या भाषा उरतील' असे ज्येष्ठ कानडी लेखक शिवराम कारंथ म्हणत असत. पण त्यांचे हे भाष्य अशा संदर्भात प्रत्यक्षात येईल याची कदाचित त्यांनाही कल्पना करता आली नसेल. त्यामुळे माणसाच्या आयुष्याची दिशा जशी बदलणार आहे, तसाच हा भाषाव्यवहारही बदलणार आहे, याची तयारी सर्वांना करावी लागेल. किंबहुना ज्या भाषा ही तयारी करतील त्याच टिकतील, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

जर भविष्यात शाळांमध्ये शिकविले जाणारे शिक्षण हे ऑनलाइन पद्धतीने होऊ लागले तर त्यासाठी विविध प्रकारचे ऑनलाइन साहित्य निर्माण करावे लागेल. फक्त पाठ्यपुस्तके आणि आवश्यक अभ्यास साहित्य पीडीएफ करून हे काम होणार नाही तर डिजिटल माध्यमांसाठी मातृभाषेतील मजकूर (म्हणजेच कंटेट) तयार करावा लागेल. तो मजकूर फक्त शब्दस्वरूपात नसेल, तर तो मल्टिमीडिया, गेम्स या स्वरूपात असेल. हा मजकूर जी भाषा तयार करू शकेल, तीच या ऑनलाइन माध्यमात लोकप्रिय ठरेल. जी भाषा लोकप्रिय ठरेल तिच्यातून आपल्या पाल्यांना शिकविण्याचा पालकांचा कल वाढेल. म्हणूनच मराठीसारख्या भाषांनी या नव्या माध्यमांपासून लांब न पळता, या माध्यमाच्या गरजा समजून त्या दिशेने काम करायला हवे.

आजवर मराठी भाषेच्या आणि भारतीय भाषांच्या भवितव्याविषयी प्रचंड लेखन झाले आहे. काय करायला हवे, याबद्दल भाषणे, परिसंवाद आणि वाद-विवादही झाले आहेत. आता या पलीकडे जाऊन भाषेचे माध्यम बळकट करण्यासाठी काम करावे लागणार आहे.

आज डिजिटल दळणवळण म्हणजे माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. कोरोनाचा प्रसार होण्यापूर्वीही तो वाढलेलाच होता. पण कोरोनाकाळात तो त्याच्या शिखरावर पोचला आहे. तो आणखीही वाढणार आहे. कोरोनानंतर भौतिक दळणवळण पुन्हा सुरू होईल. पण त्यासोबत माहितीचा वेगही वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत जाईल. आजपर्यंत 'तेल' हे जसे जगाचे चलन होते, पण भविष्यात तेलासोबच 'डेटा' हे देखील जगाचे नवे चलन असणार आहे. भौतिक दळणवळणासाठी 'तेल' आणि डिजिटल दळणवळण म्हणजे माहितीच्या वेगासाठी 'डेटा' हे सूत्र विविध मानवी व्यवहाराचा आधार ठरणार आहे.

'डेटा' नावाचे नवे चलन सामान्यांच्या भाषेत जेव्हा प्रकट होईल तेव्हा ते फक्त इंग्रजी किंवा निवडक भाषांमध्ये नसेल. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या गुगल, मायक्रोसॉफ्टसारख्या अनेक कंपन्या आज 'लोकलायझेशन'वर मोठी गुंतवणूक करत आहेत. बॅकएंडच्या तंत्रज्ञानाची भाषा वेगळी आणि फ्रंटएंडची म्हणजे दृश्यभाषा वेगळी असे हे गणित आहे. अन्य भारतीय भाषांप्रमाणेच मराठीतही हे काम होत आहे. जगभर विखुरलेलेले तज्ज्ञ या स्थानिकीकरणाच्या प्रक्रियेत काम करत आहेत. या सर्व कामावर लक्ष ठेवून तिला योग्य ती दिशा देण्याचे काम पालक म्हणून सरकारचे आहे. सरकारसोबत भाषाविषयक संस्थांनी मिळून हे काम केल्यास ते अधिक सोपे आणि सार्थक ठरेल.

भाषा हे संवादाचे माध्यम असते. विविध प्रकारच्या संवादासाठी विभिन्न भाषा वापरल्या जातात. या भाषांमध्ये परस्पर देवाणघेवाण होत असते. जसे भाषांचे माध्यम म्हणून स्थान जपणे आवश्यक, तसेच त्यासाठी नव्या माध्यमाची नवी भाषाही समजून घ्यावी लागेल. जशी दोन भाषांमध्ये देवाणघेवाण हवी तशीच भिन्न माध्यमांमध्येही देवाणघेवाण होत असते. कोरोनानंतरच्या काळात आपला डिजिटल माध्यमांमधला संवाद

वाढणार आहे. त्यामुळे आजवर फक्त बोली, लेखी किंवा ध्वनी-दृश्य माध्यमांपुरतीच वापरली गेलेली ही भाषा डिजिटल माध्यमांसाठीही तयार करावी लागणार आहे. भाषासंस्कृतीनुसार नवे इमोजी करणे, नवे लघुशब्द (शॉर्टफॉर्म्स) रूढ करणे आदी गोष्टींवर काम होणे गरजेचे आहे.

ओरिसा येथील कलिंगा विद्यापीठात एक छान प्रयोग राबविला जातो. ओरिसातील विविध आदिवासी जमातीतील मुले जेव्हा कलिंगा विद्यापीठात शिकायला येतात, तेव्हा त्यांना त्यांच्या स्थानिक भाषेतून ओडियामध्ये आणि पुढे ओडियामधून इंग्रजीमध्ये शिकणे सोपे जावे, तसेच या साऱ्या प्रक्रियेत त्यांच्या तिन्ही भाषा समृद्ध व्हाव्यात यासाठी विद्यापीठामध्ये भाषेची प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. यात वेगवेगळ्या स्तरावरील भाषांमधील संवाद समजावा, त्यात समृद्धता यावी यासाठी विविध प्रयोग केले जातात. त्यात अगदी शालेय स्तरापासून ते महाविद्यालयीन स्तरापर्यंतच्या विविध संकल्पनांचा विचार होतो. हा प्रयोग सर्वच भारतीय भाषांमध्ये व्हायला हवा.

आज सर्वत्र व्हिडीओचा जमाना आहे. पण भारतीय भाषांमध्ये सबटायटल, डबिंगसारख्या गोष्टी करायच्या म्हटल्या तरी आधारभूत संस्था किंवा साधने नाहीत. या प्रयोगशाळेच्या माध्यमातून हे सारे उभे करता येईल. भाषाभाषांमधील संवाद यातून सोपा होईल. आज सारे जग नव्या डिजिटलयाझेशनच्या दिशेने जात असताना, आपण यात मागे पडून चालणार नाही. डिजिटल पेमेंट, ऑनलाइन बँकिंगसारख्या अर्थव्यवहारातही विविध भारतीय भाषांचे स्थान दृढ करणे अत्यंत आवश्यक आहे.

हा डिजिटल कंटेंट शाळा, महाविद्यालयांसाठी लागणार आहे, बँकासाठी लागणार आहे आणि व्यापाऱ्यांच्या मोबाइल ॲपसाठीही लागणार आहे. साहजिकच अभ्यासकांप्रमाणेच तो साहित्यिकांनाही आवश्यक ठरणार आहे. पण त्यासाठी लागणारे मनुष्यबळ घडविणाऱ्या संस्था नाहीत. या संस्थांना पाठबळ देणारी धोरणे तयार करणे गरजेचे आहे.

सकस डिजिटल कंटेट उभा करणे. हे काम आज वैयक्तिकरीत्या किंवा व्यावसायिकरीत्या होत आहे. पण एक भाषा म्हणून भाषेसंदर्भातील विविध पद्धतींचा बहुभाषक समूहांनाही कळेल असा डिजिटल मजकूर तयार होणे गरजेचे आहे.

नवे शब्द रूढ करण्याचे काम माध्यमे आणि समाजमाध्यमे करत असतात. पण त्यावर लक्ष देऊन त्याच्या योग्ययोग्यतेची चर्चा व्हायला हवी. शब्दकोष, व्युत्पत्तीकोश, संकल्पनाकोश अशी कोशनिर्मिती सातत्याने, सकसतेने आणि डिजिटली व्हायला हवी. अन्य भाषेतील शब्द मोकळेपणाने स्वीकारायला हवे. आज विकिपीडियासारख्या मराठी मुक्तकोशामध्ये, मराठी डिजिटल कोशांमध्ये नव्या संकल्पना स्वीकारणे गरजेचे आहे.

मराठी आणि मराठीच्या सर्व बोलीभाषा शिकण्यासाठी किंवा त्यातील मजा अनुभवण्यासाठी विविध डिजिटल प्लॅटफॉर्म उभे राहायला हवे. ई-मराठी शाळा व महाविद्यालये उभी होणे आवश्यक आहेत. त्यात आनंदाने मराठी भाषा शिकता येईल असे नवनवे प्रयोग करावे लागतील. सोशल मीडियावर माहितीच्या संकलनासाठी नवनव्या संकल्पना वापरल्या जातात. उदाहरणार्थ हॅशटॅग, ट्रेण्ड वगैरे. या अशा संकल्पनांचा उपयोग करून मराठीत नवनवी माहिती संकलन व्हायला हवी.

आज मराठी युनिकोड लोकप्रिय झाले असले, तरी त्यात नवनवे फॉंट उपलब्ध नाहीत. मंगल, कोकिळा यांच्यापुढे आपण सरकत नाही. अद्यापही प्रकाशन व्यवसायात युनिकोडचा वापर होत नाही. हे सारे असेच चालू राहिले तर मराठीचा डिजिटल वेग मंदावेल.

एकंदरीत या नव्या जगाचे चलन असणारा मराठी डेटा उभा करणे, हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. जेवढा उत्तम, सकस आणि समृद्ध डेटा आपण तयार करू तेवढीच आपली भाषा उद्याची आव्हाने पेलायला समर्थ होणार आहे.

खरं तर यातील अनेक गोष्टी कोरोनापूर्वीच्या काळातही आवश्यक होत्या. पण याकडे आजवर दुर्लक्ष झाले, पण आता तातडीने विचार व्हायला हवा. कारण कोरोनानंतरच्या काळात माहितीचा वेग आणखीच वाढणार आहे आणि लोकांची जीवनशैलीही बदलणार आहे. त्या दिशेने पावले उचलायला हवीत.

आपल्या काही हाय प्रोफाइल उपभोक्त्यांसाठी ऑगस्ट, २०१५ मध्ये फेसबुकने 'लाइव्ह'ची सुविधा दिली. मार्क झुकेरबर्ग यांच्या या संकल्पनेची चंगळवादी चोचले म्हणून संभावना केली गेली असली, तरी त्याच वर्षी मार्कने ठरवून टाकले, की आयफोन आणि अँड्रॉइड फोन असलेल्या सगळ्यांना या सेवेचा लाभ दिला जाईल. प्रत्येकाच्या खिशात टीव्ही कॅमेऱ्यासारखी वस्तू असावी, हे त्याचे स्वप्न होते. तेव्हा मार्क झुबेरबर्ग यांनी हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी जवळ जवळ शंभर तंत्रज्ञांना काही महिने, आत्ताच्या भाषेत आपण म्हणू क्वारंटाइन केले आणि यात यश मिळवले. एप्रिल २०१६पासून ही सुविधा सर्वांसाठी खुली झाली. करोनाकाळात हेच तंत्रज्ञान रचनात्मक पातळीपासून इतर सगळ्याच क्षेत्रात उपयोगी सिद्ध होत आहे.

असे असले तरी 'डिजिटल विषमता' आहेच. २०१९च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणातील आकडेवारीतून डिजिटल विषमतेचे वास्तव समोर आले. महाराष्ट्राचाच विचार केला, तर ग्रामीण भागात केवळ ३.३ टक्के घरात संगणक आणि १८ टक्के घरात इंटरनेट सुविधा आहेत. शहरात हे प्रमाण अनुक्रमे २७ आणि ५२ टक्के असे आहे. अशाही स्थितीत घरात 'आटा' नसला, तरी 'डाटा' उपलब्ध करून, अनेकांनी हा सांस्कृतिक व्यवहार समृद्ध होण्याला आणि मोठ्या जनसमुदायाला निराशेच्या, औदासिन्याच्या गर्तेतून वाचवण्यात मोठाच हातभार लावलेला आहे.

## समारोपीय निष्कर्ष

लॉकडाउनच्या या दीर्घ काळात शिक्षण आणि सांस्कृतिक घडामोडी, सांस्कृतिक अवकाश जिवंत ठेवण्यासाठी ही डिजिटल माध्यमे उपयुक्त ठरली. ऑनलाईन क्लासेस, सांस्कृतिक विश्वातील कलाकार, साहित्यिक, रंगकर्मी, लोककलावंत अशा सगळ्या घटकांची घरबंदीच्या निरसतेतून सुटका करत एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, नवीन सृजनासाठी या माध्यमाचा उपयोग झालेला दिसतो. फेसबुक, झूम, गुगल मीट, यु ट्युब अशा 'लाइव्ह'च्या या प्रयोगांचे मूल्यमापन करताना लक्षात येते, की आपल्याकडे हे माध्यम हाताळताना काहीसा दूरदृष्टीचा अभाव आहे. सांस्कृतिक क्षेत्रातील साहित्यिक घडामोडींवर, विशेषतः काव्यमैफलींची सर्वाधिक पकड राहिलेली आहे. समग्र कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात व्यापक ऑनलाइन माध्यमांच्या वापराची आज गरज आहे. नवीन दृष्टीचा आविष्कार आत्ता आत्ता दिसू लागला आहे. घराच्या चार भिंतीत राहून, मोबाइल, संगणकावर मर्यादित स्पीड असलेल्या इंटरनेट व्यवस्थेवर मात करत, अनेक कार्यक्रम, चर्चासत्रे, वेबिनार आयोजित करून लोकांच्या ज्ञानात भर टाकली जात आहे. एका मोठ्या समुदायाला एकांतवासाची, तुटलेपणाची झळ बसू न देता, त्यांना रचनात्मक कामात गुंतवून, त्यांचे सांस्कृतिक विश्व समृद्ध केले जात आहे. त्याचप्रमाणे उद्याचे शिक्षण हे डिजिटल कंटेंटच्या माध्यमातूनच होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या नव्या बदलाला कितीही अडचणी आल्या तरी सामोरं जावं लागणार हे नक्की!

## संदर्भ साहित्य

1. Mandavkar, Pavan, Coronavirus: Basic Information and Precautionary Measures (April 12, 2020). Available at SSRN: https://ssrn.com/abstract=3573881 or http://dx.doi.org/10.2139/ssrn.3573881
Researchgate:
https://www.researchgate.net/publication/340583863_Coronavirus_Basic_information_and_precautionary_measures

2. मांडवकर, डॉ. पवन, मराठी साहित्य आणि वैश्विक महामारी (Language, Literature, Culture and Pandemic), स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य, व श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथील राष्ट्रीय वेबिनारमधील भाषण, दि. 19 डिसेंबर, 2020

❖❖❖

## Form IV
(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका (MPSP)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre**, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual (January)** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401







☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

e mail: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For RJI: researchjournalofindia@gmail.com

For MPSP: marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983



| | | | |
|---|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** | **₹ 500/-** |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** | |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** | |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** | |
| **MICR coe** | - | **445014001** | |
| **A/c No.** | - | **60175373000** | |
| **A/C Name** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** | |



**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**



p-ISSN 2454-7409

9 772454 740009

e-ISSN 2582-5305

9 772582 530008



digitalblasphemy.com